वर्ष अकरावे, अंक पाचवा, जानेवारी २०१८ मासिक अंकाची किंमत रु. पाच
वार्षिक वर्गणी रुपये १००/– (विशेषांक रु २५/–)

# ‘स्व’-रूपवर्धिनी कार्यवृत्त २०१७




## विश्वविजयी संबोधनाचे १२५ वे वर्ष

“माझा जन्म ज्या धर्मात झाला तो धर्म परमतसहिष्णू आहे, एवढेच नव्हे, तर जगातले सर्वच्या सर्व धर्म पूर्णतया सत्य आहेत, असे तो मानतो. धार्मिक अत्याचारांनी निर्वासित झालेल्या विविध धर्मांच्या अनुयायांना आम्ही आपल्या पोटात आनंदाने जागा दिली, हे मी अभिमानपूर्वक सांगतो.”

स्वामी विवेकानंद
(सर्वधर्म परिषद, शिकागो, ११ सप्टेंबर १८९३)

विशेष आभार

टाटा मोटर्स
पर्सिस्टंट फाऊंडेशन
कॉटनकिंग
टाटा पॉवर
बजाज अलायन्झ
मर्सिडीज बेन्झ
प्रबोध उद्योग
ओंकार न्यास



# ‘स्व’-रूपवर्धिनी

## कार्यवृत्त २०१७

**संपादक**

श्री. जयंत कवठेकर

**संपादकीय मंडळ**

श्री. सुनील कुलकर्णी

सौ. मंजुषाताई कुलकर्णी

श्री. निलेश धायरकर

कु. अहिल्या धायगुडे

**दूरध्वनी संपर्क**

श्री. जयंत शंकर कवठेकर

संपर्क दूरध्वनी क्र. (घर) २४२२१२९४

(कार्यालय)२६१२१७०४, २६१३४३१०

भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६

किंमत रुपये ५/-

वार्षिक वर्गणी रुपये १००/- (विशेषांकासह)

आजीव सभासद फी - रु.१०००/- फक्त

चेक अथवा ड्राफ्ट ‘स्व’-रूपवर्धिनी

या नावाने काढावा.

## अंतरंग

❖ हृदगत

❖ अध्यक्षीय मार्गदर्शन

❖ विशेष लेख

❖ विभागश: वार्षिक वृत्त

❖ आर्थिक स्थिती व आवाहन

**❖ छपाई ❖**

प्रबोध उद्योग, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२.

सर्व कायदेशीर बाबी पुणे कोर्टाच्या अखत्यारीत. हे मासिक ‘स्व’-रूपवर्धिनी संस्थेच्या मालकीचे असून संस्थेच्या वतीने मुद्रक व प्रकाशक श्री. शिरीष पटवर्धन यांनी प्रबोध उद्योग, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे छापून २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ११ येथे प्रसिद्ध केले.

**वार्षिक विशेषांक** **मुखपृष्ठ – चित्रकार श्री. दिलीप कदम**

# ‘स्व’–रूपवर्धिनी कार्यकारिणी


## सन्माननीय सभासद

*** श्री. प्रमोद चौधरी * पद्मश्री श्री. प्रतापराव पवार**

## संस्थापक सदस्य

* कै. पु. व. श्रॉफ
* कै. दत्तोबा तांबे
* कै. रा. प. देसाई
* कै. कृ. ल. पटवर्धन
* कै. अ. न. गोगावले
* कै. कां. गि. शहा
* कै. कृ. गो. लवळेकर
* श्री. श्री. शं. सामळ

## विश्वस्त मंडळ

**अध्यक्ष**
पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर

**उपाध्यक्ष**
श्री. उदय गुजर (शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रम)
श्री. शिरीष पटवर्धन (जनसंपर्क आणि विस्तार)

**कार्याध्यक्ष**
श्री. रामभाऊ डिंबळे

**सहकार्याध्यक्ष**
प्रा. संजय तांबट (संघटन कार्य)
श्री. विश्वास कुलकर्णी (प्रशासन आणि प्रकल्प)

**कोषाध्यक्ष**
श्री. विलास कुलकर्णी

**सहकोषाध्यक्ष**
श्री. सुमित डोळे

**कार्यवाह**
श्री. ज्ञानेश पुरंदरे

**सदस्य**
श्री. कन्हैयालाल बलदोटा
डॉ. विनेश नगरे

**सहकार्यवाह**
श्रीमती पुष्पाताई नडे (महिला विभाग)
श्री. विनोद बिबवे (शाखा आणि युवा विभाग)
श्री. अरविंद केळकर (प्रशासन आणि प्रकल्प)
श्री. अमोल उंदरे (विकास आणि विस्तार)

**विश्वस्त मंडळाचे मानद सदस्य**

* पद्मश्री श्री. मिलिंद कांबळे * श्री. सुधीर दरोडे * श्री. अविनाश धर्माधिकारी * कॅ. (नि.) सनतदादा भाटे


**पंजीकृत न्यास रजि. नं.एफ/१६९४, पुणे. सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट नोंदणी क्र. :** MAH/588/Pune/80
**फॉरिन कॉन्ट्रीब्युशन रेग्यु. ॲक्टनुसार नोंदणी क्र.०८३९३०२६०**
**PAN No. : AAATS 5461K**


संपर्काचा पत्ता : – ‘स्व’–रूपवर्धिनी, २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे – ४११०११.
दूरध्वनी : – (कार्यालय) – (०२०) २६१२१७०४, २६१३४३१०, मो. :९०११३८६३८६
भ्रमण दूरध्वनी क्र. ९८२२६७५७६५ (पटवर्धन) ९८२२६७५७६० (पुरंदरे) ९८२२८२३७५७ (श्रीमती नडे)
ई–मेल : wardhinee@gmail.com वेबसाईट : http://www.swaroopwardhinee.org


**धनादेश ‘स्व’–रूपवर्धिनी या नावाने काढावेत.**

देणगीसाठी आयकर सवलतीचा तपशील :

**50% Exemption available under Sec. 80G of the Income Tax Act 1961**

अर्ध्या कच्च्या, गरीब गलिच्छ वस्त्यांमध्ये राहणाऱ्या, काय शिकावे आणि कसे शिकावे हे सांगणारे कुणीच पाठीशी नसणाऱ्या आणि या सर्वांमुळे उनाड, दंगेखोर, मागास असा शिक्का बसणाऱ्या अडल्यानडल्या वंचित मुलामुलींना मायेने जवळ करून जिद्दीने शिकायला प्रवृत्त करणारी 'स्व'-रूपवर्धिनी ही जातीजातींमधील दरी भरून काढणारी देशसेवी संघटना आहे. गेल्या ३८ वर्षात वर्धिनीने कितीक मुलामुलींना शैक्षणिक यश आणि त्यापाठोपाठ मानाचे जिणे प्राप्त करून दिले आहे.

कोणत्या संस्कारातून अशी यशस्वी मुले घडतात याचा विचार करण्यासाठी आणि ही प्रक्रिया अधिक प्रभावी करण्यासाठी दि. ६ व ७ जानेवारी २०१८ रोजी डोणजे येथे शैक्षणिक परिषद आपण घेतली. प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ डॉ. अ.ल.देशमुख आणि वर्धिनीचे अध्यक्ष डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी उपस्थित ३० कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

वंचित वस्त्यांमधील मुले स्पर्धात्मक जीवनात इतरांच्या बरोबरीने यशस्वी व्हायची तर त्यासाठी त्यांनी उच्च महत्त्वाकांक्षा ठेवली पाहिजे; अतिशय चिकाटीने आणि सातत्याने मेहनत केली पाहिजे, अशक्य असे काहीच नाही हे मनात धरले पाहिजे, आधुनिक संसाधनांचा वापर केला पाहिजे. परीक्षांमधील गुणवत्ता मिळवायला पर्याय नाही हे जाणून अभ्यास केला पाहिजे असे विचार या तज्ज्ञांनी मांडले.

गेले ६ महिने कार्यकर्त्यांचा अभ्यासगट या विषयावर चर्चा करीत आहे. त्यातून विविध विषयांचा सखोल विचार करणारे उपगट काम करीत आहेत. वंचितांच्या शिक्षणाचे नवे अनुभवसिद्ध प्रारूप त्यातून आकारास येत आहे. आपले ज्येष्ठ मार्गदर्शक नरवणे सर आणि तरुण विचारवंत संजय तांबट यांनी अभ्यासपूर्ण टिपणे लिहिली आहेत.

आपल्या १७ शाखांमधून जी शिक्षणप्रक्रिया राबवत आहोत, त्यात पुष्कळ भर घालणे गरजेचे आहे. ही भर या ३० अभ्यासकांच्या विचारमंथनातून आणि ज्येष्ठ विचारवंतांच्या मार्गदर्शनाखाली आकारास येत आहे, हे विशेष. गेली ४-५ वर्षेकार्यकर्त्यांनी विविध बैठकांमधून ज्या कल्पना मांडल्या, त्यापैकी ४० नवकल्पनांची यादी सर्वांना विचारार्थ पाठवली होती, तिचाही विचार यावेळी करण्यात आला. नुसत्याच सदिच्छा वा नवकल्पना मांडून नवे फलित हातात येत नाही. त्यासाठी विचारपूर्वक काही नवप्रयोगांची अंमलबजावणी करायला घेतली पाहिजे. त्या प्रयोगांचे यशापयश मोजून पाहिले पाहिजे. त्यातूनच सर्वांना मार्गदर्शक ठरेल असे नवे प्रारूप हाताशी येणार आहे.


एक म्हणजे आपली विद्यार्थी निवड प्रक्रिया ही विद्यार्थिशोध प्रक्रिया व्हायला हवी. म्हणजे, आपण पुढाकार घेऊन विविध वंचित पोटजातीमधील चुणचुणीत मुले वर्धिनीत आणली पाहिजेत. दुसरे म्हणजे निवडलेल्या मुलांना आता काय येते, काय येत नाही याची नैदानिक चाचणी सुरुवातीलाच घेतली पाहिजे. तिसरे म्हणजे आपल्या मुलांना उत्तम इंग्रजी बोलता यावे यासाठीची आधुनिक लँग्वेज लॅब आपण उभी केली पाहिजे. चौथे म्हणजे एक उत्तम कॉंप्युटर लॅब उभी करू या. पाचवे म्हणजे व्हर्च्युअल क्लासरूम (आभासी वर्गकक्ष) उभी करू या. सहावे म्हणजे आपण अत्याधुनिक सायन्स लॅबचा सर्व शाखांवर वापर करू या. सातवे म्हणजे किमान तीन शाखांवर मुलांच्या शैक्षणिक संगोपनासाठी प्रगतिपालक म्हणून काम करणारे सहृदय, सुशिक्षित कार्यकर्तेउपलब्ध करू या, असे संकल्प परिषदेच्या अखेरीस करण्यात आले.

येती ५-६ वर्षेही वर्धिनीच्या चौफेर वाढीची असणार आहेत. ही वाढ नुसत्या आस्थापना, वास्तू व साधनांची असणार नाही. आपण कार्यकर्त्यांनी अनेकानेक नवकल्पना आणि उपक्रमांची भर घालायची आहे. आजवर पायाभरणीचे मूलभूत काम झाले आहे. आता या वृक्षाला नवनव्या शाखा, पालवी, फुले, फळे यायला हवीत.

**- श्री. रामभाऊ डिंबळे,** कार्याध्यक्ष

**नद्या वाहती पूत येथें अनेक । असे भू वनश्रीयुता ही विलोक ।।**
**पहा रक्षण्या हे उभे ठाकलेत । गिरी कैक उत्तुंग या भारतात।।**

## वार्षिक सर्वसाधारण सभेतील अध्यक्षीय भाषण



''आपल्याकडे विचार, कल्पना बऱ्याच असतात. पण ते विचार अथवा कल्पना यांचे कृतीमध्ये रूपांतर होणे फार महत्त्वाचे असते. त्या संस्था मोठ्या होतात ज्या कल्पना या केवळ कल्पना न ठेवता त्याचे कृतीमध्ये रूपांतर करतात. आजच्या पहिल्या सत्रात शिरीषजींनी आठवण करून दिली की २००३ मध्ये झालेल्या सभेत मी अध्यक्ष होतो. त्यावेळी मला 'स्व'रूपवर्धिनीचे काम खूप आवडले होते. तेव्हाच मी म्हणालो होतो की 'स्व'-रूपवर्धिनीचे काम पूर्ण देशात झाले पाहिजे. पूर्ण देशात त्याचा विस्तार झाला पाहिजे. आज आपले प्रतिनिधी सोलापूर, सातारा, कोल्हापूर, लातूर, नगर, दौंड, बार्शी इत्यादी ठिकाणांहून आले, त्यांनी त्यांच्या कार्याचा आढावा मांडला. त्यांच्या कार्यातून आज तो विस्तार मी पाहतो आहे. हा जो विचार होता तो कृतीत उतरताना मी पाहिले आहे. सन २०१६ साली सभेत मी पंचसूत्री मांडली आणि त्यासाठी श्री. विश्वास कुलकर्णी यांनी घेतलेली मेहनत आज दिसते आहे. विचार स्वरूपातले काम कृतीत उतरवणे हे फार महत्त्वाचे आहे. आणि यामुळे आपले, 'स्व'-रूपवर्धिनीचे भविष्य उज्ज्वल आहे, यामध्ये जराही शंका नाही. मला लोक दुर्दम्य आशावादी म्हणतात, म्हणूनच 'स्व'-रूपवर्धिनीबद्दल मी फार आशावादी आहे. जे आपण केलेले आहे, जे मी पाहिले आहे, याचे मला फार कौतुक आहे.

'स्व'-रूपवर्धिनीचा मनुष्यबळ घडणीवर प्रचंड जोर आहे. यामध्ये महत्त्वाचा भाग केवळ बुद्धीसंवर्धन नव्हे तर वृत्तीसंवर्धन, मूल्यसंवर्धन, व्यक्तीमत्त्व संवर्धन, नेतृत्त्व संवर्धन कसे करायचे, हे फार महत्त्वाचे आहे. हे करताना फक्त स्वत:चा विकास न बघता समाज विकास, भौतिक विकास आपण कसा करू याबद्दल लहानपणापासूनच मुलांना शिकवणे फार महत्त्वाचे आहे. आपण बदलाबाबत बोलत असतो. खूप भरभर जग पुढे चालले आहे. आपण जर दहा वर्षे मागे वळून पाहिले तर त्यावेळी iphone नव्हता, ipod नव्हते, ipad नव्हते, kindle नव्हते, facebook नव्हते, 4G नव्हते, uber नव्हते, airbin नव्हते, android नव्हते, whats app नव्हते, netflicks नव्हते. पण दहा वर्षात या साऱ्या गोष्टींनी सारे जग बदलून टाकले आहे. आज आपल्यातले सर्वजण whats app वापरतात. म्हणूनच हे digital world खूप मोठ्या प्रमाणावर बदल घडवून आणू शकते आणि हे प्रत्यक्ष भारतात होताना आपण पाहिले आहे. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे-आपल्याकडे १०० कोटी लोक आहेत, त्यांच्याकडे मोबाईल आहेत. १०० कोटी आधार कार्ड आहेत. याचाच उपयोग आपण जन-धन योजनेसारख्या policy ने केला. आणि आज २८ कोटी बँक खाती तयार झाली. त्यासाठी २८ वर्षे लागली असती. पण हेच आपण काही महिन्यात केले. यासाठी आपल्याला गिनेस विश्वविक्रम मिळाले. learning will be both with physical as well as digital आणि म्हणून आपण जे नेटवर्किंग बद्दल बोललात, नवीन शिक्षणपद्धती कशी येणार, learning to learn हे फार महत्त्वाचे आहे. (माहितीचा साठा जवळ असणे, विद्वज्जड होणे खरे नाही. शिकायचे कसे; नव्या गोष्टी आत्मसात कशा करायच्या हे कळणे म्हणजे शिक्षण होय) आणि म्हणून आपण जे digital wardhinee म्हणतो ते मला पटते आहे हे मी माझ्या पहिल्या भाषणावेळी देखील सांगितले होते.



तुम्ही ज्या शकांना, हुणांना, ग्रिकांना। पुरे जिंकुनी पाणी पाजीयले ना ?
किती म्लेंच्छ उन्मत्त आले तयांना । खडे चारिले ! आज का मात्र दैना ?

दुसरी गोष्ट म्हणजे– नीती आयोगाने मला ‘पुढे आपण काय बदल करणार आहोत? यावर टिपण लिहायला सांगितले. त्यात education यामध्ये मी सुचवले की जे विद्यार्थी आहेत त्यांच्यामध्ये पाच बदल होणार आहेत. त्यामध्ये not competing - but creating, consuming to producing, memorising to processing, isolation to colaboration, answering to questioning. (आमच्या शिक्षणात स्पर्धेऐवजी निर्मितीवर भर राहील. केवळ घोकंपट्टीच्या जागी चिंतनाचा अवलंब केला जाईल. एकाकी, व्यक्ती केंद्रात प्रगती नव्हे तर समूहयोगातून उन्नती साधण्याची धडपड असेल. घोकीव उत्तरे जमा करण्याच्या आग्रहाला फाटा देऊन जिज्ञासा, कुतूहल आणि प्रश्न विचारण्याला प्रोत्साहन असेल.) मग असं असताना आपण आपली पद्धत बदलणार कशी? आणि म्हणून आपण लक्षात ठेवले पाहिजे जसे आपण learning by rote म्हटले त्याऐवजी learning by doing महत्त्वाचे वाटते. आपले मोबाईल सायन्स लॅबचे उत्तम काम चालू आहे. पण त्यामध्ये मला एक बदल सांगावासा वाटतो. आणि तो असा की first was learning by rote, second was- learning by doing. पण जेव्हा मोबाईल सायन्स लॅबचे आपण काम करतो तेव्हा learning by doing न म्हणता learning by creating असेच काम करावे लागेल. (आधी, घोकून स्मरणात भरण्याच्या प्रक्रियेला शिक्षण म्हणत. नंतर हाताने काहीतरी करण्याने जी जाणीव येते तिला शिक्षण म्हणू लागले. आता नवनिर्मिती आणि नवे सुचणे म्हणजे खरे शिक्षण असे मानले जात आहे)

भारत म्हणजे १२५ कोटी तोंडे नव्हेत, तर १२५ कोटी मेंदू आहेत. त्यामध्ये लहान मुले, प्रौढ, इतर सर्व आहेत. लाल दिवा लागला की थांबा, हिरवा लागला की पुढे जा आणि पिवळा लागला की– सावकाश व्हा थांबा हे सर्वज्ञात आहे पण यावर एक छोट्याशा मुलीने प्रश्न केला की पुढे ट्रॅफिक जाम असेल तर निळ्या रंगाचा दिवा का असू नये? हे जे काम आहे ते learning by rote, doing, creating आणि co-creating हे सर्व टीममध्ये करायचे असते आणि या टीममध्ये फक्त माणसेच नाहीत तर माणसे आणि मशीन यांचा संगम आहे. (घोकंपट्टी, कृतियुक्त शिक्षण नवनिर्मिती आणि सहयोगी निर्मिती हे चार टप्पे शिक्षणाचे आहेत.) मुलांना जर भविष्यासाठी तयार करायचे असेल तर हे फार महत्त्वाचे आहे.

funds आपण उभारू शकतो कारण आपले काम खूप मोठे आहे. Having resource is important but being resourceful is more imporant.(हरतऱ्हेची संसाधने असणे मोलाचे आहेच पण त्याहूनही, हरहुन्नरी असणे महत्त्वाचे ठरणार आहे) त्यासाठी social media चा खूप प्रभावी उपयोग करता येईल.

तिसरी गोष्ट म्हणजे देशाला आपण विचारांचे नेतृत्त्व द्यायला पाहिजे. आणि याचे उत्तम उदाहरण– घनसांगवी येथे जलसंधारण चवळवळ चालवलेले आपले कार्यकर्ते व तहसीलदार असलेले श्री. कैलास अंडील यांचे खास कौतुक करावेसे वाटते. फार उत्तम काम केले आहे. मला जेव्हा कामाची माहिती कळली तेव्हा मी स्वत: म्हणलो ते मी मुख्यमंत्र्यापर्यंत पोहोचवण्याचे काम करीन आणि तसे मी पत्र लिहिणार आहे. म्हणून जेव्हा आपण brand build करतो तेव्हा या गोष्टी त्यासाठी पूरक आहेत. आणि हे पसरले पाहिजे. आपण जे काम करतो आहे त्याचे संपूर्ण जगात कौतुक झाले पाहिजे.

गर्जेमराठी या मराठी पुस्तकाचे प्रकाशन करताना त्यातील ३३ व्यक्तीरेखांपैकी ११ जण उपस्थित होते. तेव्हा बोलताना ११ जण म्हणाले की Maharashtra matters to me, but how can I matters to Maharashtra more. पैसे देणे सोपे असते, पण प्रत्यक्ष वेळ देणे अवघड असते. आणि मी त्यांना आवाहन केले की तुम्ही तुमचा वेळ द्या कारण हा नवा भारत घडतो आहे त्याला तुमची वेळ हवी आहे.

एका कॉलेजमध्ये भाषण करताना मी म्हणालो की आपणाकडे सत्यम, शिवम्, सुंदरम यांमध्ये सत्यम् नडेला हे microsoft चे ceo झाले, सुंदर पिचाई हे google चे ceo झाले, शिवम् बाकी आहे. तेव्हा एक मुलगा म्हणाला की सर तुम्ही विषयांपासून भरकटता आहात. अगदी आदराने तो म्हणाला, सर तुमच्या generation ला microsoft, google अशा कंपन्यांमध्ये ceo बनण्यासाठी जायचे होते, पण माझ्या generation ला माझे microsoft, माझे, google माझ्या देशात तयार करायचे आहे. त्याचे हे विचार म्हणजे बदलत्या, विकासाभिमुख भारताची ही शुभचिन्हे आहेत.''

**– डॉ. रघुनाथ माशेलकर**

❖ ❖ ❖

---

**मुखपृष्ठ व तळटीपांविषयी थोडेसे**

११ सप्टेंबर १८९३ या दिवशी सर्वधर्मपरिषदेत स्वामी विवेकानंदांनी केलेल्या मौलिक मार्गदर्शनाला यावर्षी १२५ वर्ष होत आहेत. त्यानिमित्ताने तो प्रसंग चित्रकार श्री. दिलीप कदम यांनी मुखपृष्ठावर सादर केला आहे.

अत्यंत प्रेरक गीते व कार्यकर्त्यांमध्ये प्रेरणा जागृती करणारी उठावणी हे ज्यांच्या लेखणीतून जन्माला आले ते संघप्रचारक स्व. नाना पालकर यांचे हे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्या निमित्त तळटीपांद्वारे स्व. नानांनी रचलेल्या उठावणी व गीतांमधील वेचक पंक्ती उद्‌धृत करून वर्धिनी त्यांना पुढील शब्दात आदरांजली अर्पण करीत आहोत.



कै. नानाराव पालकर म्हणजे समर्पित जीवनाचा एक श्रेष्ठ आदर्श ! आयुष्य केवळ ४९ वर्षे ! १९३६ साली मॅट्रिक झाल्यानंतर थोड्याच दिवसांनी आलेले आजारपण संपल्यानंतर महाविद्यालयीन शिक्षण सोडून केवळ संघकार्य करण्याचा निर्धार त्यांनी केला आणि तो आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत पाळला. संघकार्यानिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात त्यांचा संचार सतत होता. लहान-मोठ्या गावी महिना दोन महिने ठाण मांडून त्यांनी तेथे संघशाखा काढल्या, वाढविल्या. प्रांत कार्यवाह म्हणून जबाबदारी स्वीकारल्यानंतर त्यांचा प्रवास अधिकच वाढला. त्यांच्या भाषणांनी प्रभावित होऊन संघकार्यासाठी जीवन वेचण्यासाठी अनेक कार्यकर्ते तयार झाले.

कै. नाना हे प्रतिभावंत कवी होते. विविध कार्यक्रमांमधून रचलेली वैयक्तिक आणि सांघिकरीत्या म्हणता येतील अशी त्यांनी रचलेली ध्येयनिष्ठ स्फूर्तिगीतांची संख्या फार मोठी आहे. संघाच्या कार्यक्रमातून अखंडपणे वावरत असताना त्यांची काव्यप्रतिभा जागृत होती. ते अखेरपर्यंत कविता करत होते. त्यांच्या कविता प्रामुख्याने देशभक्तीपर आहेत. कै. नानांनी गद्य लेखनही विपुल प्रमाणात केले. संताजी घोरपडे, खंडोजी बल्लाळ या ऐतिहासिक व्यक्तींच्या छोट्या चरित्रांबरोबरच संघ संस्थापक 'डॉ. हेडगेवार चरित्र' आणि 'श्री. मा. स. गोळवलकर व्यक्ती आणि कार्य' ही दोन मोठी चरित्रे त्यांनी लिहिली. 'मंदिराची कथा आणि व्यथा', 'अंघोळ', 'नानांचे मनोगत', 'छळाकडून बळाकडे' हे इस्रायलविषयक पुस्तक ही आणखी त्यांची प्रकाशित पुस्तके !

**सभा, भाषणे. व्यर्थ सारे ठराव । नसे आज कार्यात त्या लेश वाव ।**
**कृतीचा महा पंथ हा आचरावा । कृती बोलुं द्या; व्यर्थ डंका नसावा ।।**

११ सप्टेंबर १८९३ या दिवशी स्वामी विवेकानंद यांचे शिकागो येथील सर्वधर्मपरिषदेत हिंदू धर्माची – मानवता धर्माची खरी ओळख करून देणारे चिरस्मरणीय भाषण झाले. यावर्षी या भाषणाचे १२५ वे वर्ष आहे. त्यानिमित्ताने डॉ. वि. वि. पेंडसे लिखित 'राष्ट्रद्रष्टे विवेकानंद' यांच्या पुस्तकातील या भाषण प्रसंगाचे अत्यंत उत्कट, यथार्थ संपादित शब्दचित्रे पुढे देत आहोत.

--------------------

## राष्ट्रद्रष्टे विवेकानंद

याकोहामाहून बोट व्हँकुव्हर येथे आली. स्वामीजींनी अमेरिकेमध्ये नव्या जगात पाऊल ठेवले. तिथे आल्यापासून त्यांना थंडीचा त्रास होऊ लागला. स्वामीजींजवळ गरम कपडे नव्हते. कारण मुंबईला असताना, अमेरिकेत थंडी असणार ही कल्पना कोणास आली नाही. स्वामीजी शिकागो शहराच्या गजबजलेल्या रेल्वे स्टेशनवर उतरले. प्रत्येक ठिकाणी हमालांनी त्यांच्याकडून पैसे उकळले. तो अवाढव्य खर्च, ती गर्दी, कुणाचीही ओळख नाही, उतरायचे कोठे याची कल्पना नाही, यामुळे ते गोंधळले. अमेरिकेत चमत्कारिक वाटणाऱ्या स्वामीजींच्या अंगावरील भगव्या वस्त्रांमुळे, टवाळ मुले गोळा होऊन त्यांना दगड मारू लागत. या सर्व गोष्टींमुळे स्वामीजी अगदी त्रासून गेले. अखेर ते एका हॉटेलमध्ये उतरले.

अमेरिकेतील सर्व थाटमाट आणि खर्च पाहून स्वामीजींच्या मनात एक प्रकारचा विषाद उत्पन्न झाला. अशा मनःस्थितीत परमेश्वरी योजनेने आपण इथे आलो आहोत, तो आपल्याला सर्व परिस्थितीतून योग्य मार्गदर्शन करेल, आणि आपल्या कार्याला यश मिळवून देईल हे आठवताच त्यांचा उद्वेग नाहीसा होई.

तथापि सर्वधर्मपरिषदेच्या कार्यालयामध्ये त्यांनी जेव्हा चौकशी केली, तेव्हा त्यांना आकाशातून वीज पडल्यासारखाच धक्का बसला. जुलैच्या पहिल्या आठवड्यात शिकागोला चौकशी केल्यावर त्यांना समजले की, सर्वधर्मपरिषद सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात भरणार आहे; आणि त्यासाठी जे प्रतिनिधी म्हणून येणार त्यांना परिषदेने मान्य केलेल्या संस्थांनी निवडून दिलेले असले पाहिजे; त्याविना त्यांना परिषदेमध्ये प्रवेश मिळणार नाही. इतकेच नव्हे, तर असे प्रतिनिधित्व निवडण्याचा शेवटचा दिनांकही मागे गेलेला आहे; यापुढे कोणालाही प्रतिनिधी म्हणून स्वीकारले जाण्याची शक्यता नाही. या सर्व माहितीने स्वामीजींवर आकाशातून कुऱ्हाड पडल्यासारखे झाले. हिंदुस्थानातून अमेरिकेत येताना ते कोणाचेच प्रतिनिधी म्हणून आले नव्हते. त्या वेळी त्यांची मनःस्थिती कशी झाली याचे वर्णन करताना भगिनी निवेदिता लिहितात –

'स्वामीजींच्या भक्तांची कल्पना अशी होती की, स्वामीजींनी परिषदेच्या जागी नुसता जाण्याचा अवकाश, लगेच त्यांना बोलण्याची विनंती केली जाईल. स्वतः स्वामीजी आपल्या शिष्यांइतकेच व्यवहारी होते. त्यांना वाटले, परदेशगमनाचा आदेश जर ईश्वराकडून मिळालेला आहे, तर आता कार्यामध्ये अडचणी कोठून येणार ? संपत्तीने आणि सामर्थ्याने समृद्ध अशा नव्या जगात, कड्याकुलुपांनी पक्केपणी बंद केलेल्या दरवाज्यातून, कोणाचेही प्रतिनिधित्व न मिळवता, त्याबद्दलची ओळखपत्रे इत्यादी काहीही बरोबर न घेता सर्वधर्मपरिषदेसाठी जाण्याची कल्पना, हिंदू धर्मातील विस्कळीतपणापेक्षा खासच कमी वैशिष्ट्यपूर्ण नव्हती.'

हॉटेलमधील राहण्याचा खर्च अवाच्यासवा होता. अमेरिकेमध्ये अधिक काळ राहण्यासाठी, अथवा परिषदेसाठी न थांबता असेच स्वदेशी परत जाण्यासाठी, चेन्नईमधील आपल्या शिष्यांकडून अधिक पैसे मागवावे लागतात की काय, अशी भीती त्यांना वाटू लागली. सुदैवाने चेन्नईमधील त्यांच्या कोण्या मित्राने शिकागोमधील

आपल्या एका परिचिताला लिहून स्वामीजींची पैशाची अडचण दूर केली.

बोस्टन येथील राहणी शिकागोपेक्षा कमी खर्चिक आहे, असे कळल्यावरून स्वामीजी बोस्टनला जाण्यास निघाले. परमेश्वरी अनुग्रह आश्चर्यकारक असतो. परिव्राजकाच्या आयुष्यामध्ये स्वामीजींना जसे निरनिराळ्या वेळी साहाय्य मिळाले, तसेच आताही अकस्मात साहाय्य मिळाले. स्वामीजींच्याच डब्यातून एक वृद्ध स्त्री प्रवास करत होती. स्वामीजींच्या मुद्रेवरील तेज पाहून तिला जिज्ञासा उत्पन्न झाली. स्वामीजी हे हिंदू संन्यासी असून, अमेरिकेमध्ये वेदान्ताच्या तत्त्वांचा प्रसार करण्याकरिता आलेले आहेत, असे समजताच तिला अधिकच नवल वाटले. स्वामीजींबरोबर संभाषण करता करता ती म्हणाली, 'स्वामीजी, तुम्ही माझ्याकडे का उतरत नाही ? मी तुम्हास आमंत्रण देते. माझ्या घरी राहिल्यने कदाचित काही अनुकूल गोष्ट घडणार असेल.' स्वामीजींनी आमंत्रणास तत्काळ होकार दिला आणि बोस्टनजवळील 'मेटकॉफ' या उपनगरात ते राहू लागले. त्या बाई खरोखरच श्रीमंत आणि मोठ्या कुटुंबातल्या होत्या. तिथे राहण्यामुळे स्वामीजींचे दैनंदिन खर्चाचे सुमारे १५ रुपये वाचत असत. त्याच्या फायद्यात बाईंना आपल्या मित्रमैत्रिणींना बोलावून त्यांना एक 'अजब' चीज दाखवण्याची संधी मिळत होती. या नव्या वातावरणाचा स्वामीजींना बराच त्रास झाला. यजमानीण बाईंची मित्रमंडळी स्वामीजींना धार्मिक ठेकेदार समजून भलतेसलते प्रश्न विचारत असत. 'टाकीच्या घावाशिवाय देवपण नाही,' असे जाणवून स्वामीजींनी हे प्रसंग सहन केले.

स्वामीजींसमोर खरोखरच अडचणींचे डोंगर उभे होते. थंडी जवळ येत होती. गरम कपडे नव्हते. चांगले सूट खरेदी करायला १०० डॉलर (३०० रु.) पडले असते. एवढे पैसे खर्च करून पुढे काय करायचे ? तथापि स्वामीजींची अशी श्रद्धा होती की, मेरीच्या मुलांकडे मी आलो आहे. भगवान येशू ख्रिस्त मला मदत केल्याशिवाय राहणार नाही. स्वामीजींच्या निष्ठेप्रमाणे त्यांच्यापुढील अडचणी दूर होऊ लागल्या. मोठमोठे विद्वान लोक त्यांच्या भेटीस येऊ लागले. हार्वर्ड विश्वविद्यालयातील ग्रीक भाषेचे प्राध्यापक जी. एच. राइट, हे स्वामीजींना भेटण्यास आले आणि त्यांनी चार तासपर्यंत विविध विषयांवर चर्चा केली. सर्वधर्मपरिषदेमध्ये जाऊन भाषण करण्याची आशा स्वामीजींनी आतापर्यंत सोडली होती. प्राध्यापक राइट यांना स्वामीजींच्या असामान्यतेची ओळख होताच 'परिषदेमध्ये हिंदू धर्माचे प्रतिनिधी म्हणून तुम्ही जावेच', असा त्यांनी आग्रह धरला. 'सर्व राष्ट्राला तुमची ओळख होण्याचा हाच मार्ग आहे,' असे ते म्हणू लागले. स्वतःजवळ कोणा संस्थेचे प्रतिनिधित्व आणि शिफारसपत्र नसल्यामुळे ते शक्य नाही, असे स्वामीजींनी म्हटल्यावर प्राध्यापक उद्गारले, 'तुमच्या योग्यतेबद्दल शिफारसपत्राची मागणी करणे, म्हणजे सूर्याला प्रकाशण्याचा अधिकार काय, असेच विचारण्यासारखे आहे !' स्वामीजींना परिषदेमध्ये प्रतिनिधित्व मिळवून देण्याचे कार्य प्राध्यापकांनी स्वतःच्या शिरावर घेतले. परिषदेच्या कार्यकर्त्यांपैकी अनेकांशी त्यांची ओळख असल्याने, त्यांनी प्रतिनिधींची निवड करणाऱ्या समितीच्या अध्यक्षाला पत्र लिहून कळवले, 'आपल्याकडील सर्व विद्वान प्राध्यापक एकत्र केले, तरी त्यांच्याहून जो सरस ठरेल असा हा पुरुष आहे. तरी त्यांना प्रतिनिधी म्हणून निवडावे.' स्वामीजींजवळ प्रवासखर्चास पैसे नाहीत, हे जाणून प्राध्यापक महाशयांनी त्यांना शिकागोचे तिकीट काढून दिले, तसेच 'शिकागो येथे इतर पौर्वात्य प्रतिनिधींबरोबर स्वामीजींची जेवणाखाण्याची व राहण्याची सोय करावी,' असे पत्र परिषदेच्या कार्यकारी मंडळाला पत्र लिहिले. परमेश्वरी शक्तीचे हे प्रसादचिन्ह पाहून स्वामीजींना अत्यानंद झाला. ज्या कार्यासाठी ते हजारो मैल दूर आले होते, ते कार्य कुठल्यातरी अदृश्य प्रेरणेमुळे यशस्वितेची वाट चालू लागले होते.


करावी कृती ना मुखें ती वदावी । कृतीने कृती भारतीं वाढवावी ।। कृतीचा कशाला नगारा झडावा ?

शिकागो येथे परत जाताना, आता मार्गातील सर्व अडथळे दूर झाले, अशा आनंदात स्वामीजी निघाले. परिषदेचे ठिकाण कोठे आहे, हे स्वामीजींना माहीत नव्हते. डब्यामध्ये एक श्रीमंत व्यापारी भेटला. त्याने ठिकाण दाखवण्याचे कबूल केले. परंतु शिकागो येथे आल्यावर त्या व्यापाऱ्याला अशी घाई झाली की, परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. बॅरोस यांचे कार्यालय शहराच्या कुठल्या भागात आहे, हे सांगायचेसुद्धा तो विसरला. परिषदेच्या कार्यालयाचा पत्ता स्वामीजींजवळ लिहिलेला होता. पण ऐन वेळेला तोही हरवल्याचे स्वामीजींच्या नजरेस आले. अशा स्थितीत काय करावे हे समजेना. रात्र बरीच झाली म्हणून रेल्वेच्या पार्सल यार्डमध्ये एका मोठ्या रिकाम्या खोक्यात स्वामीजी झोपले. सर्व चिंता आणि काळजी त्यांनी परमेश्वराकडे सोपवली. सकाळ उजाडली. ते उठले आणि चूळ भरायला पाणी कोठे मिळते का, याच्या शोधामध्ये रस्त्याने जाऊ लागले. थोड्याच वेळात त्या मोठ्या शहराच्या, लेक शोअर ड्राईव्ह या नावाच्या अत्यंत श्रीमंत भागामध्ये ते आले. या भागात लक्षाधीश आणि बडे कारखानदार राहात असत. स्वामीजी अतिशय भुकेलेले होते, आणि खऱ्या संन्याशाप्रमाणे त्यांनी घरोघरी जाऊन माधुकरी मागण्यास सुरुवात केली. परिषदेचे कार्यालय कोठे आहे याचीही ते चौकशी करू लागले. स्वामीजींचे मळलेले कपडे आणि प्रवासामुळे थकलेला चेहरा, असा अवतार पाहून कित्येक घरांतून त्यांना उद्धटपणाची वागणूक मिळाली. स्वामीजी थकले. अखेर फार थकल्यावर रस्त्याच्या कडेला परमेश्वराचे स्मरण करत बसले.

इतक्यात त्यांच्या बरोबर समोर असलेल्या सुंदर घराचे दार उघडले; अन् त्यातून देवता शोभण्यासारखी एक सुस्वरूप युवती पायऱ्या उतरून स्वामीजींकडे आली; आणि नम्रतेने आणि शालीनतेने मंजुळ आवाजात विचारू लागली, 'महाराज, सर्वधर्मपरिषदेकरिता आलेल्या प्रतिनिधींपैकी आपण आहात काय ?' स्वामीजींनी तिला आपल्या अडचणी सांगितल्या. बाईंनी तात्काळ स्वामीजींना घरात नेले आणि त्यांची सर्व विचारपूस करून त्यांच्या फराळाची तयारी केली. परमेश्वरी साहाय्य अशा अद्‌भुत रीतीने झालेले पाहताच, स्वामीजींच्या आश्चर्याला पारावार उरला नाही. मिसेस जॉर्ज डब्ल्यू. हेल्, त्यांचे यजमान आणि त्यांची मुले या प्रसंगापासून स्वामीजींचे एकनिष्ठ मित्र बनली. स्वामीजींच्या मनात एक नवीन उत्साह उत्पन्न झाला.

फराळ झाल्याबरोबर हेल बाईंबरोबर ते परिषदेच्या कार्यालयात गेले. तिथे त्यांनी आपली ओळखपत्रे सादर केली. परिषदेच्या अधिकाऱ्यांनी त्यांचा स्वीकार करून त्यांना इतर पौर्वात्य प्रतिनिधींच्या निवासस्थानी पोहोचते केले. तो दिवस स्वामीजींनी प्रार्थनेमध्ये आणि परमेश्वराच्या चिंतनात घालवला.

१८९३ च्या सप्टेंबर महिन्यात शिकागो शहरामध्ये जी सर्वधर्मपरिषद भरली, ती जगताच्या धार्मिक इतिहासात आणि विशेषतः हिंदुस्थानच्या इतिहासात क्रांतिकारक ठरली. या सर्वधर्मपरिषदेला जगातील थोर थोर तत्त्ववेत्ते येणार, हे उघडच होते. त्याप्रमाणे जवळ जवळ सात ते दहा हजार प्रतिनिधी तिथे जमले होते. अनेक थोर व्यक्ती तिथे उपस्थित होत्या. निरनिराळ्या प्रतिनिधींनी मिळून एक हजारपेक्षा अधिक निबंध तिथे वाचले. परिषदेत निरनिराळ्या विषयांचे विभाग करण्यात आले होते. त्यांतील शास्त्रविभागाचा उल्लेख मुद्दाम केला पाहिजे. या विभागात स्वामीजी वेगवेगळ्या विषयांवर बोलले. या विभागाचे अध्यक्ष सन्मान्य श्री. मर्विन-मेरी-स्नेल हे स्वामीजींचे एक मोठे मित्र आणि हिंदू धर्माचे उत्तम चाहते झाले.

परिषद सोमवार दि. ११ सप्टेंबर १८९३ या दिवशी सकाळी दहा वाजता सुरू झाली. परिषदेचे उद्घाटन डॉ. बॅरोस यांनी केले. व्यासपीठावर ठिकठिकाणच्या धर्मांचे प्रतिनिधी आणि एकवीस कोटी मानवांचे मंत्रद्रष्टे उपस्थित होते. ते दृश्य डोळे दिपवणारे होते.

**खरी देशभक्ती कृतीने दिसावी । मुखें वाच्यता भक्तिची त्या नसावी ।।**
**तुम्हां पाहुनी बंधुना धीर यावा । असा पंथ हा एकतेचा धरावा।।**

परिषदेचे उद्घाटन कसे झाले आणि स्वागताध्यक्षांनी केलेल्या स्वागतपर भाषणाला उत्तर देत असताना स्वतःच्या मनाची परिस्थिति कशी होत होती, याचे वर्णन स्वामीजींनी आपल्या एका शिष्याजवळ केले आहे –

'त्या दिवशी सकाळी परिषदेचे उद्घाटन झाले. आर्ट पॅलेस या इमारतीमध्ये एक अतिप्रचंड आणि काही लहान मंडप परिषदेच्या कार्यासाठी उभारले होते; तिथे आम्ही जमलो होतो. देशदेशांतरीचे लोक तिथे आले होते. हिंदुस्थानामधून ब्राह्मो समाजाचे प्रतिनिधी म्हणून श्री. मुजुमदार आणि मुंबईचे श्री. नगरकर हे दोघे आले होते. श्री. गांधी हे जैनांचे प्रतिनिधी होते. थिऑसॉफीचे प्रतिनिधित्व श्री. चक्रवर्ती आणि श्रीमती ॲनी बेझंट यांच्याकडे होते. यांपैकी मुजुमदार व मी हे जुने मित्र होतो. चक्रवर्ती मला नावाने ओळखत होता. सुरुवातीला मोठ्या समारंभाने, मिरवणुकीने, शिस्तपूर्ण रीतीने आम्हांला व्यासपीठावर नेण्यात आले. खाली आणि वर गॅलरीमध्ये, त्या देशातील अत्यंत सुसंस्कृत आणि विद्वान असे सहा–सात हजार स्त्री–पुरुष बसले होते. आणि व्यासपीठावर सर्व जगातील विद्वान उपस्थित होते. मोठ्या सभेतून कधीही न बोललेल्या माझ्यासारख्या मुखदुर्बळाला, या भव्य श्रोतृगणापुढे भाषण करायचे होते. परिषद संगीताच्या निनादात समारंभाने सुरू झाली. उद्घाटनाच्या भाषणानंतर एकेका प्रतिनिधीची ओळख करून देण्यात आली. त्यावर तो प्रतिनिधी पुढे येऊन उत्तरादाखल भाषण करून जागेवर बसत असे. माझे हृदय धाड्धाड् उडत होते. जिभेला कोरड पडली होती. मनातून मी इतका थरथरत होतो की, सकाळच्या प्रसंगी भाषण करण्याची माझी छाती झाली नाही. श्री. मुजुमदारांनी मोठे उत्तम भाषण केले. चक्रवर्तींचे तर त्यापेक्षाही सरस झाले. लोकांकडून टाळ्यांचा कडकडाट झाला. ते चांगली तयारी करून आले होते. त्यांची भाषणे पाठ होती. मी महामूर्ख, म्हणून तयारी न करताच आलो होतो. तथापि सरस्वतीदेवीला वंदन करून मी वर चढलो. डॉ. बॅरोस यांनी परिचय करून दिला. मी एक लहानसे भाषण केले; आणि ते संपल्यानंतर भावनातिशयतेमुळे थकून जाऊन खाली बसलो !' समोर बसलेला विशाल समाज, त्यांची मार्मिक दृष्टी आणि त्यांचे सोत्कंठ चेहरे, प्रतिनिधींची भव्य मिरवणूक, ख्रिश्चन प्रतिनिधींची भव्य मुद्रा या सर्व गोष्टी पाहून त्या ऐश्वर्यसागरामध्ये स्वामीजींचे मन क्षणभर हरपून गेले. स्वामीजींना असे वाटले की, 'मी हिंदुस्थानामधील एक खेडवळ संन्यासी, कौपीनधारी परिव्राजक, मला या सर्व ऐश्वर्यामध्ये कोठे स्थान आहे ?'

पण खरोखरच त्यांचे स्थान कोठे होते ते थोडक्याच वेळात समजणार होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वामुळे हजारो लोकांचे डोळे त्यांच्याकडे केव्हापासून लागले होते. अध्यक्षांनी स्वामीजींना अनेक वेळा बोलण्याचा आग्रह केला; पण प्रत्येक वेळी ते म्हणत, 'मग, आत्ता नको.' अध्यक्षांना त्याचे मोठे आश्चर्य वाटले. अखेर संध्याकाळ झाली तेव्हा अध्यक्षांनी फार आग्रह धरल्यावरून स्वामीजी भाषण करण्यास उठले.

त्यावेळी त्यांचा चेहरा अग्नीसारखा उजळत होता. निमिषमात्रात समोरच्या समाजाकडे त्यांनी दृष्टिक्षेप केला. सर्व अत्यंत शांततेने बसले होते. इतके की, सुई पडल्याचा आवाजदेखील ऐकू आला असता. विद्येची अधिष्ठात्री देवता जी सरस्वती, तिला वंदन करून **स्वामीजींनी आरंभ केला –**

**'Sisters and Brothers of America',**
**'अमेरिकेतील भगिनींनो आणि बंधूंनो',**

एवढ्या उच्चाराबरोबर स्वामीजी पुढे काही बोलण्याच्या आत, सर्व श्रोत्यांच्या अंगातून विजेची एखादी सौम्य लहर चमकून गेल्यासारखे झाले. कित्येक जण उभे राहिले, कित्येक आनंदाने ओरडू लागले, कित्येक उत्साहाने वेडावून गेले. टाळ्यांचा नुसता कडकडाट सुरू झाला. दोन मिनिटांपर्यंत स्वामीजी पुढे बोलण्याचा प्रयत्न करत होते. पण ते शक्य झाले नाही.

लोक शांत झाल्यावर स्वामीजींनी आपले भाषण पुढे चालू केले.

**‘अमेरिकेतील भगिनींनो आणि बंधूंनो, आपण आम्हां प्रतिनिधींचे ज्या आपुलकीने नि उत्कंठेने स्वागत केले आहे, त्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करताना माझे मन उचंबळून येत आहे. मी आपणां सर्वांचा आभारी आहे. सर्व जगातील विरक्तांमध्ये पुरातन असलेला जो संन्यासमार्ग, त्याच्या नावाने मी आपला आभारी आहे. नानाविध धर्मांची जी भूमी जननी आहे, तिच्या वतीने मी आपला आभारी आहे. आणि संख्येने कोटी कोटी असलेले जे हिंदू, त्यांच्या सर्व पंथोपपंथांचा प्रतिनिधी या नात्याने, त्यांच्या वतीने मी आपला आभारी आहे.**

**आज कोणीतरी धर्मसहिष्णुतेबद्दल बोलले. माझा जन्म ज्या धर्मात झाला तो धर्म परमतसहिष्णू आहे, एवढेच नव्हे, तर जगातले सर्वच्या सर्व धर्म पूर्णतया सत्य आहेत, असे तो मानतो. धार्मिक अत्याचारांनी निर्वासित झालेल्या विविध धर्मांच्या अनुयायांना आम्ही आमच्या पोटात आनंदाने जागा दिली, हे मी अभिमानपूर्वक सांगतो. रोमनांच्या अत्याचारांनी यहुदी नि मुसलमानांच्या अत्याचारांनी पारसिक भारतात आले. त्यांना त्यांचा धर्म बदलण्याची कधीच आवश्यकता पडली नाही. सर्वच धर्म जिथे सत्य आहेत तिथे बदलण्याचा धर्म तो कोणता नि स्वीकारण्याचा धर्म तरी कोणता ?**

**आम्हांला या निष्ठेचे बाळकडूच आहे. भारतातील कोट्यवधी लोकांना कंठगत असलेली आणि मी माझ्या बाळपणी पाठ केलेली एक काव्यपंक्ती आपणास सांगतो –**

**रुचीनां वैचित्र्यात् ऋजुकुटिल नानापथजुषां**<br>**नृणामेको गम्यः त्वमसि पयसामर्णव इव ।। (शिवमहिम्न स्तोत्र)**

**ज्याप्रमाणे आकाशातून निरनिराळ्या ठिकाणी पडणारे पाणी, अखेर सागराला जाऊन मिळते, त्याप्रमाणे हे परमात्मन्, लोकांकडून निरनिराळ्या मनोभावनांनी अनुसरले जाणारे पूजनाचे विविध असे सरळ अथवा वक्र मार्ग, अखेर तुलाच येऊन पोहोचतात !**

**माझाच धर्म तेवढा खरा, असल्या अविचारी हट्टाग्रहाचे दिवस आता संपले. आजची ही पुण्यमय परिषद गीतेतल्या विचारांचेच सत्यत्व प्रकट करत नाही काय ?**

**यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धयाऽर्चितुमिच्छति ।**<br>**तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम् ।। (गीता ७–२१)**<br>**येऽप्यन्यदेवताभक्ताः यजन्ते श्रद्धयाऽन्विताः ।**<br>**तेऽपि मामेव कौन्तेय जयन्त्यविधिपूर्वकम् ।। (गीता ९–२३)**

**(जो जो भक्त ज्या ज्या स्वरूपाचे पूजन श्रद्धेने करू इच्छितो, त्याची त्याची तीच श्रद्धा मी अढळ करतो.**

**आणखी जे कोणी भक्त इतर देवांचे श्रद्धायुक्त होऊन पूजन करतात, तेदेखील अप्रत्यक्षपणे माझेच पूजन करतात.)**

**जो माझ्याकडे येतो तो कोणत्याही साधनाने येवो, मी त्यालाच प्राप्त होतो; विविध मार्गांनी**

**धावणारे हे लोक अंती मलाच येऊन मिळतात.**

**खरोखर संकुचितपणा, पंथनिष्ठा, नि त्यांचेच अपत्य म्हणजे पिसाट वृत्ती; या पिशाच्यांनी आपल्या सुंदर पृथ्वीला आजपर्यंत घेरले आहे. ही पिशाच्चे नसती तर मानवी समाज एव्हाना कितीतरी प्रगत झाला असता. पण आता त्या पिशाच्चांचे दिवस भरले आहे, असे मी समजतो. आज सकाळी परिषदेच्या सुरुवातीला जी घंटा वाजत होती तिच्या निनादातून हेच सूचित झाले आहे की, तलवारीच्या तडाख्यांनी अथवा लेखणीच्या फटकाऱ्यांनी पंथनिष्ठेचा प्रचार करण्याची पिसाट वृत्ती मेली, नि त्याचप्रमाणे एकाच ध्येयाकडे जाणाऱ्या व्यक्तींमधील असद्भावनाही नाहीशी झाली.'**

स्वामीजींचे हे भाषण लहान नि मोजके होते. पण त्यामधील विश्वात्मकता, मूलस्पर्शी आस्था, उदारता ही अननुभूत होती. निरनिराळ्या धर्मांची तत्त्वे विश्वव्यापक आहेत; आणि सर्व धर्मांचे ध्येय एकच आहे हे स्वामीजींनी केलेले उद्घोषित केवळ अश्रुत, अलौकिक, अभूतपूर्व होते. दूर दक्षिणेश्वराच्या मंदिरात राहणाऱ्या एका महान द्रष्ट्याच्या पायांशी बसून, सर्व धर्म एकाच परमेश्वराकडे नेतात, हे जे ज्ञान स्वामीजींनी संपादन केले होते, तेच त्यांनी परिषदेमध्ये प्रकट केले. स्वामीजी भाषण संपवून भावनावेगात खाली बसले, तेव्हा श्रोत्यांनी संमतिदर्शक टाळ्या वाजवून त्यांचा आदर केला.

कीर्तीच्या ऐन शिखरावर असताना स्वामीजींचे अंतःकरण हिंदुस्थानासाठी तळमळत होते. त्यांना व्यक्तिशः मिळवायचे असे काहीच उरले नव्हते. शिकागोमधील काही लक्षाधीशांनी त्यांना आपल्या घरात राजाप्रमाणे राहायला बोलावले होते. स्वामीजींचे पहिले भाषण झाले, त्या रात्री शिकागो शहरातील एका अत्यंत श्रीमंत गृहस्थाने त्यांना राहण्यासाठी घरी नेले. तिथे राजेशाही थाटामध्ये त्यांची बडदास्त ठेवली. झोपेसाठी सर्व सुखसोयींनी युक्त अशी एक राजमहालासारखी खोली त्यांना दिली. ऐश्वर्याने वेढल्या गेलेल्या त्या परिस्थितीमध्ये स्वामीजींना सुख झाले नाही. उलट ते अधिकच कष्टी झाले. लाखो लोकांनी केलेले स्वागत, झालेली कीर्ती, होणारे गुणगान या कशाचाही त्यांच्या मनावर परिणाम झाला नाही. सर्व सुखकल्पनांच्या पलीकडे असलेला संन्यस्त भाव त्यांच्या चित्तात कायम हेता. त्यांच्या मनात दरिद्री हिंदुस्थानातील समाजाचे चित्र उभे राहिले होते. त्या दिवशी त्यांनी आपले अंग अंथरुणावर टाकले, त्या वेळेला भयंकर दारिद्र्याने पिळून गेलेला हिंदुस्थान आणि श्रीमंतीमध्ये लोळणारी अमेरिका, अशी दोन चित्रे त्यांच्या डोळ्यासमोर एकदम उभी राहिली. हिंदुस्थानच्या दुर्दैवाबद्दलच्या विचाराने त्यांना झोप येईना. अंगाखालची गादी त्यांना काट्यासारखी खुपू लागली. उशी अश्रूंनी भिजून गेली. ते उठले, आणि खिडकीपाशी जाऊन बाहेरच्या अंधारात दूरवर पाहात राहिले. बराच वेळ अशा स्थितीत गेल्यावर दुःखातिशयाने ते तिथेच पडले आणि स्फुंदत स्फुंदत म्हणू लागले, **'हे आई, माझी मातृभूमी जोपर्यंत भीषण दारिद्र्याच्या दुःखात आहे, तोपर्यंत मला मिळणारे यश आणि कीर्ती यांची काय किंमत ! मूठभर तांदुळाकरिता आमच्या देशातील लाखो लोकांना मरावे लागत आहे, आणि या ठिकाणी एका सामान्य व्यक्तीच्या क्षुद्र सुखाकरिता लाखो रुपये खर्च होत आहेत. हिंदुस्थानातल्या समाजाचा उद्धार कोण करेल ? त्यांना पुरेसे अन्नपाणी कोण देईल ? हे आई, त्यांना मदत कशी करावी याचा मार्ग मला दाखव.'**

स्वामीजींच्या मनातील मातृभूमीबद्दलचे नितांत प्रेम पुनःपुन्हा दिसून येते. किंबहुना त्यांच्या सर्व कार्याची स्फूर्ती या प्रेमामधून होती, असे म्हटल्यास चूक होणार नाही.

❖ ❖ ❖

२०१७-१८ हे वर्ष भगिनी निवेदिता यांचे सार्धशती जयंती समारोह म्हणून साजरे होत आहे. त्या निमित्ताने गतवर्षीच्या अंकात त्यांचे प्रेरणादायी विचार प्रत्येक पानावरील तळटीपांच्या द्वारे सादर केले होते. यावर्षीच्या अंकात विवेकानंद केंद्र, कन्याकुमारीच्या उपाध्यक्षा मा. निवेदितातार्इ भिडे यांनी पुण्यात या निमित्ताने झालेल्या कार्यक्रमात भगिनी निवेदितांना वाहिलेली अत्यंत प्रेरक आदरांजली सादर करत आहोत.

-------------------

## भगिनी निवेदिता

**– श्रीमती निवेदिता भिडे**

भगिनी निवेदितांच्या जीवनचरित्राचे मी जेव्हा जेव्हा अध्ययन करते तेव्हा मला त्याच्यातून दोन महत्त्वाचे प्रेरणा बिंदू मिळतात. एक म्हणजे जेव्हा आपण जीवन प्रयोजनपूर्ण करण्यासाठी सत्याच्या शोधात निघतो, तेव्हा सत्याशी आपली समोरासमोर ओळख होते. तेव्हा कशी धैर्याने त्यासाठी उडी मारायची, त्यासाठी स्वतःला कसं झोकून द्यायचे आणि एकदा झोकून दिलं म्हणजे आपण त्या कार्यासाठी उपयुक्त होतोच असं नाही तर स्वतःमध्ये त्या अनुसार बदल घडवून कसे आणायचे (Transformation in oneself) हे प्रत्यक्ष सांगणारं जे निवेदितांचं जीवन आहे ते अत्यंत प्रेरक आहे. शेवटी जीवनाचं शाश्वत सत्य काय आहे ? जीवन कशासाठी आहे ? जर एक ना एक दिवस मृत्यू निश्चित आहे तर मग आपण जन्म घेतला तो कशासाठी ? याच्या शोधात त्या निघाल्या. त्यांनी खूप अध्ययन केलं. जेथे सत्याबरोबर सुसंगतता दिसली नाही ते त्यांनी सोडून दिलं.

स्वामी विवेकानंदांच्या भाषणाला त्यांच्या मैत्रिणीनं – लेडी मार्गेझन – यांनी बोलवलं म्हणून त्या गेल्या होत्या. भाषणं ऐकायला गेल्या तेव्हा त्या एक खूप अभिमानी गर्विष्ठ अशा ब्रिटिश नागरिक होत्या. या भाषणाच्या निमित्ताने त्यांना स्वामीजींचं प्रभावी व्यक्तिमत्त्व जाणवलं. स्वामीजींचं भाषणही अत्यंत प्रभावी होतं. नंतर जेव्हा त्यांना विचारलं तेव्हा त्या म्हणाल्या, ''भाषण खूप छान होतं पण त्यात नवीन काहीच नव्हतं.'' घरी गेल्यावर त्या विचार करायला लागल्या. 'जर मी म्हणते सत्य सत्य तर जे आज आमचं गुलाम राष्ट्र आहे त्या देशातून आलेल्या व्यक्तीकडून 'सत्य' समजणार असेल तर ते समजावून घ्यायची माझी तयारी असली पाहिजे.' म्हणजे सर्वात प्रथम मन जे आहे ते मोकळं, खुलं असलं पाहिजे. मोकळ्या मनाने सत्य जिथून येईल ते स्विकारायची तयारी असली पाहिजे. नंतर जेव्हा त्या स्वामी विवेकानंदांच्या संपर्कात आल्या, त्यांची भाषणे, चर्चा ऐकायला लागल्या तेव्हा त्यांनी स्वामींचे इंग्लंडमधील एकही भाषण, मुलाखत चुकवली नाही.

भगिनी निवेदिता या काही सामान्य नव्हत्या. त्या एक प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ होत्या. त्यांनी एक 'क्रिसेंट लिटररी क्लब' उघडला होता. त्यात बर्नार्ड शॉसारखे लोक यायचे. अशा प्रसिद्ध लोकांच्या वर्तुळामध्ये त्या वावरणाऱ्या होत्या. जेव्हा त्या विवेकानंदांना ऐकायला लागल्या तेव्हा त्या अशा निष्कर्षापर्यंत आल्या की, 'मी भारतात जाईन आणि भारतामध्ये सेवा करीन. माझ्या गुरुंबरोबर राहून सत्याची अनुभुती घेईन.' ही गोष्ट खूप मोठी आहे. त्यांनी हे स्वामी विवेकानंदांना सांगितले पण स्वामी विवेकानंदांची अशी इच्छा नव्हती की 'दुसऱ्या देशातून कुणी यावं आणि परत आमच्याकडे बोट दाखवीत बोलावं की तुमच्याकडे हे ठीक नाही, ते ठीक नाही, ते तर आम्ही खूप ऐकलंय. आम्हाला जाणून, आमची शक्ती जाणून मदत करणारं व्यक्तिमत्त्व हवं आहे' आणि म्हणून स्वामी विवेकानंदांनी सांगितलं की 'तुम्ही इथंच राहून भरपूर काम करू शकता'. पण भगिनी निवेदिता एकदम पक्क्या होत्या. त्यांनी परत पत्र लिहिलं की मी येऊ इच्छिते. मग स्वामी विवेकानंदांनी त्यांना सांगितलं, 'तुम्ही भारतात आलात तर तुम्हाला

**करा कार्य मोठें, नको ती अहंता । कशाला कृतीची म्हणावीच संथा ।।**
**पुरा स्वार्थ जाळून तो भस्म लावी । बने दास त्याचा सदा काल भावी ।।**

सतत अडचणी येत राहतील. एक म्हणजे ज्या भारतीयांसाठी तुम्ही इथे येत आहात ते भारतीयच तुमच्याबद्दल तुमच्या इराद्याबद्दल संशय घेतील. तर तो तुम्ही सहन करू शकाल का ? दुसरं म्हणजे इथं जे ब्रिटीश आहेत त्यांना हे आवडणार नाही. तुम्ही त्यांना तोंड देऊ शकाल का ? इथं तुम्हाला कोणत्याही युरोपियन सुखसुविधा मिळणार नाहीत. त्यांच्याशिवाय तुम्ही राहू शकाल का ? आणि भारत हा अत्यंत गरम देश आहे. ती गरमी तुम्ही सहन करू शकाल का ?' मार्गारेट नोबल यांनी स्वामीजींना सांगितलं की 'हो, हे मी सगळं सहन करायला तयार आहे' आणि मग त्या स्वामीजींच्या अनुमतीने भारतात आल्या. स्वामीजींनी सांगितलं, 'या तुमचं स्वागत आहे. I always stand by you.' इथं आल्यावर त्यांची दीक्षा झाली आणि स्वामीजींनी त्यांना 'निवेदिता' हे नाव दिले. 'निवेदिता म्हणजे समर्पित'. निवेदिता नाव दिलं म्हणून कुणी समर्पित होत नाही तर त्यासाठी स्वतःमध्ये जो बदलाव आणायचा होता ती एक मोठी प्रक्रिया होती. **कुणीही राष्ट्रासाठी, समाजासाठी कार्य करू इच्छितो. त्यासाठी वेळ देऊ इच्छितो तेव्हा मी जसा आहे तसा मी राहीन असं म्हणून मी राष्ट्रासाठी काही करू शकत नाही तर त्याच्याशी एकरूप होऊनच आणि त्याप्रमाणे स्वतःमध्ये बदल घडवून आणूनच आपण कार्य करू शकतो. असं म्हणतात ना, 'शिवो भूत्वा शिवम् यदे' म्हणजे शिवाची जर खरी पूजा करायची असेल तर आपल्याला शिवस्वरूप व्हायला पाहिजे म्हणजे शुद्ध मनाचे व्हायला पाहिजे तसंच भारतमातेची पूजा करायची तर तिच्याबरोबर एकरूप व्हायला हवे.** तर एकदा दीक्षा झाल्यावर स्वामी विवेकानंदांनी भगिनी निवेदितांना विचारले की ''तुम्ही कुठल्या देशाच्या आहात ?'' तर त्यांनी सांगितलं, 'ब्रिटन!' आणि मग विवेकानंदांच्या लक्षात आलं की, मार्गारेट नोबल खूप लांब आहे. अजून बराच वेळ लागणार आहे. आणि मग स्वामीजींचे जे वर्ग असायचे, शिष्यांना घेऊन काही वेगवेगळे विषय व्हायचे, चर्चा व्हायची त्यामध्ये कधी कधी निवेदितांचे प्रश्न असायचे. आक्षेप असायचे. स्वामी विवेकानंद त्यांना म्हणायचे, 'Patriotism like yours is a sin. Ignorance so determined is wickedness.' अशा शब्दांचे प्रयोग स्वामी विवेकानंद करायचे आणि त्यामुळे भगिनी निवेदितांना खूप त्रास व्हायचा. त्यांनी स्वामीजींना गुरु म्हणून स्वीकारलेलं होतं. हिंदू धर्माची दीक्षा घेतली आणि नंतर त्याप्रमाणे त्यांनी उडी घेतली. त्या भारतात आल्या. स्वामी विवेकानंदांच्या शिवाय त्यांना कोणीही सपोर्ट करणारे इथे नव्हते.

त्या इथे आल्या आणि रामकृष्ण मिशनच्या झाल्या. पण इथे आल्यावर दुसरीच अडचण निर्माण झाली की स्वतःमध्ये बदल घडवून आणायचा, बदल घडवायचा. योग्य साधन म्हणून स्वतःला तयार करायचं आणि तिसरी अडचण होती की या मार्गावर मी पक्की राहू शकते की नाही याविषयी मनात येणारी शंका. भगिनी निवेदितांची विशेषता ही आहे की, त्यांनी कधीही माझा निर्णय चुकला का ? मी परत जाऊ का ? हे मला जमेल का ? असा विचार केला नाही. त्या फक्त हेच म्हणायच्या, की माझे गुरु मला जे सांगताहेत ते मला समजत का नाहीये; मी काय केलं म्हणजे मला समजेल ? मग त्यातून गीतेचा, ध्यानाचा अभ्यास सुरू केला. स्वतःमध्ये जो बदल घडवून आणायचा तो त्यांनी केला. आणि आपण बघतो की हळूहळू त्या खऱ्या अर्थाने समर्पित झाल्या.

समर्पित म्हणजे स्वतःला त्यांनी असं झोकून दिलं की केवळ अकरा वर्षांमध्ये त्यांनी प्रचंड मोठं काम केलं. **आपल्या राष्ट्र जीवनाचं एकही क्षेत्र त्यांनी असं सोडलं नाही की ज्यामध्ये त्यांचं योगदान नाही; ज्यामध्ये त्यांनी संस्था उभ्या केल्या नाहीत. ज्यामध्ये त्यांनी राष्ट्रीय भावना निर्माण केली नाही, या संस्था त्यांनी**

**प्रत्यक्ष उभारल्या नाहीत पण त्यांनी प्रेरणा दिली. मग कला असो, राष्ट्रीय स्वातंत्र्य असो, साहित्य असो, विज्ञान असो, शिक्षण असो. प्रत्येक क्षेत्रामध्ये वेगवेगळ्या संस्था त्यांच्या प्रेरणेने उभ्या राहिल्या. असं असतं समर्पण.** भगिनी निवेदिता लंडनमध्येच राहिल्या असत्या तर त्या एक उत्तम शिक्षणतज्ज्ञ म्हणून प्रसिद्ध झाल्या असत्या. पण **त्यांनी हे जे समर्पण केलं त्या समर्पणात, त्यागातही एक 'करिअर' असतं हे दाखवून दिलं. युवकांना हे मी सांगू इच्छिते समर्पणाचं एक उत्तम उदाहरण म्हणजे भगिनी निवेदिता.**

आज भगिनी निवेदितांची १५० वी जयंती त्यांच्या जन्मस्थानापासून दूर इतक्या लांब मोठ्या प्रमाणावर साजरी होतीय याला अर्थ आहेच. **भगिनी निवेदितांचे हे समर्पण पाहिले की, 'स्वतःमध्ये बदल घडवून आणून राष्ट्रकार्याला अनुरूप साधन असं स्वतःला बनवणं' ही प्रेरणा त्यांच्याकडून घेऊ शकतो.** त्या म्हणायच्या 'मी माझं कार्य केलं आहे. हे राष्ट्र काही या ब्रिटिशांनी 'एक' केलेलं नाही. या रेल्वेमुळे आणि पोस्टामुळे हे 'एक' झालेलं नाही तर **हे अत्यंत प्राचीन राष्ट्र आहे. इथली राष्ट्रीयता ही एक दैवी देणगी आहे. आज फक्त ही एक समस्या आहे की आम्ही राष्ट्रीयता विसरलो आहोत. ही राष्ट्रीयता मला परत जागृत करायची आहे. I have to awaken the national consciousness.' आणि खरोखरच आपण जर त्यांचं जीवन वाचलं तर हे जाणवेल की आपल्या प्रत्येक कृतीतून राष्ट्रीयता प्रकट होतीय ना याबद्दल त्या सतत जागरुक असत.**

काही उदाहरणं सांगते, संपूर्ण भारतभर त्या भाषण द्यायला जात असत. एकदा त्या भाषण द्यायला गेल्या असताना **लोक स्वागत करताना ब्रिटिश पद्धतीप्रमाणे हिपीप हुर्रे... असं म्हणायला लागली तेव्हा त्या खूप संतापल्या आणि म्हणाल्या, 'हिपीप हुर्रे... काय, जयजयकार करा, भारताचा जयजयकार करा, वाहे गुरुकी फते म्हणा'** आणि मग लोकांनी पण 'वाहे गुरुकी फते'चा जयघोष केला.

एकदा नागपूरला एका महाविद्यालयाच्या कार्यक्रमाला गेल्या असताना त्यांना सांगितले गेले की आधी बक्षीस समारंभ असेल नंतर तुमचं भाषण. बक्षीस समारंभ सुरू झाला तर तो क्रिकेटसाठी होता. तेव्हा त्या खूप संतापल्या. त्यांनी बक्षिसे दिली पण जेव्हा त्या बोलायला उभ्या राहिल्या तेव्हा म्हणाल्या, **''मला वाटलं या मराठ्यांच्या भूमीमध्ये शारीरिक शक्ती वाढवणारे खेळ शिकवले जातील आणि त्याचे प्रदर्शन असेल. त्यासाठी स्पर्धा घेतल्या जातील. त्यासाठी बक्षीसे असतील.''**

एकदा रवींद्रनाथांनी त्यांना विचारले की, 'तुम्ही माझ्या मुलीला इंग्रजी शिकवाल का ?' निवेदिता म्हणाल्या, 'काय ? मी इथे भारतीय स्त्रियांना इंग्लीश किंवा ब्रिटीश बनवायला आली नाहीये. मी अजिबात इंग्रजी शिकवणार नाही, स्त्रियांमध्ये जी प्रतिभा आहे त्या प्रतिभेचा उपयोग करून, कलेचा उपयोग करून त्यांची भारतीयता कशी प्रगटीत होईल हे साधण्याचे कार्य करण्यासाठी मी इथे आली आहे.' आणि त्यांनी इंग्रजी शिकवलं नाही. रवींद्रनाथ टागोरांसारख्या व्यक्तीलासुद्धा नाही म्हणायची त्यांची हिम्मत होती.

त्यांच्या घरी दूध टाकायला दूधवाला यायचा. त्या विवेकानंदांच्या शिष्या आहेत म्हणून हात जोडून त्यांना म्हणाला, 'तुम्ही मला धर्माबद्दल सांगा.' तर भगिनी निवेदिता म्हणाल्या, 'मी ? मी कोण तुम्हाला धर्माबद्दल सांगणार. तुम्ही या भूमीमध्ये जन्म घेतलाय. तुम्ही श्रीकृष्णाच्या परंपरेतील काम करताय. तुम्हीच मला हा धर्म काय आहे ते सांगा.' हा होता प्रत्येक भारतीयावरचा विश्वास. मग ते सेवा क्षेत्र असो, शिक्षण क्षेत्र असो, विज्ञान क्षेत्र असो किंवा साहित्य असो.

सर्वात पहिलं पुस्तक त्यांनी इथं भारतात येऊन लिहिलेलं 'Kali the mother'. या पुस्तकात त्यांनी 'बाहेरून आलेल्या लोकांना काली ही भयंकर देवता वाटते पण तसं नसून काली जीवनाचं वास्तव शिकवणारी देवी आहे' हे अत्यंत सुंदरपणे लिहिले आहे. प्रत्येक क्षेत्रात त्यांनी उत्तम काम केलं आहे.

शिक्षण क्षेत्रातील एक उदाहरण सांगते ज्या काळात वंदेमातरम् म्हटलं तर जेलमध्ये पाठवले जाई. तेव्हा भगिनी निवेदितांच्या शाळेत 'वंदेमातरम्' ही रोजची प्रार्थना होती. छोट्या छोट्या गोष्टीतून त्या शिकवायच्या. एकदा मुलींनी वर्गात भिंतीवर रामकृष्णांचा फोटो एकीकडे व दुसरीकडे जगाचा नकाशा लावला. तर यांनी काय केलं ? जगाचा नकाशा काढून रामकृष्णांच्या फोटोखाली लावला आणि म्हणाल्या, 'एक ना एक दिवशी पूर्ण जगाला यांच्या म्हणजे रामकृष्णांच्या पायाशी यायचंय.' म्हणजे इतक्या छोट्या गोष्टीतून आपण आपली राष्ट्रीयता आपली संस्कृती कशी शिकवू शकतो हे जाणवते.

त्यांचे शब्दही असेच होते. 'माझा देश, माझी लोकं. भारताला त्या असं म्हणायच्या. संपूर्ण विश्वामध्ये जर काही सुंदर असेल तर भारतातील स्त्री आपलं घर कसं चालवते, ही संपूर्ण विश्वातील सुंदर गोष्ट आहे.' शारदा माताजींना, पत्र लिहायच्या तेव्हा शेवटी लिहायच्या, 'Yours foolish Khooki' खुकी म्हणजे मुलगी. त्या म्हणायच्या 'मी काय मूर्खपणा केला. जेव्हा जेव्हा मी तुमच्याजवळ येऊन राहते तेव्हा मी बसून फक्त मेडिटेशन करत होते. किती मूर्खपणा आहे हा. तुमच्या पायाशी बसून पाच वर्षाच्या मुलीसारखी राहिली असती तर तुमचं प्रेम मला तितकंच मिळालं असतं.'

भगिनी निवेदितांची १५० वी जयंती आहे. **त्यांचं साहित्य आपण जरुर वाचलं पाहिजे. त्याच्यातून दोन प्रेरणा आपल्याला मिळतात. एक म्हणजे मी जे काय करीन त्यातून राष्ट्रीयता कशी प्रकट करीन ? या राष्ट्राचा आत्मा कसा प्रकट करीन ? आणि दुसरं म्हणजे या राष्ट्र कार्यासाठी स्वतःमध्ये मी बदल कसा घडवून आणीन, त्यासाठी माझी काय तयारी असली पाहिजे. या दोन प्रेरणा आजसुद्धा आपल्याला आवश्यक आहेत. त्या आपल्याला १५० व्या जयंतीमध्ये मिळोत अशी प्रार्थना करते.**

❖ ❖ ❖



गुजरातमधील संघकार्याचा परिपूर्ण विस्तार ज्यांच्या अथक परिश्रमांमधून घडला ते 'वकीलसाहेब' म्हणजेच स्व. लक्ष्मणराव इनामदार यांचे जन्मशताब्दी वर्ष. आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत केवळ संघकार्याकरिता जगलेला एक असामान्य कार्यकर्ता असे त्यांचे सार्थ वर्णन करावे लागेल. त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आदरांजली म्हणून मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'ज्योतिपुंज' या पुस्तकातून घेतलेला लेख 'संघयोगी वकीलसाहेब – लक्ष्मणराव इनामदार' अंशतः उद्धृत करत आहोत.

---

**संघयोगी वकीलसाहेब लक्ष्मणराव इनामदार**

शेक्सपिअरने एका ठिकाणी लिहिले आहे, 'नावात काय आहे ?' या कथनात काही प्रमाणात तथ्य आहे; पण हे विधान पूर्णांशाने स्वीकारता येत नाही. नावाचेही फार महत्त्व असते. उदाहरण घ्या – 'रविशंकर शिवराम व्यास' या नावाचा आमच्यावर तसा कोणताही परिणाम होत नाही; पण रविशंकर महाराज म्हणताच, एका महान तपस्व्याची मूर्ती डोळ्यासमोर येऊ लागते. तसेच अमृतलाल विठ्ठलदास ठक्कर या नावाशी आमचे काही देणे–घेणे आहे, असे वाटत नाही. पण ठक्कर बाप्पा म्हणताच आमच्यात एक वेगळीच भावना जागृत होते. त्याचप्रमाणे 'लक्ष्मण माधव इनामदार' हे नाव गुजरातमध्ये किती लोकांना माहीत असेल ? पण वकीलसाहेब म्हणताच गुजरातच्या केवळ शहरांमध्येच नाही तर गावागावांमध्ये त्यांना ओळखणारे हजारो लोक भेटू लागतील. रविशंकर शिवराम व्यास – रविशंकर महाराज झाले. अमृतलाल विठ्ठलदास ठक्कर – ठक्कर बाप्पा झाले, ही काही जादूची करामत नव्हती. यामागे होती त्यांची अथक तपश्चर्या ! लक्ष्मणराव इनामदार आमच्यासाठी वकीलसाहेब झाले यामागे होती त्यांची तपस्या, अथक परिश्रम आणि कार्यासोबतची त्यांची संपूर्ण समरसता.

वकीलसाहेबांचा जन्म महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील खटाव गावात झाला होता. वडिलांचे नाव माधवराव आणि आडनाव खटावकर. वकीलसाहेबांचे एक पूर्वज श्री. कृष्णराव खटावकर यांनी स्वराज्याची सेवा केली होती. छत्रपती संभाजींचे सुपुत्र छत्रपती शाहू महाराजांनी 'सरदार' हा किताब व काही जमीन बक्षीस दिली होती. बक्षीस म्हणून मिळालेल्या जमिनीच्या महसुलाचा काही भाग इनामदारांना मिळत होता. कालौघात इनाम गेले आणि इनामदार आडनाव कायम राहिले.

वकीलसाहेबांचा जन्म २१ सप्टेंबर १९१७ रोजी ऋषिपंचमीच्या दिवशी झाला. वकीलसाहेबांना सात भाऊ व दोन बहिणी. भावांमध्ये वकीलसाहेब तिसरे. वकीलसाहेबांच्या वडिलांचे कुटुंब फार मोठे होते. माधवराव कॅनॉल इन्स्पेक्टर होते. एका गावाहून दुसऱ्या गावी त्यांची वारंवार बदली होत होती. त्यामुळे कुटुंबाला त्यांनी खटावलाच ठेवले होते.

वकीलसाहेबांचे शिक्षण जरा उशिराने सुरू झाले. १९२३ मध्ये त्यांच्या वडिलांची बदली किर्लोस्करवाडीजवळ दुधोंडी गावात झाली. तेथील शाळेत त्यांना प्रवेश मिळाला. दोन वर्षे तेथे शिकून ते पुन्हा आपल्या आजोबांजवळ खटावला आले.

वकीलासाहेबांच्या वडिलांनी मुलांच्या शिक्षणासाठी साताऱ्यात एक घर भाड्याने घेतले होते. चौथी उत्तीर्ण केल्यावर वकीलसाहेबही तिथे शिकण्यासाठी गेले. १९२९ मध्ये त्यांनी साताऱ्याच्या न्यू इंग्लिश शाळेत प्रवेश घेतला. मोठे एकत्र कुटुंब व बेताचीच स्थिती यामुळे स्वाभाविकपणे इनामदार कुटुंबाला गरिबीला तोंड द्यावे लागत

होते; पण त्याचे काही दूरगामी फायदेही झालेत. कुटुंबात एवढे सारे लोक, पण हे सर्व आपलेच आहेत, असे समजून थोडेफार कष्ट सहन करावे लागत. त्यातही एक आनंद होता. हा अमूल्य संस्कार बालवयातच त्यांच्यावर झाला. एक प्रकारे पाहिल्यास संपूर्ण हिंदू समाजच माझे कुटुंब आहे या संघ विचाराचे बीज याच काळात त्यांच्या मनात रोवले गेले होते.

वकीलसाहेबांच्या समाजजीवनाची प्रत्यक्ष सुरुवात साताऱ्यापासून झाली, असे म्हणता येईल. साताऱ्यात शिक्षण सुरू होते आणि सोबतच मित्रमंडळींची साथही मिळत होती. वकीलसाहेबांना बालपणापासूनच कसरतीची आवड. कबड्डी व खो-खो खेळण्यात ते निपुण होते. अनेकदा ते कर्णधारही राहिले होते आणि त्या काळात विविध क्रीडा स्पर्धांमध्ये बक्षिसे जिंकली होती. क्रीडा क्षेत्रात अनेक बक्षिसे 'इनाम' मिळवून वकीलसाहेबांनी आपले आडनाव सार्थ केले होते.

**भागानगर सत्याग्रह**

वकीलसाहेबांची जीवनतपस्या सुरू झालेली होती. एकीकडे अभ्यास, दुसरीकडे संघकार्य. इंटर आर्ट्स उत्तीर्ण केल्यानंतर वकीलसाहेबांनी एल्.एल्.बी.च्या अभ्यासक्रमात प्रवेश घेतला. एल्.एल्.बी. प्रथम वर्षाची परीक्षा उत्तीर्णही केली; पण त्याच वेळी १९३९ मध्ये भागानगर (हैद्राबाद) सत्याग्रह सुरू झाला होता. या राज्यातील बहुसंख्य प्रजा हिंदू; पण शासक मुसलमान. निजामाचे शासन जनतेवर एवढा अन्याय, अत्याचार करीत होते की, 'निजामशाही' हा शब्द जुलमी शासनाला पर्यायी शब्द बनला. स्थानिक जनता वारंवार त्याचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न करी; पण प्रत्येक वेळी निजाम शासन आपल्या दडपशाहीने जनतेचा आवाज दाबून टाकत असे. शेवटी सावरकरांनी निजामाचा निःशस्त्र प्रतिकार करण्याचे आंदोलन सुरू केलं. नंतर आर्यसमाजही या सत्याग्रहात सामील झाला. वीर सावकरांच्या आवाहनाला प्रतिसाद देत देशाच्या कानाकोपऱ्यांतून सत्याग्रहींच्या तुकड्या हैद्राबादमध्ये दाखल होऊ लागल्या. पुण्यातील एक नामवंत वकील व हिंदू महासभेचे अग्रणी स्व. ल. ब. भोपटकर यांच्या नेतृत्वाखाली जवळपास १५० महाविद्यालयीन युवक सत्याग्रहात सहभागी झाले होते. वकीलसाहेबांनीही आपला एल.एल.बी.चा अभ्यासक्रम अर्धवट सोडून या तुकडीसह सत्याग्रहात पाऊल टाकलं.

**प्रांत स्वयंसेवक**

संघकार्याच्या यशाचे मूळ सतत कार्य व सातत्यपूर्ण कार्य यात आहे. संघ जीवनात जास्तीत जास्त वेळ देण्याची परंपरा राहिली आहे. नवनव्या योजनांमधून स्वयंसेवकांना संघकार्यासाठी प्रेरित करू शकणारी एक योजना म्हणजे प्रांत स्वयंसेवक ही योजना. तेही संघाच्या योजनेनुसार १९४३ मध्ये गुजरातच्या नवसारीत येऊन पोहोचले. या वेळी त्यांचे वय होते केवळ २५ वर्षे.

**सुवर्ण अध्यायाचा शुभारंभ**

संघात एक गीत आहे - 'शपथ लेना तो सरल हैं, पर निभाना ही कठीन हैं।' पण वकीलसाहेबांनी यात कठीण मार्गच निवडला. त्यांच्या जीवनाचा नवीन अध्याय सुरू झाला होता. आणि तेव्हाचा घटनाक्रम पाहता, गुजरातच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल असा एक अध्याय सुरू झाला होता, असे म्हणावे लागेल.

त्यांच्या आदर्श जीवनाचा प्रारंभ एका अपघाताने झाला. संघाच्या प्रवासासाठी गेलेले दोन स्वयंसेवक आंघोळीसाठी गेले असताना बुडून मरण पावले. या स्वयंसेवकांना आपण वाचवू शकलो नाही, याचे वकीलसाहेबांना दुःख होते. त्या दोघांच्या जागी मीच बुडालो असतो तर किती चांगले झाले असते, असा विचारही



**जनाला पचे तेच वाचे वदावे । कदा क्लिष्ट, दुर्बोध वा तें नसावें ।।**
**रुचे तें ना द्यावें, परी सत्य नित्य । नका रंजनासाठिं बोलूं असत्य।।**

त्यांच्या मनात येऊन गेला. वकीलसाहेब या स्वयंसेवकांच्या घरी गेले. बुडालेल्या स्वयंसेवकांच्या घरचे लोक फारच शोक संतप्त होते. वकीलसाहेबांशी बोलताना त्यांनी अतिशय कटू शब्द वापरले. ते वकीलसाहेबांनी ऐकून घेतले आणि मग त्यांचे सांत्वन केलं. बुडून मरण पावलेल्या एका स्वयंसेवकाचे नाव लक्ष्मण होते. त्याच्या आईचे सांत्वन करत ते म्हणाले, ''मामी (लक्ष्मणच्या आईला ते मामी म्हणत) तुमचा लक्ष्मण तर गेला. यापुढे मीच तुमचा लक्ष्मण.' वकीलसाहेबांनी आपला हा शब्द 'मामी' हयात असेपर्यंत पाळला.

**कसोटीचा कालखंड**

१९५२ मध्ये वकीलसाहेबांच्या तरुण हातात गुजरातच्या संघकार्याचे नेतृत्व आले. संकटकाळातून नुकत्याच बाहेर पडलेल्या संघकार्याचा विस्तार करणे हे काही मामुली काम नव्हते. बिकट आर्थिक स्थितीमुळे अनेक प्रचारकांना आपल्या रोजगार, व्यवसायात परतावे लागले होते. वकीलसाहेब युवा होते तरी त्यांनी धैर्यपूर्वक काम केले. त्यांच्यातील या गुणाने संघकार्यावर कोणतेही संकट येऊ शकले नाही. तीन-चार वर्षांतच ज्या १५० ठिकाणी संघ शाखा पूर्ववत् सुरू झाल्या. दर वर्षी होणाऱ्या संघ शिक्षा वर्गात १५० ते २०० युवक उत्साहाने भाग घेऊ लागले.

**संघयोग्याची साधना**

वकीलसाहेबांचे अखंड कार्यरत, प्रेरक, प्रभावी व तरीही प्रसन्न व्यक्तिमत्त्व पाहून त्यांच्या संपर्कात येणाऱ्यांना वाटे की, त्यांनी काही विशेष साधना वगैरे करून आत्मसिद्धी प्राप्त केली आहे. वकीलसाहेब नियमित व्यायाम, ध्यान, प्राणायाम, गीतापाठ करीत. आठवड्यातून काही दिवस उपवास वा एकवेळ भोजन याचेही पालन करत. पण, लोकांना वाटत होते तशी कोणतीही आध्यात्मिक सिद्धी त्यांना नव्हती आणि ना त्यांनी ती मिळविण्याचा प्रयत्न केला होता.

**डिगो न अपने प्रणसे**

प्रत्यक्षात वकीलसाहेबांचे व्यक्तिमत्त्व,
डिगो न अपनें प्रण से, तो फिर
सब कुछ पा सकते हो प्यारे
तुम भी उंचे बन सकते हो
तुम छू सकते हो नभ के तारें

या गीतातील ओळींमधून देण्यात आलेल्या शिकवणुकीचे ज्वलंत उदाहरण आहे. पू. सरसंघचालक मा. बाळासाहेब देवरस, स्वर्गस्थ वकीलसाहेबांना श्रद्धांजली अर्पण करताना म्हणाले होते, ''वकीलसाहेबांच्या लोकोत्तर गुणविशेषांचे रहस्य समजण्यासारखे आहे.'' पू. बाळासाहेब म्हणाले होते, ''काही गुण तर त्यांच्यात जन्मजातच असतील; पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वात आम्हाला जे इतके सारे गुण दिसतात, ते त्यांनी अथक प्रयत्नांनीच मिळवले असले पाहिजेत. कोणत्याही व्यक्तीला अलौकिक गुणविशेष प्रयत्नांनीच प्राप्त होत असतात.''

स्वयंसेवकांचे जीवन घडविण्यात अधिकाऱ्यांचा आदर्श आचार-विचार या व्यतिरिक्त व्यक्तिगत चर्चा, प्रासंगिक बैठका, वारंवार होणाऱ्या बौद्धिक वर्गांचाही परिणाम असतो. अशा चर्चा, बैठका व बौद्धिक वर्गांमधून विविध विषय समजावून सांगताना वकीलसाहेब दैनंदिन घटनांचा संदर्भ देत. त्यामुळे ऐकणाऱ्याला सहजपणे विषय समजे. एक उदाहरण येथे देण्यासारखे आहे. एका कार्यकर्त्याला एका साप्ताहिकाचे संपादक करण्याची वकीलसाहेबांची योजना होती. तो कार्यकर्ता चांगला हुशार होता; पण वृत्तपत्र क्षेत्राचा अनुभव नसल्याने तो ही

**जगाला खरी शर्करा आवडेल । परी द्यावयाचें जरी कोयनेल ।।**
**तरी शर्करा वेष्टुनी तेच द्यावे । असें युक्तिनें सत्य मार्गास न्यावें।।**

जबाबदारी घेण्यास कां कू करीत होता. वकीलसाहेब त्याला समजावीत म्हणाले, ''तुझं म्हणणं बरोबर आहे; पण कोणाला तरी संपादक करणे आवश्यक आहे. नव्या क्षेत्रात पाय ठेवताना थोड्या फार अडचणी येतातच. काही दिवस काम करून पाहा. वाजली तर बासरी नाही तर बास आहेच.'' वकीलसाहेबांची सूचना शिरोधार्य मानून त्या स्वयंसेवकाने संपादकपदाची जबाबदारी स्वीकारली आणि आज तो एक यशस्वी संपादक म्हणून ओळखला जातो.

**संपर्काची आवड**

व्यापक संपर्क हे वकीलसाहेबांचे मोठे वैशिष्ट्य. संघाचे क्षेत्र प्रचारक व त्यानंतर अखिल भारतीय स्तरावर अधिकारी झाल्यानंतरही त्यांच्या प्रवासातील निर्धारित कार्यक्रम पार पडल्यावर ते काही वेळ या संपर्कासाठी राखून ठेवीत. काही कारणांमुळे संघकार्याच्या जबाबदारीतून मुक्त झालेल्या स्वयंसेवकांच्या घरी जाण्यासही ते विसरत नसत. पू. सरसंघचालक, मा. सरकार्यवाह यांसारख्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत प्रवास करतानाही निर्धारित कार्यक्रम पूर्ण झाल्यावर वेळ काढून त्या ठिकाणच्या नव्या-जुन्या स्वयंसेवकांच्या घरी जाणे हे त्यांचे वैशिष्ट्य होते. आपल्या या व्यापक संपर्कामुळेच ते गुजरात संघ परिवारात दाट स्नेह व आत्मीयतेचे प्रतीक झाले होते.

**भला माणस**

३५ वर्षांच्या या कार्यकाळात त्यांनी अनेक जबाबदाऱ्या सांभाळल्या. १९५२ ते १९७३ या काळात गुजरातमध्ये प्रांत प्रचारक आणि मग गुजरात, महाराष्ट्र, नागपूर, विदर्भ या भागांत क्षेत्र प्रचारक म्हणून मार्गदर्शन केले.

१९४८ मध्ये संघबंदीच्या काळात स्वयंसेवकांवर अनेक संकटे आली होती. त्यावेळी त्यांनी भूमिगत राहून संघबंदीविरुद्ध चालणाऱ्या सत्याग्रहाचे यशस्वी संचालन केले. असेच दुसरे संकट १९७५ मध्ये आणीबाणीत उद्‌भवले होते. त्या काळातही भूमिगत राहून स्वयंसेवकांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी त्यांनी यशस्वीपणे सांभाळली होती. या दोन्ही संघर्षात त्यांच्यातील विलक्षण धैर्याची प्रचीती स्वयंसेवकांना आली. त्यांचे हे तपस्वी व्यक्तिमत्त्व सहकारी स्वयंसेवकांचा विकास व सहानुभूतीसाठी सदैव तयार असे. स्वयंसेवक लहान असो वा मोठा कार्यकर्ता, कोणाकडूनही चूक झाली तरी जराही न रागावता ते आपला आवडता शब्द 'भला माणस' उच्चारत. रागावण्यासाठी त्यांच्या शब्दकोशात जणू काही हाच सर्वात कठोर शब्द होता.

वकीलसाहेबांचे आकर्षक व्यक्तिमत्त्व अनेक युवकांचे प्रेरणास्थान होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने प्रभावित एक वरिष्ठ अधिकारी एकदा सांगत होते, 'हा मुलगा रोज माझ्या कार्यालयासमोरून जाणाऱ्या रस्त्यावरून शाखेत जात होता. मी त्याची ओळख करून घेतली. मग रोज माझ्या कार्यालयात येऊन नमस्ते-नमस्ते म्हणणे हा जणू त्याचा नित्यक्रम झाला होता. मलाही त्याच्याबद्दल एक जबर आकर्षण वाटू लागले होते. कधीकधी मी त्याला सोडा पाजत असे. नमस्ते-नमस्ते म्हणणारा हा युवक माझ्या संपूर्ण जीवनालाही त्याच रंगात रंगवून टाकील, याची मला तेव्हा कल्पना नव्हती आणि आज प्रत्यक्षात मला त्याच्या चरणाजवळ बसण्यास अभिमान वाटतो.'

**'संघकार्य तर जीवनभर आहे – आता हे करा'**

१९७१ मध्ये जुनागढच्या विवेकानंद शाळेत संघ शिक्षा वर्ग सुरू झाला होता. एक स्वयंसेवक तिथे शिक्षक म्हणून आले होते. प. पू. श्रीगुरुजीही वर्गात आले होते. ते दुसऱ्या प्रांतातील वर्गासाठी रवाना झाले. त्यांच्या प्रस्थानानंतर लगेच वकीलसाहेबांनी या कार्यकर्त्याला आपल्या कक्षात बोलावले. त्याच्या खांद्यावर हात ठेवीत प्रेमाने ते म्हणाले, ''आता आपण घरी परतण्याची तयारी करा.'' कार्यकर्त्याला धक्का बसला. तो हादरला आणि



**सदा शब्द तोलून वाचे वदावे । असे जें मनीं तेच लोकां कळावे ।।**
**सदा भावनेचे कुठेही फवारे । उगा शिंपुनी कां मुखा शीण द्या रे ।**

कापऱ्या स्वरात त्याने विचारले, ''वकीलसाहेब, माझ्या हातून काही चूक झाली का ? माझ्या हातून काही शिस्तभंग घडला ?'' वकीलसाहेब उत्तरले, ''नाही रे ! भल्या माणसा. असं काहीही नाही. चिंता करू नकोस.'' त्याने विचारले, ''मग मला घरी परतण्यासाठी का म्हणत आहात ? मी येथील शिस्त कशी मोडू शकतो ?''

वकीलसाहेबांनी मग हळूच आपल्या हाती लपवलेला टेलिग्राम उघडून त्याला दाखवला. ''पाहा ! तुझ्या वडिलांनी पाठविला आहे. त्यात लिहिलं आहे, 'कम सून फॉर इंटरव्ह्यू ऑफ सेन्सस ऑन २२ मे.' म्हणून जा आणि यशस्वीपणे मुलाखत दे.'' कार्यकर्ता युक्तिवाद करीत म्हणाला, ''मी तर अन्य अनेक ठिकाणी नोकरीसाठी अर्ज केला आहे. या मुलाखतीसाठी मी वर्ग सोडणार नाही.'' आता वकीलसाहेबांचा स्वर अधिक संवेदनशील झाला होता. कार्यकर्त्याचा खांदा हाताने हळूच दाबीत ते म्हणाले, ''पाहा ! तुझ्या घरची आर्थिक स्थिती इतक्यात फार खालावली आहे. तुझ्या कुटुंबाला अलीकडे आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. म्हणून तू आपल्या कुटुंबाला आर्थिक हातभार लावला पाहिजे. संघकार्य तर जीवनभर करायचेच आहे. ते होत राहील; पण आता तुला ताबडतोब घरी गेलं पाहिजे.'' कार्यकर्त्याचे डोळे भरून आले. कठोर शिस्तीचा आग्रह धरणाऱ्या प्रांत प्रचारक वकीलसाहेबांना प्रत्येक कुटुंबाची किती काळजी होती, याचे हे उदाहरण.

१९८२-८३ ची घटना असावी. वकीलसाहेबांची प्रकृती खालावू लागली होती. एक स्वयंसेवक त्यांच्याजवळ जाऊन म्हणाला, ''परमेश्वराच्या कृपेने मला चार पैसे मिळत आहेत, त्यातील काही आपली देखभाल करण्यासाठी वापरू इच्छितो. कृपया, त्याचा स्वीकार करावा.'' वकीलसाहेब उत्तरले, ''बंधू ! मी तुझी भावना ओळखतो; पण माझी देखभाल संघ फार चांगल्या पद्धतीने करत आहे. त्यासाठी पैसे घेण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.'' पण तरीही त्याने पैसे देण्याची इच्छा व्यक्त केली. वकीलसाहेबांनी त्याला व त्याच्या कुटुंबाला योग्य मार्ग दाखविला होता. त्यामुळे त्यांच्या आजारपणात आपण काही तरी केले पाहिजे, असे कार्यकर्त्याला वाटत होते. वकीलसाहेबांनी त्याला दिलेले उत्तर त्यांची उत्तुंगता आणि संघाशी समरसता याचे उत्तम उदाहरण आहे. यानंतर तो स्वयंसेवक वकीलसाहेबांच्या औषधोपचारासाठी पैसे देण्यास जणू अडून बसला होता. शेवटी वकीलसाहेबांनी मार्ग शोधून काढला. ''आपण एवढा आग्रह धरत आहात. मी ते पैसे घेईन; पण त्या पैशाचा उपयोग आम्ही गरीब बांधवांसाठी चालविल्या जाणाऱ्या वैद्यकीय केंद्रासाठी करू. ठीक आहे ना ? कारण तसेही आपल्याला या पैशाचा उपयोग औषधांसाठीच करायचा आहे ना ?'' त्यांनी पैसे घेतले; आणि त्या स्वयंसेवकाला आनंदही झाला.

**गुरुदक्षिणा**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शक्ती मुळात त्याच्या स्वावलंबी अर्थरचनेत आहे. संघ आपल्या कार्यासाठी कोणासमोरच हात पसरत नाही. वर्षातून एकदा सर्व स्वयंसेवक आपापल्या श्रद्धेने जे काही देतात त्यातून संघ चालतो. एकदा एका स्वयंसेवकाने संघ कार्यालयाला पंखा भेट म्हणून देण्याचा प्रस्ताव मांडला होता. अनेकांना हा प्रस्ताव पसंत पडला. सर्वांचे ऐकून घेतल्यावर वकीलसाहेब म्हणाले, ''असे करण्याने पंखा देणारा स्वयंसेवक असूनही त्याच्या मनाचा योग्य विकास होणार नाही. त्याच्यावर होणारे संस्कार सदोष असतील. कारण तो जेव्हा केव्हा कार्यालयात येईल, तेव्हा हा पंखा मी दिला आहे हा विचार त्याच्या मनात येत राहील आणि इथे राहणाऱ्या लोकांच्या मनातही पंखा त्या स्वयंसेवकाने दिला आहे ही भावना राहील. संघासाठी गुरुदक्षिणा हा एकच मार्ग आहे. अन्य कोणत्याही मार्गाने संघाला मदत करणे योग्य नाही.'' वकीलसाहेब प्रत्येक कृतीला संघ संस्काराच्या तराजूत

**जिथे योग्य जे तेच तेथे कथावें । कळे ना कुणा ते न केव्हां भकावें ।।**
**असे रुग्ण पोळी तयाला कशाला ?। तया औषधें द्या, मुसुंबी रसाला ।।**

तोलत. संस्कारप्रक्रियेत कोणतीही उणीव राहू नये, यासाठी ते अतिशय जागरूक असत.

३०-३५ वर्षांपासून ते नियमितपणे गुजरातच्या गावागावांची भ्रमंती करत होते. मा. वकीलसाहेब रेल्वेच्या एखाद्या डब्यात भेटले तर गुजरातच्या एखाद्या लहानशा गावातील गुजराती व्यापाऱ्यासारखे त्यांचे व्यक्तिमत्त्व आणि भाषेवर सौराष्ट्रातील भाषेचा पगडा या बाबी स्पष्टपणे जाणवत. त्यांच्या हातातील एखादे पुस्तक वा वर्तमानपत्र त्यांच्या सतत चिंतनशील मनोवृत्तीची ओळख करून देई. एवढे प्रभावी व्यक्तिमत्त्व असूनही त्यांच्यात अभिमानाचा लवलेशही नव्हता. विविध कार्यांच्या उभारणीत महत्त्वाची भूमिका बजावीत असतानाही त्यांचा एखादा फोटो सापडणेही अवघड होते. खूप शोधल्यानंतर १५-२० वर्षांपूर्वीचा जुना फोटो हाती लागे. इतकी सारी वर्षे सार्वजनिक जीवनात सक्रीय असून, संघाची महत्त्वाची जबाबदारी असून, चुकीनेही त्यांचे नाव वर्तमानपत्रात आले नाही.

**इतिहासाच्या दृष्टिक्षेपातून**

राष्ट्राचा कायाकल्प करणारे वकीलसाहेब केवळ संघकार्यासाठी नाही तर संपूर्ण समाजजीवनातील दोष दूर करण्यासाठी कटिबद्ध होते. त्यांनी तर केवळ शाखाच चालविली; पण त्या शाखांमधून तयार झालेले हजारो स्वयंसेवक आज समाजजीवनाच्या विविध क्षेत्रांना उजळून टाकत आहेत. कोणी धर्मपूर तालुक्यातील वनवासी बांधवांच्या विकासासाठी प्रयत्न करीत आहे, कोणी शिक्षण क्षेत्रात व्यवस्था उभी करून शिशुमंदिर ते उच्च माध्यमिक शाळेपर्यंतच्या शिक्षणात सजीवता आणण्याचा प्रयोग करीत आहे, तर कोणी संत-माहात्म्यांच्या संघटित शक्तीतून समाजातील उणिवा दूर करण्याच्या प्रयत्नात आहे. कोणी मंदिरांना समाजजागृतीचे केंद्र बनविण्याच्या प्रयत्नात आहे, संसद व विधानसभांमध्ये समाजाचे प्रश्न मांडण्याचा काहींचा प्रयत्न आहे, तर कोणी महिला उत्कर्षासाठी महिला स्वावलंबन केंद्र चालवीत आहे. काही स्वयंसेवक कच्छ सीमेच्या रक्षणासाठी जनजागरणाचे व्रत पार पाडीत आहेत, तर कोणी सहकार क्षेत्राच्या माध्यमातून व्यक्तीच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करीत आहेत. सहकारी शेतीचा प्रयोग काही लोक करीत आहेत, तर काहींचा प्रयत्न शहरातील झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या मुलांवर चांगले संस्कार घडविण्याचा आहे. समाजापासून दुरावलेल्या सुशिक्षित वर्गाला राष्ट्रकार्यात जोडण्याचे काम काही लोक करत आहेत, तर संतसाहित्याचा प्रसार करण्याचा काहींचा प्रयत्न आहे. कोणी लहान-मोठ्या वृत्तपत्रांच्या माध्यमातून समाज-जागरणाचे कार्य करीत आहे, कोणी कामगारांमध्ये देशभक्तीचे संस्कार रुजवण्याचा प्रयत्न करत आहे, कोणी अस्थिर अवस्थेत जगणाऱ्या युवाशक्तीला रचनात्मक मार्गावर नेण्यासाठी ग्रामोत्थानसारख्या कार्यक्रमात त्यांना सहभागी करून घेत आहे. असा कार्यांची यादी मोठी आहे. अशा अनेक कार्यांमध्ये कार्यरत कार्यकर्त्यांची संख्याही मोठी आहे. त्यांना जर विचारण्यात आले की, 'बंधू ! जीवनात करिअर बनवण्याचे सोडून या मार्गाला कसे लागलात ?' तर ते म्हणतील, 'शाखेत समाजकार्याचे संस्कार मिळालेच होते आणि नंतर वकीलसाहेबांनी सूचना केली. बस ! मग कशाचा विचार करायचा ?'

वकीलसाहेबांच्या जीवनयज्ञाचा हा एक प्रेरक परिणाम आहे. राष्ट्रनिर्माणाच्या यज्ञात स्वतःचा होम करणाऱ्या या समाज शिल्पकाराचे नाव कोणत्याही फलकावर तर लिहिलेले नाही; पण हजारो स्वयंसेवकांच्या हृदयावर ते कायमचे कोरले गेले आहे. कर्करोगासारख्या आजाराने ग्रासल्यावरही शेवटपर्यंत ते संघकार्यात सक्रीय होते. मृत्यू जवळ आला आहे, हे माहीत असूनही ते जास्तीत जास्त स्वयंसेवकांना भेटण्याचा प्रयत्न करत असत. वकीलसाहेबांचे जीवन 'स्वत: जळत सुगंध दरवळणाऱ्या' उदबत्तीप्रमाणे आजही सारा आसमंत सुगंधित करत आहे.

❖ ❖ ❖



नका हात बांधू कदा साधनांत । असे योग्य जें त्या क्षणीं घ्या करांत ।।
'जुनें तेंच सोनें' नको दृष्टि येथें । तयानें खरी वाढ खुंटोनि जाते ।।



वर्धिनीच्या सर्व शाखात नित्य दहा अंकातील सूर्यनमस्कार प्रसंगोपात्त 'आरुणी' या संगीतरचनेच्या साथीतही घातले जातात. वर्धिनीतील युवकांनी 'सूर्यनमस्कार व प्रांगणीय घोष संगीत' या संदर्भात बापूराव दात्यांची मुलाखत घेतली होती. स्व. बापूरावांच्या जन्मशताब्दीनिमित्त डॉ. शरदराव कुंटे लिखित 'प्रांगणीय संगीताचे स्वदेशी भाष्यकार – बापूराव दात्ये' या पुस्तकातून पुढील लेख अंशतः आदरांजली म्हणून देत आहोत.

--------------------

**आरती एका संघसमर्पित जीवनाची**

२९ एप्रिल १९९८ रोजी श्री. बापूराव दात्यांची जीवनज्योत मालवली आणि ही बातमी प्रसिद्ध झाल्याबरोबर श्री. बापूरावांशी विविध कारणांनी संबंध आलेल्या शेकडो कार्यकर्त्यांचे, संगीत क्षेत्रातील मान्यवरांचे दूरध्वनी मोतीबाग कार्यालयात व श्री. बापूरावांचे धाकटे बंधू, माधवराव यांच्याकडे खणखणू लागले. कित्येकांची पत्रे येऊ लागली. त्यात सामान्य कार्यकर्त्यांपासून संघाचे सरकार्यवाह मा. श्री. शेषाद्रीजींपर्यंत सर्व स्तरातल्या व्यक्तींचा समावेश होता. संघाच्या वर्तुळात बापूराव घोषातील भीष्माचार्य म्हणूनच परिचित होते. संगीत क्षेत्रातील कित्येकांना ते १९८२ च्या दिल्ली एशियाडमधील शिवराजः या भूपरागातील रचनेचे कर्ते म्हणून माहीत होते. पुस्तक प्रकाशन व विक्री विषयात संघाचे काम म्हणून श्री. बापूरावांनी १८ वर्षे हिंदुस्थान साहित्य ही प्रकाशन संस्था चालविली होती. त्यामुळे साहित्य क्षेत्रातही अनेकांना ते जवळून माहीत होते. प्रतिवर्षी रथसप्तमीस हजारो, लाखो बाल युवकांना सांघिक सूर्यनमस्कार घालण्यास प्रवृत्त करणारे, लयबद्ध सूर्यनमस्कारांसाठी आरूणी ही भैरवी रागातील अभिनव रचना करणारे द्रष्टे म्हणून क्रीडा, व्यायाम व आरोग्य क्षेत्रातील व्यक्तींना श्री. बापूराव माहीत होते. या सर्व क्षेत्रात बापूरावांसाठी हळहळणारे हजारो लोक त्यांना मूकपणे श्रद्धांजली देत होते.

'गायनी कळा' हे सांघिक घोष वादनाची मुळाक्षरे सांगणारे पुस्तक, श्रीगुरुजींचे जीवनचरित्र 'तेजाची आरती – श्रीगुरुजी एक दर्शन', सूर्यनमस्कार विषयाचे महत्त्व विशद करणारे संशोधनपर पुस्तक 'सूर्यनमस्कार, उपासना आणि व्यायाम' व भारतीय रागदारीवर आधारित सांघिक घोषवादनासाठी उपयुक्त रचनांचा संग्रह 'स्वरांजली.' ही बापूरावांची पुस्तके ज्यांनी वाचली, अभ्यासली आहेत त्यांना श्री. बापूरावांची त्या त्या क्षेत्रातली उंची माहीत आहे.

एखाद्या विषयाचा सखोल अभ्यास, कोणताही विषय तर्कशुद्ध पद्धतीने मांडण्याची त्यांची हातोटी, पुराव्याशिवाय कोणतेही विधान न करण्याची त्यांची दक्षता, आणि या सगळ्यातून डोकावणारा एक आदर्श कार्यकर्ता यांचे दर्शन या सर्व पुस्तकांतून होते. श्रीगुरुजी हे बापूरावांचे दैवत होते. त्यांचे विचार, त्यांची कामाची पद्धती, त्यांची माणसे जोडण्याची पद्धती, संकटाच्या स्थितीतही न डगमगता ठामपणे वाटचाल करण्याचे त्यांचे धैर्य या सर्वांसंबंधी ते भरभरून बोलत. डॉक्टरांना जवळून पाहिलेले, त्यांच्या मार्गदर्शनाचा प्रत्यक्ष लाभ घेतलेले, १९३८ सालीच घरचा विरोध पत्करूनही मद्राससारख्या दूरच्या अपरिचित प्रांतात प्रचारक म्हणून गेलेले श्री. बापूराव, पुढे विविध क्षेत्रात काम करत राहिले तरी ते आयुष्यभर सर्वार्थाने प्रचारकच राहिले. स्वतःचे घरदार उभारण्याचा विचार सुद्धा केला नाही. संघ विचार, हिंदुत्वाचा विचार समाजात रुजवण्याचाच आयुष्यभर व्यवहार केला. एक प्रतिथयश संगीत रचनाकार म्हणून त्यांना प्रसिद्धी मिळाली. पण ते कधी प्रसिद्धीच्या मागे धावले नाहीत. आपल्या संगीत रचना, सूर्यनमस्कारासंबंधीचे संशोधन व त्याची ध्वनिफीत या कशाचाच उपयोग त्यांनी स्वतःचे खिसे भरण्यासाठी केला नाही. त्यांचे म्हणून जे जे होते ते सारे संघ समर्पितच होते. ❖ ❖ ❖

**कदा चूक कार्यांत हातून झाली । अशी बांधवानें तुला दाखवीली ।।**
**तरी ती चुकी मान्य आहे म्हणावें । न हेका धरोनी कधींही बसावें ।।**

## मकर संक्रमण उत्सव

वर्धिनीचा मकर संक्रमण उत्सव २२ जानेवारी २०१७ ला पोलिस मैदान, शिवाजीनगर येथे उत्साही वातावरणात साजरा झाला. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे १२ शाखांमधील वर्धक व वर्धिका, युवक वर्धक व रुग्ण सहाय्यक वर्गातील विद्यार्थिनी यांची क्रीडा प्रात्यक्षिके. या क्रीडा प्रात्यक्षिकांत फीतनृत्य (रिबीन नृत्य), दंड कवायत (प्रॉपड्रील), दोरीवरच्या उड्या (स्किपींग रोप), नानचाकू, नियुद्ध, दंड, ॲरोबिक्स, छाया नाट्य (शॅडो ॲक्ट), दीप कवायत (बॅटरी ड्रील), बोथाट्या, उत्सव मिरवणूक (कार्निवल) यांचा समावेश होता. ही प्रात्यक्षिके मनोवधेक, सुमधूर संगीतावर सादर झाली. त्याला प्रेक्षकांनी मनापासून दाद दिली.




कार्यक्रमास प्रमुख पाहुणे आंतरराष्ट्रीय कबड्डी पंच श्रीमती सायरा शेख उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या, 'Formula for success is to do hardwork and to believe on your efforts. Always respect your parents. Impossible ह्या शब्दात I M (am) possible असा अर्थ दडलेला आहे. चांगले व सुजाण नागरीक घडवण्याचे मोलाचे काम 'स्व'-रूपवर्धिनी करत आहे. सर्व खेळाडूंचा बहुमान म्हणून आज या कार्यक्रमास उपस्थित आहे. आयुष्यात यशस्वी होण्यासाठी आपण केलेल्या प्रयत्नांवर विश्वास ठेवणे गरजेचे आहे.

कार्यक्रमास निवृत्त सनदी अधिकारी, श्री. सुभाष नागपाल व 'स्व'-रूपवर्धिनीचे कार्यकारिणी सदस्य, सर्व कायकर्ते व पालकवर्ग उपस्थित होता. कार्यक्रमाचे सूत्र संचालन श्री. शुभम जगताप, प्रास्तविक श्री. निशिकांत वाईकर व आभार श्री. योगेश माकणे यांनी मानले.

## राज्यस्तरीय कुमार साहित्य संमेलन २०१७

ज्ञानप्रबोधिनीच्या छात्र प्रबोधनतर्फे राज्यस्तरीय कुमार साहित्य संमेलन ७ व ८ जानेवारीला निगडी येथे पार पडले. या संमेलनाला महाराष्ट्र राज्यातून जवळपास २००० विद्यार्थी आणि शिक्षक उपस्थित होते. या संमेलनात वर्धिनीच्या ५५ वर्धक वर्धिका, युवक युवतींनी सहभाग घेतला.

या संमेलनाच्या उद्‌घाटन प्रसंगी डॉ. रघुनाथ माशेलकर आणि मा. मल्हार अरणकल्ले यांचे मार्गदर्शन मुलांना लाभले.

कविता लेखन, प्रसंग वर्णन, चित्र वर्णन, कथाकथन, व्यक्तिचित्रण अशा विविध २३ साहित्यविषयक कार्यशाळेत मुले रमली.

आपल्या पाठ्यपुस्तकातील अनेक कविता आणि पाठाचे लेखक-लेखिका, कवी-कवयित्री सर्वांच्या भेटीला आले होते. मुलांनी त्यांना भरभरुन प्रश्न विचारले. मनसोक्त गप्पा मारल्या. संजय ढोले, सुमन नवलकर, संगीता बर्वे, प्रदीप अवटे अशा अनेक मान्यवरांची हजेरी होती.

संध्याकाळी मान्यवरांच्या अभिवाचनाचा रसास्वाद मुलांनी घेतला. यात कविता, ललित लेख, कथा यांचा



असो अंतरीं भावना प्रज्वलीता । वरी तेच गांभीर्य का दाखवीता ?
सदा शुद्धसे हास्य गालीं खुलावें । असें वर्तुनी आदरा प्राप्त व्हावें।।

समावेश होता. अभिवाचनाचे सुंदर अविष्कार सगळ्यांनी अनुभवले.
सकाळी राज्यस्तरीय अभिवाचन स्पर्धेत प्रथम क्रमांक आलेल्या शाळेतील मुला-मुलींनी सादरीकरण केले. यात समाविष्ट कथा, कविता मंत्रमुग्ध करणाऱ्या होत्या.
महाराष्ट्र राज्यात विविध क्षेत्रात अभिमानास्पद कामगिरी बजावलेल्या काही मंडळींच्या मुलाखतीचा कार्यक्रम पार पडला. इंद्रजीत भालेराव (ग्रामीण आणि कृषि कवी), भूषण कर्वे(एव्हरेस्ट शिखर जिद्दीने सर केलेले गिर्यारोहक) अशा अनेकांनी मुलांशी गप्पा मारल्या. प्रत्येक अवघड प्रसंगी हार न मानता पुढे जायचे, ग्रंथांची साथ सोडायची नाही असे अनमोल मार्गदर्शन त्यांनी केले.
शेवटचा कार्यक्रम होता तो कल्पक स्पर्धांचा. जवळपास २८ प्रकारच्या स्पर्धा मुलांसाठी आयोजित करण्यात आल्या होत्या. यात सोडवू या शब्दकोडी, शब्द मनोरा, शोध विशेषणांचा, शब्दांच्या अदलाबदली, कल्पनेच्या प्रांगणात अशा भाषिक विश्व समृद्ध करणाऱ्या स्पर्धा होत्या. मुलांच्या मनोरंजना सोबतच नकळत शिक्षण होत होते. या स्पर्धांमध्ये उच्च गुण मिळवलेल्या सर्वांना पुस्तकं बक्षीस मिळाली.
समारोप सत्रात लीना मेहेंदळे, इंद्रजीत भालेराव यांचे सुंदर मार्गदर्शन झाले. ग्रंथ माझे गुरु हाच संदेश त्यांनी सर्वांना दिला.
आपले सर्व वर्धक, वर्धिका २ दिवस साहित्यारसात संपूर्ण बुडून गेले होते. नवीन कविता, नवीन कथा, वाचन, लेखन, रसास्वाद, आकलन अशा अनेक गोष्टींचा सगळ्यांनी आनंद लुटला. स्वतःमधला लेखक आणि कवी जागा व्हायला त्यांना मदत झाली. नवीन मित्र-मैत्रिणी, नवीन अनुभव, नवीन पुस्तक, सर्व लेखक-लेखिका, कवी कवयित्री, संपादक-संपादिका... एक वेगळं जग... साहित्याचं... सगळंच समरसून अनुभवावं व जपून ठेवावं असं!

**जिल्हा अभ्यास दौरा**

सर्व शाखांतील इयत्ता ८ वी व ९ वी च्या वर्धक-वर्धिकांसाठी ११ व १२ फेब्रुवारी रोजी जिल्हा अभ्यास दौरे आयोजित करण्यात आले होते. हे अभ्यास दौरे महाराष्ट्रातील एकूण ६ जिल्ह्यात नेले होते. कोल्हापूर, औरंगाबाद, बीड, बारामती, सोलापूर आणि पुणे या जिल्ह्यांची यासाठी निवड करण्यात आली होती. या निवडक जिल्ह्यांतील शैक्षणिक, सामाजिक, कृषी, महिला-बाल विकास अशा विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांना मुलांनी भेट दिली.
या सेवा कार्यांच्या तसेच सामाजिक प्रश्नांवर काम करणाऱ्या संस्थांच्या अभ्यासातून आपल्या राज्यातील समस्या, त्यावर अनेकांनी शोधलेले उपाय, अवलंबलेले मार्ग, केलेला विचार, अवलंबलेली कार्यपद्धती या मुद्द्यांवर वर्धकांबरोबर चर्चा झाली. **आपण ज्या समाजात राहतो त्या समाजाच्या विकासासाठी आपण काय केले पाहिजे हा विचार वर्धक, वर्धिकांमध्ये रुजवण्यास या भेटींमुळे मदत झाली.**
* संभाजीनगर (औरंगाबाद) - १) रांजण खळगे, निघोज २) आदर्श गाव पाटोदा ३) देवगिरी किल्ला ४) डॉ.बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय प्रतिष्ठान संचलित डॉ. हेडगेवार रुग्णालय व दत्ताजी भाले रक्तपेढी
* मुळशी - १) सायन्स पार्क, पिंपरी-चिंचवड २) ज्ञानप्रबोधिनी, निगडी ३) साखर कारखाना ४) पारले बिस्कीट कंपनी ५) पौड-कातकरी वस्ती
* कोल्हापूर - १) मोतीबाग तालीम २) शाहू राजवाडा ३) कला दालन ४) महालक्ष्मी मंदीर ५) मातोश्री वृद्धाश्रम

६) रंकाळा तलाव ७) गोकुळ दूध कंपनी ८) कण्हेरी मठ ९) हेल्पर्स ऑफ दि हॅन्डिकॅप
* सोलापूर – १) उद्योगवर्धिनी, पाखर संकुल २) नळदुर्ग किल्ला ३) ज्ञानप्रबोधिनी, हराळी ४) भटके विमुक्त विकास परिषद, यमगरवाडी
* बारामती – १) अपंग कल्याणकारी संस्था २) ममता बालसदन ३) सकाळ प्रेस ४) साखर कारखाना ५) जलशुद्धीकरण प्रकल्प ६) नक्षत्र वन ७) शास्वत केंद्र ८) ARTI संस्था
* बीड – १) हिवरे बाजार २) स्नेहालय ३) सोनदरा गुरुकुल ४) शांतीवन ५) रांजणगाव गणपती
यातील काही संस्थांची माहिती देत आहोत.

**१) सोनदरा गुरुकुलम (पाटोदा) –** २१ जुलै १९८६ मध्ये गुरुकुलाच्या कामाची सुरुवात श्री. सुदाम भोंडवे यांनी त्यांच्या काही सहकाऱ्यांसोबत केली. सुरुवातीला २३ मुलांना घेऊन गुरुकुलाची पायाभरणी झाली. आजमितीला येथे १८४ मुले गुरुकुलाअंतर्गत घेतल्या जाणाऱ्या उपक्रमांचा लाभ घेत आहेत. 'सहवासातून शिक्षण आणि शिक्षणातून संस्कार' हे ब्रीद गुरुकुल जोपासत आहे. २१ शिक्षक त्यांच्या परिवारासोबत पूर्ण वेळ या कामात हातभार लावत आहेत. शिक्षण आणि ग्रामविकास हा या प्रकल्पाच्या कार्याचा मुख्य गाभा आहे. आजपर्यंत १५०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी गुरुकुलातून शिक्षण घेतले आहे. परिसरातील शिक्षणापासून वंचित असणाऱ्या मुलांच्या शिक्षणाचा वसा गुरुकुलाने घेतला आहे. ४ थी ते १० वी अशा इयत्तानुसार शिक्षणाची रचना केली आहे. येथील वर्ग चारभिंतीत बंदिस्त नाहीत. वातावरणाच्या व निसर्गाच्या कुशीत बसून विद्यार्थी शिक्षण घेतात. सकाळी फक्त तीनच तास पाठ्यपुस्तक शिकवले जाते. यानंतर अवांतर वाचन, अभ्यासपुरक उपक्रम घेतले जातात. सर्व शिक्षक याच गुरुकुलात रहात असल्याने मुले कधीही जाऊन शंका विचारतात. वर्धिनीच्या वर्धकांनी न्याहारीच्या वेळेत गुरुकुलातील मुलांशी संवाद साधला. यातून मुलांची आर्थिक स्थिती, सामाजिक स्थिती, घरातील वातावरण इ. गोष्टी कळण्यास मदत झाली. मुलांनी गुरुकुलातले शिक्षण जास्त आवडत असल्याचे नमूद केले. कातकरी वस्तीतील मुले, ऊसतोडणी कामगारांची मुले या ठिकाणी आहेत. हे काम उभे करतानाचा प्रवास सुदाम काकांनी मुलांसमोर प्रभावी पद्धतीने मांडला. गुरुकुलातील प्रसन्न वातावरण, मोहक व उपयुक्त साधनांची रचना यामुळे गुरुकुलात रहायचा प्रत्येकालाच मोह होतो. गुरुकुलातील मुले, शिक्षक यांच्याकडून वर्धकांना अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या. सर्व मुले स्वतःची कामे स्वतः करत असल्याचे सर्वांना जाणवले. भोजनांत लागणारा भाजीपाला पिकवणे, गाई, म्हशी, शेळ्या यांची देखभाल करणे, गांडूळखत तयार करणे, परिसर स्वच्छता करणे इ. सर्व कामे मुलंच एकत्र येऊन करतात हे विशेष. या ठिकाणी इयत्तांनुसार मुलांचे गट केले आहेत व त्यांना एकेक पालक नेमून दिले आहेत. मुलांनी आपल्या अडचणी त्यांना सांगाव्यात व यातून उपाय मुलांनीच काढावा अशी संकल्पना आहे. त्यांच्याशी चर्चा करून **हे सर्व कार्य पाहिल्यावर आमच्या सर्वांच्याच मनात आपणही पुढे असेच कार्य करावे हा विचार कोरला गेला.**

**२) शांतीवन (आर्वी, बीड) –** २००१ पासून श्री. दीपक नागरगोजे आणि सौ. आरती नागरगोजे या दांपत्याने शांतीवनचे काम आर्वी या छोट्याशा खेड्यात सुरु केले. दीपक सर आणि आरती ताई यांना या कामाची प्रेरणा थोर समाजसेवक बाबा आमटे यांच्याकडून मिळाल्याचे ते अभिमानाने सांगतात. **विशेष म्हणजे ११ वीत असतानाच आपण सामाजिक काम करायचे असे दिपकसरांनी मनाशी निश्चित केले होते.** सुरुवातीला ऊस तोडणी कामगारांच्या मुलांना घेऊन पत्र्याच्या छोट्याशा झोपड्यात कामास सुरुवात झाली. नंतर हळूहळू आसपासची

अनाथ मुले, तमाशा कलावंतांची मुले, आदिवासी पाड्यावरची मुले, वंचित व दुर्लक्षित समाजातील मुले यांचाही यात समावेश करून घेण्यात आला. हा एक निवासी शैक्षणिक प्रकल्प असला तरी आसपासच्या गावातून मुले-मुली येथे शिकण्यासाठी येत आहेत. आज या शांतीवनात एकूण १००० मुले-मुली शिक्षणाचा लाभ घेत आहेत. यात एकूण ७४ मुली आणि २२५ मुले निवासी आहेत. या सर्व मुला-मुलींच्या शिक्षणाची, निवासाची, भोजनाची व्यवस्था शांतीवनात उत्तम प्रकारे केली आहे. आवश्यक सर्व सोयी-सुविधा या ठिकाणी उपलब्ध करून दिल्या आहेत. मुला-मुलींच्या शिक्षणाबरोबरच शांतीवनाने गावातील पाणीप्रश्नावर काम करण्यास सुरुवात केली आहे. **दुष्काळग्रस्त म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या गावात शांतीवनाने शेततळी बांधण्यात यश मिळवले. मागील वर्षी राज्याने भयंकर दुष्काळाचा सामना केला पण या काळात शांतीवन हिरवेगार होते. या तळ्याच्या पाण्यावर शांतीवन प्रकल्पात लागणारा सर्व भाजीपाला स्वकष्टावर पिकवला जातो.** आज या प्रकल्पासाठी एकूण ५२ जण कार्यकर्ते म्हणून काम करत आहेत. या सर्व मुला-मुलींच्या चेहऱ्यावर आनंद, समाधान पहायला मिळते. याचे श्रेय अर्थातच दिपक सर, आरतीताई व सर्व कार्यकर्त्यांची धडपड यालाच द्यायला हवं.

हिवरे बाजार, स्नेहालय, सोनदरा गुरुकुल, शांतीवन प्रकल्प या सर्व सेवाकार्यांना भेट दिल्यावर, अभ्यास केल्यावर वर्धकांना सामाजिक विकासाच्या दृष्टीने दिशा मिळाली. आपल्या राज्यातील समस्या, त्यावर अनेकांनी शोधलेले उपाय, त्यांचे विविध मार्ग, विचार, कार्यपद्धती व त्याची परिणामकारकता या आणि अशा अनेक गोष्टींवर मुलांनी विचार केला. **'स्व'-रूपवर्धिनीचे काम आणि त्याची गरज पण मुलांना समजली. समाजाला असणाऱ्या सामाजिक कामांची गरज प्रकर्षाने जाणवली.** सहल पालक श्री. विलास कुलकर्णी यांनी वेळोवेळी मुलांच्या कल्पनाशक्तीला वाव दिला. शिवाजी महाराज, ज्ञानेश्वर महाराज यांचे दाखले, रात्र बैठक आणि प्रबोधनातून दिले. **आपण ज्या समाजात राहतो त्याच समाजाच्या विकासासाठी आपण आदर्श नेतृत्व केले पाहिजे आणि वर्धिनीचा वर्धक, युवक हे करू शकतो;** हाच विचार मुलांमध्ये रुजवणे हे या अभ्यास दौऱ्याचे उद्दीष्ट होते.

**३) अपंग कल्याणकारी संस्था, पुणे –** स्थळ – वानवडी, संस्थापक – डॉ. आर. जी. काकडे, स्थापना – ६ नोव्हेंबर १९५६. या संस्थेत एकूण २५० मुलंमुली निवासी राहतात. जी मुले जन्मतः अपंग किंवा अपघातात अपंग होतात त्यांना प्रवेश दिला जातो. सर्व सुविधा मोफत दिल्या जातात. जिल्हा परिषदेमार्फत अनुदान दिले जाते. मुलांचे छंद जोपासण्यापासून ते त्यांच्या सर्वांगीण विकासावर लक्ष दिले जाते. पहिली ते आठवी या संस्थेत शाळा चालते. या संस्थेत वेगवेगळे विभाग चालवले जातात, जसे – हस्तकला, सुतारकाम, शिवणकाम, संगणक विभाग इ. ज्यांना ज्या कलेत गती व आवड आहे, त्यांना त्याचे प्रशिक्षण दिले जाते. दरवर्षी १० वीच्या मुलामुलींची सहल जाते. संस्कारवर्ग, शिबीर याचे पण आयोजन केले जाते. अपंगांना उपयुक्त असे जे काही सामान लागते, ते या संस्थेतच बनविले जाते. अतिशय उत्तम प्रकारे ही संस्था अपंगांचा सर्वांगीण विकास करत आहे.

**४) सकाळ छापखाना –** संस्थापक – श्री. नानासाहेब परुळेकर, स्थापना – १९२४

सकाळ छापखाना हा दिवेघाटाच्या पायथ्याशी वडकी येथे आहे. इथून सकाळ वर्तमानपत्र वितरीत केले जाते. १२ पानी अंकासाठी ६ x ८ अशा ४८ प्लेटस लागतात. आधी बातमी त्या ॲल्युमिनियमच्या प्लेटवर छापली जाते. कॉम्प्युटरवरती आकृतीबंध (फॉरमॅट) तयार केलेला असतो. नंतर ती प्लेट छपाईसाठी जाते. १ तासात ६०,०००

वर्तमानपत्रांची छपाई केली जाते. पहाटे ४ नंतर वर्तमानपत्र पाठविले जाते. १ संचात २०,००० वर्तमानपत्रे बनतात. बातम्या ह्या शनिवारवाड्याजवळील मुख्य कार्यालयामधून दिल्या जातात. सकाळ छापखान्यात ५ छपाई विभाग (टॉवर) आहेत. 'सकाळ' अंकाची दैनंदिन निर्मिती प्रक्रिया पाहणे हा मुलींसाठी चिरस्मरणीय असा अनुभव होता.

**५) ॲप्रोप्रिएट रुरल टेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूट (ARTI), फलटण –** स्थळ – फलटण, स्थापना – १९९६
सुमारे वीस ध्येयप्रेरित शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी सन १९९६ मध्ये या संस्थेची स्थापना केली. या संस्थेत एकूण २२ सभासद आहे.

शास्त्रीय संशोधन व आधुनिक तंत्रज्ञान यांचा फायदा बहुशः मोठे उद्योग व नागरी जनता यांनाच होतो तर ग्रामीण जनता विकासाच्या या नव्या संधीपासून वंचित राहते, यासाठी आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा वापर करून ग्रामविकास घडवून आणणे या उद्देशाने संस्था कार्यरत आहे.

कार्यपद्धती – सध्या संस्था हाताळीत असलेले विषय हे मुख्यतः कृषी व ऊर्जातंत्रांशी निगडीत आहे. उपयुक्त व प्रचलित अशा वनस्पतींची, तसेच औषधी वनस्पतींची लागवड, जैव इंधने व सुधारीत स्वयंपाक इंधने, वाहून जाणाऱ्या पाण्याची साठवण, रोपवाटिका तंत्रे, वनस्पतींचे ऊती संवर्धन, स्वस्त हरितगृह इ. अनेक तंत्रांचा वापर होतो.

**संस्थेने विकसित केलेली ग्रामीण तंत्रे –** १) रोपवाटिका तंत्र २) हंगामी पिकांच्या रोपवाटिका ३) वनस्पतींचे ऊती संवर्धन ४) औषधी व सुगंधी मुळ्यांची पैदास ५) खाऱ्या पाण्यावर शेती ६) सांडपाण्यावर वृक्ष लागवड ७) बांबूची लागवड व बांबूवर आधारित उद्योग ८) सेंद्रीय शेतीची नवी पद्धती ९) टाकाऊपासून टिकाऊ शेगडी १०) सुधारीत इंधने व स्वयंपाक साधने ११) टाकाऊ शेतमालापासून कोळसा १२) सराई कुकर १३) लाकडाच्या गॅसवर आधारित शेगड्या.

या संस्थेला २००२ सालचा आंतरराष्ट्रीय ॲश्डेन पुरस्कार मिळाला आहे. उर्जा शिक्षणाचा एक वस्तुपाठ या भेटीद्वारे वर्धिकांनी अनुभवला.

## वर्षारंभ उपासना

वर्षारंभ सामुहिक उपासना गुढीपाडव्याच्या दिवशी दि. २८ मार्च २०१७ ला ओंकारेश्वर मंदिरात झाली. प्रेरणासत्राचा कार्यक्रम नवीन मराठी शाळेतील सभागृहात श्री. मिलिंदराव ओक, अखिल भारतीय अभिलेखाकार प्रमुख, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्या मार्गदर्शनाने संपन्न झाला. त्यांनी व्याख्यानात अनेक उदाहरणे देत खालील मुद्दे मांडले.

* १९९६–९७ च्या दरम्यान बुद्धिबळाचे सामने झाले होते. त्यावेळच्या बुद्धिबळातील जगज्जेता गॅरी कॅस्पोरोव्ह बरोबर सुपर कॉम्प्युटर डीप ब्ल्यूचा सामना झाला होता. या सामन्यात गॅरी हरला आणि डीप ब्ल्यू जिंकला होता. ज्यांनी तो सुपर कॉम्प्युटर बनवला होता त्यांनी संशोधन करून गॅरीला हरवलं होतं. जेव्हा पत्रकारांनी गॅरीला विचारलं की तुला मशिनबरोबर हरल्यानंतर कसं वाटतं ? तेव्हा गॅरीने सुंदर उत्तर दिलं, 'Deep Blue has won but I doubt whether he has understood that he has won.' याचं कारण असं होतं की कृत्रिम पद्धतीने, यांत्रिक पद्धतीने आपल्याला कौशल्य वाढवता येतात व अनेक कठीण गोष्टी करता येतात. पण त्या समजतातच असे नाही. कारण समजणं, कळणं ही एक वेगळीच गोष्ट आहे. त्याकरिता कबीर म्हणतात तसा 'मन का ठहराव' असावा लागतो.

*** आपण वर्धिनीचे काम करतो पण ते कशासाठी ? –** काही वर्षांपूर्वी मी एका शाळेत गेलो होतो. तिथल्या



पुढारी कुणी भिन्नपंथामधील । तुम्हांला कदा भारती जो दिसेल ।।
कशा त्यास निंदा ? तया मान द्यावा । पुसावे कशा जायचे ज्या न गावा ?।।

मुख्याध्यापिका परिचयातल्याच होत्या. त्या म्हणाल्या, 'आजचा मूल्यशिक्षणाचा तास तुम्हीच घ्या.' आता मूल्यशिक्षणाचा तास घ्यायचाय म्हणजे नक्की काय करायचे असा जरा विचार केला. वर्गात लहान मुली बसल्या होत्या. त्यांना विचारलं की 'तुम्हाला खायला काय आवडते ?' त्यावर एक मुलगी म्हणाली, 'मला चॉकलेट खायला आवडतं, दुसरी म्हणाली, मला आईस्क्रीम.' मग मी प्रश्न केला, 'समजा तुम्ही भल्या मोठ्या गाडीत बसला आहात, एकीकडे चॉकलेट तर दुसरीकडे आईस्क्रीम आहे, ती गाडी चौकात लाल दिवा लागल्यावर थांबते आणि तुमच्याच वयाची एक मुलगी तुमच्यापुढे हात पसरून उभी राहिली तर तुम्ही काय कराल ?' यावर त्या मुली म्हणाल्या, 'आम्ही खायला देऊन टाकू.' त्यावर मी म्हणालो, 'एवढी आवडती वस्तू का देऊन टाकायची ?' मुलींचा गोंधळ उडाला. पण एकीने उत्तर दिलं, 'ती खाताना पहातेय म्हणून देऊ.' मी म्हणालो, 'समजा त्या गाडीची काच अशी असेल की फक्त आत बसलेल्या व्यक्तीला बाहेरचं दिसेल पण बाहेरच्या व्यक्तीला आतलं दिसणार नाही. तर मग तुम्ही काय कराल ?' यावर परत त्या म्हणाल्या, 'तरी पण आम्ही देऊ'. 'तुम्ही काय खात आहात, त्यांना दिसत तर नाही मग ?' **'त्यांना दिसत नाही म्हणून काय झालं ? आम्हाला दिसतंय ना. म्हणजे काय तर ज्या वेळेला एक असा क्षण येतो की खाण्यात जितका आनंद आहे त्याहूनही दुप्पट आनंद हा देण्यात आहे अशी जेव्हा भावना निर्माण होते त्यावेळेला आयुष्य हळूहळू बदलायला लागतं.'** नंतर मी म्हणालो, 'समजा तुम्हाला जास्त पगाराची नोकरी लागली, एक लाखाची. त्यातली एक मुलगी सगळे पैसे स्वतःवर खर्च करते व दुसरी मुलगी जिलाही एक लाख पगार आहे ती मात्र त्यातले दहा हजार लहान गरीब मुलांवर खर्च करते. मग या दोघांमधील कोणाचा आनंद अधिक असेल.' उदाहरण ताजे असल्याने त्या म्हणाल्या की दुसऱ्या मुलीचा आनंद अधिक असेल कारण दोघेही सारखेच पैसे मिळवत असतील तरी दुसऱ्या मुलीचा आनंद हा वेगळाच असेल. अशी चर्चा होत असताना तास संपला.' मी नंतर शिक्षकांबरोबर चहापानाला गेलो आणि शिक्षकांनी म्हटलं की 'बरं झालं तुम्ही खूप छान सांगितलं. या मुली खाण्यावरून रोज भांडायच्या. आता त्या नाही भांडणार!' त्यावर मी म्हणालो, **'त्या फक्त एक दिवस नाही भांडणार.' तर शिक्षक म्हणाले 'असं का ?' 'मुलं जे ऐकतात ते एक दिवस करतात व जे रोज बघतात ते रोज करायला लागतात. म्हणून मुलांना रोज चांगलं बघायला मिळालं पाहिजे आणि प्रत्यक्ष तसं वागणारी माणसं बघायला मिळाली पाहिजेत.' अशी ही कार्यपद्धती आहे. त्या कार्यपद्धतीचं नाव म्हणजे 'स्व'-रूपवर्धिनी.**

* **संपर्क –** संपर्क सर्वांशी असायलाच हवा. समोरच्याला घडवणं हे महत्त्वाचं. त्याला कमी जास्त लेखणं हे आपलं काम नाही. ज्या प्रमाणे परीस सान्निध्यात येणाऱ्या लोखंडाचं मग ते खाटकाकडचं असो किंवा देवघरातलं असो – त्याचं सोनंच करतो त्याप्रमाणे संपर्कात येणाऱ्या सर्वांशी समभावाने वागणे हे कार्यकर्त्याचे सूत्र असले पाहिजे.

* **जोपर्यंत काम करायला प्रवृत्त होण्याची ठिणगी पडत नाही तोपर्यंत कामाला गती मिळत नाही–** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अपरात्री बडोद्याच्या पारशी वसतीगृहातून त्यांच्या सामानासकट केवळ ते अस्पृश्य वर्गातले आहेत म्हणून बाहेर काढण्यात आलं. तेव्हा त्यांच्या मनात विचार आला, 'मी एवढा उच्च शिक्षण घेतलेला असूनही माझी ही अवस्था या लोकांनी केली तर माझ्या अशिक्षित बांधवांची अवस्था काय होत असेल ?' या विचार ठिणगीने ते कार्यप्रवृत्त झाले. गोव्याच्या मातृछाया प्रकल्पातल्या कार्यकर्त्या श्रीमती अलकाताई परुळेकर वसतीगृहात छोट्या अनाथ मुलींच्या– बरोबरच रहात होत्या. दिवाळीला त्या त्यांच्या घरी जायला निघाल्या. तेव्हा

एका छोट्या मुलीने त्यांना म्हटले, 'असं दिवाळीच्या दिवशी आपलं घर सोडून कोणी बाहेर जातं का ?' या प्रश्नासरशी घरी जायला निघालेल्या अलकाताई थबकल्या. त्यांच्या मनात विचार ठिणगी पडली. हे माझंच घर आहे. वसतीगृह सोडून पुढे त्या क्वचितच बाहेर पडल्या.

*** वर्धिनीच्या शाखेत आपण का जातो ? –** माझे एक महाविद्यालयातले मित्र वनस्पतीशास्त्र या विषयाचे गाढे अभ्यासक. एकदा त्यांच्याशी या अभ्यासाबद्दल बोलत होतो. त्यांनी बाहेरच्या मैदानातल्या उंच झाडाकडे बोट दाखवून विचारले, 'किती उंची असेल या झाडाची ?' मी म्हटले, 'असेल तीन मजले उंच.' ते म्हणाले, 'त्याचे शेंडे हिरवेगार आहेत. तिथपर्यंत पाणी पोहोचायला किती हॉर्सपॉवरची मोटार लागेल ?' मी म्हटले, 'चार पाच हॉर्सपॉवरची मोटार लागेल. नंतर त्यांनी समोरच्या गव्हाच्या शेताकडे बोट दाखवलं, म्हणाले, 'या शेतातल्या गव्हात जे प्रोटीन तयार होते ते एखाद्या फॅक्टरीत तयार करायला किती खर्च येईल ?' मी म्हणालो, 'हा खर्च कोटीच्या घरात जाईल.' ते म्हणाले, 'निसर्ग आपल्याला भरभरून देतो. पण ती सर्व Free Gift असल्यानं त्याचं मोल आपल्याला कळत नाही.'

आपण वर्धिनीच्या शाखेत येतो. इथे आल्यावर उत्तम संस्कारित होतो. त्यातूनच आपण घडतो. **पण हे 'Free Gift असल्यानं' आपल्याला याचं मोल कळत नाही.** शाखेबाहेरचे वातावरण विपरीत असते. जसं विमानतळावरचा स्मोकिंग झोन. उलट शाखेतलं वातावरण शुद्ध असतं. गैर गोष्टींना इथे स्थान नसतं.

*** विशिष्ट कार्यपद्धती –** एकदा अरुंद कड्यावरून जाताना दोन बोकड समोरासमोर येतात. त्यांच्यात भांडण सुरू होतं. दोघंही अहंकाराचे बळी. माघार घ्यायला कोणीही तयार नसतात. मग त्यांचा गुरु त्यांना सांगतो, एकानं आडवं निजायचं आणि दुसऱ्यानं त्याच्या अंगावरून जायचं. म्हणजेच नमतं व्हायचं.

कार्यहानी होऊ द्यायची नाही ही शाखेची कार्यपद्धती आहे. याच कार्यपद्धतीतून Checks & Balances निर्माण होतात. हे स्वतःच स्वतःतून सहजपणे निर्माण होतात तेव्हा शब्दांचीही आवश्यकता नसते. जे बोलायचे ते डोळे बोलतात. ज्येष्ठ संगीतकार बाबूजी, श्री. सुधीर फडके यांनी आपल्या आत्मचरित्रात लिहून ठेवलं आहे. खूप ओढाताणीच्या परिस्थितीत काम नव्हतं, निवारा नव्हता तेव्हा परमपूजनीय डॉक्टर हेडगेवार त्यांना भेटले. त्यांनी विचारलं, 'काय करतोस सध्या ?' बाबूजींनी उत्तर दिले, 'काहीही नाही.' 'कुठे राहतोस ?' त्यांचं उत्तर 'कुठेही नाही.' परमपूजनीय डॉक्टर त्यांच्याकडे पहात होते. त्यांच्या डोळ्यात अश्रू दाटले होते. बाबूजी म्हणतात, 'या महापुरुषाच्या डोळ्यातील अश्रुंनी मला खूप मोठा आधार दिला. त्यांनी मला काम दिलं नाही, पैसे दिले नाहीत आणि निवाराही नाही, पण डॉक्टरांकडून जे मिळालं ते मात्र अनमोल होते. अंतःकरणातील भाव डोळ्यांनी बोलला आणि माझ्यावर आवश्यक तो संस्कार घडला.' आपण का काम करतो हे जाणवणं, समजणं महत्त्वाचं आहे.

**अभिनंदन**

आपल्या वर्धिनीच्या **क्रीडाप्रतिभाविकास प्रकल्पा**तील वर्धक-वर्धिकांची २५ जुलैला महाराष्ट्र मंडळ आयोजित क्रॉस कंट्री स्पर्धेत कौतुकास्पद कामगिरी –

* प्रियांका तिवारी – 8th Rank – वय वर्षे १४ खालील

* आर्यन लिम्हण – 2nd Rank – वय वर्षे १२ खालील (२००० मीटर)

* रवी महातो – 1st Rank – वय वर्षे १६ खालील (४००० मीटर) विक्रमी वेळा – ९ मि. ४० से.

उन्हाळी शिबिर कला, विज्ञान, क्रीडा, थोरांचे बालपण आणि जाणिवांचा विकास या विषयांवर झाली.

**कला शिबिर २०१७– कालावधी** – २१ ते २२ एप्रिल २०१७.

**ठिकाण** – हुतात्मा बालवीर शिरीषकुमार विद्यालय, शिवाजीनगर, पुणे

| दिनांक | सत्र–१ (प्रशिक्षण) | सत्र–२ | सत्र–३ प्रेरणासत्र व सराव |
|---|---|---|---|
| २१–४–२०१७ | | | श्रीकांत यादव |
| २२–४–२०१७<br>शनिवार | अभिनय – हेमंत शिर्के<br>लेखन – मनीषा कावतकर (कथा)<br>वक्तृत्व – शामराज पाटील<br>गायन – मिलिंद सबनीस<br>चित्रकला – श्री. धुमाळ आणि टीम | शोध कलाकारांचा<br>स्पर्धा | सराव सत्र<br>संकेत जोशी |
| २३–४–२०१७<br>रविवार | अभिनय – हेमंत शिर्के<br>लेखन – मनीषा कावतकर (नाट्यछटा)<br>वक्तृत्व – मयूर कर्जतकर (वक्तृत्व तयारी)<br>गायन – मिलिंद सबनीस<br>चित्रकला – रवी देव | अमर आग<br>(दृकश्राव्य) | सराव सत्र<br>संकेत जोशी |
| २४–४–२०१७<br>सोमवार | अभिनय – हेमंत शिर्के<br>लेखन – मिलिंद सबनीस<br>वक्तृत्व – अरविंद केळकर (प्रभावी वक्तृत्व)<br>गायन – मिलिंद सबनीस<br>चित्रकला – दीपक साळी | सौरभ कर्डे<br>विषय – कथाकथन<br>पैठणकर सर (वारली पेंटिंग) | ज्ञानेश पुरंदरे<br>विषय –<br>वक्तत्व कलेची महती<br>आणि वक्तृत्व विकास |
| २५–४–२०१७<br>मंगळवार | सादरीकरण, प्रदर्शन आणि समारोप<br>सत्र (वक्ते – सारंग कुलकर्णी) | | |

१) अभिनय गट – हेमंत शिर्के, संकेत जोशी यांनी अभिनय गटाच्या कार्यशाळा घेतल्या. अभिनय करताना आवश्यक असणाऱ्या कौशल्यांची ओळख करून दिली. देहबोली, आवाज, हावभाव यावर विशेष लक्ष देण्यात आले. शिबिरादरम्यान विविध विषयांवरची आणि विविध प्रकारची नाटके बसवण्यात आली.

२) लेखन गट – कथा, नाट्यछटा, कविता, निबंध यांच्या लेखनाचे प्रशिक्षण झाले. मनीषाताई कावतकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ही सत्रे घेतली. लेखन करताना आवश्यक शुद्धलेखन, शब्दसंपत्ती, अलंकार ओळख याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या गटातील निवडक वर्धकांचे लेखन अप्रतिम होते.

३) वक्तृत्व गट – रामराज पाटील, मयूर कर्जतकर, अरविंद केळकर, ज्ञानेश पुरंदरे, सौरभ करडे यांनी या गटाला मार्गदर्शन केले. वक्तृत्वाची पूर्वतयारी, विषय मांडणी, आवश्यक माहितीचे एकत्रीकरण, प्रभावी वक्तृत्व इ. विविध अंगांनी मार्गदर्शन करण्यात आले. सौरभ करडे यांनी कथाकथन कसे करावे, कसे असावे याबाबत प्रत्यक्ष सादरीकरण केले.

४) गायन गट – मिलिंद सबनीस आणि निलेश धायरकर यांनी गायन गटाची कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेत पेटी, ढोलकी, डफ यांच्या साथीने सामुहिक गीते बसवण्यात आली. 'हम करे राष्ट्रआराधन, मनी नाही भाव, मनसा सततम' अशा गीतांचा समावेश होता.

५) चित्रकला गट – श्री. धुमाळ आणि टीम – चित्रकलेची प्राथमिक ओळख.

रवी देव – निसर्गचित्र, प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन चित्र, व्यक्तिचित्र, रंगांची गंमत.

दीपक साळी – व्यक्तिचित्र

पैठणकर सर – वारली पेंटिंग अशी सत्रे चित्रकला गटाची झाली.

शिबिर कालावधीत जवळच असणाऱ्या पाताळेश्वर मंदिराला मुलांनी भेट दिली. चित्रकला गटाने पाताळेश्वराचे देखणे रुप कागदावर उमटवण्याचा प्रयत्न केला. गायन गटाने गीतांचा सराव केला. पाताळेश्वराचे ऐतिहासिक महत्त्व मुलांना सांगण्यात आले.

चित्रकला गटाने पंडित जवाहरलाल नेहरु सांस्कृतिक भवन येथे भरलेल्या प्रदर्शनास भेट दिली. या प्रदर्शनातून चित्रकलेचे भव्य विश्व मुलांना समजले. चित्र काढण्याचे प्रकार, रंगांचे प्रकार, कागदाचे प्रकार, नावीन्य, सादरीकरणाचे प्रकार यावर मुलांनी विशेष लक्ष दिले.

शिबिराचे उद्घाटन श्री. श्रीकांत यादव सरांनी केले. अभिनयाचे तंत्र व मंत्र सांगताना ते म्हणाले, 'आवाज ही आपली पहिली ओळख असते. ज्ञान ग्रहण करणाऱ्या पाच इंद्रियांचा योग्य आणि जास्तीत जास्त वापर कलाकाराला करता आला पाहिजे. कोणतीही कला शिकण्याआधी ती का शिकायची हा प्रश्न स्वतःला विचारला पाहिजे. बाराखडी स्पष्टपणे बोलता आली पाहिजे आणि त्याच्यावर आपले प्रभुत्व असले पाहिजे.'

काही मुलांना प्रत्यक्ष व्यासपीठावर बोलावून ऐन वेळेस विषय देऊन बोलण्यास सांगितले. या माध्यमातून देहबोलीचे प्रत्यक्ष मार्गदर्शन सरांनी केले.

शिबिराचा समारोप करताना श्री. सारंग कुलकर्णी म्हणाले, 'कलाकारासाठी बैठक महत्त्वाची. कलेची आवश्यकता समजून घेऊन ती आत्मसात करता आली पाहिजे. कठोर परिश्रम आवश्यक व प्रयत्नात सातत्य असले पाहिजे.'

उद्घाटन आणि समारोप सत्रास आलेले मार्गदर्शक वर्धिनीच्या परिवारातले होते. त्यांची वैयक्तिक जडण-घडण वर्धिनीच्या सहवासातून कशी झाली हे त्यांनी सांगितले. शिबिर म्हणजे व्यक्तिमत्त्व विकास असे सारंग सरांनी सांगितले.

शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी अभिनय गटाने एक नाटक सादर केले. समारोप प्रसंगी याच गटाने परत नाटक सादर केले. दोन्ही सादरीकरणात मुलांना स्वतःच्या अभिनयात झालेला फरक समजला. याचप्रमाणे चित्रकला गटाने प्रदर्शन मांडले होते. गायन गटाने दोन गीतांचे सादरीकरण केले. वक्तृत्व गटातील वर्धक युवकांनी समारोप सत्राचे सूत्रसंचालन, प्रस्तावना, आभार या सर्व गोष्टी प्रभावीपणे केल्या.

**स्पर्धा आणि इतर कार्यक्रम –**

१) शोध कलाकारांचा – विविध क्षेत्रात (कला) उत्कृष्ट कामगिरी केलेल्या कलाकारांवर माहितीवर प्रश्नमंजुषा, विविध कलाकृती सादरीकरण अशा फेऱ्यांचे आयोजन या स्पर्धेत केले होते. विविध विषयांवरची नाटके, गाणी, चित्र, वक्तृत्व मुलांनी स्पर्धेदरम्यान सादर केली.

२) कीर्तन – ह. भ. प. सौ. अद्वैता उमराणीकर



**कसा कोण वागे, कसा कोण चाले । कसा कोण बोले, कुठे काय झालें ।।**
**न टीका अशी बोलुनी मुक्त व्हावें । तशा सर्व गोष्टी सुधारीत जावें ।।**

५ नवम्बर, २०१७

एन.डी.एम.सी. कन्वेन्शन सेन्टर
नई दिल्ली

SANT ESHWER AWARD

॥ अहर्निश सेवामहे ॥

संत ईश्वर सम्मान

# संत ईश्वर सेवा सम्मान

## स्व-रूपवर्धिनी, पुणे, महाराष्ट्र

किसी साधनहीन व्यक्ति की सबसे बड़ी मदद उसे योग्य बनाना होता है और शिक्षा ऐसी योग्यता है जो किसी भी सपने को वास्तविकता में बदलने की ताकत रखती है। इसी दर्शन पर विश्वास करने वाली यह संस्था झुग्गी-झोपड़ियों में दो जून की रोटी के लिए संघर्ष कर रहे लोगों को शिक्षित कर बड़े सपने देखने का हौसला दे रही है।

संस्था के प्रयासों से अब तक हजारों निर्धन बच्चों और उनके परिवारों का भाग्य बदल चुका है। इस उपलब्धि के लिए संत ईश्वर फाउण्डेशन की ओर से संस्था को सेवा सम्मान से सम्मानित किया जाता है।

हमारी कामना है कि यह संस्था अपने उत्कृष्ट कार्यों से राष्ट्र जीवन में अभिनव योगदान देती रहे। इसी अपेक्षा के साथ हार्दिक बधाई।

**अभिनंदनकर्ता**

कपिल खन्ना, अध्यक्ष

**संत ईश्वर सम्मान समिति**








कीर्तन या महाराष्ट्रातील प्राचीन कला प्रकाराचे सादरीकरण रात्रकार्यक्रमात झाले. कीर्तनातून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनपटावर ताईंनी प्रकाश टाकला. त्यांच्या आयुष्यातील अनेक प्रसंग उलगडत शिक्षणाचे महत्त्व मुलांना पटवून सांगितले. दैनंदिन जीवनातील प्रसंग आणि उदाहरणे सांगत वागावे कसे, बोलावे कसे याचे मार्गदर्शन केले.

३) अमर आग कार्यक्रम (दृकश्राव्य)

काही आठवड्यांपूर्वी पुण्याच्या शनिवारवाड्यावर संपन्न झालेल्या अमर आग कार्यक्रमाची ध्वनिचित्रफित मुलांना दाखवण्यात आली. या कार्यक्रमात असणाऱ्या विविध गीतांचे सादरीकरण, नृत्य, मंदार परळीकर सरांचे सूत्रसंचलन (बोलण्याची व सादरीकरणाची शैली) यावर मुलांनी विशेष लक्ष दिले.

४) विविध कलागुण दर्शन कार्यक्रम – रात्र कार्यक्रमात विविध कलागुणदर्शनाचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमात विशेष उल्लेखनीय म्हणजे एकपात्री नाट्यप्रयोग, गीत, सामुहिक विनोदी नाटक, वक्तृत्व या गोष्टींवर मुलांनी भर दिला. शिबिरात विविध सत्रांतून शिकवलेल्या कौशल्यांचा वापर करण्याचा प्रयत्न मुलांनी प्रभावी पद्धतीने केला. चेतन कुसाळकर आणि निलेश धायरकर यांच्या दमदार पोवाड्याने या कार्यक्रमाची सांगता झाली.

### विषय : विज्ञान

**स्थळ** : म. फुले माध्यमिक विद्यालय, हडपसर. **कालावधी** : २१ एप्रिल ते २७ एप्रिल, **उपस्थिती** : १२०

विज्ञान व गणित या विषयांची आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी या शिबिराचे आयोजन केले होते. शिबिराच्या पहिल्या दिवशी सर्वांनी पिंपरी येथील सायन्स गार्डनला भेट दिली. विज्ञानावर आधारित शेकडो खेळणी, प्रकल्प, मॉडेल्स यांनी भरगच्च असे हे सायन्स गार्डन मुलांना खूप आवडले. Fun with Science, Automotive Mechanisms, Energy Park, यांसारख्या विविध दालनांमधील शास्त्रीय उपकरणांशी खेळण्यात मुले दंग होऊन गेली. हा खेळाचा आनंद लुटतानाच त्यामागील वैज्ञानिक तत्त्वाची उकल करून देण्याचे काम गटाबरोबर असणारे अगस्त्या फौंडेशनचे ताई–दादा कौशल्याने करत होते. पुढील संपूर्ण सात दिवस विविध उपकरणांच्या आधारे त्यांनी मुलांना शिबिरात प्रमुख सर्व वैज्ञानिक संकल्पनांचे ज्ञान दिले. दुपारच्या सत्रात अक्षरभारती संस्थेच्या प्रशिक्षकांनी प्रत्येक मुलाला स्वतंत्र लॅपटॉप उपलब्ध करून देऊन संगणकांचे प्रशिक्षण दिले. सायंकालीन सत्रात डॉ. सौ. शहा यांनी वैदिक गणिताची दुनिया मुलांना दाखवली. अत्यंत सोप्या सुत्रांच्या आधारे अवघड गणिती प्रक्रिया मुले सहजगत्या करू लागली.

### विषय : क्रीडा

**स्थळ** : नवनगर विद्यालय, ज्ञानप्रबोधिनी, निगडी. **कालावधी** : २० एप्रिल ते २७ एप्रिल, **उपस्थिती** : १२०

शिबिराचे उद्घाटन श्री. मनोज देवळेकर यांच्या व्याख्यानाने झाले. त्यांनी मेजर ध्यानचंद या महान हॉकीपटूबद्दल माहिती दिली. शिबिरात वर्धकांची सहा गटात विभागणी केली होती. कबड्डी, खोखो, मल्लखांब, ॲथलेटिक्स, कुस्ती, जिम्नॅस्टिक या गटांनुसार मुलांना सात दिवस प्रशिक्षण देण्यात आले. शिबिर हे क्रीडा विषयावर असल्यामुळे वर्धकांचे सकाळचे मैदान तीन तास व संध्याकाळचे मैदान तीन तास असे घेण्यात आले. मैदानात मुलांना धर्नुविद्या(आर्चरी)चे दोन दिवसीय प्रशिक्षण श्री. रणजित चामले यांनी दिले. मुलांच्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या. मुलांना ॲरोबिक्स, मॅरेथॉन, क्रॉस कन्ट्री याचे प्रशिक्षण देण्यात आले. कबड्डी व खो–खो या खेळाचे संघ या शिबिरात निश्चित करण्यात आले.

**नको दोष याचे दुजालाच सांगू । तयाचे तयाला करी बोल लागूं ।।**
**अशानेच मैत्रींत ना खंड येई । करी मित्रही सद्गुणांची कमाई।।**

मुलांचा मैदानावर खूप व्यायाम होत असल्यामुळे त्यांना खेळाडूंसारखा आहार देण्यात आला. दूध, केळी, बदामाचा शिरा, खजूर, गूळ शेंगदाणे असा आहार दिला. क्रीडा या विषयाला अनुसरूनच व्याख्याने या शिबिरात होती. राज्यस्तरीय, राष्ट्रीय स्तरीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंच्या मुलाखत घेतल्या. श्रीमती सत्यव्वा हळदीकर या ताईंनी मुलांना कबड्डी खेळाची माहिती दिली. अथक परिश्रमाने खेळात करिअर करता येतं याचा अनुभव त्यांच्या बोलण्यातून आला. श्रीमती दिप्तीताई धर्माधिकारी यांनी आरोग्य व प्रथमोपचार या विषयावर मार्गदर्शन केले. श्रीमती आरतीताई खोत यांनी खेळाडूंची मानसिकता किती महत्त्वाची असते याचे महत्त्व पटवून दिले. श्री. रणजित चामले यांनी मुलांना आर्चरी व खेळांसाठी लागणारा संयम किती महत्त्वाचा असतो हे सांगितले. खेळाडूच्या आयुष्यातील सर्वात मोठा क्षण म्हणजे आपल्यामुळे आपला राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत याचा सन्मान होणे हे त्यांच्या मुलाखतीतून कळाले. **शिबिराचा समारोप आंतरराष्ट्रीय कबड्डीपटू कु. किशोरी शिंदे (क्रीडा सहआयुक्त, पुणे) यांनी केला.** आपला खेळातील प्रवास त्यांनी भाषणातून मांडला. या सर्व प्रेरणादायी व्याख्यानातून वर्धकांना खेळाडूच्या अंगी असणाऱ्या गुणांची व कौशल्यांची माहिती झाली.

| तारीख | विषय | वक्ते |
|---|---|---|
| २०-४-२०१७ | क्रीडा प्रबोधिनी ओळख | श्री. मनोज देवळेकर |
| २१-४-२०१७ | आरोग्य आणि प्रथमोपचार | श्रीमती दिप्ती धर्माधिकारी |
| २२-४-२०१७ | Climbing | श्री. सचिन गायकवाड |
| २३-४-२०१७ | आर्चरी (मुलाखत) | श्री. रणजित चामले |
| २४-४-२०१७ | खेळाडूंची मानसिकता | श्रीमती आरती खोत |
| २५-४-२०१७ | व्हॉलीबॉल (मुलाखत) | श्री. चेतन कुसाळकर |
| २७-४-२०१७ | समारोप सत्र | कु. किशोरी शिंदे |

***संस्था वर्धापन दिन - स्नेहमेळावा*** *- १३ मे हा वर्धिनीचा वर्धापन दिन. ह्या वर्षी १४ मे ला संध्याकाळी पेरुगेट भावे स्कूलच्या मैदानात अनौपचारिक स्नेहमेळाव्याचे आयोजन करून साजरा झाला. स्नेहमेळाव्यात वर्धिनीच्या सुरुवातीपासूनचे विद्यार्थी, शिक्षक, हितचिंतक, देणगीदार तसेच सर्व प्रकल्पातील, विभागातील कार्यकर्ते, शिक्षिका, माजी विद्यार्थी, परिवारातील संस्थांचे कार्यकर्तेपण सहभागी झाले होते. खूप वर्षांनी सगळ्यांच्या आपापसातल्या गप्पा खूप रंगल्या होत्या. त्यामुळे ६ ते ८.३० हे अडीच तास कमीच पडले. स्वामी योगानंद शाखेच्या वर्धकांनी मल्लखांब व स्वामी दयानंद सरस्वती शाखेच्या वर्धकांनी मैदानी खेळांची प्रात्यक्षिके सादर करून वाहवा मिळवली. बासरीवादन, कथ्थक, पोवाडा, सामुहिक व वैयक्तिक गीतांनी मेळाव्याची रंगत वाढवली. फार दिवसांनी जीवलगांचा असा सामुहिक संवाद घडला. कार्याध्यक्ष श्री. रामभाऊ डिंबळे सरांनी याप्रसंगी स्व. किशाभाऊंचे स्मरण जागविले. २०२० साली होणाऱ्या स्व. किशाभाऊंच्या जन्मशताब्दीनिमित्त सर्वांनी जमेल त्या मार्गाने सहयोग द्यावा असे आवाहन केले. हम करे राष्ट्र आराधन या स्फूर्तीदायी गीताने मेळाव्याची सांगता झाली.*



**कदा आळशी राहूनीया दुजाला । नको देउ आदेश, आज्ञा कुणाला ।।**
**अशाने न झेलील तो शब्द कोणी । फुका मात्र जाईल व्योमी विरोनी ।।**

**शिबिराचा विषय –** थोरांचे बालपण आणि जाणीवांचा विकास

**शिबिर स्थळ –** शिशुविहार प्राथमिक विद्यालय, एरंडवणा, कर्वेरस्ता

**कालावधी –** २१ ते २५ एप्रिल

**वर्धिका शिबिर**

| | | | |
|---|---|---|---|
| सत्र १ | श्री. बापू शिंदे<br>शिवरायांचे बालपण | श्री. श्रीकांत यादव<br>कलावंतांचे बालपण | श्री. प्रदीप आगाशे<br>क्रांतिकारकांचे बालपण |
| सत्र २ | श्यामची आई<br>पुस्तक प्रकटवाचन | श्री. मोहन शेटे<br>स्वा. सावरकरांचे बालपण | श्री. निलेश धायरकर<br>बालपणातील गमतीजमती |
| मोठा गट<br>कार्यशाळा | कु. स्वाती शिरतर<br>स्वतःची विशेषणे व<br>गुणवैशिष्ट्ये | सौ. उमा गुजर<br>ओळख स्वतःशी | सौ. रत्नप्रभा राजहंस<br>अभिव्यक्ती |
| लहान गट<br>कार्यशाळा | Short Film<br>(Charlie Chaplin) | कु. कल्याणी भोईटे<br>(कला) | श्री. अरविंद केळकर<br>गप्पाष्टक |
| प्रेरणासत्र | श्री. रामभाऊ डिंबळे<br>मुलाखत | सौ. बागेश्री पोंक्षे<br>मुलाखत | सौ. काजरेकर<br>मुलाखत |

प्रभावीपणे विषय मांडणारे वक्ते आणि तितक्याच एकाग्रतेने व्याख्यान ऐकणाऱ्या वर्धिका यामुळे तर शिबिराचे वातावरण चिंतनमय झाले होते. शिबिरात बागेश्री दीदी मुलाखत देण्यासाठी आल्या होत्या. त्यांच्या दारुबंदीविषयीच्या धगधगत्या अनुभवांचे दर्शन त्यांच्या बोलण्यातून घडत होते. ते ऐकून वर्धिका, युवतींचे डोळे अश्रुंनी पाणावले. अशाच भावपूर्ण वातावरणात एका प्रेरणासत्रात रामभाऊ डिंबळे यांनी अनुभवकथन केले. दुपारच्या कार्यशाळेत स्वतःची ओळख, अभिव्यक्ती याविषयी गप्पासत्र झाले. यातून वर्धिकांना 'स्व'ची ओळख झाली.

**श्री. श्रीकांत यादव –** कलावंतांचे बालपण या विषयावर श्रीकांत यादव सरांनी वर्धिकांना मार्गदर्शन केले. संवाद–कौशल्य कसे विकसित करावे यावर माहिती दिली व वेगवेगळ्या activity घेतल्या.

**श्री. प्रदीप आगाशे –** लहानपणी क्रांतिकारकांचे विचार कोणते होते. मदनलाल धिंग्रा यांच्या जीवनातील संघर्षाचे चित्र आगाशे सरांनी रेखाटले. त्याचप्रमाणे वर्धिकांनी वेगवेगळी गीते सांगितली.

**सौ. उमाताई गुजर –** दुपारच्या कार्यशाळेत उमाताई गुजर यांनी 'ओळख स्वतःशी' हा विषय मांडला. त्यामध्ये त्यांनी स्वतःचे गुण कसे विकसित करावेत, दोष कसे कमी करावेत याविषयी मार्गदर्शन केले. त्याप्रमाणे करिअर विषयीच्या मुलींच्या कल्पना जाणून घेतल्या.

**सौ. रत्नप्रभा राजहंस –** बऱ्याचदा काही कारणांनी आपल्याला व्यक्त होता येत नाही. पण व्यक्त होणे देखील तितकेच महत्त्वाचे असते. म्हणूनच रत्नप्रभा ताईंनी 'अभिव्यक्ती' या विषयावर दुपारचे सत्र घेतले. या सत्रात त्यांनी

वर्धिकांच्या अडचणी जाणून घेतल्या व त्यावर उपाय सांगितले.

**श्री. अरविंद केळकर –** यांनी लहान गटातील वर्धिकांना गोष्ट सांगितली. लहान गटातील वर्धिकांचे मनोरंजनातून उद्‌बोधन झाले. त्यानंतर त्यांनी युवतींना वेगवेगळ्या संस्थांची माहिती सांगितली.

आव्हानात्मक स्पर्धा देणाऱ्या युवती व तितक्याच जोमाने तयारी करणाऱ्या वर्धिकांमुळे रात्रकार्यक्रमाला रंगत चढली होती. कबड्डी स्पर्धा, अडथळा शर्यत, बेस बॉल अशा खेळांमुळे मैदानात चुरस रंगली होती. पाच दिवस चाललेल्या या संस्कारांच्या, स्वावलंबनाच्या, आनंदाच्या शिबिराचा समारोप २५ एप्रिल रोजी ज्ञानेश पुरंदरे यांनी केला.

**शाखा विभाग – १० वी पूर्वपीठिका शिबिर** (३ मे २०१७ – ५ मे २०१७) –

| दि. ३ मे | दि. ४ मे | दि. ५ मे |
|---|---|---|
| श्री.अ.ल.देशमुख – ओळख १० वीची | कृती कार्यक्रम | सौ. उमा गुजर–अभ्यासाचे नियोजन |
| सौ. राही ताई – इंग्रजी | श्री. थत्ते – इतिहास | विज्ञानवाहिनी– प्रयोग प्रात्यक्षिके |
| सौ. मंगल देशपांडे – गणित | श्री. मालुसरे – भूगोल | सौ. उमा गुजर – अभ्यासाच्या पद्धती |
| सौ. दीपाली थोरात – मराठी | श्री. प्रदीप आगाशे–भूमिती | समारोप |

इ. १० वीला गेलेल्या विद्यार्थ्यांचे सुट्टीच्या काळात पूर्वपीठिका शिबिर ३ मे ते ५ मे या दरम्यान घेण्यात आले. वर्षभर अभ्यास कसा करावा ? अभ्यासाचे नियोजन कसे करावे ? प्रत्येक विषयामध्ये काय महत्त्वाचे आहे ? हे या शिबिरातून वर्धकांना माहीत झाले.

* डॉ. अ. ल. देशमुख सरांनी यशाचे गमक हे निरंतर सरावात आहे असे उद्‌घाटन सत्रात सांगितले.

* इंग्रजी विषयामध्ये पाठ्यपुस्तकामध्ये असलेले धडे, कविता, व्याकरणासंबंधी सौ. राही कानडे–भालेराव यांनी मार्गदर्शन केले.

* दिपाली थोरात ताई यांनी मराठीतील अभ्यासक्रम कसा आहे ? कोणत्या गोष्टीवर भर जास्त दिला पाहिजे? इ. गोष्टी सांगितल्या. व्याकरण, उपयोजित लेखन यांविषयी मार्गदर्शन केले.

* गणित हा काही विद्यार्थ्यांचा नावडता विषय असतो. १० वीमध्ये गेल्यानंतर गणिताविषयी अधिक भीती वाटू लागते. सौ. मेघनाताईंनी गणिताविषयीची भीती घालवून त्यातील गंमती सांगितल्या.

* भूमिती शिकवत असताना गाण्याच्या माध्यमातून प्रमेय कसे लक्षात ठेवावे हे श्री. आगाशे सरांनी सांगितले.

* विज्ञानातील गमतीजमती सांगत, अभ्यास कसा करावा, विज्ञान हा पाठांतरचा विषय नसून तो समजून प्रत्यक्षात कृती करून शिकण्याचा विषय आहे असे कु. मनिषाताई आणि सौ. लता ताई यांनी सांगितले.

* थत्ते सरांनी इतिहासाच्या अभ्यासाची पद्धत व सनावल्या लक्षात ठेवण्याची पद्धत सांगितली.

* श्री. मालुसरे सरांनी भूगोल विषयाची अध्यापन पद्धती व गुणांकन यांचे सखोल मार्गदर्शन केले.

* अभ्यासाचे वार्षिक नियोजन कसे असावे ?

कोणत्या पद्धतीने अभ्यास करावा या गोष्टी सौ. उमाताई गुजरांनी सांगितल्या.

* विज्ञान वाहिनीच्या प्रशिक्षकांनी अभ्यासक्रमातील प्रयोगांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले.



**नको 'आंत–बाहेर' हो बांधवांशीं । खुलें ठेवि भांडार ना त्या अरीशीं ।।**
**अशानेंच शक्ती सदा वाढणार । अशानेंच कीर्ती जगीं गाजणार ।।**

**१० वी अभ्यास शिबिर (२६ ऑक्टोबर ते २८ ऑक्टोबर) –**

१० वीचा अभ्यास कमी वेळात टप्प्याटप्प्याने कसा पूर्ण करावा, उत्तरपत्रिका कशा लिहाव्यात आणि वैयक्तिक अभ्यासाचे नियोजन या विषयांवर शिबिर झाले. शिबिरात खालीलप्रमाणे मार्गदर्शन करण्यात आले.

| दि. २६ ऑक्टोबर | दि. २७ ऑक्टोबर | दि. २८ ऑक्टोबर |
|---|---|---|
| इंग्रजी – रितेश ओतारी | विज्ञान–२ – श्रीमती मंजिरी दातार | इतिहास – श्रीमती रोहिणी काळे |
| बीजगणित – श्री. पिसाळ | भूमिती – श्रीमती मंजिरी दातार | विज्ञान १ – सौ. लता टिळेकर |
| वेध भविष्याचा – श्री.धायरकर | मी पुढेच जाणार–श्री.धायरकर | भूगोल – श्री. दिलीप भांगरे |
| उत्तम टक्के कसे मिळवाल ? – श्री. अरविंद केळकर | अभ्यास कौशल्य – सौ. उमा गुजर | १० वीला सामोरे जाताना – श्री. अ. ल. देशमुख |
| कथा आपल्या यशाच्या– श्री. शिरीष पटवर्धन | वेध भविष्याचा – श्री.विश्वास कुलकर्णी | |
| अभ्यास नियोजन– श्री. सुरेश पवार | प्रेरणासत्र – श्री.हर्षल सोनार | |

**गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ**

हा कार्यक्रम सर्व शाखांमध्ये रविवार दि. २३ जुलै २०१७ शाखा स्थानांवर आयोजला होता.

| **शाखा** | **वक्ते** |
|---|---|
| रामकृष्ण–निवेदिता | प्रा. संजय तांबट |
| स्वामी ब्रह्मानंद शाखा | श्री. विश्वास कुलकर्णी |
| स्वामी विवेकानंद शाखा | डॉ. सतीश राजमाचीकर व श्री. शिरीष पटवर्धन |
| श्रद्धानंद–सावित्री | श्री. पुष्पाताई नडे |
| स्वामी अखंडानंद शाखा | श्री. रामभाऊ डिंबळे |
| स्वामी शिवानंद शाखा | श्री. विनेश नगरे |
| स्वामी सुबोधानंद शाखा | श्री. सुमित डोळे |
| राजर्षी शाहू शाखा | श्री. अमोल उंदरे |
| स्वामी अभेदानंद शाखा | श्री. पराग लकडे |

यानिमित्त संपर्क मोहीम – ९००० घरे, ४५ वस्त्या, १२५० नोंदणी, बक्षीसपात्र विद्यार्थी – १२००

सर्व शाखांनी या कार्यक्रमानिमित्त संबंधित वस्ती, शाळा, पालक यांकडे संपर्क केला. यातून गुणवंत विद्यार्थ्यांची नोंदणी करून घेतली. यासाठी पुढील निकष विचारात घेण्यात आले होते.

१) मागील शैक्षणिक वर्षात अ, अ+, ब+ श्रेणीत उत्तीर्ण विद्यार्थी.

२) शालेय क्रीडा स्पर्धा आणि शाळेच्या संघात/खेळात विजयी झालेला विद्यार्थी.

३) कोणत्याही एका कलेमध्ये सहभागी विद्यार्थी व विशेष कामगिरी

४) अतिशय गरीब व इतर समस्या असूनसुद्धा परीक्षेत उत्तम यश मिळवलेले विद्यार्थी

या कार्यक्रमाला वस्तीतील मुलांबरोबरच मुलींची उपस्थितीही उल्लेखनीय होती. वस्तीतील वरील निकषांत बसणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या माध्यमातून आलेल्या मुलांना व त्यांच्या पालकांना वर्धिनी समजावून सांगण्यात आली. यातील काही विद्यार्थी शाखेत नियमितपणे येऊ लागले. **सर्व ठिकाणी काका हलवाई स्वीट सेंटर, टिळक रोड, पुणे श्री. सुरेंद्रशेठ गाडवे यांनी देणगीस्वरुपात दिलेल्या पेढ्यांनी सर्वांचे कौतुक केले.** या त्यांच्या सहकार्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद.

वर्धिनीला अपेक्षित वर्धक-वर्धिका मिळाव्यात यासाठी वस्ती-वस्तीमध्ये जाऊन मुले शोधण्याची ही नवीन धडपड होती. वस्तींमधील वंचित व उपेक्षित गुणवंत मुले यामुळे नक्कीच आनंदली.

## गणेशोत्सव

गणेशोत्सव प्रमुख - श्री. नकुल थावरे, पथक प्रमुख - श्री. प्रतिक भिसे

वादन प्रमुख - श्री. राज जाधव, सांस्कृतिक प्रमुख - श्री. मयुर शेडगे

| शाखा | पथक | वर्धक संख्या | सादरीकरण |
|---|---|---|---|
| समर्थ रामकृष्ण शाखा | मल्लखांब | ३० | ०४ |
| स्वामी श्रद्धानंद शाखा | घुंगुरकाठी | २४ | ०५ |
| स्वामी अखंडानंद शाखा | झांज | २४ | ०३ |
| स्वामी शिवानंद शाखा | झांज | ३२ | ०३ |
| स्वामी ब्रह्मानंद शाखा | झांज | ३२ | ०५ |
| स्वामी विवेकानंद शाखा | झांज | २४ | ०२ |
| क्रांतीज्योती सावित्री शाखा | लेझीम | २४ | ०४ |
| युवती गट | ध्वज | २४ | ०२ |
| नरवीर तानाजी मालुसरे शाखा | ध्वज | २४ | ०३ |

यंदाच्या वर्षी पौराणिक व ऐतिहासिक प्रसंगांसोबतच डॉ. अब्दुल कलाम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांवर विशेष प्रसंग सादर केले. तसेच प्रदूषण, अस्वच्छता व महिलांचे प्रश्न अशा समस्यांवर देखील नवनवीन प्रकार सादर केले.

**विसर्जन मिरवणूक -** श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे अध्यक्ष श्री. अशोकराव गोडसे यांनी स्वतः १२५ ध्वजांच्या मानवंदनेस मुख्य ध्वज हातात घेऊन उद्घाटन केले. सार्वजनिक गणेशोत्सव व श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट यांच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त 'स्व'-रूपवर्धिनीने विजय टॉकीज चौक ते टिळक चौकापर्यंत १२५ ध्वजांच्या ध्वजपथकाद्वारे मानवंदना दिली. वर्धक-युवक-युवती यांच्या ध्वज पथकांमुळे टिळक चौकात एक वेगळेच वातावरण तयार झाले होते. लयबद्ध हालचाल, सामुहिक प्रकार व मोरयाचा जयघोष करीत ही १२५ ध्वजांची मानवंदना आपल्या लाडक्या बाप्पाला दिली.

**श्री गणेश प्राणप्रतिष्ठापना वर्ग –**

यंदाच्या वर्षी प्राणप्रतिष्ठापना वर्ग हा 'स्व'–रूपवर्धिनी आणि ज्ञानप्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आला. या वर्गात श्रीमती आर्याताई जोशी यांनी मार्गदर्शन केले. वृत्तपत्रातील निवेदन वाचून एकूण २० जणांनी या वर्गासाठी नाव नोंदवले होते. हा वर्ग ज्ञानप्रबोधिनी येथे पार पडला.

**पथनाट्य प्रशिक्षण कार्यशाळा –**

या वर्षी पथनाट्य सादर करणाऱ्या सर्व शाखांची एकत्रित पथनाट्य प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेसाठी श्री. आनंद माढ्ये हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. या दिवसभराच्या कार्यशाळेमधून पथनाट्य म्हणजे नेमकं काय? पथनाट्य करताना कोणकोणत्या गोष्टींची काळजी घ्यावी, कोणत्या गोष्टी आवर्जून कराव्यात आणि कोणत्या गोष्टी टाळाव्यात या बाबत मार्गदर्शन करण्यात आले. ह्यावेळी उपस्थित मिळालेल्या मार्गदर्शनातून लगेच पथनाट्याच्या बाबत विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या शंकांचे निरसन तर झालेच शिवाय वर्धक, वर्धिकांचा उत्साह पाहून आलेले प्रमुख मार्गदर्शकही खुश झाले. झालेल्या पथनाट्यांचा आढावा –

| क्र. | शाखा | विषय | गणेशोत्सवातील एकूण सादरीकरणे |
|---|---|---|---|
| १) | स्वामी श्रद्धानंद शाखा | निर्माल्य | २१ |
| २) | स्वामी दयानंद शाखा | व्यसनमुक्ती | ०९ |
| ३) | धर्मवीर शंभूराजे शाखा | डिलीट करा | १० |
| ४) | स्वामी ब्रह्मानंद शाखा | सांस्कृतिक प्रदूषण | १३ |
| ५) | स्वामी सुबोधानंद शाखा | डिलीट करा | ०७ |
| ६) | स्वामी अभेदानंद शाखा | बदलत्या समाजाचे बदलते भारुड | ११ |
| ७) | भगिनी निवेदिता शाखा | जबाबदार कोण ? | २५ |

**दिवाळी बौद्धिक फराळ**

'तमसो मा ज्योर्तिगमय' हा संदेश देणारी दिवाळी ही वैचारिक क्षितीजेही प्रकाशमान करणारी ठरावी या उद्देशाने दिवाळी व्याख्यानमालेचे आयोजन युवा गटातर्फे प्रतिवर्षी केले जाते.

यावर्षी लक्ष्मीपूजनाच्या दिवशी माजी खासदार व शिपींग कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष श्री. प्रदीपदादा रावत यांनी प्रथम सत्र घेतले. राष्ट्रजीवनातील सर्व धार्मिक, सामाजिक, जनतांत्रिक गतिविधी या विज्ञाननिष्ठ असणे कसे गरजेचे आहे हे त्यांनी प्रभावीपणे व अनेक उदाहरणांच्या आधारे स्पष्ट केले. विज्ञाननिष्ठेचा आग्रह हा भारतीय लोकशाहीला उत्तरोत्तर परिपक्व करणारा ठरेल हे या व्याख्यानाद्वारे उपस्थितांच्या मनावर बिंबवले.

दिवाळी पाडव्याच्या दिवशी सुप्रसिद्ध प्रवचनकार कु. गीताताई उपासनी यांनी शिवचरित्राची वेगळ्या पद्धतीने मांडणी केली. कु. गीताताई यांनी वयाच्या अवघ्या चवथ्या वर्षी कै. बाळासाहेब ठाकरे यांच्या लक्षावधींच्या गर्दीने भरलेल्या सभेसमोर वेदस्तुतीचे प्रभावी पठण केले होते. व्हॉटस्अ‍ॅप, फेसबुक, यु ट्युब यांचा प्रभावी वापर करून स्वा. सावरकरांचे तेजस्वी विचार त्या समाजात प्रस्तुत करीत असतात. आपल्या व्याख्यानात शिवचरित्रातील अनेक प्रसंगांच्या आधारे सद्यस्थितीत भारतीय जनमानस ध्येयपूर्ण, विजीगीषू व सामर्थ्यशाली होण्यासाठी शिवचरित्राची कास धरली पाहिजे असे आग्रही प्रतिपादन केले.

## अभ्यास दौरा

महाराष्ट्रातील प्रमुख जिल्ह्यातील औद्योगिक, सामाजिक, शैक्षणिक, ऐतिहासिक, कृषी क्षेत्रातील संस्था भेटीतून 'त्यांची कार्यपद्धती समजून घेणे' या उद्देशाने शाखांचे भागशः अभ्यास दौरे २२ ते २५ ऑक्टोबर दरम्यान झाले. त्याच्या काही विशेष नोंदी –

**भाग १ – औरंगाबाद –**

दौऱ्याची सुरुवात पाबळ येथील विज्ञान आश्रमास भेट देऊन झाली. तेथील सुलभ तांत्रिक शिक्षण, आधुनिक शेती, अल्प दरातील घरबांधणी, गोपालन, आयुर्वेदिक उत्पादने, रक्त तपासणी केंद्र, बेकरी उद्योग या सर्व विभागांची माहिती विद्यार्थ्यांनी घेतली. सायंकाळी आदर्श ग्राम, पाटोदा येथील भेट कायम स्मरणीय अशीच ठरली. श्री. भास्करराव पेरे पाटील यांनी अत्यंत योजनाबद्ध व कष्टपूर्वक गावाचे रूप ग्रामसहभागाने पूर्ण बदलून दाखविले. गावातील स्वच्छता व उत्साही वातावरण विद्यार्थ्यांना भावून गेले. ग्रामविकासातील महिलांचा सहभाग लक्षणीय असा आहे. सर्व घरांवर महिलांचीच नावे आहेत. शाळेतही शिक्षणातील नवनवीन उपक्रमांना प्रोत्साहन दिले जाते. पाण्याचा वापर अत्यंत काटकसरीने केला जातो. गावाचे नेतृत्व सक्षमपणे करण्यासाठी पुढील पिढी तयार होत आहे. औरंगाबाद येथील डॉ. हेडगेवार रुग्णालय व दत्ताजी भाले रक्तपेढीचे सेवाभावाने भरलेले वैद्यकीय कार्य वर्धकांनी समजावून घेतले. देवगिरी किल्ला, बिबी का मकबरा व वेरुळची लेणी या ऐतिहासिक स्थानांचीही समग्र माहिती घेतली. पैठण येथील संत एकनाथांचे मंदिर आणि जायकवाडी धरणाला या गटाने भेट दिली.

**भाग २ नाशिक –**

गारगोटी संग्रहालय, सिन्नर – श्री. के. सी. खन्ना यांच्या छंदातून हे संग्रहालय सुरू झाले आहे. ४० वर्षांपासून हा संग्रह आहे.

मोरोपंत पिंगळे गोशाळा – सामाजिक उपक्रम म्हणून गोशाळेला वर्धकांची पहिलीच भेट होती. तेथील गोसेवकांनी मुलांशी प्रश्नोत्तर रूपात संवाद साधला. गाईच्या दुधाबरोबरच गोमूत्र, शेण याचा होणारा वेगवेगळा उपयोग मुलांना समजला. या उत्पादनातून होणारी आर्थिक उलाढाल लक्षात घेता अशा उपक्रमांची खरी गरज लक्षात आली.

काळाराम मंदिर, नाशिक – मंदिराचे पुजारी महंत सुधीरदासजी यांनी मंदिराची माहिती, इतिहास मुलांना सांगितला.

जनकल्याण समिती, नाशिक (अन्नपूर्णा सेवा केंद्र व मनोहर रुग्ण सहाय्य केंद्र) – शासकीय रुग्णालयात रुग्णांच्या नातेवाईकांच्या जेवणाची सोय बऱ्याचदा होत नाही. परगावाहून आलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांसाठी ही व्यवस्था कठीणच असते. **अशा नातेवाईकांसाठी दोन्ही वेळेला जेवणाची सोय अन्नपूर्णा सेवा केंद्र करते. नाशिक शहरातील नागरिकांच्या सहकार्याने डब्यांचे संकलन करून ही सोय केली जाते. साधारणतः रोजच ८० ते १०० जणांची सोय यातून होते.**

सह्याद्री फार्म्स, नाशिक – 'मी शिक्षणानंतर नोकरी न करता व्यवसायच करेन तोही ग्रामीण भागात आणि शेतीतच' असे ठरवून व्यवसायात असलेले लाखोंचे कर्ज फेडून वर्षाला २०० कोटींची उलाढाल करणाऱ्या श्री. विलास शिंदे यांची सह्याद्री फार्म्स कंपनी शेतीमालातून तयार होणाऱ्या पदार्थांचे वितरण ही कंपनी करते. श्री. विलास शिंदे सरांशी मुलांनी संवाद साधला. भोसला मिलीटरी स्कूल व स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे जन्मस्थान भगूर या दोन्ही ठिकाणांची भेट खूपच प्रेरणादायी ठरली.

कृषी उत्पन्न बाजार समिती, निफाड, पिंपळगाव – १०० एकरात पसरलेली अतिशय भव्य व मोठी सर्व सोयींनी युक्त



बना वृत्तिने दीप ज्याची अखंड । जळे ज्योत; दे जी प्रकाशा उदंड ।।
नको वृत्तिची धांव एक क्षणाला । जगीं अक्षया वृत्ति येई फळाला ।।

अशी बाजार समिती व शिस्तबद्ध रीतीने होणारे लिलाव व त्याचे पुढील कामकाज मुलांना बघायला मिळाले. पिंपळगावच्या बाजारात दररोज २ लाख टोमॅटो कॅरेट विकले जातात. शेतकरी-व्यापारी-आडतदार ही कार्यप्रणाली मुलांना समजली. टोमॅटो विक्रेत्या शेतकऱ्यांशी झालेल्या संवादातून त्यांच्या समस्याही जाणवल्या.

**भाग ४ सोलापूर, पंढरपूर –**

उद्योग वर्धिनी, सोलापूर – सौ. चंद्रिकाताई चौहान यांनी महिला उद्योगाची उभारलेली चळवळ आज एक उत्कृष्ट यशस्वी प्रयोग म्हणून प्रसिद्ध आहे. सोलापूरची चटणी व भाकरी हिला या उद्योगातून प्रसिद्धी मिळाली आहे. या उद्योगाबरोबर अनाथ मुलांना सांभाळायचे काम ही 'पाखर संकुल' या संस्थेत केले जाते.

पालवी संस्था, पंढरपूर – प्रभा हीरा प्रतिष्ठानच्या पालवी संस्थेमुळे अनेक एडस्ग्रस्त अनाथ मुलांना हक्काचे घर मिळाले आहे. त्यांच्या आरोग्याची, तसेच शिक्षणाचीही सोय यामुळे झाली आहे. श्रीमती मंगलाताई शहा यांच्या प्रेरणादायी कामाची ओळख वर्धकांना झाली. याचबरोबर सोलापूरचा चादर कारखाना, ज्ञान प्रबोधिनी शाळा, ज्ञान प्रबोधिनी हराळी, पंढरपूर येथील कैकाडेश्वर महाराज मठ, विठ्ठल रुक्मिणी मंदिर याही ठिकाणी वर्धकांच्या भेटी झाल्या.

**भाग ५ – कोल्हापूर, सातारा –**

कण्हेरी मठ – सिद्धगिरी ग्रामजीवन संग्रहालय : भारतीय व ग्रामीण जीवन संस्कृतीचे दर्शन शिल्पं व चित्रांकडून या ठिकाणी बघायला मिळते. सर्व शिल्पं खूप जिवंत वाटतात. यामुळे शहरात राहणाऱ्यांना 'गावाकडे, शेतांमध्ये काम कशी चालतात व लोकजीवन कसे असते' याची माहिती मिळते. गोकुळ डेअरी – कोल्हापूरची प्रसिद्ध गोकुळ दूध प्रकल्पातून दूधाचे संकलन कसे होते, त्यापासून वेगवेगळे पदार्थ कसे बनवतात, ते कसे टिकवतात, त्याचे पिशव्यात भरून वितरण कसे करतात या गोष्टी बघायला मिळाल्या. सज्जनगड – संत रामदासस्वामींची समाधी, मंदिरातील पवित्र व धार्मिक वातावरण मनाला खूप शांत व उत्साह देणारे आहे. सगळ्या गोष्टी ठराविक वेळेत व शिस्तबद्ध रीतीने पण सेवा आणि भक्तीभावातून होत असतात. श्री. ज्ञानेश पुरंदरे सरांनी गडाची माहिती सांगितली. रामदास स्वामींच्या कार्यातला महत्त्वाचा सामाजिक दृष्टिकोन समजावून सांगितला. कु. समृद्धी यादव हिने श्रीधरस्वामींचे कार्य गोष्टींद्वारे सांगितले. याच बरोबर कोल्हापूरचे महालक्ष्मी मंदिर व रंकाळा तलावालाही भेट दिली. स्थानिक इतिहासप्रेमी श्री. रामजी फल्ले यांनी पन्हाळा किल्ल्याच्या सर्व महत्त्वपूर्ण स्थानांवर प्रत्यक्ष नेऊन तेथील इतिहास सांगितला. बाजीप्रभूंचे हौतात्म्य गौरविणारी विशालगड मोहीम व केवळ ६० मावळ्यांनिशी पन्हाळा जिंकणाऱ्या कोंडाजी फर्जंदांची कथा त्यांनी सांगितली. नायक्रोम या पॅकेजिंग मशीन बनवणाऱ्या कंपनीला भेट दिली. दौऱ्याचा समारोप संत सेवा संघातील प्रवचनाने झाला.

## क्रीडादिन

यावर्षीचा क्रीडादिन हा तीन टप्प्यात पार पडला. दि. २६ नोव्हेंबरला सांघिक स्पर्धा आणि सूर्यनमस्कार स्पर्धा, दि. १७ डिसेंबरला युवक गटाच्या मैदानी स्पर्धा झाल्या.

**१) सांघिक मैदानी स्पर्धा –** १९ नोव्हेंबर रोजी भागशः स्पर्धा घेऊन त्यातून भागाचा संघ निवडण्यात आला. २६ नोव्हेंबरला भारत स्काऊट गाईडच्या मैदानावर ५ वी ते १२ वी च्या वर्धक, वर्धिकांच्या सांघिक स्पर्धा घेण्यात आल्या. त्यात लंगडी, खो खो, डॉजबॉल व कबड्डी या खेळांचा समावेश होता. भागशः स्पर्धा घेण्यात आल्यामुळे भागात एकी निर्माण झाली. एकूण ५०० विद्यार्थी या स्पर्धांमध्ये सहभागी झाले होते. स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी

बॉक्सिंग खेळातील राष्ट्रीय खेळाडू श्री. मृणाल भोसले सर उपस्थित होते. सर्वच स्पर्धा उत्साहात, चुरशीने पार पडल्या. नवीन नियम व नवीन मैदानामुळे आणखीच उत्साह मुलांमध्ये पहायला मिळाला.

सूर्यनमस्कार स्पर्धा याच दिवशी दुपारी झाल्या. सूर्यनमस्कार स्पर्धेचे सलग हे सहावे वर्ष. स्पर्धात्मक दर्जा असल्यामुळे विद्यार्थ्यांनी कसून सराव केला होता. मंत्रोच्चार, श्वसनाची पद्धत, सुनियोजित हालचाली, सांघिक हालचाली, उभ्या राहण्याच्या आणि सादरीकरणाच्या वेगवेगळ्या रचना यांवर मुलांनी विशेष मेहनत घेतली. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून श्री. विनोद बिबवे, श्री. विश्वास कुलकर्णी, श्री. संदीप मोरे हे उपस्थित होते.

१७ डिसेंबरला पेरुगेट भावे हायस्कूल शाळेत युवकांच्या सांघिक मैदानी स्पर्धा घेण्यात आल्या. कबड्डी व व्हॉलीबॉल या खेळांचा समावेश होता. युवकांचे सर्व सामने चुरशीचे झाले. विवेकानंद शाखेतील युवकांचे दोन्ही खेळात वर्चस्व होते. स्पर्धेसाठी पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशन यांनी पंच उपलब्ध करून दिले. व्हॉलीबॉल खेळासाठी श्री. आदित्य भोसले व श्री. मयूर शितोळे हे पंच उपस्थित होते.

निकाल –

वर्धक : १) ५ वी – ६ वी – लंगडी – भाग २ २) ७वी – ८ वी – खो–खो – भाग २ ३) ९ वी – १० वी – कबड्डी – भाग २ ४) ११ वी – १२ वी – कबड्डी – भाग ४ ५) एफ.वाय.–टी.वाय. – कबड्डी – भाग ४ ६) व्यावसायिक– व्हॉलीबॉल– स्वामी विवेकानंद शाखा.

वर्धिका : १) ५ वी – ६ वी – लंगडी – क्रांतीज्योती सावित्री शाखा २) ८ वी – १० वी – डॉजबॉल – क्रांतीज्योती सावित्री शाखा

सूर्यनमस्कार स्पर्धा : १) लहान गट – स्वामी सुबोधानंद शाखा २) मोठा गट – क्रांतीज्योती सावित्री शाखा ३) युवक/युवती गट – स्वामी सुबोधानंद शाखा

**२) वैयक्तिक स्पर्धा –** यावर्षीचा वर्धक–वर्धिकांचा वैयक्तिक क्रीडादिन १ डिसेंबर या दिवशी सर्वोत्तम सुविधा असणाऱ्या चंद्रशेखर आगाशे महाविद्यालयाच्या मैदानावर पार पडल्या. १०० मी, १५०० मी, पळणे, लांब उडी व गोळा फेक अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. क्रीडाप्रतिभा विकसन प्रकल्पातील खेळाडूंच्या हस्ते एक भव्य मशाल फेरी काढून स्पर्धेचे उद्घाटन झाले. एकूण ५५० विद्यार्थी स्पर्धेत सहभागी झाले होते. यावर्षी मोठा गट व युवक गट या दोन्ही गटांसाठी ४ बाय १०० मी. रिले स्पर्धा घेण्यात आली. ही स्पर्धा अतिशय जल्लोषाने उत्साहात पार पडली. बक्षीस समारंभ अंध संघाचे आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू श्री. अमोल करचे यांच्या हस्ते पार पडला. त्यांनी मुलांना अंध क्रिकेट खेळाबद्दल माहिती दिली. त्यांचे हे मार्गदर्शन मुलांसाठी नक्कीच प्रेरणादायक ठरले.

**निकाल – वर्धक – मुले :**

| गट | १०० मी. | १५०० मी. |
|---|---|---|
| ५ वी – ६ वी | साहिल चोरघे | साहिल खंडाळे |
| ७ वी – ८ वी | ओंकार दुकाले | श्रेयस खंडाळे |
| ९ वी – १० वी | रितेश शिंदे | रवी महतो |
| ११ वी – १२ वी | अनिकेत कावणकर | गौरव ढोबळे |
| महाविद्यालयीन गट | अक्षय कदम | अमित आदवडे |

**सदा शत्रुपक्षातल्या हालचाली । पहायास डोळ्यांमधे तेल घाली ।।**
**तसे दोष हेरी स्वपक्षांतरीचे । सुधारी, अखंडत्व ठेवीं तयाचें।।**

| गट | लांब उडी | गोळा फेक |
| --- | --- | --- |
| ५ वी – ६ वी | अनिकेत काकणकर | – |
| ७ वी – ८ वी | ओंकार दुवाले | – |
| ९ वी – १० वी | आदित्य दिवटे | आदित्य दिवटे |
| ११ वी – १२ वी | वैभव सपकाळ | राघव बगेल |
| महाविद्यालयीन गट | सचिन निकम | रोहित कानसरे |

१०० मी X ४, रिले – १) ८ वी – १० वी – स्वामी दयानंद शाखा २) युवक गट – स्वामी अभेदानंद शाखा

**वर्धिका : मुली –**

| गट | १०० मी | १५०० मी | लांब उडी |
| --- | --- | --- | --- |
| ५ वी – ६ वी | उत्कर्षा शिरोळे | – | प्रतीक्षा परदेशी |
| ७ वी – ८ वी | समृद्धी गायकवाड | अंकिता तिवारी | समृद्धी गायकवाड |
| ९ वी – १० वी | रितिका अतांदास | प्रियांका तिवारी | प्रियांका तिवारी |
| युवती गट | पूजा बत्तीन | प्रियांका शिंदे | प्रज्ञा चिंतामणी |

गोळा फेक – ८ वी – १० वी – मानसी माझिरे, युवती गट – पायल जिरेसाळ

## हिवाळी शिबिरे

**लहान गट शिबिर २०१७ –** कालावधी – २३–१२–२०१७ ते २५–१२–२०१७

संख्या : वर्धक – ५ वी + ६ वी – १६१, युवक – ४०. स्थळ – भावे हायस्कूल, पेरुगेट, पुणे

इयत्ता ५ वी आणि ६ वी मध्ये मागील ७ ते ८ महिन्यांपूर्वीच नवीन वर्धक नव्याने शाखेत आले. या नवीन वर्धकांना शिबिराचा अनुभव घेता यावा आणि त्याचबरोबर त्यांच्यातल्या कला गुणांचा, स्वभावाचा, कला कौशल्याचा शोध घेऊन वर्षभर गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करता यावेत यासाठी हे उत्साहपूर्ण शिबिर योजिले होते.

**शिबिरात झालेली व्याख्याने आणि उपक्रम –**

शनिवार, दि. २३–१२–२०१७

**व्याख्यान –** श्री. अमोल कचरे, विषय – लघुपट आणि गमतीजमती

विविध विषयांना वाहिलेल्या लघुपटांचा आस्वाद मुलांनी या शिबिरात घेतला. विविध जाहिराती आणि लघुपट सरांनी मुलांना दाखवले. प्रत्येक लघुपट आणि जाहिरातीच्या शेवटी चर्चा करून यातूनच काय शिकायला मिळाले यावर चर्चा घेतली. सहज चर्चेतून समाजमाध्यमांचा कसा जास्तीत जास्त सकारात्मक उपयोग करायचा हे वर्धकांना समजावून सांगितले. भविष्यात सर्व व्यवहार, संदेशवहन हे ध्वनिचित्रफितीच्या माध्यमातून होण्याचे प्रमाण वाढणार आहे. त्यामुळे याबाबतची जागरुकता वाढणे आवश्यक आहे. माणसाच्या भावनांचे वहन हे समाज माध्यमातून १००% होईलच अशी खात्री देता येत नाही. त्यामुळे आपला व इतरांचा समोरासमोर संवाद होणेच आवश्यक आहे.

**'स्व'–परिचय सत्र –** स्वतःचे नाव, शाळा, इयत्ता, पत्ता, आई–वडील अशी आपण ओळख नेहमीच सांगत असतो. पण याचबरोबर आपल्या आवडीनिवडी आणि त्यामागची कारणे मुलांनी सर्वांना सांगितली. स्वतःचा परिचय करून देण्याबरोबरच समोर बसलेल्या मुलांनी विचारलेल्या प्रश्नांनाही त्यांनी उत्तरे दिली.

रविवार, दि. २४–१२–२०१७

**कृतीसत्र –**

ज्ञानप्रबोधिनीमध्ये शालेय मुला–मुलींसाठी नावीन्यपूर्ण उपक्रम घेण्याचा अनुभव असणाऱ्या नेहा पोटफोडे, तेजश्री दमामे, दीपाली मुजुमदार, निकिता भांड, पल्लवी कासलीकर या मान्यवर मंडळींनी हे सत्र घेतले. या सत्रात 'चित्रनिर्मिती' व 'चला गोष्ट बनवूया' या दोन उपक्रमांचा समावेश होता. वेगळ्या पद्धतीने विचार करणारी मुलं, भाषिक कौशल्य व शब्दसंपत्ती वापरणारी मुलं, पटकन सहभागी होणारी मुलं आमच्या लक्षात आली.

युवक गटाने घेतलेल्या दुसऱ्या कृतीसत्रात 'मला काय आवडतं ?' आणि 'मुकी चित्रं' असे दोन खेळ झाले. मुलांना आवडणाऱ्या आणि नावडणाऱ्या गोष्टींचा त्यांनी प्राधान्यक्रम सांगितला. या खेळातून मुलांच्या मनातल्या गोष्टी समजायला मदत झाली. 'आजूबाजूच्या वातावरणाचा परिणाम त्यांच्यावर पडून विचार विविध दिशांना झुकले आहेत' हे जाणवले.

**मैदान –** नेहमीच्या मैदानाच्या वेळेत जे खेळ होतात त्या खेळांना उत्तमतेची जोड देण्याचा प्रयत्न करण्यात आला. दोन गटांत टेली मॅचेसच्या स्पर्धा झाल्या. याच खेळात 'पाण्याची ओंजळ' नावाचा खेळ झाला. यातून आपल्या गटात चुकणाऱ्याला समजून घेणारी, नेतृत्व करणारी, सहभागी नसलेली, विशेष उत्साह दाखवणारी, उत्तम समायोजन कौशल्य असणारी आणि त्याचबरोबर उत्तम नेतृत्व करणारी मुलं लक्षात आली.

**प्रेरणासत्र –** वक्ते – रामभाऊ डिंबळे, विषय – कथाकथन

मुलांच्या मनात असणारी भूताची भीती घालवून त्यांना धीट बनवण्यासाठी आणि चौफेर विचार करायला लावण्यासाठी रामभाऊंनी भूताची गोष्ट सांगितली.

**रात्रकार्यक्रम,** वक्ते – मा. विवेक साने, विषय – जादूचे प्रयोग

जादू म्हणजे मुलांच्या आवडीचा विषय. विवेक सरांनी विविध जादूचे प्रयोग मुलांना दाखविले. काही लहान, सहज, सोपे प्रयोग शिकवलेही. प्रत्येक प्रयोगामागे गणित, विज्ञान आणि हातचलाखी असते हे मुलांच्या लक्षात आले. मुलांमध्ये जादूच्या कलेची आवड निर्माण व्हावी आणि त्याचबरोबर याकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन यावा म्हणून हे सत्र महत्त्वाचे ठरले.

सोमवार, दि. २५–१२–२०१७

**व्याख्यान –** वक्ते : सौ. रत्नप्रभाताई राजहंस, विषय – झेप उत्तमतेकडे (वर्तन समस्या)

राजहंस ताईंनी या वयात मुलांना येणाऱ्या अडचणींवर मुलांशी संवाद साधला. शाळा, मित्र, आई–वडील यांच्या सहवासात असताना येणाऱ्या अडचणींवर कशी मात करावी हे मुलांना सहज गप्पांमधून सांगितले. अभ्यासात येणाऱ्या विविध अडचणी कशा सोडवता येतील यावर जास्त लक्ष देणे महत्त्वाचे आहे.

**कृतीसत्र, युवक गट –**

मुलांचे रिले फेस पेंटींग, फेस चॅलेंज हे खेळ गटशः तर स्मरणशक्ती, संदेशवहन हे खेळ वैयक्तिक घेण्यात आले. या खेळांचा मुलांनी मनमुराद आनंद लुटला आणि अनेक गोष्टी न कळत शिकल्या. समूहातील मुलांचा सहभाग,



**वरिष्ठाधिकारी म्हणे ते करावे । तयाचे कदा बोल ना फोल व्हावे ।।**
**नको दोष त्याचे कनिष्ठास दावूं । वरिष्ठासवे तूं न वागे दिखावू।।**

कल्पनाशक्ती विकास, तार्किक विचार, योग्य अभिव्यक्ती, देहबोलीचा योग्य वापर, भाषिक ज्ञान यांचे मूल्यमापन सांघिक खेळातून झाले. मुलांची स्मरणशक्ती, भाव-भावनांचे आकलन, निरीक्षण क्षमता वैयक्तिक खेळातून समोर आली.

**व्याख्यान –** मा. प्रकाश पारखी, विषय : अभिव्यक्त होताना.

'नाटक' हे व्यक्त होण्याचे सर्वोत्तम माध्यम असल्याने अभिनयातून गोष्ट कशी सांगावी, त्यात देहबोलीचा कसा वापर करावा, आवाजाचा चढउतार कसा असावा याबाबत सरांनी मार्गदर्शन केले. आवाजनिर्मितीचे विज्ञान त्यांनी मुलांसमोर मांडले. सरांनी काही प्रसंग स्वतः अभिनयातून सादर केले. श्वासाचा उपयोग करून विविध प्रकारचे आवाज त्यांनी काढून दाखवले.

**समारोप सत्र,** प्रमुख वक्ते – श्री. ज्ञानेश पुरंदरे

समारोप सत्रामध्ये 'अनुराग तिवारी' या वर्धकाचे तर 'शुभम नरके' या युवकाचे मनोगत झाले. त्यांना आलेला अनुभव आणि मिळालेली शिकवण त्यांनी मनोगतातून व्यक्त केली. नेहमीपेक्षा वेगळे आणि यशस्वी शिबिर झाले असे त्यांनी नमूद केले.

समारोप सत्रात ज्ञानेश पुरंदरे यांनी मुख्य मार्गदर्शन केले. शिबिराचा मूळ उद्देश आणि त्याची पूर्तता, काही जुन्या वर्धकांची उदाहरणे देत त्यातून उत्तमतेचा ध्यास आपण कसा घ्यायचा हे मुलांना सांगितले. येणाऱ्या काही वर्षात वर्धिनीचे वर्धक म्हणून आपली वागणूक उत्तम आणि आदर्श असेल यासाठी आपण प्रयत्न करूयात हाच संदेश मुलांना दिला.

---

**वर्धिनीच्या हिवाळी शिबिरानंतर पत्ररुपाने आलेली एका पालकांची प्रतिक्रिया...**

*सप्रेम नमस्कार,*

*माझा मुलगा आपल्या 'स्व'-रूपवर्धिनी संस्थेच्या कामशेत येथील दिवाळी शिबिरात गेला होता. एक शिक्षक म्हणून तुम्ही त्याच्यातील गुण, दोष, चुका याची त्याला जाणीव करून दिली व त्या चुका पुन्हा न करण्याचा निश्चय त्याच्याकडून करून घेतला. स्वतःतील चुका, दोष याची जाण आली की सद्गुणाची वाढ आपोआप होते.*

*माझी इच्छा अशी आहे की, माझ्या मुलाने भविष्यात फक्त पैसे कमवण्याचे मशीन न बनता एक उत्तम मुलगा, मित्र व समाजाची, देशाची सेवा करणारा एक उत्तम नागरिक बनावे.*

*सर, मी आपला व 'स्व'-रूपवर्धिनीचा शतशः आभारी आहे.*

आपला विश्वासू,

**– (संजय तु. खापरे)**

अप्पर इंदिरानगर, पुणे

**समर्थ रामकृष्ण शाखा –** मानसिक विकास बैठक – मुलांना या बैठकीत कृतज्ञता, महत्त्वाकांक्षा, सावर रे या पुस्तकातील थोर समाजसेवक, संतांच्या गोष्टी सांगण्यात आल्या. एका रविवारी 'दंगल' या चित्रपटावर चर्चा घेण्यात आली. या चर्चेतून समाजातील घटकांना गरजेनुसार मदत, सहकार्य केले पाहिजे, समस्या योग्य वेळी सोडवल्यास लोकांच्यात बदलही घडू शकतो असे वेगवेगळे मुद्दे मांडण्यात आले.

दिवाळी निमित्त चार गटात शुभेच्छापत्र बनवण्याची स्पर्धा झाली. शुभेच्छा पत्र बनवण्यासाठी आधुनिक माध्यमातील यू ट्यूबचा वापर झाला. त्यामुळे मुलांना संगणकातून माहिती शोधण्याचा सराव झाला. प्रत्येक गटाने दहा शुभेच्छा पत्रे बनवली. दिवाळी पाडव्याच्या दिवशी शाखेतील मुलांच्या घरी जाऊन दिवाळी शुभेच्छा व मुलांनी तयार केलेली शुभेच्छा पत्रे पालकांना दिली.

प्रदर्शन भेट – दि. २३ नोव्हेंबरला नवीन मराठी शाळेतील रायगड किल्ल्याची प्रतिकृती व त्यावर आधारित दृकश्राव्य चित्रपट मुलांनी बघितला. तसेच दि. २७ नोव्हेंबरला गणेशकला क्रीडा मंच येथील भारतातील व भारताबाहेरील पक्षी व माशांचे प्रदर्शन बघितले.

**स्वामी योगानंद शाखा –** ऑगस्ट महिन्यात अक्षर सरिता फाऊंडेशनकडून शाखेत ग्रंथालय सुरू करण्यात आले. श्रीमती शोभा बेंद्रे यांनी विविध विषयांवरची ८० पुस्तके व कपाट दिले. या कार्यक्रमास अक्षर सरिताचे कार्यकर्ते व प्रसिद्ध शास्त्रज्ञ श्री. जयंत गाडगीळ उपस्थित होते. त्यांची मुलांनी मुलाखत घेतली.

**स्वामी श्रद्धानंद शाखा –** शाखेने सकाळ सोशल फौंडेशनसोबत संलग्न होऊन पुण्यात ठिकठिकाणी 'निर्माल्य' ह्या विषयवार पथनाट्याचे सादरीकरण केले. पथनाट्यातील कलाकारांच्या भूमिकांनी प्रेक्षकांची मने जिंकून घेतली व निर्माल्य कसे, कुठे जमा करावे ह्याचा संदेश या पथनाट्याद्वारे देण्यात आला.

**महात्मा गांधी जयंतीनिमित्त २ ऑक्टोबरला 'एक कदम स्वच्छता की ओर' या ध्येयाने घोरपडे पेठ, झगडेवाडी, स्वारगेट एस.टी. स्थानक परिसरात स्वच्छता अभियान झाले.** वर्धकांना सर्वत्र चांगला प्रतिसाद मिळाला. व्यवसायातील व विक्रीतील काही बाबी समजण्यासाठी दि. ३१ ऑक्टोबरला TIM (थिंक इव्हेंट मार्केटिंग) हा उपक्रम घेण्यात आला. वर्धकांनी अकरा वापरातील उपयोगी वस्तूंचा नव्याने विचार करून काल्पनिक वस्तू तयार केल्या. मल्टी थर्मास (Multi Thermas), अत्याधुनिक सायकल, वेटलेस बॅग, छोटे घरकुल (टायनी हाऊस) या वस्तूंची माहिती, विक्री या मुख्य हेतूने सांगण्याची स्पर्धा झाली. युवक कार्यकर्ते श्री. शुभम जगताप यांनी परीक्षणातून छोटे घरकुल या कल्पनेला बक्षीस दिले. स्वामी श्रद्धानंद शाखा व क्रांतिज्योती सावित्री शाखा मिळून १७ सप्टेंबरपासून महिन्यातून दोन रविवारी पालक शाखा सुरू झाली आहे. दि. १ ऑक्टोबरला या शाखेत आहार सल्लागार कु. तन्मयी नाईक यांनी विशेष मार्गदर्शन केले.

**स्वामी दयानंद शाखा –** शिवजयंती – या शिवजयंतीला संपूर्ण आठवडा 'शिवसप्ताह' म्हणून साजरा झाला. शाखेत रोज 'शिववंदना' झाली. तसेच चित्रकला, वक्तृत्व, गायन अशा स्पर्धा झाल्या. श्री. बापू मांढरे सरांनी शिवाजी महाराजांच्या चरित्राचा अभ्यास चालू परिस्थितीत कसा आवश्यक आहे हे गोष्टीरूपात सांगितले. त्यांनी मुलांना प्रश्न विचारून त्यांनाही या विषयावर बोलते केले. नंतर झालेल्या स्पर्धांची बक्षीसे सरांनी वर्धकांना दिली. वर्धकांना तलवार, लाठीकाठी, दांडपट्टा या मर्दानी खेळांची नीट ओळख व्हावी, त्यातील वेगवेगळे साहसी प्रकार समजावेत या उद्देशाने भवानी पेठ व नाना पेठ येथील शिवजयंती उत्सवांमध्ये मर्दानी खेळांचे सादरीकरण १४ व १५ मार्चला झाले.शाखेतील कु. राज भारती व कु. कुणाल बांबळे यांची सर्वोत्कृष्ट वर्धक म्हणून निवड झाली.



**जरी भिन्नता ये कदा बांधवांशीं । तरी दाखवी ती न केव्हां कुणाशीं।।
तशानें स्वपक्षांत चंचुप्रवेश। रिपू तो करी ऐक्य जातें लयास।।**

शाखेतील उपस्थिती, शाखेच्या इतर कामातील व सामाजिक कामातील सहभाग आणि शैक्षणिक प्रगती या निकषांवर त्यांची निवड झाली. यासाठी बिबवेवाडी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक श्री. जयवंत जाधव, शाखा पालक श्री. अद्वैत कुलकर्णी व शाखा प्रमुख श्री. आकाश देशमुख यांनी निवडलेल्या वर्धकांच्या मुलाखती घेतल्या.

शाखेने 'व्यसनमुक्ती' ह्या विषयावर अनेक मंडळांसमोर दर्जेदार पथनाट्यांचे सादरीकरण केले. योग्य त्या वयात मार्गदर्शन नाही मिळाले की चुकीच्या संगतीमुळे व्यसनाच्या विळख्यात अडकण्याची शक्यता असते. त्यामुळे व्यसनमुक्ती हा विषय घेऊन दयानंद शाखेने लोकांसमोर पथनाट्य सादर केले. ह्या वेळी भरपूर प्रमाणात पालक वर्ग व युवक वर्ग उपस्थित होता.

**स्वामी शिवानंद शाखा –** शाखेत 'फळबिया अभियान' सुरू आहे. उन्हाळी मौसमातील फळबिया मुलांना गोळा करून पावसाळ्यात त्यांची लागवड करणार आहोत. १३ एप्रिलला शाखेत सुट्टी असल्याने १० मनोरंजन खेळांच्या स्पर्धा झाल्या. परिसरातील मुलेही यात सामील झाली. यातील नवीन १५ वर्धक रोज शाखेत येत आहेत. १४ एप्रिलला डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त डॉ. आंबेडकरांचे चरित्र कथाकथनातून श्री. निलेश धायरकर यांनी सांगितले. दिवाळीत शाखेत सर्व वर्धकांच्या सहभागातून दीपोत्सव साजरा झाला. मुलांनी कल्पकतेने सजावट केली होती. याच सुटीत सर्व वर्धकांची 'किल्ले राजगड'वर सहल गेली होती. प्रथमच गड चढत असल्याने मुले खूप उत्साहित होती. गडावर त्यांची राहण्याची सोय तंबूत केली होती. युवकांनी तंबूंची उभारणी केली. श्री. निलेश धायरकरांनी सर्वांना गडाची माहिती दिली.

**धर्मवीर शंभुराजे शाखा –**

शाखेत वेगवेगळ्या विषयांवर व्याख्याने झाली.

श्री. निलेश धायरकर – स्वामी विवेकानंद – कथाकथन, श्री. विनोद बिबवे – ओळख 'स्व'–रूपवर्धिनीची

श्री. संदेश शेंडकर – वर्धिनीचा वर्धक कसा असावा ? श्री. संदीप जोगळे – मुलाखत

शाखेतील कु. दत्ता वाघमारे व कु. कुमार खराडे यांचा जिल्हास्तरीय खोखो संघात समावेश झाला होता. त्यांना या स्पर्धांमधून खेळल्याने वेगवेगळ्या कौशल्यांचा अनुभव मिळाला.

मानसिक विकास बैठकीचा विषय 'निसर्गाकडून ईश्वराकडे' आणि 'जीवनमूल्ये' असा घेण्यात आला होता. सरासरी २० वर्धक मानसिक विकास बैठकीला उपस्थित असतात. निसर्गात विविध गोष्टी घडत असतात, जर बारकाव्याने आपण त्यांचे निरीक्षण केले तर असे लक्षात येते की, प्रत्येक गोष्ट घडण्यामागे हेतू आहे. प्रत्येक घटना किंवा जीवनपद्धतीमधील रचना मग त्या मानवाच्या, वनस्पतींच्या किंवा प्राण्यांच्या संदर्भात असोत, त्यामागे कोणतीतरी शक्ती आहे याची प्रचिती येते. आपल्या संस्कृतीची नाळ ही पूर्णपणे निसर्गाशी जोडलेली आहे. वर्धकांमध्ये निसर्ग निरीक्षण, निसर्ग संगोपन वाढीस लागावे, त्याचप्रमाणे आपली महान अशी संस्कृती निसर्गाच्या माध्यमातून सांगता यावी हा या विषयामागचा उद्देश आहे. वर्धकांमध्ये या विषयाची उत्सुकता असल्याचे जाणवले. स्वतःहून नवीन निरीक्षणे वर्धक मांडत आहेत.

'डिलीट करा डिलीट करा' या विषयातून अनेक सोसायट्या, मंडळे आणि वस्त्या या शाखेने पिंजून काढत मोबाईलच्या वापरावर भाष्य केले. ह्यावेळी उपस्थित अनेक नागरिकांनी मुलांना कौतुकाची थाप दिली व काही मंडळांनी त्यांचा सत्कारही केला.

**स्वामी सुबोधानंद शाखा –**

शाखेने ह्यावर्षी 'डिलीट करा डिलीट करा' ह्या विषयावर पथनाट्यांचे सादरीकरण केले. या वेळी शाखेने अनेक मंडळांसमोर सादरीकरण तर केलेच पण विशेष मुलांसमोर हेच पथनाट्य सादर करताना वर्धकांना मनस्वी आनंद झाला. अनेक मंडळांनी या वेळी शाखेला श्रीफळ देऊन शुभेच्छा दिल्या.

**स्वामी ब्रह्मानंद शाखा –** जून महिन्यात मानसिक विकास बैठकीत 'कारगिल युद्धाची शौर्यगाथा' मुलांना सांगितली. यातून आणीबाणीच्या प्रसंगी मनोधैर्य किती महत्त्वाचे असते हे सर्वांना समजले. याबरोबर बुलेटप्रुफ जॅकेटची माहितीही दिली.

८ वी ते १० वीतील वर्धकांनी रविवारी रामकृष्ण मठाला भेट दिली. सर्वांनी मठात चालणारे उपक्रम बघितले. श्री. विजय महाराजांनी रामकृष्ण मठाची माहिती व स्वामी ब्रह्मानंदांचे चरित्र मांडले.

प्रदूषण, प्रदूषण आणि प्रदूषण हा शब्द आपल्याला नवीन नसेलच पण 'सांस्कृतिक प्रदूषण' हा विषय आपल्याला नक्कीच नवीन वाटेल. समाजात डोळ्यांना दिसणारी प्रदूषणं अनेक आहेत परंतु संस्कृतीचे जतन होत आहे का हेही पाहणे गरजेचे असते. म्हणूनच ब्रह्मानंद शाखेने 'सांस्कृतिक प्रदूषण' ह्या विषयावर पथनाट्यांचे सादरीकरण केले ज्यामध्ये गणेशोत्सवाचे सद्य स्वरूप यावरही भाष्य केले.

क्रीडा दिनाच्या दृष्टीने शाखेत दोन व्याख्याने झाली. युवक कार्यकर्ता श्री. हेमंत राजगुडे यांनी राष्ट्रीय व्हॉलीबॉलपटू अरुणिमा सिन्हा यांचा धाडसी जीवनपट सांगितला. 'कृत्रिम पायाने माऊंट एव्हरेस्ट यशस्वीरित्या चढणाऱ्या पहिल्या महिला गिर्यारोहक' याबद्दल त्यांना पद्मश्री किताबाने सन्मानित करण्यात आले. तसेच श्री. दीपक भोरेकर सरांनी स्पर्धांमध्ये आपली तब्येत, शरीर कसे सांभाळले पाहिजे हे खेळातील तंदुरुस्ती (स्पोर्ट फिटनेस) या व्याख्यानातून सांगितले. शक्यतो एकाच आवडीच्या खेळाकडे जास्त लक्ष द्या, त्यामुळे त्या खेळासाठी आवश्यक असा आहार, व्यायाम याच्याकडे विशेष लक्ष देऊन त्यातच नैपुण्य साधण्यास उपयोग होतो हे सांगितले.

**नरवीर तानाजी मालुसरे शाखा –**

सहामाही परीक्षेच्या अभ्यासाच्या दृष्टीने युवक प्रमुख श्री. सुरेश पवार यांचे व्याख्यान झाले. अभ्यास कसा करावा हे सांगताना त्यांनी स्वनियोजन, विषय नियोजन, सूक्ष्म नियोजन व अंमलबजावणी या पायऱ्या खूप महत्त्वाच्या आहेत हे सांगितले. मुलांना व्यायामाची व खेळाची गोडी लागावी, एका तरी खेळात विशेष नैपुण्य यावे म्हणून 'आदर्श खेळाडू वर्धक' अशी स्पर्धा घेण्यात येणार आहे. त्यासाठी रोजची मैदानावरची उपस्थिती, सूर्यनमस्कार, आसने यातील नैपुण्य, खेळांमधील सहभाग असे निकष लावण्यात येणार आहेत. या उपक्रमामुळे सर्व वर्धक खेळांत आवडीने सहभागी होत आहेत.

सुट्टीच्या दिवसांमध्ये रोज खेळाच्या स्पर्धा झाल्या. त्याबरोबर रोज एक नवीन पद्य शाखेत घेतले व पद्यवही स्पर्धा झाली. यासाठी खूप कल्पकतेने मुलांनी पद्यवही तयार केली. फर्ग्युसन कॉलेजमधील शस्त्रास्त्रांच्या प्रदर्शनास वर्धक व युवकांनी भेट दिली. विज्ञान प्रयोग व शस्त्रे जवळून बघण्याचा अनुभव मुलांना मिळाला. शाखेत नागपंचमीच्या दिवशी सर्पमित्र श्री. अप्पा डुबल यांचे व्याख्यान झाले. त्यांनी मुलांना जिवंत साप दाखवून बिनविषारी–विषारी साप कसा ओळखायचा हे सांगितले. तसेच साप पकडण्याचे तंत्र प्रात्यक्षिकासह दाखवले.

शाखेचा रक्षाबंधनाचा कार्यक्रम धायरीतील 'माहेरवाट वृद्धाश्रमा'त झाला. तेथील सर्व आजी आजोबांना मुलांनी वर्धिनीची माहिती सांगत राख्या बांधल्या. तसेच झाडांचे महत्त्व सगळ्यांच्याच लक्षात यावे म्हणून शाळेतील सर्व

झाडांना मुलांनी राख्या बांधल्या. शाखेत प्रत्येक रविवारी वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, नाट्य स्पर्धा अशा विविध स्पर्धा गटशः होतात. ऑगस्ट महिन्यात शेतकऱ्यांची आत्महत्या, अंधश्रद्धा अशा विषयांवरील नाट्यस्पर्धा घेण्यात आली.

**स्वामी विवेकानंद शाखा –** शाखेतील **पुस्तक वाचन उपक्रमात** खालील पुस्तके वाचली.

१) हॅनाची सूटकेस २) स्वप्ने साकारताना ३) आम्ही असे घडलो

**हॅनाची सुटकेस** या पुस्तकात हॅना आणि तिच्या परिवाराची गोष्ट सांगितली आहे. महायुद्धाच्या काळात ज्यू माणसांवर झालेल्या अन्यायाचे दर्शन यातून होते. इयत्ता ८ वी, ९ वी, १० वी बरोबरच लहान गटातीलही उत्साही मुलांना बैठकीत समाविष्ट करून घेतले. या गोष्टीतून मुलांना सामाजिक जाणीव झाली, त्यातील काही प्रसंग आपल्या आजूबाजूलाही घडत असल्याच्या प्रतिक्रिया उमटल्या. ही कथा अतिशय रंजक आहे. त्याचप्रमाणे खऱ्या परिस्थितीशी जवळीक साधणारी आहे, त्यामुळे मुलांना आवडली व त्यातली वेदनाही जाणवली.

**स्वप्ने साकारताना –** डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनावरील या पुस्तकातून डॉ. कलामांच्या आयुष्यातील अनेक प्रसंग मुलांसमोर उभे राहिले. बालपणात त्यांनी केलेले कष्ट, त्यांचे आई-वडील, शिक्षक यांचे योगदान मुलांना समजले. हे वाचून आपणही मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्यासाठी धडपडले पाहिजे हे मुलांच्या मनावर ठसले.

**बैठक घेताना जाणवलेल्या गोष्टी –** मुलं रस घेऊन वाचतात पण त्यांच्या हातात चांगली पुस्तके पोहोचवली पाहिजेत हे प्रकर्षाने जाणवले. पुस्तके वाचण्याचे आवाहन केल्यापासून प्रत्येक मुलांनी बैठकीतली पुस्तके सोडून इतर किमान २ पुस्तके वाचून पूर्ण केली आहेत.

निवासी परिसरातील (गोखलेनगर, वडारवाडी) विविध संस्था, ऐतिहासिक स्मारके, शासकीय आणि खाजगी कार्यालये, उद्योगसमूह, बाजारपेठ, शैक्षणिक व सामाजिक संस्था यांचा परिचय व्हावा या हेतूने 'खजिना शोध स्पर्धा' तीन गटांमध्ये घेण्यात आली. मुलांनी भांडारकर प्राच्य विद्या संशोधन केंद्र, बालभारती, बालगंधर्व रंगमंदिर, पाताळेश्वर, पोलीस ग्राऊंड, हवामान संशोधन केंद्र, कृषी महाविद्यालय, पुणे विद्यापीठ, चतुःश्रृंगी मंदिर, किर्लोस्कर बंगला इ. ठिकाणी भेटी दिल्या.

**स्वामी अभेदानंद शाखा –** शाखेत ५ डिसेंबर ते ११ डिसेंबर चित्रकला, हस्ताक्षर, बुद्धिबळ, निबंध, देवाला पत्र, वक्तृत्व, खजिना शोध अशा वेगवेगळ्या स्पर्धा घेण्यात आल्या. त्यामुळे शाखेत उत्साहाचे व चुरशीचे वातावरण निर्माण झाले होते. यामधील आपल्या मनामधील गुपिते देवाला पत्राने कळवायची अशी पत्रलेखन स्पर्धा सर्व वर्धकांना खूप आवडली. हा एक वर्धकांचा युवकांशी मुक्तसंवाद होता. पुढील कार्यक्रमांच्या नियोजनात याचा निश्चित उपयोग होईल.

शाखेच्या परिसरातील शाळांशी संपर्क वाढावा, शाखेत न येणाऱ्या मुलांना वर्धिनीची माहिती व्हावी या हेतूने परिसरातील चार शाळांतील ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांसाठी १) स्वच्छ भारत अभियान २) माझे आजी आजोबा ३) आपले सैनिक ४) विनाफटाक्यांची दिवाळी या विषयांवर निबंध स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेला उत्तम प्रतिसाद मिळाला.

शाखेत 'अभेदानंद गौरव सोहळा' कार्यक्रम झाला. सर्व वर्धक युवकांनी वेगवेगळे कार्यक्रम सादर केले. यात पद्य, नाट्य, नृत्य, भाषांतरित संभाषण यांचा समावेश होता. आदर्श खेळाडू, आदर्श कर्णधार, अवांतर वाचन, हस्ताक्षर,

पद्यवही या गोष्टींसाठी विशेष निवडक वर्धकांना पुरस्कार देण्यात आले. या सोहळ्यात सर्व पालक सहभागी झाले होते. 'अक्षरभारती'मधील शिक्षकांनी १५ दिवस 'लॅपटॉप प्रशिक्षण' दिले. यामध्ये MS Word, Excel, Powerpoint, Paint याचे प्रशिक्षण झाले.
शाखेने एका वेगळ्या विषयात हात घालत 'बदलत्या समाजाचे बदलते भारुड' ह्या विषयावर पथनाट्ये सादर केली. भारुडामार्फत पूर्वीपासून प्रबोधनात्मक काम झाले आहे आणि त्याच परंपरेला टिकवण्याचे काम ह्या पथनाट्यातील भारुडाद्वारे वासुदेवांनी केले. एका वेगळ्या स्वरुपाच्या ह्या प्रयत्नाला लोकांनी भरभरून दाद दिली.
शाखेच्या परिसरात गोखलेनगर, जनवाडी भागात मुलांनी वृक्षदिंडी काढली. 'झाडे लावा झाडे जगवा', 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरी' असे घोषणाफलक घेऊन मुले, वस्तीतील नागरिकही दिंडीत सामील झाले होते. पारंपारिक वेशातील मुलांच्या दिंडीची सांगता वेताळ टेकडीवर झाली. टेकडीवर शंभर झाडे लावली आहेत. त्यांची निगराणी ही मुले करतात.

**भगिनी निवेदिता शाखा** (हिवाळी सहल) –
शाखेची नवीन वर्षाची सुरुवात नीळकंठेश्वर सहलीच्या आयोजनाने झाली. वर्धिनीतून सकाळी सात वाजता आम्ही निघालो. गाडी सुरु झाल्यावर खडकवासला धरणापर्यंत पद्यभेंड्या झाल्या. मुलींनी धरणाची माहिती घेतली. नंतर 'पिकॉक बे' येथे मोर बघून सकाळी दहा वाजता गाडी नीळकंठेश्वरच्या पायथ्याशी पोचली. न्याहारी करून नीळकंठेश्वराचा डोंगर चढायला सुरुवात केली. मंदिरात पोहोचल्यावर श्री. ज्ञानेश पुरंदरे सरांनी मंदिरासंबंधी माहिती सांगितली. ''या मंदिराची देखभाल कै. श्री. सर्जेमामा बघत होते. त्यांनी धार्मिक कामाबरोबर दारुपासून मुक्ती हे सामाजिक कामही सुरू केले आणि खूप लोकांना याचा फायदा झाला'' असे सांगितले. डोंगरावरचे नीळकंठेश्वर म्हणजे शंकराचे देऊळ आहे. मंदिराच्या परिसरात महाभारत व रामायण कथांची मांडणी पुतळ्यांच्या रुपातून सादर केली आहे. सर्वांनी शंकराचे भजन म्हणून भोजन केले. भोजनानंतर मनोरंजनात्मक स्पर्धा झाल्या. डोंगर चढण्यापेक्षा उतरताना सर्वांचीच कसरत झाली. एकमेकींना मदत करत सर्वजणी खाली उतरल्या. नीळकंठेश्वराच्या पायथ्याशी कातकरी व धनगर लोकांची वस्ती आहे. या वस्तीला आम्ही भेट दिली. त्यांच्याशी झालेल्या गप्पांतून त्यांचे मूळ गाव, व्यवसाय, राहणीमान याबद्दल माहिती मिळाली. वस्तीवरील सर्व लोकांना आम्ही त्यांची विचारपूस केल्याने त्यांना आनंद झाल्याचे जाणवले. 'येणारा प्रत्येक जण नीळकंठेश्वरला पर्यटनस्थळ म्हणून येतो पण आमच्याशी कुणीच बोलत नाहीत. आमच्याकडे लक्षही देत नाही' हे त्यांचं विधान खूप विचार करायला लावणारं होतं. सहल ही नुसतीच मजा म्हणून न होता त्यातून काहीसे प्रबोधनही व्हायला हवे, आपल्या अशा उपेक्षित बांधवांची जाणही आपण ठेवली पाहिजे हे जाणवले.
**दि. ५ फेब्रुवारीला शाखेतील सर्व वर्धिकांनी नदीपात्राच्या परिसरातील प्लॅस्टिक कचरा गोळा करून 'स्वच्छता अभियान' उपक्रमात सहभाग घेतला.** ज्याप्रमाणे आपण आपले घर स्वच्छ ठेवतो त्याचप्रमाणे परिसरही स्वच्छ ठेवला पाहिजे व प्लॅस्टिक कचऱ्याचे प्रमाण कमीतकमी केले पाहिजे हा संदेश या अभियानातून सर्वांना मिळाला.
१ जून शाखेचा वर्धापन दिन. यावर्षी 'स्व'–रूपवर्धिनीत स्वच्छता अभियान झाले. या उपक्रमात क्रांतीज्योती सावित्री शाखा सहभागी झाली होती. सर्वांनी मिळून काम करण्याचा अनुभव सर्वांना मिळाला व दोन्ही शाखेतल्या नवीन मुलींची ओळख झाली.

१७ जूनला शाखेत 'स्त्री शक्ती' या विषयावर पथनाट्य गटशः स्पर्धा झाली. पथनाट्य स्वतः लिहून त्याचे सादरीकरण मुलींनी उत्तम प्रकारे केले.

देश जर समृद्ध करायचा असेल तर देशातील प्रश्नांनी मन अस्वस्थ झाले पाहिजे आणि अशाच प्रश्नांनी जाणीव करून दिली शाखेतील मुलींच्या पथनाट्याने ! यावर्षी शाखेने 'जबाबदार कोण ?' या विषयावर पथनाट्य सादर केले. मुलींनी या वेळेस अनेक वस्त्यांमधील मंडळांसमोर आणि चौकाचौकात हे पथनाट्य सादर केले.

२८ ऑक्टोबरला भगिनी निवेदितांची १५० वी जयंती साजरी झाली. वर्धिकांनी भगिनी निवेदितांच्या चरित्रातील प्रसंग नाट्यरुपात सादर केले व दीपोत्सव साजरा झाला. त्यांच्या नावाची रांगोळी काढून त्यावर दिवे लावण्यात आले.

**क्रांतीज्योती सावित्री शाखा –** ४ जुलैला आषाढी एकादशीच्या दिवशी शाखेत वर्धिकांनी संतांची माहिती सांगितली व अभंग गायनाचा कार्यक्रम झाला. २८ जूनला योगदिनाच्या दिवशी श्री. संदीप मोरे सरांचे 'आहार' विषयावर व्याख्यान झाले. सध्या घड्याळाबरोबर धावण्यासाठी आपली शरीरातील ताकद कशी राखून ठेवली पाहिजे, त्यासाठी असलेल्या योग्य आहाराची माहिती सर्वांना मिळाली.

रक्षाबंधनानिमित्त फायर ब्रिगेडमधील अग्निशामक दलातील जवानांना राखी बांधून सण साजरा करण्यात आला.

दिवाळीत लक्ष्मीपुजनाला स्वारगेट स्थानकाच्या बाहेर राहणाऱ्या गरजू लोकांना जुने कपडे आणि फराळ देण्यात आला. पाडव्याला क्वि–लिंग पेपरपासून वेगवेगळी चित्रे बनवण्याची कार्यशाळा घेण्यात आली.

सावरकर अध्यासन केंद्राला भेट देऊन सावरकरांच्या स्मारकाचा इतिहास सांगण्यात आला तर पर्वतीवर जाऊन तेथील वास्तुंचा इतिहास सांगणे ही स्पर्धा घेण्यात आली.

सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त 'मी सावित्रीची लेक' म्हणून मला समाजात काय अडचणी येत आहेत यावर पत्रलेखन स्पर्धा घेण्यात आली आणि सौ. संध्याताई साबणे यांचा 'मी सावित्री बोलते' हा एकपात्री चरित्र–नाट्य प्रयोग दाखवण्यात आला.

**१० वी–१२ वी वर्धिका सहल –** दहावी, बारावी म्हणजे तणावाचे वर्ष असते. हा तणाव कमी व्हावा, थोडा बदल मिळावा म्हणून दहावी, बारावीची परीक्षा दिलेल्या युवतींची/वर्धिकांची सहल तिकोणा या किल्ल्यावर गेली होती.

### *कल चाचणी आणि समुपदेशन*

*इयत्ता - ८ वी, ९ वी. एकूण संख्या - १५८*

*सर्व शाखांमधील वर्धक–वर्धिकांची कलचाचणी घेऊन आलेल्या रिपोर्ट आधारे समुपदेशन पार पडले. शाखेत येणाऱ्या वर्धकात असणारे कला–गुण, विविध प्रकारच्या क्षमता, अभ्यास पद्धती यांचे सर्वेक्षण करणे ह्या महत्त्वाच्या हेतूने कल चाचणी घेण्यात आली. इयत्ता ८ वी, ९ वीमध्ये आपले कल समजले तर १० वीनंतर विद्या शाखा निवडताना अडचण येणार नाही. ११ वी नंतर सुरु होणाऱ्या शिक्षणासाठी आवश्यक पायाभरणी इयत्ता ८ वी, ९ वी, १० वीत करता यावी या उद्देशाने ही चाचणी महत्त्वाची आहे. कलचाचणीनंतर झालेले समुपदेशन हे वर्धकांच्या पालकांसोबत करण्यात आले. याचा फार मोठा फायदा झाल्याचे निदर्शनास आले.*

त्याचप्रमाणे सर्वांना निसर्गाच्या विविध पैलूंची ओळख व्हावी यासाठी अजिवली 'देवराई' येथेदेखील सहल गेली होती. तिकोणा किल्ल्याच्या टोकावर पोहोचल्यावर पाहिलेले निसर्गसौंदर्य नयनमनोहर होते. सहलीदरम्यान विविध पक्ष्यांचा मंजुळ आवाज कानावर पडत होता. त्यामुळे पक्ष्यांविषयीची जिज्ञासा वर्धिका, युवतींच्या मनात निर्माण झाली. या पक्ष्यांची ओळख मनीषाताई पाठक यांनी करून दिली. त्याचप्रमाणे विविध भूस्वरुपीय वैशिष्ट्ये पाहायला मिळाली. त्यात प्रामुख्याने रांजण–खळग्यांचा समावेश होता. रांजण–खळग्यांविषयीची माहिती पितळे काका यांनी सांगितली. अशा प्रकारे तिकोण्याची सहल आनंदात पार पडली. दुसऱ्या दिवशी सकाळीच वर्धिका/युवती अजिवली देवराईला भेट देण्यास गेल्या. 'देवराई म्हणजे देवाच्या नावाने राखून ठेवलेला वनाचा संरक्षित भाग' अशी माहिती लताताईंनी दिली. देवराईत विविध वृक्षांच्या आणि पक्ष्यांच्या निरीक्षणाबरोबरच देवराईतील प्लास्टिक कचरा उचलून आगळ्या वेगळ्या प्रकारे स्वच्छता अभियान वर्धिका/युवतींनी केले. तिकोणा व देवराईतील दुर्मिळ गोष्टींची छायाचित्रे देखील टिपण्यात आली. अशा प्रकारे दोन दिवस निसर्गसान्निध्यात रमलेल्या वर्धिका/युवती निसर्गाकडून अनमोल ठेवा घेऊन घरी परतल्या. ही सहल सर्वांच्याच जीवनातील अविस्मरणीय सहल ठरली.

**वीर अभिमन्यू बाल शाखा –** शाखेत दैनंदिन उपक्रमांबरोबर खालील अभ्यासपूरक स्पर्धा घेण्यात आल्या. 'हसत खेळत शिक्षण' या पुस्तकाच्या आधारे गणितातील कोडी, विज्ञानातील प्रयोग, यावर गटशः स्पर्धा दि. ४ फेब्रुवारीला झाल्या, तर दि. ८ व ९ फेब्रुवारीला पुस्तक वाचन स्पर्धा झाली. **वाचलेल्या पुस्तकातील एखादी गोष्ट किंवा पुस्तकाचा सारांश प्रत्येकाने सांगितला पाहिजे ही अट होती. सगळ्या बाल वर्धकांचा यात उत्तम सहभाग होता.**

दि. १८ फेब्रुवारीला माझी आई, माझे वडील या विषयावर ३ री व ४ थीच्या वर्गासाठी वक्तृत्व स्पर्धा झाली.

शाहू उद्यानातील खुल्या व्यायामाच्या साधनांवर खेळण्यासाठी मुलांना नेले. त्यामुळे रोजच्या खेळाच्या तासात मुलांना जास्त रस वाटला. चित्रकला स्पर्धा, पद्य स्पर्धा, कविता पाठांतर स्पर्धा, गटशः वादविवाद स्पर्धा अशा वेगवेगळ्या स्पर्धा सुट्टीच्या कालावधीत घेतल्या. ❖ ❖ ❖

### *"तू उठ, आपण एकत्रित पुढं जाऊ !"*

*शाखेवर दोन गटांचा टेली मॅचेसचा खेळ रंगला होता. प्रत्येक वेळी आपलाच संघ जिंकावा म्हणून वर्धक धावत होता. एका खेळात पळत जाऊन लंगडी घालत परत येताना दोन वर्धकांचा एकदम चुरशीचा सामना रंगलेला असताना एक वर्धक पाय मुरगळून खाली पडला... त्याचा प्रतिस्पर्धी वर्धक चार पावले पुढे असताना जागीच थांबला... समोरुन त्याचा संघ मिळालेल्या संधीचा लाभ घेण्यासाठी लवकर ये म्हणून ओरडत होता.*

*...पण साहिल मागे येत खाली पडलेल्या निलेश पवारला म्हणाला, 'तू उठ, आपण एकत्रित पुढे जाऊ'. निलेशने प्रयत्न केला पण त्याला शक्य होईना. साहिल पुन्हा म्हणाला, 'वाटल्यास मी चार पावले मागे जातो पण तू उठ.' निलेशला उचलून बाजूला केल्यानंतरच साहिल पुढे गेला.*

*वर्धिनीच्या शाखेच्या मैदानात 'खेळण्यासाठी एकत्रित न येता एकत्रित येण्यासाठी खेळ' हा उद्देश अशा प्रसंगातून आपण साधत आहोत असे वाटते.*

*– निलेश धायरकर*

## यशोगाथा

### सिद्राम शासम ते CA सिद्राम शासम

सदा आनंद नगर ही पुणे शहरातील एक मुख्य वस्ती. 'स्व'-रूपवर्धिनीच्या दृष्टीने या वस्तीचे वैशिष्ट्यं म्हणजे वर्धिनीच्या कामाची सुरुवात याच वस्तीपासून सुरू झाली. वर्धिनीच्या अनेक सेवा प्रकल्पांचा आरंभ याच वस्तीमधून झाला. त्यामुळे वर्धिनी व वस्तीचे एक अनोखे नाते नक्कीच आहे.

या वंचित वस्तीमधून वर्धिनीने पदवी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केलेले अनेक युवक युवती घडविले, याचबरोबर या वस्तीमधील पहिले पोलिस, सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक वर्धिनीच्या सान्निध्यात तयार झाले आहेत.

हीच परंपरा या वस्तीमधला पहिला सनदी लेखापाल (चार्टर्ड अकाऊंटंट) सिद्राम शासम याने कायम ठेवली आहे. सिद्राम बालपणापासूनच वर्धिनीमध्ये आहे. समर्थ शाखेत नियमित येणाऱ्या सिद्रामने बृहन् महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयामधून (BMCC) वाणिज्य विभागातील पदवी B.Com. चे शिक्षण पूर्ण करतानाच किंबहुना १२ वी उत्तीर्ण झाल्यावरच सनदी लेखापाल (CA) होण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयाची यशप्राप्ती यंदाच्या वर्षी पूर्ण झाली. या प्रवासाबाबत त्याच्या दोन बहिणी, आई, वडील आणि 'स्व'-रूपवर्धिनीतील वर्धक यांची मोलाची मदत झाली.

त्याच्या या प्रवासाबाबत त्याची बहीण सांगते की, 'परवाच दादाच्या नावाने एक पत्र आले. ते पत्र पाहून आईला अभिमान वाटला. कारण पत्रावर नाव होतं, CA सिद्राम शासम.' CA ह्या शब्दाचा अर्थही कळत नसताना आपल्या मुलाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे आई-वडील होते म्हणून तो CA होणे शक्य झाले.

सिद्रामच्या या प्रवासात सर्वतोपरी साह्यासाठी आधारवडासारखी उभी होती ती 'स्व'-रूपवर्धिनी. CA होण्याचा निर्णय, त्यासाठीचे मार्गदर्शन, अभ्यासाला जागा, प्रेरणा देणारे युवक-युवती आणि कार्यकर्ते असं सारं काही वर्धिनीत मिळाले.

विशेष मार्गदर्शन वर्गाचा लाभ न घेतल्याने CPT या पहिल्याच परीक्षेत अपयश आल्यानंतर आई-वडिलांनी सांगितले, 'आम्ही पैशाची व्यवस्था करतो. त्याची काळजी तू नको करू. तू फक्त अभ्यास करून परीक्षा दे.' सिद्राम तसा रोजच्या शाखेचाच कार्यकर्ता असल्याने अपयश पचवून पुढे जाण्याची प्रेरणा त्याच्यामध्ये होतीच. पुढील CPT परीक्षा व IPCC हा दुसरा टप्पा यात त्याने पहिल्याच प्रयत्नात यश मिळविले. कारण त्याला माहीत होते की, जर आपण पुन्हा नापास झालो तर घरावर आर्थिक बोजा येईल. घरचे पुन्हा ही आर्थिक जमवाजमव  कोठून करणार या विचाराने त्याने मनापासून कसून प्रयत्न केले.

ह्या सगळ्यात 'स्व'-रूपवर्धिनीची आर्थिकदृष्ट्यादेखील खूप मदत झाली. वर्धिनीत आईचा बचत गट असल्याने आईला बचत गटातूनसुद्धा मदत मिळाली. त्यामुळे त्याला आवश्यक तेव्हा शिकवणी वर्ग लावणे शक्य झाले.

यानंतर CA परीक्षेचा अंतिम टप्पा. या दरम्यान त्याच्या शाखेतील दादा आणि वर्धिनीचे पूर्ण वेळ कार्यकर्ते घरी सतत संपर्काला जात असत. सिद्रामचे कष्ट, चिकाटी व कठोर मेहनतीला फळ आले. अंतिम परीक्षेचे दोन ग्रुप त्याने पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण केले. सिद्राम शासम २०१७ साली CA झाला.

दोन बहिणींनी खंबीरपणे दिलेली साथ ही साह्यातील अत्यंत महत्त्वाची पायरी ठरली आहे. ह्याशिवाय हे शक्य होणे कठीण होते. **या मोठ्या परीक्षेचा अभ्यास करताना रोजची शाखा, वर्धिनीचे नित्य कार्यक्रम यापासून**

**सिद्राम कधीच दूर राहिला नाही. हे करत असताना शाखेवर नियमित काम करणाऱ्या सर्व युवकांच्या अभ्यासातील प्रगतीची काळजी व त्यासाठी मार्गदर्शन, शाखेच्या साप्ताहिक बैठका व संक्रांत उत्सव व गणेशोत्सवात आर्थिक प्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळत त्याने वर्धिनीविषयीचे सामाजिक कर्तव्यसुद्धा पार पाडले.**

सिद्रामच्या या प्रवासात कधी त्याच्या आरोग्याचे तर कधी आर्थिक प्रश्न निर्माण होतच होते; परंतु या सर्वांवर मात करीत CA बनलेला सिद्राम हा त्याच्या कुटुंबासाठी, आणि वर्धिनीसाठी एक प्रेरणा देणारे उदाहरण ठरले. वर्धिनीवर अमाप प्रेम करणाऱ्या त्याच्या कुटुंबियांचे व सिद्रामचे खूप खूप अभिनंदन !

---

## कृतज्ञ मी ! तृप्त मी !

वाळवंटी जीवनात तासन्तास चालल्यानंतर मिळणारे पाण्याचे दोन घोट हे अमृताहून गोड असतात आणि त्याच तहानलेल्या अवस्थेत जर पाण्याचे अनेक साठे सापडले तर ? निश्चितच तो आनंद शब्दांत सांगण्यासारखा नाही. माझा प्रवासही काही असाच आहे. वाळवंटी जीवन म्हणजे पदव्युत्तर समाजकार्यापर्यंतचे कष्टप्रद शिक्षण व मिळणारे पाण्याचे साठे म्हणजे भल्या मोठ्या पगारांचे आमिष ! आतापर्यंत दुःख एवढे पाहिले होते की वाटायचे पैशाने सर्व समस्या सुटतील त्यामुळे आपण या संधी स्विकाराव्यात पण काम करायचं कशासाठी ? ह्या विचाराने मला भेडसावून सोडले होते. काही दिवसांपूर्वी इंटरनेटवर समाजकार्य संदर्भात एक लेख वाचला होता. त्यात असे म्हटले होते की, समाजकार्य करून तुम्हाला आनंद मिळतो की समाधान हे ओळखावे लागते. जर आपल्याला समाजकार्य करून आनंद मिळविणे हा हेतू असेल तर त्याचा अर्थ होतो की माझ्या आनंदासाठी समाजाने दुःखी असणे गरजेचे आहे का ? म्हणजे मला त्यावर काम करून आनंद मिळविता येईल. आनंद मिळविण्यापेक्षा समाजकार्यातून समाधान मिळविणे अधिक हितकारक असते. ह्या विचाराच्या स्पष्टतेतूनच वर्धिनीचे काम का करायचे ह्याचे प्राथमिक उत्तर मिळाले. सुदैवाने ह्याच कालावधीत 'किशाभाऊंची पत्रे' वाचनास मिळाले. पहिल्याच पत्रातील काही ओळींनी वर्धिनीचे काम करण्याची माझी ही इच्छा अधिक तीव्र करून टाकली होती. त्या ओळी होत्या,

'परि हे तुमचे नी झाले । म्या हे नाही केले ।।<br>
धर्म कीर्तन सिद्धी गेले । तुम्हा कारणे ।।'

एवढे मोठे काम उभे करून देखील त्याचे श्रेय इतरांना देणे यातून 'ध्येयधुंद' हा शब्द किशाभाऊंच्या जीवनाची प्रचिती देऊन जातो. वर्धिनीचे काम करताना माझ्याकडे असणाऱ्या जबाबदाऱ्यांना पाहून मी त्यासाठी योग्यतेचा अथवा त्या पात्रतेचा नाही असे मला नेहमी वाटते. पण त्या कामासाठी वर्धिनीला मी योग्यतेचा वाटतो यातून आनंदाची बातमी माझ्यासाठी दुसरी कोणतीच नाही. आतापर्यंतचा प्रवास हा अर्धाच म्हणजेच 'विकसित व्हावे' आणि ह्यापुढील प्रवास 'अर्पित होऊनी जावे' असा निश्चित असेल. 'स्व'–रूपवर्धिनी या मातृसंस्थेने मला नेहमी स्वावलंबी व्हायला शिकवले. त्यामुळेच कदाचित आजवरचे शिक्षण (पदव्युत्तर समाजकार्यापर्यंतचे) ठरवून खुल्या प्रवर्गातून केले. म्हणजेच आरक्षणाचा फायदा न घेता ! 'आपल्याला या सेवेतून सेवेकरी निर्माण करायचे आहेत' असे स्वप्न श्रद्धेय किशाभाऊंचे होते. ज्याप्रमाणे नवीन लावलेल्या रोपट्याला मातीशी नातं जोडायला वेळ

लागतो. अगदी तसंच मला देखील 'स्व'-रूपवर्धिनी ही मातृसंस्था हळूहळू कळू लागली आहे. लावलेल्या रोपट्याचे मातीशी नाते जसे घट्ट होत जाते. माझेही माझ्या मातृसंस्थेशी नाते हे अधिक घट्ट होऊ लागले आहे. म्हणूनच पुढील कवितेच्या ओळी ह्या मातृसंस्थेस समर्पित करत आहे.

माझ्या रूपाचे वर्धन घाम माथ्याचा चंदन ।
स्मित ठेवूनी हास्य फुलवी अंतरी वृंदावन ।।
स्वार्थ येथे मनातला देह तपत्या उन्हातला ।
दोहो जाळला क्षणात 'स्व' पुन्हा प्रकटला ।।
एक दिवा सामोरी देव शोधितो मंदिरी ।
भेटला देव माणसात तयाचे नाव 'स्व'-रूपवर्धिनी ।।

**– सुरेश गोविंद पवार,** पूर्ण वेळ कार्यकर्ता

❖ ❖ ❖

## विस्तार विभाग

**कोल्हापूर –** हे केंद्र **सेतू चॅरिटेबल ट्रस्ट** ही संस्था चालवते. या उपकेंद्रावर मार्च महिन्यातील रंगपंचमीला एक अनोखा उपक्रम घेतला. पर्यावरण संवर्धनाची जाणीव शाखेतील मुलांमध्ये लहानपणीच निर्माण व्हावी या उद्देशाने कोल्हापूर शहरातील या विषयावर उल्लेखनीय काम करणारी आणि पर्यावरण रक्षणाचा वारसा जपणारी 'निसर्गमित्र' ही संस्था आणि 'सेतू' यांच्या सहभागातून नैसर्गिक रंगनिर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. ही कार्यशाळा शिवाजी पार्क वस्तीमधील शाखेत दि. ५ मार्चला व राजेंद्रनगर शाखेत दि. ९ मार्चला घेण्यात आली. निसर्गमित्र संस्थेचे श्री. अनिल चौगुले सरांनी मनोरंजक आणि माहितीपूर्ण पद्धतीने पानांफुलांपासून सिद्ध झालेल्या रंगनिर्मितीचे प्रात्यक्षिक दाखविले. दोन्ही ठिकाणी कार्यशाळेत सहभागी झालेल्या मुलांनी उत्साहाने भाग घेतला.

**या कार्यशाळेनंतर मुलांनी स्वतः पानाफुलांपासून रंग तयार केले आणि याच रंगांनी दि. २० मार्चला सर्वांनी पर्यावरणपूरक रंगपंचमी साजरी केली.**

विशेष म्हणजे इनरव्हिल क्लब कोल्हापूर हेरिटेज या संस्थेकडून दि. १६ मार्चला संस्थेच्या कर्णबधीर मुलांसाठी **Speech Trainer** भेट स्वरुपात मिळाला. या भेटीमुळे कर्णबधिर मुलांमध्ये आत्मविश्वास वाढवण्यासाठी निश्चितच मदत होईल.

**डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अभ्यासिका –** दि. २३ डिसेंबर २०१६ ला कासेवाडी वसाहतीतील मनपा शाळा क्र. ८६ ब, भवानी पेठ येथे गरजू व गरीब विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका सुरू झाली. सध्या या अभ्यासिकेत इ. १ ली ते ७ वी तील १६ विद्यार्थी रोज संध्याकाळी ६.३० ते ८.३० या वेळात येतात. अभ्यासाबरोबर त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास व्हावा या उद्देशाने अन्य कार्यक्रमही होतात. श्री. ज्ञानेश पुरंदरे सरांनी मुलांना बोध कथा सांगून त्यांच्याशी प्रश्नोत्तर रूपाने संवाद साधून बोलते केले. परिसरातील १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी एक संपूर्ण आठवडा अभ्यासवर्गाचे आयोजन करण्यात आले. यासाठी श्री. प्रवीण पासलकर व श्री. संजय परमार यांचे मार्गदर्शन मिळाले. वर्गात रामनवमी उत्साहात साजरी झाली. मुख्य कार्यक्रमानंतर मुलांचे वेगवेगळे बौद्धिक खेळ घेण्यात आले. डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त घेतलेल्या चित्रकला स्पर्धेत सर्व विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. कासेवाडी शेजारी हरकानगर येथे मुलींची व मुलांची स्वतंत्र अभ्यासिका दिवाळीनंतर सुरू करण्यात आली आहे.

# विस्तार विभाग वृत्त

लक्ष्मी केशव प्रतिष्ठान–सातारा, सेतू चॅरिटेबल ट्रस्ट–कोल्हापूर आणि जनभारती प्रतिष्ठान–लातूर तसेच हिंद सेवा मंडळ–अहमदनगर या चार समविचारी संस्थांच्या माध्यमातून वर्धिनीची उपकेंद्र सुरू झाली आहेत. या उपकेंद्रात वर्धिनीच्या शाखा विभागाचे काम सुरू आहे. व्याख्याने, संस्थाभेटी, छोट्या सहली, शिबिरे या उपक्रमातून हळूहळू काम स्थिर होत आहे. नवीन कार्यकर्ते कामाला जोडले जात आहेत.

**सातारा उपकेंद्र –** सातारा केंद्राचा विस्तार होऊन सात ठिकाणी शाखा चालू झाल्या आहेत आणि संस्थेतून घडलेले युवक–युवती कार्यकर्ते या शाखा सांभाळत आहेत. संगणक आणि विज्ञान या विषयांसाठी सुरू झालेल्या फिरत्या प्रयोगशाळेचा लाभ नगरपालिकांच्या शाळांना मिळत आहे. केंद्रात काम करणाऱ्या नवीन कार्यकर्त्यांना सातारा केंद्र संस्थापक श्री. विजयराव पंडित सरांचे मार्गदर्शन मिळत आहे. युवक–युवती कार्यकर्त्यांचे अभ्यासवर्ग सुरू झाले असून या कामाची दखल साताऱ्यातील सामाजिक संस्थांनी तसेच शासकीय पातळीवरही घेतली जाऊ लागली आहे.

**कोल्हापूर उपकेंद्र –** सेतू चॅरिटेबल ट्रस्टच्या सहयोगाने सुरू असलेल्या उपकेंद्राच्या दोन वस्त्यांमध्ये शाखा सुरू झाल्या आहेत. तरुण कार्यकर्त्यांची एक फळी उभी रहात असून स्वतःच्या शिक्षणाबरोबरच या कामासाठी अधिकाधिक वेळ ते देत आहेत. संघटनात्मक पातळीवर नियमित बैठका घेण्यास सुरुवात झाली आहे. त्यातून कार्यकर्त्यांचा उत्साह आणि आत्मविश्वास वाढल्याचे जाणवले आहे.

**लातूर उपकेंद्र –** जनभारती न्यासाच्या माध्यमातून सुरू झालेल्या उपकेंदाच्या शाखेचे काम नियमित चालू आहे. केंद्राचे काम पाहणाऱ्या राहुल गायकवाड या कार्यकर्त्याने नवीन तरुण कार्यकर्ते जोडले आहेत.

**अहमदनगर उपकेंद्र –** अहमदनगर शहरामध्ये हिंद सेवा मंडळ ही खूप जुनी नावाजलेली शिक्षणसंस्था आहे. या संस्थेने वर्धिनीच्या शाखा विभागाचे काम आपल्या संस्थेतील वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी सुरू केले असून संस्थेच्या प्रत्येक शाळेत शाखा सुरू करावी असा विचार संस्था संचालक करत आहेत.

**संभाव्य उपकेंद्र, राजगुरुनगर –** वर्धिनीचे काम पाहून व अनुभव ऐकून सरस्वती शिक्षण प्रसारक मंडळ, राजगुरुनगर या संस्थेने वर्धिनीचे उपकेंद्र म्हणून काम करण्याची तयारी दाखवली असून तसा सामंजस्य करारही वर्धिनीबरोबर केला आहे. जून २०१८ पर्यंत हे उपकेंद्र सुरू होणार आहे.

**रुग्ण सहाय्यक अभ्यासक्रमाचा पुण्याबाहेरील विस्तार –** योगेश्वरी हॉस्पिटल–दौंड, भगिनी निवेदिता प्रतिष्ठान – सांगली, हरिजन सेवक संघ – बार्शी या संस्थांमध्ये वर्धिनीचा रुग्ण सहाय्यक अभ्यासक्रम व्यवस्थित सुरू आहे. बार्शी येथे हा अभ्यासक्रम पहिल्यांदाच घेतला गेला असून त्याच्या अनुभवामुळे नवीन वर्षात पुढचा वर्ग सुरळीतपणे सुरू होईल.

**अपेक्षा –** या सर्व उपकेंद्रांचे, रुग्ण सहाय्यक वर्गांचे आणि नव्याने विस्तार होऊ शकणाऱ्या केंद्राचे काम प्रभावी होण्यासाठी महिन्यातून एखादी भेट त्या त्या केंद्रांना देऊ शकतील अशा कार्यकर्त्यांचा एक स्वतंत्र संच उभा राहण्याची आवश्यकता जाणवत आहे. अशी मदत करू शकणाऱ्या कार्यकर्त्यांचे विस्तार विभागात स्वागत आहे.

❖ ❖ ❖

**शाखेत मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी वेगवेगळे कार्यक्रम होत असतात. या कार्यक्रमांविषयी वर्धक व त्यांच्या पालकांना काय वाटते ? त्यांच्या काही प्रतिक्रिया –**

आभाळाएवढी ज्यांची उंची । त्यांनी थोडेसे खाली यावे ।।
मातीत ज्यांचे जन्म मळले । त्यांना उचलून वरती घ्यावे ।।

– कवी दत्ता हलसगीकर

या कवितेप्रमाणेच आमची 'स्व'–रूपवर्धिनी आमच्या रूपाचे वर्धन करण्याचे काम करत आहे. गरीब, गल्लीबोळात राहणाऱ्या मुलांना वळण लावण्याचे, घडवण्याचे काम करत आहे. सोळा शाखांपैकी आमची घोरपडे पेठ भागातील मुलांसाठी असलेली 'स्वामी श्रद्धानंद शाखा'. मी शाखेत जायला सुरुवात केल्यावर माझ्यात खूपच बदल झाला. शाळेचा शाखेत अभ्यास सोप्या भाषेत शिकवल्याने त्याची आवड लागली. वेगवेगळे मैदानी खेळ खेळू लागलो. बाहेरील अन्य गोष्टींची ही माहिती मिळाली. मुख्य म्हणजे मुलांच्यातल्या गुणांना वाव मिळण्यासाठी वर्धिनीत त्यांना वैयक्तिक मार्गदर्शन केले जाते. मला शाखेत शिकवलेल्या विविध पद्यांमुळे गाण्याची आवड निर्माण झाली. त्यासाठी मी संगीताचा वर्गही लावला आहे. याचे प्रोत्साहन मला शाखेकडूनच मिळाले. मला स्वतःचे घर आणि शाखा यात फरकच जाणवत नाही. कारण वर्धिनीची शाखा प्रेरणादायी आहे; सहवासातून शिक्षण व शिक्षणातून संस्कार घडवणारी, विविध कार्यक्रमांतून एकही दिवस सुट्टी न घेता रोज संध्याकाळी आम्हाला घडवणारी संस्था म्हणजे 'स्व'–रूपवर्धिनी.

**– इ. ९ वी, सुजीत तिवारी, (वर्धक)**

माझा मुलगा ५ वी पासून स्वामी श्रद्धानंद शाखेत जातो. दोन महिन्यातच मला त्याच्या वागणुकीत बदल जाणवू लागले. शाळेच्या परीक्षेतही त्याला कमी गुण असायचे पण शाखेत जायला लागल्यापासून अभ्यासातही प्रगती झाली. त्याआधी तो इतरांशी जास्त बोलायचा नाही, खेळायचा नाही पण आता मैदानी खेळात आवडीने भाग घेतो. हे सर्व बदल त्याच्यात शाखेमुळेच झाले आहेत.

**– निता तिवारी (पालक),**
**स्वामी श्रद्धानंद शाखा**

माझा मुलगा सिद्धार्थ डोलारे हा ७ वी पासून स्वामी श्रद्धानंद शाखेत जातो. शाखेत जायला लागल्यापासून तो स्वतःची कामे स्वतःच करतो. सकाळी लवकर उठतो. व्यायाम करतो. गोडीने अभ्यास करतो. त्याच्या वागण्यात बोलण्यात चांगला बदल झाला आहे. खेळल्यामुळे त्याची उंचीही वाढली आहे.

मला वाटते शाखा म्हणजे उत्तम संस्कार देणारा वर्गच आहे. शाखेतील सर्व दादा स्वतःचे कॉलेज, शिक्षण सांभाळून मनापासून इतरांसाठी मेहनत घेतात. त्यांचे खूपच कौतुक करावेसे वाटते. शिबिरासाठी, सहलींसाठी घेऊन जाणे, वेगवेगळ्या कार्यक्रमात भाग घेणे, त्याची तयारी करून घेणे यासाठी खूप कष्ट घेतात. **दादा त्यांची परीक्षा असो अथवा कामासाठी बाहेर जाणे असो तेव्हा दुसऱ्या दादांना सांगून जातात की ज्यामुळे शाखेतील इतरांचे नुकसान होऊ नये.** शाखेत आमच्या मुलांचे जे शिक्षक तास घेतात त्यांचे पण आभार. **सध्या बाहेर पैशाशिवाय कोणतेच काम होत नाही पण वर्धिनी ही संस्था कशाचीच अपेक्षा न ठेवता मुलांना शिकवण्याचे काम करत आहे.** त्या सर्व दादांचे, शिक्षकांचे पुन्हा पुन्हा आभार मानते.

शाखेतील पालकसभांमुळे आम्हाला मुलांची प्रगती तर कळतेच पण अन्य उपक्रमांचीही माहिती होते. पालकांचे

चहापान होते. असे आपुलकीने वागल्याने आम्हाला पण शाखेविषयी प्रेम वाटते. संक्रांतीचा कार्यक्रम खूप चांगला झाला. तो आम्हाला सर्वांना खूप आवडला. शाखेचे काम असेच पुढे जावो ही इच्छा.

**– सौ. स्वाती डोलारे (पालक),**
**स्वामी श्रद्धानंद शाखा**

शाखा म्हणजे असे ठिकाण जिथे मुलांचा सर्वांगीण विकास केला जातो. त्याचबरोबर त्यांच्या सुप्तगुणांनाही तिथे वाव मिळतो. अभ्यासाबरोबर खेळ आणि व्यायामाचेही महत्त्व पटवले जाते. मोठमोठ्या व्यक्तींचा सहवास आमच्या मुलांना इथे लाभतो. आम्ही मुलांना शाळेमुळे फक्त शिक्षण देऊ शकतो. पण शाखेमुळे शिक्षण आणि खेळ शास्त्रशुद्ध पद्धतीने शिकता येतात. शाखेमुळे आपण समाजाचे घटक आहोत ही जाणीव पटकन येते.

माझ्या मुलाला प्रथमेशला शाळा व घर यापलिकडे दुसरे जगच नव्हते. पण आता शाखेत जायला लागल्यापासून तो सगळ्यांच्यात मिसळू लागला आहे. शाखेचे विविध उपक्रम निश्चित फायदेशीर आहेत त्याचा अभ्यासातही मुलांना चांगला उपयोग होतो. ही शाखा अजून खूप वाढावी ही सदिच्छा.

**– सौ. आम्रपाली मिंडे (पालक),**
**स्वामी विवेकानंद शाखा**

❖❖❖

---




प्रार्थना

हे प्रभो! तू ज्ञानरूपे कल्पवृक्षा लाविले।
बहरल्या शाखा तयांच्या चिंतनी मन रंगले॥
विश्व हे सामावले ॥धृ॥

या पदासी आकळीली सूर्य-चंद्राची प्रभा।
मोजुनी ग्रह-गोल-तारे भेदिले अवघ्या नभा।
मंथुनीया सप्त सिंधू गगन तेजे व्यापिले॥
विश्व हे सामावले ॥१॥

संस्कृती गंगौघ वाहे, त्यामधे अवगाहुनी।
शोधण्या शिव-सत्य-सुंदर दिव्य श्रद्धा घेऊनी-
चालले पथ साधनेचा गुरुपदा ते पावले॥
विश्व हे सामावले ॥२॥

ज्ञान-रूपा! हे विराटा!! अणुअणुत तुज पाहु दे।
शक्ति, युक्ति, नम्रता दे, शील, शुभ संकल्प दे॥
आत्म-ज्ञाने, निश्चये, मन चेतनामय जाहले।
विश्व हे सामावले ॥३॥

१४।७।८३

कै. राजाभाऊ लवळेकर ह्यांच्या हस्ताक्षरात



नवी नित्य शस्त्रे स्वराष्ट्रार्थ घ्यावी । त्वरें जाणुनी युक्तिनें वाढवावीं ।।
जयें शक्ति वाढे असे छंद घ्यावे । सशस्त्रांविना राष्ट्र कैसे जगावे।।

* युवक शाखेची सुरुवात जुलै महिन्यात झालेल्या बैठकीने झाली. बैठकीची सुरुवात युवकांच्या परिचयाने झाली. स्वतःची ओळख वेगळ्या पद्धतीने सांगण्यासाठी त्यांना विविध चवी असलेली चॉकलेटस् देण्यात आली. सर्व युवकांनी आपले नाव, शिक्षण, शाखा व त्यासोबत आपल्याला जे चॉकलेट मिळाले आहे त्याच्या चवीनुसार आपली ओळख सांगणे आवश्यक होते. सर्व युवकांनी आपल्या मिळालेल्या चॉकलेटनुसार आपला स्वभाव कसा आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला. उदा. ह्या चॉकलेटप्रमाणे माझा स्वभाव हा वरून जितका कडक वाटतो तितकाच हळवा आहे. हे चॉकलेट जसे हळूहळू विविध चवीत मिसळून जाते तसा मी देखील कोणत्याही वयोगटातील लोकांमध्ये मिसळून जातो. ह्या चॉकलेटप्रमाणे माझा स्वभावदेखील परिस्थितीनुसार बदलत जातो. कधी गोड तर कधी आंबट. युवक शाखेची सुरुवात अशी नाविन्यपूर्ण पद्धतीने जोशपूर्ण झाली.

* **वर्धिनीचे संस्थापक-सदस्य कै. राजाभाऊ लवळेकर सर यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त** दोन्ही शाखांवर व्याख्याने झाली. श्री. जयंतराव कवठेकर सरांनी शाखा संचालनासाठी प्रभावी ठरलेली कै. राजाभाऊंनी आग्रहाने मांडलेली 'स'कारात्मक संस्कार सप्तपदी समजावून सांगितली. संपर्क, सानिध्य, सहवास, संवाद, सहअनुभूती, सातत्य आणि समर्पण ही सप्तपदी म्हणजे संघटन कौशल्याचा मूलमंत्र होय.

* **अण्णाभाऊ साठे पुण्यतिथी –** वर्धिनीचे युवक कार्यकर्ते श्री. सुरेश पवार यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे चरित्र गोष्टीरुपात सादर केले. तसंच त्यांचे 'माझी मैना गावावर राहिली' हे सामाजिक स्थिती सांगणारे प्रसिद्ध गाणे गाऊन दाखवले.

**कृतीसत्र –** शाखेतील युवकांचा आत्मविश्वास वाढावा यासाठी 'अनोळखी वस्तीत एकट्याने जाऊन सर्वेक्षण करणे' हा क्षेत्र उपक्रम झाला. यामध्ये 'गणेशोत्सवात ध्वनीप्रदूषण व अन्य आवाजाने होणारे त्रास' यांचे सर्वेक्षण युवकांनी केले. ध्वनीप्रदूषण टाळण्यासाठी आपण काय करू शकतो हे युवकांनी वस्तीत समजावून सांगितले.

कमीतकमी शब्दात व्यक्त होण्याचे कौशल्य विकसित व्हावे या हेतूने वाचकांचा पत्रव्यवहार वाचून एका विशिष्ट बातमीवर प्रतिक्रिया म्हणून पत्र लिहिण्याचा उपक्रम झाला.

वेगवेगळे विषय मांडण्याचा सराव व्हावा यासाठी उत्स्फूर्त बोलणे हे कृतीसत्र झाले. आयत्या वेळेला मिळालेल्या विषयावर तीन मिनिटात विषय मांडणी करताना स्वतःमधल्या चांगल्या व कमी असलेल्या गोष्टींची युवकांना जाणीव झाली.

गृहभेटीच्या कृतीसत्रातून 'स्व'-रूपवर्धिनी समजवून देताना दुसऱ्या व्यक्तीचे विचार जाणून घेणे ही महत्त्वाचे असते ही जाणीव युवकांना झाली. यासाठी शाखेमध्ये रोज न येणाऱ्या वर्धकाच्या घरी जाऊन त्याच्या पालकांशी बोलण्याचे कृतीसत्र झाले.

### प्रशिक्षण शाखा – ११ वी, १२ वी

११ वी, १२ वी प्रशिक्षण शाखेत नेहमीप्रमाणे श्री. अरविंद केळकर सरांचा इंग्रजीचा तास होता. सरांनी पावसाचे झालेले सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम लिहिण्यास सांगितले. सर्वांनी चांगला प्रयत्न केला. त्यातील ऋषभ सावंत ह्या युवकाचे मनोगत (भाषांतरित) – ''पावसाने एवढ्या काही दिवसात चांगलाच जोर धरला आहे. या पावसामुळे एक चांगले होईल की धरणे भरली जातील व काही प्रमाणात पाण्याचा प्रश्न सुटेल पण याचा वाईट

परिणाम सर्वसामान्यांवर इतका होणार नाही जितका हातावर पोट असणाऱ्या लोकांवर होईल. स्थानकावर झोपणारी मुलं असतील अथवा चौपाटीवर लागणाऱ्या छोट्या गाड्या यांच्यावर याचा जास्त परिणाम होईल.'' डोळसपणे मांडलेल्या या मताचे अरविंद सरांनीदेखील कौतुक केले. **वर्धिनीच्या युवकांमध्ये काय रुजवायचे आहे तर हीच संवेदना रुजवायची आहे.**

**अभ्यास दौरा –** * दि. ८ ते दि. १० डिसेंबर वर्धिनीतील युवकांचा नंदुरबार या आदिवासी जिल्ह्यात दौरा झाला. या लोकांच्या दैनंदिन जीवनात जास्त हस्तक्षेप न करता त्यांची प्रगती साधण्याच्या हेतूने काही संस्था कार्यरत आहेत. त्यांना युवकांनी भेट दिली.

निंबोणी शेतकरी सुविधा केंद्र, खांडबारा – ह्या केंद्रातून (नाबार्ड अंतर्गत) शेतीची आधुनिक अवजारे माफक दरात शेतकऱ्यांना उपलब्ध होतात. शेतकऱ्यांचे संघटन करून नेसू नदीवर बांध बांधला आहे. त्यामुळे २००० एकर क्षेत्राला पाणी मिळाले. कुक्कुटपालन, शेळीपालन, गांडूळखत प्रकल्प, भात गिरणी, कडबा कुट्टी या जोड व्यवसायांमुळे गावातील स्थलांतर थांबवण्यात कार्यकर्त्यांना यश आले आहे. मा. सरपंच श्री. किसन वडजे यांच्याशी झालेल्या संवादातून 'शेतकऱ्यांचा शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदललेला आहे, शेतीतून मिळणारा नफा परत शेतीत वापरला जातो, मुले शिक्षणासाठी आश्रम शाळेत जाऊ लागली', या गोष्टी समजल्या.

कृषी विज्ञान केंद्र, कोळडा – शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणींवर मात करून शेतीशी निगडीत असलेल्या गोष्टी आणखी सोप्या कशा करता येतील यासाठी हे केंद्र सदैव पुढाकार घेत असते. याची पावती म्हणून राष्ट्रीय पातळीवरचे अनेक पुरस्कार केंद्राला मिळाले आहेत. केंद्राने परिसरातील शेतकऱ्यांची माहिती संकलित करून त्यांना वेळोवेळी सरकारी शेती योजनांची माहिती देण्याचे काम केले आहे.

* धडगाव (अक्राणी) येथील श्री. भिकाभाऊ चौधरी यांच्या 'जय जीवाणू' या व्यवसाय प्रकल्पाला युवकांनी भेट दिली. गांडूळखत, कंपोस्ट खत, जीवामृत यांचे उत्पादन येथे घेतले जाते. या व्यवसायाची सुरुवात ३००० रुपयांपासून झाली आणि आता तो कोटीच्या घरात पोहोचला आहे. याच गावात आदिवासी बांधवांनी स्वखर्चाने पाईपलाईन टाकून पाणी आणले आहे. गावात सापडणाऱ्या सर्व प्रकारच्या रानभाज्या, कडधान्ये याचे स्वामीत्व हक्क गावाने घेतले आहेत आणि या भाज्यांचे माहिती देणारे पुस्तकही प्रकाशित झाले आहे.

* दि. ६ डिसेंबर २०१७ रोजी तळेगाव येथील तोलानी मॅरीटाईम इन्स्टीट्यूट या ठिकाणी 'मर्चंट नेव्ही' या विषयातील करिअरच्या संधी जाणून घेण्यासाठी प्रशिक्षण शाखेचा अभ्यास दौरा झाला. समुद्रात दिसणारे व्यापारी व मालवाहू जहाज प्रत्यक्ष पाहण्याचा व त्यावरील कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव युवकांनी घेतला. या संस्थेमार्फत प्रशिक्षण कसे दिले जाते व तेथील अभ्यासक्रमाची माहिती युवकांना झाली.

* डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा हा महापरिनिर्वाण दिन असल्याने त्यांच्या तळेगाव मधील राहत्या घराला युवकांनी भेट दिली. तेथे बुद्ध वंदना व पद्य सादर केले.

**U-Lead शाखा उपक्रम –** युवकांचे, युवकांनी, युवकांसाठी चालवलेले केंद्र म्हणजे U-Lead शाखा. या शाखेत सर्व कार्यक्रम मार्गदर्शक उपक्रमांनुसार युवकांद्वारे घेतले जातात. U म्हणजे Youth आणि Lead म्हणजे Leader. या संकल्पनेतून युवा नेतृत्व केंद्र सुरू झाले. वर्धिनीच्या दैनंदिन शाखांतील युवांसाठी ५ ठिकाणी हा उपक्रम चालतो. या शाखेत झालेले उपक्रम –

| शाखा | उपक्रम | वक्ते |
|---|---|---|
| भाग १ | U-Lead शाखा का व कशासाठी ? | श्री. सुरेश पवार |
| | नियोजन भविष्याचे | श्री. शिरीष पटवर्धन |
| | प्रेरणासत्र | श्री.सिद्राम शासन |
| | | कु. अश्विनी शेंडगे |
| | तिहेरी तलाक व चालू घडामोडी | श्री. रोहित धायरकर |
| | | कु. पार्थ कश्यप |
| | अभ्यास नियोजन | श्री. सुरेश पवार |
| | वाचू आनंदे | श्री. अक्षय देशमुख |
| | संस्था भेट – ग्रीन सिग्नल | श्री. शुभम जगताप |
| | कृतीसत्र – इंग्रजी शब्द संपत्ती विकास | श्री. अक्षय देशमुख |
| | वादविवाद स्पर्धा | श्री. राज जाधव |
| | शिक्षणाचे माध्यम – इंग्रजी की मराठी ? | |
| भाग २ | विचारधारा – विद्यार्थी दशेतून | श्री. सुरेश पवार |
| भाग ३ | करिअर मार्गदर्शन | श्री. अजय कदम व श्री. मनोज शिंदे |
| भाग ४ | U-Lead शाखा का व कशासाठी ? | श्री. सुरेश पवार |
| | आरोग्य व आहार | श्रीमती नीलम पंडित |
| | वाचू आनंदे, लिहू आनंदे | श्री. अभिजित दोडके |
| | व्यावसायिक युवक एकत्रीकरण | |
| भाग ५ | भगिनी निवेदिता | श्री. मिलिंद सबनीस |
| | U-Lead शाखा का व कशासाठी ? | श्री. सुरेश पवार |
| | स्पोकन इंग्लीश | श्रीमती वर्षा सारडा |
| | संस्था भेट – चैतन्य महिला मंडळ | सौ. ज्योती पठानिया |
| केंद्रीय उपक्रम | जर्मन भाषा वर्ग | श्री. आनंद सामक |
| | एकनाथजी रानडे जीवनपट | चित्रपट दर्शन |
| | साउंड इंजिनियरिंग कार्यशाळा | श्री. स्वरूप जोशी |
| | निबंध स्पर्धा | विषय – 'स्व'–रूपवर्धिनीची प्रार्थना |
| | भारतीय संस्कृती परीक्षा | विवेकानंद केंद्र |

शाखेतील उपक्रमांसंबंधी युवकांचे मनोगत –

श्री. राज जाधव (रचनाप्रमुख, भाग १) – 'छोट्या छोट्या कृतीसत्रातून, व्याख्यानातून, युवकांचा व्यक्तिमत्त्व व सर्वांगीण विकास साधण्यास मदत झाली.'

श्री. ऋषिकेश नरसाळे (रचनाप्रमुख, भाग २) – 'अनौपचारिक गप्पा, चर्चा यांमधून युवकांना प्रत्येक गोष्टीत विचार करण्याची सवय लागली. त्यामुळे फेसबुक, व्हॉटसॲप यांमधून येणारे मुक्त संदेश, त्यांची सत्यता आणि

मोबाईलचा गैरवापर या गोष्टी प्रत्येकाने अनुभवल्या.'

श्री. अशोक इंगवले (विकासप्रमुख, भाग ३) – 'आपण खेळासाठी एकत्र येत नसून एकत्र येण्यासाठी खेळतो या विचाराने प्रत्येकजण शाखेत यायला लागला. वर्धिनीच्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांच्या व्याख्यानांमधून भावी काळातील व्यवसाय मार्गदर्शन (करिअर गाईडन्स) मिळाले.'

श्री. शुभम अलकुंटे (रचनाप्रमुख, भाग ४) – 'शाखेत कृती उपक्रमांसोबत अभ्यास नियोजन, अभ्यास यज्ञ यामुळे परीक्षांचा अभ्यास करणे खूप सोपे झाले. स्वतःचे आरोग्य सांभाळताना आहारविषयक चांगल्या सवयी किती महत्त्वाच्या आहेत हे व्याख्यानातून जाणवले.'

कु. निकीता शासम (विकासप्रमुख, भाग ५) – 'शाखेचे काम करताना युवतींनी स्वतःचा विकास साधण्यासाठी कसा व किती वेळ द्यावा यासाठी लागणारे कौशल्य कसे अवगत करावे याचे उत्तम मार्गदर्शन मिळाले.'

**नियुक्त कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर – २३ जून ते २६ जून २०१७**

संत सेवा संघाच्या शिरवळ येथील केंद्रात हे शिबिर आयोजित करण्यात आले. १२० युवक-युवती-कार्यकर्ते शिबिरात सहभागी झाले होते. शाखेत काम करताना लागणारे कौशल्य अवगत व्हावे या मुख्य हेतूने शिबिरात वेगवेगळी व्याख्याने व चर्चासत्रे, प्रेरणासत्रे झाली. सकाळच्या प्रबोधन सत्रातून संत सेवा संघाच्या कार्यकर्त्यांनी वेगवेगळ्या संतांची चरित्रे मांडली. तसेच शाखेत काम करताना वेगवेगळ्या व्यवस्थांचे नियोजन कसे करावे, त्याची मांडणी व कार्यवाही कशी करावी ? या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली.

| विषय | वक्ते | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| वर्धिनीचे काम मीच का करावे ? | श्री. शिरीष पटवर्धन | जीवनबोध | श्री. संजय गोडबोले गुरुजी |
| स्वतःला समजून घेताना | श्री. सुभाष देशपांडे | शाखा हेच उत्तर | श्री. निलेश धायरकर |
| कामावरील भक्ती, श्रद्धा, निष्ठा | श्री. संजय भोसले | श्रद्धेय किशाभाऊ | श्री. शिरीष पटवर्धन |
| कथा समर्पणाच्या-कथा प्रचारकांच्या | श्री. हर्षवर्धन खरे | | |

* **सहल –** युवक शाखेची सहल लोहगडला जुलै महिन्यात गेली होती. ही सहल केवळ मौजमजा व मस्ती यापुरती न राहता युवकांनी गडकिल्ल्यांच्या संवर्धनाची जबाबदारी कोणाची या विषयावर चर्चा करून पथनाट्ये स्वतः लिहून त्याचे सादरीकरण केले. गडावरही आलेल्या वेगवेगळ्या गटांसमोर या पथनाट्याचे सादरीकरण झाले. पथनाट्यामधून गडावरील स्वच्छता, गडावरील अनैतिक वर्तन, गडाच्या भिंती व तट काहीही लिहून विद्रूप करणे हे टाळावे, गडकिल्ल्यांचे संवर्धन करण्याला प्राधान्य द्यावे हे मुद्दे मांडले गेले. यामुळे अनेक अनोळखी लोक वर्धिनीच्या कामाशी जोडले गेले व सहलीचे वेगळेपण जपल्याचा आनंद वर्धकांना मिळाला.

**यशाने दुमदुमवू त्रिभूवने ।**

सनदी लेखापाल (Chartered Accountant) या केंद्रीय परीक्षेत 'स्व'-रूपवर्धिनीच्या तीन कार्यकर्त्यांनी यश प्राप्त केले आहे.

**१) सिद्राम शासम २) प्रसाद ढमाले ३) सुमित पाटील**

अत्यंत विपरित परिस्थितीत एकाग्रतेने अभ्यास करून प्राप्त केलेल्या या कष्टसाध्य यशाबद्दल

**कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन.**

**फिरती प्रयोगशाळा –**

'स्व'–रूपवर्धिनीने वैज्ञानिक दृष्टिकोन, तर्कसंगत कारणमीमांसा आणि विवेकपूर्ण विचारसरणी शालेय विद्यार्थी, युवक आणि समाजात रुजविणे हे आपले ध्येय आणि उद्दिष्ट मानले आहे. त्याला अनुसरून १९९६ साली 'स्व'–रूपवर्धिनीच्या फिरत्या प्रयोगशाळेचे काम सुरू झाले. ग्रामीण भागातील विज्ञान प्रयोगाच्या प्राथमिक सुविधांपासून वंचित असलेल्या शाळांमधील मुलांना डोळ्यासमोर ठेवून या कामाची आखणी झाली. जुलै २०१६ पासून डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी 'स्व'–रूपवर्धिनीच्या अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली. त्यामुळे फिरत्या प्रयोगशाळेच्या कामाचा संख्यात्मक, गुणात्मक आणि भावात्मक दृष्टिकोनाचा पुन्हा एकदा विचार सुरू झाला.

पाठ्यक्रमातील मूलभूत वैज्ञानिक संकल्पनांबरोबर मुलांना नजिकच्या काळात येणाऱ्या नव्या विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रांची माहिती देणे आवश्यक असल्याची जाणीव झाली. माहितीबरोबरच या नव्या क्षेत्रांचे कृतीप्रवण, प्रायोगिक शिक्षण, प्रयोगशाळेत समाविष्ट करण्यात आले.

प्रयोगशाळेबरोबरचा प्रत्येक दिवस हा विद्यार्थ्यांसाठी विज्ञान दिन व्हावा यासाठी तंत्रसाधनांचा योग्य वापर आणि साहित्य निर्मितीही करायला वर्धिनीने हळूहळू सुरुवात केली आहे. पुण्याच्या ग्रामीण भागातील ४० शाळांच्या जवळपास ८००० विद्यार्थ्यांपर्यंत 'स्व'–रूपवर्धिनीची प्रयोगशाळा पोहोचली आहे.

पुढील वर्षी सुसज्ज विज्ञान–तंत्रज्ञानयुक्त वाहनाची फिरत्या प्रयोगशाळेला जोड मिळणार आहे. प्रयोगशाळेच्या कामाचा आलेख उंचावण्यासाठी याचा निश्चित उपयोग होईल आणि विद्यमान अध्यक्षांनी दिलेल्या 'समाजाभिमुख विज्ञान' या संकल्पनेनुसार पुढील वर्षी प्रयोगशाळा काम करेल.

**संख्यात्मक आढावा**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| प्रयोगशाळेद्वारे जोडलेल्या ग्रामीण भागातील शाळा | | | | ४० | |
| एकूण विद्यार्थीसंख्या | | | | ८,००० | |
| एकूण शाळा भेटी | | | | २४१ (प्रत्येक शाळेत सहा ते सात वेळा) | |
| दरमहा सरासरी प्रवास | | | | ३,००० किमी. | |
| तालुका निहाय शाळा | | | | | |
| हवेली | मुळशी | खेड | भोर | सासवड | शिरवळ |
| ४ | ११ | ११ | ६ | ४ | ५ |

रोबोटिक्स ह्या मुख्य विषयाबरोबर 3D Printing & Digital Microscope या आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती शाळांमधील ८ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावी हा मुख्य उद्देश प्रयोगशाळा विभागाचा आहे.

श्री. विश्वास कुलकर्णी यांनी PPT च्या माध्यमातून मुलांना रोबोटिक्सविषयी विस्तृत माहिती सांगितली. त्यामध्ये मुलांना रोबोटिक्सचे वेगवेगळे व्हिडीओ दाखवण्यात आले. व्हिडीओ पाहिल्यानंतर मुलांमध्ये एक प्रकारचा आत्मविश्वास आला की आपण पण रोबोट बनवू शकतो. रोबोटिक्सचे संच प्रत्येक विद्यार्थ्याला दिले गेले. त्यावेळी मुलांनी F1 CAR, ROBOT CAT, FREE FALL, DUMPER अशा प्रकारचे वेगवेगळे रोबोट बनविले. मुलांनी काही प्रश्न विचारले. श्री. कुलकर्णी व श्री. रवी पाटील यांनी प्रश्नांची उत्तरे दिली व शंकांचे निरसन केले. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे विद्यार्थ्यांच्या मनात विज्ञानाविषयी आवड निर्माण झाली. रोबोटिक्स शिकताना मुलांना खूप आनंद झाला. नवीन काहीतरी शिकायला मिळणार म्हणून मुलांमध्ये खूप उत्साह होता.

Robotics या विषयाबरोबर श्री. सुहासराव काणे सर (निवृत्त संचालक, DRDO) यांनी त्यांचे अंटार्क्टिका मोहिमेत प्रत्यक्ष घेतलेले अनुभव PPT च्या माध्यमातून मुलांपुढे कथन केले.

अंटार्क्टिकामध्ये किती तापमानामध्ये रहावे लागते, तेथील वातावरण, भारताचे असलेले मैत्री स्टेशन, दक्षिण गंगोत्री, तेथील पेंग्वीन प्राणी या सर्वांविषयी त्यांनी माहिती सांगितली. मुलांचा प्रतिसाद खूप चांगला होता. ''आपण पण अंटार्क्टिकाला गेले पाहिजे, तिथे जाऊन आपल्या भारत देशासाठी काम केले पाहिजे, आपण पण असे संशोधन केले पाहिजे'' याची जाणीव मुलांना झाली.

तसेच सोमवार दि. ७ ऑगस्ट रोजी चंद्रग्रहण असल्यामुळे श्री. सुनील कुलकर्णी सरांनी चंद्रग्रहणावर खूप चांगल्या प्रकारे माहिती सांगितली. ''ग्रहणाच्या दिवशी काहीही करायचे नाही'' ही अंधश्रद्धा मुलांच्या मनामधून दूर केली. प्रत्येक शाळेमध्ये पद्मविभूषण डॉ. रघुनाथ अनंत माशेलकर सरांविषयी, त्यांच्या कार्याविषयी माहिती स्नेहल शेलार यांनी सांगितली. गरीब परिस्थिती असतानाही जिद्द असेल तर आपण पण माशेलकर सरांसारखे यशस्वी होऊ शकतो याची जाणीव मुलांना झाली.

इतर शाळांबरोबर शाखांमधील मुलांचेही रोबोटिक्सचे प्रशिक्षण चालू आहे. ''रोबोट म्हणजे काय ?Gear चा उपयोग काय असतो, मोटर म्हणजे काय, मशीनचे मॅनेजमेंट अशा प्रकारचे प्रश्न मुलांनी विचारले. हे सर्व करताना मुलांमध्ये उत्साह होता. प्रत्येक शाखांमध्ये व शाळांमध्ये महिन्यातून दोनदा रोबोटिक्स हा विषय घेतला जातो.

**शाखेतील मुलांच्या प्रतिक्रिया –**

* पहिल्यांदाच रोबोट म्हणजे काय ते समजले. * एक स्क्रू जरी चुकीचा लावला तरी सगळे काम परत करावे लागते.
* मन लावून काम केल्याने समाधान मिळाले. * शास्त्रज्ञ व्हायचंय, ही माझी इच्छा पूर्ण होईल असे वाटू लागले.
* गिअर वापरून वेग कसा कमी जास्त करतात ते समजले. * समन्वय व्यवस्थित असेल तरच मॉडेल काम करते.
* पहिल्यांदा चुका झाल्यानंतर जोडणीचे तंत्र समजले.

रोबोटिक्स घेताना शाळांमधील मुलांनी मुख्याध्यापकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे अतिशय चांगल्या प्रकारे दिली. यावरून सदरचे सत्र समजल्याचे जाणवते. यावेळी ते म्हणाले, 'विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची वेगळी माहिती देऊन विद्यार्थी जगतात वेगळे भावविश्व निर्माण करण्याचे कार्य 'स्व'–रूपवर्धिनीने केले.'

कु. सिद्धी घारे, कु. श्रद्धा काळजे या विद्यार्थ्यांनी प्रोग्रॅमिंग विषयी माहिती विचारली. तसेच विद्यार्थ्यांनी रोबोटिक्सचा इतिहास व शेतीमधील त्याचा उपयोग, रोबोटची भाषा असे कल्पक प्रश्न विचारले. रोबोटिक्स घेताना शाळांमधील मुलांनी व शिक्षकांनी दिलेल्या प्रतिक्रिया खालीलप्रमाणे –

- ❖ रोबोटिक्स कार असेम्ब्लीमुळे वस्तूंची जोडणी कशी करतात हे समजले.
- ❖ अंटार्क्टिका व रोबोटिक्सची माहिती मिळाली तसेच अगदी नवीन विषयाचा उलगडा विद्यार्थ्यांना झाला.
- ❖ रोबोट हालचाल कशी करतो, तो बोलू शकतो का ? त्याला भावना असतात का ? असे कुतुहलजनक प्रश्न मुलांनी विचारले.
- ❖ रोबोटमध्ये कोणते सेन्सर वापरले जातात याची माहिती मिळाली.
- ❖ जुन्या काळातील आणि आधुनिक काळात रोबोटमध्ये झालेले बदल विद्यार्थ्यांना समजले.

**प्रदर्शिका –** डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम, विक्रम साराभाई, टेसी थॉमस, एम. विश्वेश्वरय्या, सर आयझॅक न्यूटन, सलीम अली, जगदीशचंद्र बोस, विजय भटकर, निकोला टेस्ला, एस. चंद्रशेखर, हरगोविंद खोराना, मेरी

क्युरी, जयंत नारळीकर, थॉमस एडीसन, गॅलीलीओ, लुई पाश्चर, अल्बर्ट आईन्स्टाईन, मायकल फॅरडे, सी. व्ही. रमण, रामानुजन, मेघानंद सहा, राधाकृष्णन, बिरबल सहानी, होमी भाभा या निवडक शास्त्रज्ञांची माहिती (छायाचित्र, चरित्र, त्यांनी मिळवलेले सन्मान, पारितोषिके, संशोधन वैशिष्ट्य इत्यादी) संकलित करून त्याची प्रदर्शिका (display board) तयार करण्यात आली. सदर प्रदर्शिका फलकाच्या आधारे मुलांना कृतीद्वारे माहिती व्हावी या उद्देशाने वेगवेगळ्या १५ प्रश्नांची प्रश्नावली तयार करण्यात आली. पुस्तकाच्या साहाय्याने विद्यार्थ्यांनी प्रश्नावलीतील उत्तरे शोधली. प्रश्नपत्रिकेबरोबरच वरील फलकांच्या आधारे सहा वेगवेगळी शब्दकोडी बनवण्यात आली व ती शाखांमधील मुलांकडून सोडवून घेण्यात आली. हे सगळे काम शाखांमधील मुलांनी खूप उत्साहाने पूर्ण केले.

**प्रतिक्रिया शिक्षक व विद्यार्थ्यांच्या –**

* अमृतेश्वर माध्यमिक विद्यालय, कोंढूर – मुलांच्या निरीक्षणशक्तीला वाव मिळवून मुलांचा बौद्धिक विकास होईल तसेच कृतीयुक्त शिक्षण प्रक्रियेद्वारे मुलांना शिकता येईल याची खात्री झाली.

– (शिक्षक)

* विजय मुकुंद आठवले माध्यमिक विद्यालय, माळेगाव नसरापूर, ता. भोर – या उपक्रमांतर्गत वैज्ञानिक परिचय प्रदर्शिकेमुळे विद्यार्थ्यांना थॉमस एडिसनच्या बरोबरीनेच विद्युत क्षेत्रात भरीव कामगिरी केलेल्या परंतु दुर्लक्षित असलेल्या निकोला टेस्ला यांच्या संबंधित माहिती मिळाली. तसेच अंतराळ क्षेत्रात विशेष कामगिरी करणारे डॉ. विक्रम साराभाई यांच्याबद्दलही अधिक माहिती मिळाली.

– (श्री. राहुल द. शेटे)

* श्रीमती लक्ष्मीबाई विठ्ठलराव दुराफे माध्यमिक विद्यालय, आळंदी – डॉ. अब्दुल कलामांचे चरित्र गोष्टीरूपातून ऐकल्यावर त्यांची इतरही पुस्तके वाचायची ठरविले आहे.

– (विद्यार्थिनी कु. रीता)

* सेनापती बापट माध्यमिक विद्यालय, माले – अंटार्क्टिका मोहिमेचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेल्या श्री. सुहास काणे सरांच्या मार्गदर्शनाखाली दाखवलेल्या चित्रफितीतून मुलांना पूर्ण अंटार्क्टिका खंडाची भौगोलिक माहिती मिळाली.

– शिक्षक

* शिंदेवाडी माध्यमिक विद्यालय, शिंदेवाडी – या उपक्रमामुळे विज्ञानाची गोडी लागली. शारीरिक अवस्थांची माहिती मिळाली.

– (विद्यार्थिनी मानसी लक्ष्मण कांबळे)

* श्री वाघेश्वर विद्यालय, चऱ्होली – सी. व्ही. रामन, जगदीशचंद्र बोस, गॅलिलिओ या शास्त्रज्ञांची माहिती प्रदर्शिकेतून मिळाली. त्यांनी लावलेले शोध कळाले. – विद्यार्थी

– या उपक्रमातील वर्धिनीच्या शिक्षकांचे उत्तम मार्गदर्शन मिळाले. मुलांचा उत्साह वाढला आहे.

– सौ. पोळ, शिक्षिका

* सिंहगड विद्यालय, सांगरुण – प्रत्यक्ष कृतीने मुलांनी रोबोटिक्स स्वींग, रोबो मांजर या गोष्टी बनवल्या. हे कृतीसत्र कायम स्मरणात राहील.

– (शिक्षक)

## बालवाडी संक्रांत उत्सव

२१ जानेवारीला पाकोळी बालवाडीचा संक्रांत उत्सव वर्धिनीच्या उपासना मंदिरात उत्साहात साजरा झाला. 'सण' या विषयाला अनुसरून मुलांनी वेगवेगळ्या गाण्यांवर नृत्यं सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. मोनालीताई यंदे यांनी केले.

कार्यक्रमाची सुरुवात मोठ्या गटाच्या गुरुवंदनेने झाली. यानंतर छोट्या गटाने 'ग गणपतीचा' 'फ फणसाचा' ही गाणी, मधल्या गटाने दिवाळी, गोकुळअष्टमी व नवरात्र यावरची गाणी व मोठ्या गटाने नागपंचमी व आषाढीची पालखी ही गाणी सादर केली. बालशाखेच्या बालचमूंनी 'हनुमान जयंती' या सणासाठी हनुमानाचे गाणे सादर करताना छोटे छोटे मनोरे उभे केले. सर्वांनी मुलांचे टाळ्यांच्या गजरात कौतुक केले.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या सौ. साधनाताई सेठिया यांनी पालकांशी मुक्तपणे संवाद केला. त्या म्हणाल्या, 'टीव्ही व मोबाईल यांचे व्यसन लागू नये म्हणून पालकांनी मुलांशी बोलले पाहिजे. मुलांना पडणाऱ्या प्रश्नांना न कंटाळता त्यांना उत्तरे द्यायला हवीत. प्रत्येक मूल वेगळे असते. त्याला सुसंस्कारित व सुजाण नागरिक बनवण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे.'

पाहुण्यांच्या हस्ते मुलांना चित्रकलेच्या स्पर्धेची व शिक्षिकांना उत्तम प्रकल्पांबद्दलची बक्षीसे देण्यात आली. प्रथमच शाळेचे कार्यवृत्त दृकश्राव्य (PPT) माध्यमातून सादर झाले. पालकही आपली मुले पडद्यावर दिसत आहेत हे बघून सुखावली. दरवर्षी संक्रांत उत्सवाच्या कार्यक्रमात पालक उत्साहाने सहभागी होतात. **यावर्षी विशेष म्हणजे बाहेरून आणून वेशभूषेसाठी खर्च न करण्याची कल्पना पालकांच्या सहकार्याने प्रत्यक्षात उतरली. आपल्या जवळील अथवा वर्गातील मुलांच्या पालकांनी एकमेकांना वेशभूषेकरिता कपड्यांची मदत करून हा खर्चाचा भार सगळ्यांनीच हलका केला. याबद्दल सर्व पालकांचे मनापासून कौतुक.** कार्यक्रमास मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी सर्व पालक, वर्धिनीचे कार्यकर्ते, बालवाडीच्या माजी शिक्षिका, स्काऊट ग्राऊंड शाळेच्या शिक्षिका उपस्थित होत्या.

बालवाडीत सर्व सण उत्साहाने, कल्पकतेने साजरे होतात. त्यात मुलांचा जास्त सहभाग असतो.

* **प्रजासत्ताक दिन** – २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनाचे ध्वजारोहण निवृत्त कार्यकारी अभियंता श्री. अवचट यांच्या हस्ते वर्धिनीच्या गच्चीत झाले. बालवाडीतील मोठ्या गटातील मुले क्रांतिकारक, नेत्यांची वेशभूषा करून आली होती. त्यांनी व रुग्ण सहाय्यक वर्गाच्या विद्यार्थिनींनी देशभक्तीपर गीत सादर केले. श्री. अवचट सर मार्गदर्शन करताना म्हणाले, 'लहानपणी झालेला शिस्तीचा संस्कार मोठेपणी काम करताना जास्त उपयोगी पडतो. कोणतेही काम वेळेत व नियोजनपूर्वक करायची सवय असेल तर ते उत्तमच होते व त्याचे कौतुक होते. आपल्या कामाचा समाजाला निश्चित उपयोग होतो.'

* दि. २ फेब्रुवारीला छोट्या गटातील मुलांचे **बोरनहाण** झाले. मोठ्या व मधल्या गटातील मुलांनी या मुलांसाठी हलव्याचे सुंदर मुकुट बनवले होते. मुलेही छान नटून आली होती. चुरमुऱ्यांबरोबर बिस्किटे, गोळ्या, बोरे, उसाचे करवे गोळा करण्यात मुले दंग झाली होती.

* **शिवजयंती**ला कु. हर्षल शिंदे याने जोशपूर्ण आवाजात पोवाडा सादर केला.

* **विज्ञान दिन –** बालवाडीत प्रथमच २८ फेब्रुवारीला **विज्ञान दिन** साजरा झाला. या कार्यक्रमास फिरती प्रयोगशाळा विभागाचे प्रमुख श्री. सुनील कुलकर्णी सर व श्री. शिरीष पटवर्धन सर उपस्थित होते. छोट्या गटातील मुलांनी 'विज्ञान गीत' सादर केले. मुलांना सरांनी रुमालाचा उंदीर करून दाखवला तेव्हा त्यांना खूपच गंमत वाटली. मधल्या गटातील मुलांना कुलकर्णी सरांनी कागदाच्या टोप्या करून दाखवल्या. मोठ्या गटातील मुलांनी आत्मविश्वासाने खालील प्रयोग करून दाखवले.

१) ज्वलनास हवेची गरज असते.
२) पारदर्शक व अपारदर्शक वस्तू
३) जलचक्र
४) लोहचुंबकाला चिकटणाऱ्या व न चिकटणाऱ्या वस्तू.

सर्व मुलांचे सरांनी कौतुक केले आणि नंतर बाटलीत कारंजे करणे, भोवरा करणे, काडेपेटीशिवाय निरांजन लावणे हे प्रयोग करून दाखवले. जेवणापूर्वी हात धुवावेत कारण आपल्या हातात जंतू चिकटलेले असतात ते आपल्याला दिसत नाहीत. **पण हे न दिसणारे जंतू सरांनी गोष्ट सांगून एका बाटलीत जमा करून त्यांना दाखवले. हे बघून मुलांचा स्वच्छतेचा पाठ पक्का झाला.**

*** आईस्क्रीम व डोसा मेजवानी –**

दि. २१ मार्चला भावे प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. उज्ज्वलाताई गायकवाड यांनी पालकांना 'मातृभाषेतून शिक्षणाचे महत्त्व' सांगितले. त्यानंतर मुलांबरोबर पालकांनी पण आईस्क्रीमचा स्वाद घेतला. दरवर्षी **गुजर कोल्ड्रींक हाऊस**चे श्री. गुजर मुलांसाठी ही मेजवानी आयोजित करतात.

दि. ३० मार्चला सर्व गटातील मार्च, एप्रिल व मे महिन्यातील मुलांचे वाढदिवस वर्धिनीच्या उपासना सभागृहात साजरे झाले. सर्व मुलांना औक्षण करून बक्षिसे दिली. 'मी आता मोठा झालो आहे. मोठ्या शाळेत जाऊन खूप अभ्यास करीन' असा संकल्प मोठ्या गटातील मुलांनी न घाबरता सांगितला. यानंतर डोसा मेजवानीचा आनंद सगळ्यांनी घेतला. या कार्यक्रमास काही पालकांनी आर्थिक सहकार्य केले.

**शुभेच्छा समारंभ –** १२ एप्रिलला सर्व गटातील मुलांना प्रगतीपुस्तके दिली. मोठ्या गटातील मुलांचा शुभेच्छा समारंभ त्याच दिवशी झाला. पालकांनी आपल्या मनोगतातून त्यांच्या मुलांमध्ये झालेला बदल सांगितला.

सौ. करुणा वेळेकर – 'मी स्वतः लहानपणी खूप बुजरी होते. पण आमची काव्यांजली मात्र तशी नाही. शाळेत आल्यामुळे ती खूपच धीट झाली आहे. वर्गातही पुढे होऊन बोलते, गोष्ट सांगते.'

सौ. लक्ष्मी मांढरे – 'बालवाडीतील उपक्रमांमुळे मुलांचा आत्मविश्वास वाढला आहे. बालमेळाव्यामुळे मुलांना वेगवेगळ्या गोष्टींतून काय व कसे सांगायला हवे हे आम्हाला समजले.'

सौ. कविता अहिरगवळी – 'या वर्षापासून सुरू केलेल्या कथ्थक वर्गामुळे आधीच नाचरी असलेली पूर्वी आता व्यवस्थित नाच करते. घरी एकत्र कुटुंब असल्याने मला आवडणाऱ्या गोष्टी करता आल्या नाहीत पण मी मात्र माझ्या मुलीला तिला रस असलेल्या गोष्टी करू देईन व तिला स्वतःच्या पायावर उभे करीन.'

**निवासी शिबिर –** मोठ्या गटातील मुलांचे दोन दिवसांचे निवासी शिबिर १२ व १३ एप्रिल रोजी 'स्व'-रूपवर्धिनीत झाले. शिबिराचे उद्घाटन श्री. शिरीष पटवर्धन सरांनी केले. सरस्वती पूजनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. शिबिराचा हेतू मुलांना स्वच्छता व स्वावलंबन शिकवणे हा होता. सरांनी मुलांना स्वच्छतेची संस्कार कथा सांगितली. गोष्टीतल्या गणेशला चिऊताई स्वच्छतेचा धडा शिकवते. मुलांचे ४ गट करून त्यांना अश्विनी,

भरणी, कृत्तिका, रोहिणी ही नक्षत्रांची नावे दिली. परिपाठातील प्रार्थनेनंतर कलेच्या सत्रात कागदी ग्लासवर जादुई पेंटींग करताना मुले तल्लीन झाली होती. संध्याकाळी ५ ते ७.३० पर्यंत मुले शाहू बागेत रमली. प्रत्येकजण आवडीच्या खेळण्यावर खेळत होता. ७ नंतर गवतावर बसून सायंप्रार्थना झाली. एक जण म्हणाली, ''ताई, अगदी शेतात बसल्यासारखं वाटतंय.'' रात्रीच्या जेवणानंतर मोठ्या सतरंजीवर आपले अंथरुण मुलांनी घातले. रामरक्षा, भीमरुपी, स्वामींचा जप झाल्यावर मुले गाढ झोपी गेली.

दुसऱ्या दिवशी ताईंच्या एका हाकेत मुले उठली. दात घासून स्वच्छ होऊन व्यायामासाठी तयार झाली. व्यायाम, खेळ, प्रार्थना झाल्यावर दूध पिऊन मुले चित्र रंगवण्यासाठी वर्गात आली. माडगावकर सभागृहात गप्पागोष्टींचा कार्यक्रम खूप रंगला. पुष्पाताईंनी मुलांना शूर किशोरची गोष्ट सांगितली. त्यानंतर उपासना मंदिरात बादलीत बॉल टाकणे, डोक्यावर वही ठेवून चालणे अशा खेळांच्या स्पर्धा झाल्या. काही उभे व बैठे गटशः खेळ झाले. त्यानंतर मुलांनी ताईंच्या मदतीने कागदी फुले बनवली. वर्धिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. संदीप मोरे यांनी शिबिराचा समारोप केला. सरांनी पालकांना बालशाखेचे महत्त्व सांगितले. झालेल्या स्पर्धांची बक्षिसे सरांनी मुलांना दिली. घरी जाताना मुलांनी केलेल्या सर्व वस्तू त्यांना दिल्या. स्वतःची बॅग स्वतः नीट भरणे, वर्ग स्वच्छ करणे, स्वतःचे ताट स्वतः धुणे ही कामे मुलांनीच केल्याने स्वावलंबन आणि स्वच्छता हा शिबिराचा हेतू साध्य झाला.

**बालवाडी शिक्षिका प्रेरणा शिबिर**

१ जून ते १० जून २०१७ या कालावधीत नवीन आलेल्या शिक्षिकांबरोबरच जुन्या शिक्षिकांना मार्गदर्शन मिळावे यासाठी प्रेरणा शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात बऱ्याच अनुभवी व तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन सर्वांना मिळाले. शिबिराचे उद्‌घाटन श्री. प्रशांत एडवी सर यांचे हस्ते झाले. त्यांच्या मार्गदर्शनाचा विषय 'बचत कशी करावी' हा होता. बचत म्हणजे पैशाचीच असते असा सर्वांचा समज असतो. पण त्यांनी वेळेची, विचारांची बचत कशी करावी हा विषय छोटे छोटे दाखले देऊन खूप छान पद्धतीने समजावून सांगितला. तसेच 'आयुष्यातील स्वप्नांचा आराखडा आधीपासूनच तयार पाहिजे म्हणजे योग्य वयाच्या योग्य टप्प्यावर ती ती आवश्यक कामे करणे सुलभ होते.' हे त्यांनी आलेखाच्या मदतीने चांगल्या प्रकारे समजावून सांगितले.

दुपारच्या सत्रात सौ. अर्चना दोडे यांनी क्राफ्टच्या माध्यमातून वर्गसजावट करताना टाकाऊपासून टिकाऊ वस्तू कशा तयार कराव्या हे खूप छान तऱ्हेने दाखवले.

**दुसरा दिवस** – शिबिराचे पहिले सत्र श्री. सुनील कुलकर्णी सर यांच्या विज्ञानाच्या छोट्या पण गमतीदार प्रयोगांनी सुरू झाले. 'मुलांची क्षमता ओळखून तसेच प्रासंगिक घटनांमधून प्रयोग शिकवणे. घरात असलेल्या साध्या साध्या वस्तूंचा उपयोग करून साधे सोपे प्रयोग करून त्यातील गंमत कशा प्रकारे मुलांना दाखवता येईल हे सांगितले. दुपारच्या सत्रात सौ. मेघाताई नगरे यांनी बालमन कसे जोपासावे यावर सुंदर मार्गदर्शन केले. 'जीन पियाजीस थेअरी' या पद्धतीचा अवलंब करून मुलांचे मन जाणून त्यांना मार्गदर्शन करा असा सुंदर विचार त्यांनी आम्हाला दिला.

**तिसरा दिवस** – <u>प्रथम सत्र</u> – श्रीमती कुंदाताई वर्तक यांनी 'बालमनाचा तसेच वर्तनाचा अभ्यास म्हणजेच मानसशास्त्र हे समजावून सांगताना सर्वांगीण विकासाचे वेगवेगळे टप्पे व त्यासाठी घ्यावी लागणारी काळजी' हे सर्व छान पद्धतीने समजावून सांगितले. शिक्षिकांनी विकासाचा 'चार्ट' तयार करावा असेही सुचविले.

<u>द्वितीय सत्र</u> – सौ. सोनलताई जुवेकर यांनी मुलांशी जवळीक वाढवताना काय करावे, वेगवेगळ्या प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून मुलांच्या पंचज्ञानेंद्रियांचा विकास कसा करावा याचे प्रात्यक्षिक करून दाखवले.

**चौथा दिवस –** प्रथम सत्र – सौ. लताताई पुरंदरे यांनी पंचकोष विकसनाच्या आधारे व्यक्तिमत्त्व विकासाचे तंत्र समजावून सांगितले. द्वितीय सत्र – श्रीमती स्वातीताई कारेकर यांच्या जीवन–व्यवहाराच्या सत्रात मुलांना दुसऱ्या दिवशी काय शिकवणार आहात त्याची आदल्या दिवशी कल्पना द्या. वातावरण निर्मिती, पूर्वतयारी, क्रमवारी ठरवणे अशा पद्धतीने जीवनव्यवहाराचा पाठ घ्यावा असे सांगितले.

**पाचवा दिवस –** प्रथम सत्र – पाचव्या दिवशीच्या प्रथम सत्रात श्रीमती पुष्पाताई नडे यांनी शालेय व्यवस्थापन या विषयीचे मार्गदर्शन करताना अगदी नित्य व्यवहारातील उदाहरणे देऊन मुलांच्या मानसिकतेशी शिक्षिकांनी कसे जुळवून घेतले पाहिजे याचे अतिशय उपयुक्त चर्चासत्र घेतले.

द्वितीय सत्र – दुपारच्या सत्रात सौ. संध्याताईंनी मुलांना गोष्ट सांगण्यासाठी व मुले त्यात चांगल्या प्रकारे रमावीत व त्यांच्या लक्षात गोष्ट रहावी यासाठी पपेट शोचा कसा उपयोग करावा हे छान प्रात्यक्षिक करून दाखवले. चालणारं बोटाचं (फिंगर) पपेट, दोरीचे पपेट, हाताचे पपेट, स्टीक पपेट, फोम शीटचे पपेट असे बरेच प्रकार ताईंनी सांगितले, दाखवले व शिकवलेही.

शिबिराच्या सहाव्या दिवशी नियोजन बैठकीचे आयोजन होते. या दिवशी शालेय वार्षिक व्यवस्थापन, वर्गवाटप, शिक्षिका नियोजन तसेच सहल, पूरक आहार, सण व उत्सव, पालकसभा, वाढदिवस अशा सर्व कार्यक्रमांचे शिस्तबद्ध नियोजन केले गेले.

**दि. १२ जून २०१७ ला पुण्यातील बालवाडीचा पहिला दिवस** सर्व शिक्षिकांचा आनंद ओसंडून वहात होता. शाळा छान नटली होती. मुलांचे आगमन झाले तसे चित्रे, फुलांच्या माळा, पताका बघून मुले आनंदाने इकडून तिकडे बागडू लागली. बालवाडीतील मुलांची संख्या २२५ आहे.

**दि. १५ जून २०१७ ला हडपसरमधील हरपळे वस्ती, भेकराईनगर येथे नवीन बालवाडी सुरू झाली.** या भागात अंगणवाडी, बालवाडी नसल्याने तेथील रहिवाशांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. यासाठी बालवाडीच्या शिक्षिका सौ. मनीषाताई धेंडे यांनी घरोघरी संपर्क करून वर्धिनीची व बालवाडीची माहिती सांगितली. आत्तापर्यंत ५० मुलांनी शाळेत प्रवेश घेतला आहे. ताईंच्या संपर्कातून श्री. सुनील हरपळे यांचे घर बालवाडीसाठी भाड्याने घेतले.

उद्घाटनाच्या दिवशी सजवलेली शाळा, वर्गात मांडलेली खेळणी बघून मुले व पालक आनंदित झाली. वर्धिनीचे कार्यवाह श्री. ज्ञानेश पुरंदरे, बालविभाग प्रमुख पुष्पाताई नडे, बालवाडी मुख्याध्यापिका सौ. संगिता शेडगे कार्यक्रमाला उपस्थित होते. **श्री. सुनील हरपळे यांच्या हस्ते नवीन बालवाडीचे उद्घाटन झाले.**

आषाढ, श्रावण महिना म्हणजे सणांची रेलचेल. हे सर्व सण बालवाडीत साजरे होतात.

* ४ जुलैला आषाढी एकादशीच्या दिवशी 'स्व'–रूपवर्धिनीतून कण्वाश्रमापर्यंत **पालखी** निघाली. मोठ्या गटाचे पालक श्री. संजय कांबळे व सौ. अश्विनी कांबळे यांच्या हस्ते पालखीचे पूजन करून 'ज्ञानोबा माऊली तुकाराम' 'विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल' म्हणत पालखी मार्गस्थ झाली. मोठ्या गटातील मुलांनी संतांचा, वारकऱ्यांचा पेहराव केला होता. छोट्या रुक्मिणी विठ्ठलाचे चौकाचौकात स्वागत होत होते. बालशाखेच्या मुलांनी रिंगणात फुगडी, फेर धरून खेळ खेळले. बालशाखेच्या वर्धकांनी 'स्वच्छता' या विषयावर देवळात कीर्तन सादर केले. त्यातून त्यांनी स्वच्छतेच्या सवयी व परिसराची स्वच्छता यांची आवश्यकता सांगितली.

*** नारळीपौर्णिमेला** मोठ्या गटाचे कोळी नृत्य – 'एकवीरा आई' बसविले होते व मुलांनी न चुकता प्रत्येक

पदन्यास लक्षात ठेवून छान नृत्य सादर केले तर मधल्या गटातील मुलांनी ''नवी नवी छान मी साडी नेसणार'' हे गीत सादर केले व बालचमूंनी ताईकडून राखी बांधून घेतली.

श्रावण महिन्यातील प्रत्येक शुक्रवारी वर्गात पूजा मांडून ताईंनी व मुलांनी श्रावणी शुक्रवार साजरा केला.

* दि. १४ ऑगस्टला **दहीहंडी** साजरी करण्यात आली. मुले राधा–कृष्ण यांच्या वेशभूषेत छान तयार होऊन आले होते. प्रभात फेरी काढण्यात आली होती. ''राधेकृष्ण–गोपालकृष्ण,'' ''हाथी घोडा पालखी, जय कन्हैय्यालाल की'' अशा घोषणांनी सर्व परिसर दुमदुमुन गेला. त्याच जल्लोषात मुलांनी दहीहंडी फोडली व दहीकाल्याचा प्रसाद आवडीने खाल्ला. भेकराईनगरमधील बालवाडीत ताईंनी कृष्णजन्माची व दहीहंडीची गोष्ट चित्रवर्णनातून सांगितली. श्रावणी सोमवारी मोठ्या गटातील मुले महादेवाच्या मंदिरात गेली होती.

* १५ ऑगस्टच्या **स्वातंत्र्यदिनी** मोठ्या व मधल्या गटातील मुले आपापल्या पालकांसोबत उपस्थित होते. श्रीमती वसुधाताई भंडारी यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. ८ वाजता झेंडावंदन झाल्यानंतर, मोठ्या गटाने 'प्रियतम आमुची भारतमाता' हे गीत साभिनय सादर केले. मधल्या गटातील मुले स्वातंत्र्यवीर व वीरांगना यांच्या वेशभूषा करून आले होते. नंतर सर्व मुलांना खाऊ वाटप करण्यात आले. भेकराईनगरला पालकही झेंडावंदनाला उपस्थित होते. येथील मोठ्या गटातील मुलांनी 'प्रियतम आमुची भारतमाता' हे गीत सादर केले.

*** गणपती उत्सव –** मोठ्या गटातील मुले वेगवेगळ्या मंडळांमध्ये जाऊन अथर्वशीर्ष म्हणू लागली. पुढील मंडळांमध्ये मुलांनी अथर्वशीर्ष पठण सादर केले, दत्त मित्रमंडळ, सूर्योदय मित्रमंडळ, तरवडे मित्रमंडळ, गोसावीपुरा मित्रमंडळ. काही ठिकाणी मधल्या गटातील मुलेही गेली होती. गणपतीसोबत मुलांनी बालवाडी पालक श्री. देशमुख यांच्या घरी जाऊन गौरीचेही दर्शन घेतले. भेकराईनगरमध्ये बालवाडीच्या वर्गातील श्रुती व गणेश यांच्या घरी गौरी गणपतीच्या दर्शनाला मुलांना नेले. गणपतीसमोर ठेवलेल्या पदार्थांची नावे मुलांनी सांगितली. **छोट्या गटातील श्रेयस एक दिवस संध्याकाळीच झोपला पण जाग आल्यावर घरातील गणपतीसमोर शुभंकरोती म्हणण्यास चुकला नाही.**

*** नवरात्र –** नवरात्रात घरोघरी घटाची स्थापना करण्यात येते. याची माहिती मुलांना उपक्रमातून देण्यात आली. मुलांकडून परडीत माती घालून धान्य पेरण्यात आले व त्याविषयी माहिती देण्यात आली. सर्व गटांचा एकत्रित भोंडला झाला. अष्टमीच्या दिवशी १०८ मुलींचे सिद्धेश्वर मंदिरात कुमारिका पूजन करण्यात आले. या उपक्रमात पाकोळी बालवाडीच्या छोट्या कुमारिका सहभागी झाल्या होत्या. दसऱ्यानिमित्त वर्गावर्गात पाटीवर व फळ्यावर सरस्वतीचे चित्र काढून पूजा करण्यात आली. वह्या व पुस्तके, इतर शैक्षणिक साहित्याची पूजा करण्यात आली.

* दि. २ ऑक्टोबरला **'गांधी जयंती'** स्वच्छता अभियानाने साजरी झाली. तीनही गटांच्या मुलांनी आपले वर्ग उत्साहाने स्वच्छ केले. वर्गात रोजच स्वच्छतेच्या सवयी सांगितल्या जातात. त्याचा उपयोग त्यांच्या दैनंदिन जीवनात जाणवत आहे. घरी गेल्यावरही हातपाय धुतल्याशिवाय खायचे नाही या गोष्टींची सवय मुलांना लागली आहे.

*** दिवाळी –** दि. ९ ऑक्टोबरला भेकराईनगरच्या बालवाडीत तर दि. १३ ऑक्टोबरला वर्धिनीतल्या बालवाडीत दिवाळी साजरी झाली. सर्व वर्गांच्या बाहेर रांगोळी, पणत्या, आकाशकंदील लावले होते. बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्गाच्या ताईंनी मुलांकडून मातीचा किल्ला करून घेतला. त्यावर मुलांनी चित्रे मांडून किल्ला छान सजवला. अंगणात दिवाळीतल्या वस्तूंच्या सामानाचे एक छोटे दुकान मांडले होते. मुले उत्सुकतेने खरेदीत सहभागी झाली.



**जगीं 'बुद्धि राष्ट्रीय' गेली लयाला । न संख्या, न शास्त्रेंहि येती फळाला।।
न शस्त्रें तिच्याविण येतील कामा । तिच्याविण संभार सारा रिकामा ।।**

‘‘मी फटाके उडवून प्रदूषण करणार नाही’’ अशी शपथ सर्व मुलांनी घेतली. दिवाळी फराळाचा आनंद व छानसे शुभेच्छापत्र घेऊन मुले घरी गेली.
दिवाळीच्या सुट्टीनंतर शाळेत ‘मर्सिडीज बेंझ’कंपनीकडून देणगी स्वरुपात मिळालेले स्वेटर सर्व मुलांना दिले. सर्वजण अचानक मिळालेल्या या भेटीमुळे खूप खूष होते. सगळ्यांचा एकच रंग असल्याने मुलेही गणवेश समजून रोज घालून येतात.

*** सहल –** डिसेंबर महिना म्हणजे सहलीचा महिना. घरातल्या भावंडांची सहल आहे कळल्यावर ‘आपली सहल कुठे जाणार ?’ वर्गात मुले बाईंना विचारायला लागली. संपूर्ण बालवाडीची सहल दि. ८ डिसेंबरला वडगाव शेरीमधील छत्रपती शिवराय उद्यानात गेली होती. फुलांनी आणि फुग्यांनी सजवलेली गाडी बघताच मुले आनंदून गेली. ‘गणपती बाप्पा मोरया’च्या गजरात गाडी सुरू झाली. सहलीचे गाणे, देवांची भजने म्हणत, रस्त्यावरील गाड्यांची गर्दी, पळणारी झाडे बघत, बाग कधी आली हे कळलेच नाही. बागेत स्वागताला ‘छोटी आगगाडी’ दारातच उभी होती. आगगाडीमध्ये मोठ्या आवाजात बालगीते लावली होती. टाळ्या वाजवत मुलांची बागेला एक फेरी पूर्ण झाली. बारीक रेतीमध्ये मुलांनी छोटी छोटी घरे बांधली, बोगदे केले. घसरगुंड्या, झोके यात मुले छान रमली. मनसोक्त खेळून झाल्यावर मुलांनी ‘संगीत कारंजी’ बघितली. गाण्याच्या तालावर नाचणारी कारंजी बघून मुले टाळ्या वाजवत नाचत होती. अंगावर येणारे पाणी त्यांना पाण्यात खेळण्यासाठी बोलवत होते, ‘ताई चला ना पाण्यात भिजायला’. यानंतर मुले हात पाय धुऊन जेवायला बसली. काहीजण जेवणानंतर हिरवळीवर लोळली तर काही परत खेळण्यांकडे धावली. ‘आता घरी जायचे म्हणून गाडीत बसा’ असे सांगितल्यावर तर ‘संध्याकाळपर्यंत इथेच थांबू या’असा मुलांनी आग्रह धरला. शेवटी त्यांची समजूत घालून त्यांना गाडीत बसवले आणि परतीचा प्रवास सुरू झाला.

**पालकसभा –** मुलांच्या शिक्षणाबरोबर पालकांनाही पालकसभांमध्ये वेगवेगळ्या विषयातून विशेष मार्गदर्शन केले जाते. सौ. संगीताताई, सौ. मोनालीताई, सौ. अक्षताताई यांनी पालकांशी संवाद साधला. त्यात ‘ब्लू व्हेल’ या खेळाविषयी चर्चा करण्यात आली. मुलांना भ्रमणध्वनीची माहिती द्यावी पण त्याचा दुरुपयोग व अतिरेक टाळण्यासाठी त्यांना पूर्ण समज येईपर्यंत त्यापासून दूर ठेवावे. सौ. मेधाताई नगरे यांनी ‘पालकत्व’ या विषयावर व्याख्यान दिले. पालकांचा एक खेळ घेऊन पालकसभेला उत्साहात सुरुवात झाली. पालकत्वाची जबाबदारी पार पाडत असताना मुलांवर ओरडू नये, त्यांना सतत हे करू नका, ते करू नका असे सांगू नये. मुलांना स्वतःची कामे स्वतः करावीत यासाठी त्यांना प्रोत्साहन द्या, मुलांना सतत उपदेश न करता मुलांमध्ये मूल होऊन खेळा, त्यांना आनंदी ठेवण्याचा प्रयत्न करा. एकमेकांना मदत करण्याची भावना मुलांमध्ये वाढीस यावी यासाठी काळजी घ्या तसेच मुलांमध्ये ईर्षा उत्पन्न होऊ न देता दुसऱ्याचे यश व आनंद यामध्ये सहभागी होण्याची मुलांना सवय लावा. असा छान सल्ला मेधाताईंनी पालकांना दिला.

**अभिनंदन–** महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेचे राज्यस्तरीय २४ वे अधिवेशन दि. २७ ऑक्टोबर ते २९ ऑक्टोबर या काळात पुण्यात नवी सांगवी येथे झाले. ‘‘बालशिक्षणाचे तंत्र आणि तंत्रज्ञान’’ या मुख्य विषयाभोवती तीन दिवस चर्चासत्रे झाली. या अधिवेशनात **बालवाडी शिक्षिका सौ. नेहा जमदग्नी यांच्या ‘‘मॉंटेसरी आणि ताराबाई मोडक’’ या शोधनिबंधाची निवड झाली व त्याचे वाचन करायची संधी त्यांना मिळाली.** त्याबद्दल सहा पुस्तकांचा संच बक्षीस मिळाला.

**जलावीण वापी असो खोल, मोठी । तशी एक धान्याविना भव्य कोठी ।।**
**तिला कोण ढुंकोनि पाहील वाया । तशी तुच्छ बुद्धीविना राष्ट्र–काया ।।**

**रुग्ण सहाय्यक वर्ग –**

**निवासी शिबिर –** दि. ६ व ७ जानेवारीला दोन दिवसांचे निवासी शिबिर झाले. शिबिरात दौंड व सांगली येथील विद्यार्थिनीही सहभागी झाल्या होत्या.

**कार्यक्रम पत्रिका**

| विषय | वक्ते | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| उद्घाटन –अवयवदान | डॉ. पाटील | वेळेचे व्यवस्थापन | श्री. प्रशांत एडवी |
| सरोगेट मदर | डॉ. नंदा भावसार | 'स्व'ची ओळख | सौ. मेघा नगरे |
| चैतन्य महिला मंडळाचे कार्य | सौ. ज्योती पठानिया | मी सुरक्षित आहे का ? | सौ. रंजनाताई करंदीकर |
| सहजीवनाच्या उंबरठ्यावर | सौ. साधना सेठीया | अंटार्टिका दृकश्राव्य दर्शन | श्री. सुहासराव काणे |
| अंधश्रद्धा निर्मूलन | श्री. दिलीप सरोदे | समारोप – सामाजिक समरसता | सौ. सीमा कांबळे |

उद्घाटनाच्या सत्रात ससून रुग्णालयातील डॉ. अंजली पाटील यांनी शरीरशास्त्रातील महत्त्वाच्या इंद्रियांबद्दल व अवयवदानाबद्दल माहिती व महत्त्व सांगितले. शरीराचे काही अवयव कशा पद्धतीने जतन करून ठेवले जातात. त्याची पद्धत सांगितली. ही सर्व माहिती दृकश्राव्य (PPT) माध्यमातून मिळाल्याने याचा विद्यार्थिनींना अभ्यासात चांगला उपयोग होईल.

डॉ. भावसार ताईंनी 'सरोगेट मदर' हा विषय शास्त्रीयदृष्ट्या स्पष्ट केला. एखादी स्त्री आपल्या गर्भाशयात दुसऱ्या स्त्रीचा गर्भ कशा प्रकारे वाढवू शकते, हे करताना तिची काळजी कशी घेतली जाते याची सविस्तर माहिती सांगितली. या सामाजिकदृष्ट्या उपयुक्त पद्धतीचा सर्व बाजूंचा विचार त्यांनी पुढे मांडला.

'सहजीवनाच्या उंबरठ्यावर' हे सौ. साधनाताई सेठियांचे सत्र मुलींशी संवाद, प्रश्नोत्तर रूपात झाल्याने खूपच उद्बोधक झाले. समाजात मिसळताना, वावरताना आपण कसे वागले पाहिजे, तसेच जेव्हा जोडीदार निवडायची वेळ येते तेव्हा कोणत्या गोष्टींना महत्त्व द्यायला पाहिजे हेही त्यांनी लक्षात आणून दिले.

श्री. दिलीप धर्मा सरोदे यांनी वेगवेगळे प्रयोग दाखवून समाजात लोकांना देवाचे नाव घेऊन कसे फसवले जाते हे दाखवले. या सर्व प्रयोगांचे शास्त्रीय स्पष्टीकरण देऊन त्या बाबतीतील अंधश्रद्धा सर्वांच्या लक्षात आणून दिली.

'वेळेचे व्यवस्थापन' हा विषय श्री. प्रशांत एडवी सरांनी सोप्या भाषेत स्पष्ट केला. 'नोकरी करताना आपल्याला मिळणाऱ्या वेळेचे नियोजन व वेळेची बचत केली पाहिजे. त्यामुळे आपले काम व जीवनही आनंदी राहू शकेल' असे त्यांनी सांगितले.

वेगवेगळ्या खेळातून सौ. मेघाताई नगरे यांनी 'स्व'ची ओळख हा विषय स्पष्ट केला. प्रत्येक ठिकाणी आपण स्वतःला ओळखून काम केल्यास ते अधिक उत्तम होईल याची जाणीव मुलींना झाली.

'चैतन्य महिला मंडळ' या महिलांच्या सामाजिक प्रश्नांवर काम करणाऱ्या संस्थेची माहिती संस्थेच्या संस्थापिका सौ. ज्योती पठानिया यांनी दिली.



करंटे असे माजले भारतात । असे स्वार्थ बोकाळला हो तयात ।।
जिथे स्वार्थ, व्यक्तित्व तेथें कशाचे । वसे राज्य राष्ट्रीयतेचे यशाचे?।।

शिबिराचा समारोप सौ. सीमाताई कांबळे यांच्या 'सामाजिक समरसता' या व्याख्यानाने झाला. समाजात भेदभावाची दरी का व कशी निर्माण झाली यामागचा इतिहास सांगून त्यांनी आज आपण हे भेदभाव विसरून एकोप्याने काम करणे जास्त गरजेचे आहे. त्यामुळे आपण तसेच आपला समाज व देश प्रगती करू शकेल हे सर्वांच्या मनावर बिंबवले.

शिबिरात व्याख्यानांबरोबर गटचर्चा, पद्य, खेळ, स्पर्धा झाल्याने मुलींना वेगळाच अनुभव मिळाला.

**सहल –** शिबिर संपल्यावर ८ जानेवारीला रुग्ण सहाय्यक वर्गाची सहल अलिबागला गेली. जाताना महडच्या गणपती व येताना सासवणे येथील करमरकरांचे शिल्पांचे प्रदर्शन, भूगोलात अभ्यासलेला जलदुर्ग अलिबागचा किल्ला बघितला. काहीजणी प्रथमच सहलीसाठी बाहेर पडल्या होत्या तर समुद्रही खूप जणींनी प्रथमच पाहिला होता. भरती, ओहोटी या संकल्पनाही त्यामुळे त्यांच्या लक्षात आल्या. यामुळे सहलीचे शैक्षणिक व मनोरंजन हे दोन्ही हेतू साध्य झाले.

**ॲक्युप्रेशर उपचार शिबिर –**

२५-०२-२०१७ ला ॲक्युप्रेशर शिबिर घेण्यात आले. मुलांनी, पालकांनी उत्साहाने सहभाग घेतला होता. शरीरात कुठेही किंवा कोणत्याही प्रकारचा त्रास जाणवतो तेव्हा थोडा आराम पडावा यासाठी सहज प्रेरणेने त्या जागेवर दाब देऊन उपचार देण्याची पद्धत सर्व लोकांसाठी नवीनच होती. त्यामुळे उपचार घेताना उत्सुकता कुतुहूल पाहण्यास मिळाले. प्रत्येक रुग्णास ॲक्युप्रेशर रिंग भेट देण्यात आली.

रुग्ण सहाय्यक वर्गातील मुलींचा अभ्यासक्रम संपल्यानंतर हे शिबिर घेण्यात आल्यामुळे त्यांच्या अभ्यासक्रमाची उजळणी झाली. रुग्णावर उपचार करत असताना विद्यार्थिनींचा आत्मविश्वास जाणवत होता.

**प्रशस्तीपत्रक वितरण –**

१७ जुलैला २०१६-१७ च्या वर्गाचा प्रशस्तीपत्रक वितरण कार्यक्रम झाला. कार्यक्रमास माजी परिवहन मंडळ अधिकारी श्री. विकास पांडकर, यार्दी कंपनीचे श्री. प्रकाश पाटणकर, वर्धिनीचे कार्यवाह श्री. ज्ञानेश पुरंदरे, श्रीमती पुष्पाताई नडे उपस्थित होते. या सर्वांच्या हस्ते प्रशस्तीपत्रके व बक्षिसे देण्यात आली. ही बक्षिसे श्री. चंद्रकांत कुलकर्णी व श्री. बी. जी. नातू यांच्या कायम निधीतून देण्यात येतात. यावर्षी वर्गाचा माजी विद्यार्थी श्री. भगवान बनसोडे यानेही बक्षिसासाठी रक्कम दिली होती.

**खालील मुलींनी चमकदार यश प्राप्त केले –**

१) रेखा मारुती सोनावणे,प्रसुतीशास्त्र व पुणे विभाग प्रथम
२) शिवानी बाबूराव जाधव, माले विभाग प्रथम
३) माया गणेश गायकवाड, शरीरशास्त्र (पुणे विभाग)
४) सुनिता रामचंद्र गोरे, प्रसुतीशास्त्र (माले विभाग)
५) रेश्मा काशिनाथ खंदारे, परिचर्या कला (पुणे विभाग)
६) भारती रामदास शिंदे, प्रात्यक्षिक (पुणे विभाग)
७) शारदा नंदू पाठारे, आदर्श विद्यार्थिनी (माले विभाग)

**वर्गाच्या विद्यार्थिनींची मनोगते –**

* **रेश्मा खंदारे –** 'घरापासून लांब राहून वर्ग पूर्ण केला. त्यामुळे माझा आत्मविश्वास वाढला आहे.'

* **मनिषा गोपीरेड्डी –** 'वर्षभरात झालेल्या उपक्रमातून खूप चांगले शिकायला मिळाले. दवाखान्यात काम करताना आमचे नेहमीच कौतुक होते. याला कारण इथे आमच्या मनात सेवाभाव रुजवला गेला.'

जिथे स्वार्थ मोठा तिथे मुक्ति नाही । तिथे दास्य दुर्गंध कोंदून राही ।।
सुखी स्वार्थ साधून का कोण होतो ? पिसाळाप्रती; भूमिला काळिमा तो !।।

*** राणी सरोदे –** '१० वी नंतर मला शिकायचे होते पण घरुन परवानगी नव्हती. या वर्गाची माहिती मिळाल्यावर काही झालं तरी वर्ग पूर्ण करायचा ध्यास धरला आणि आता नोकरी करताना स्वतःला खूप समाधान वाटत आहे.'

यार्दी कंपनीच्या श्री. प्रकाश पाटणकर सरांनी सर्व मुलींचे कौतुक केले पण 'यापुढेही जिद्दीने स्वतःशी स्पर्धा करत प्रगती करत रहा' असे सांगितले.

श्री. पांडकर सर म्हणाले, 'वर्गामुळे मिळालेला आत्मविश्वास तुमच्या शब्दातून, चेहऱ्यावरून जाणवत आहे. आता कामामुळे हा आणखीन वाढेल, तो स्वतःहून वाढवा आणि प्रगती साधत रहा.'

श्री. ज्ञानेश पुरंदरे सर मुलींना शुभेच्छा देताना म्हणाले, 'आज तुम्हाला सेवेची दीक्षा मिळाली आहे, ती अखंड घडत राहो. नेहमी आपल्यापेक्षा मोठ्या असणाऱ्यांना गुरु मानून त्यांच्याकडून शिकण्याचा प्रयत्न करा. आधुनिक तंत्रज्ञानाचा, गुगल नेटचा वापर करून नवनवीन माहिती घेण्याचा प्रयत्न करा.'

*आदिवासी कातकरी तरुणांचा स्नेहमेळावा या समाजासाठी काम करणाऱ्या सामाजिक संस्थांनी १० जानेवारी २०१८ रोजी पौडजवळील 'दिसली' गावात आयोजला होता. कातकरी समाजात लहान वयातच लग्न लावले जाते. परंतु प्रवाहप्रतीत न होता रुग्णसहाय्यक माले वर्गाच्या (२०१६-१७) मनीषा वसंत वाल्हेकर व मनीषा चंद्रकांत वाल्हेकर या दोन कातकरी तरुणी वर्ग पूर्ण करून पुण्यातील नामांकित दवाखान्यात काम करत स्वतःच्या पायावर उभ्या राहिल्या आहेत. या स्नेहमेळाव्यात या दोघींचा विशेष सत्कार करण्यात आला.*

माले व पुणे येथे **नवीन वर्गाची सुरुवात** (२०१७-१८) १३ जुलैपासून झाली. दोन्ही वर्गात मिळून ५० मुलींनी प्रवेश घेतला आहे. नेहमीच्या अभ्यासाबरोबर ॲक्युप्रेशर प्रशिक्षणासही सुरुवात झाली आहे. श्रावण महिन्यातील नागपंचमी, शुक्रवारचे हळदीकुंकू वर्गात साजरे झाले. या सणांचे शास्त्रीय महत्त्व मुलींना ताईंनी सांगितले. मालेच्या वर्गात 'जव्हार' या आदिवासी भागातील मुली आहेत. त्यांनी पारंपारिक गाणी म्हणून दाखवली व खेळही खेळले. यातून तिथल्या संस्कृतीची माहिती मिळाली.

**माले विभाग –** १२ ऑगस्टला 'जागतिक स्तनपान दिवस' साजरा झाला. टाटा पॉवर कंपनीचे अधिकारी, सरकारी दवाखान्यातील डॉक्टर, सिंबॉयसिस कॉलेजमधील शिक्षिका यांनी मार्गदर्शन केले.

८ सप्टेंबरला 'राष्ट्रीय पोषण आहार' सप्ताहानिमित्त मुलींना सोप्या पद्धतीने रोजच्या आहारात पोषक घटक मिळणाऱ्या पदार्थांचे प्रात्यक्षिक सिंबॉयसिसच्या विद्यार्थिनींनी दाखवले. 'नाचणीची खीर', 'पिकलेल्या केळांचे घावन', 'अळूच्या पानांचे पिठलं' अशा अनेक पौष्टिक पदार्थांची कृती सर्वांना बघायला मिळाली. अन्नघटक व समतोल आहार या विषयावर एक छोटासा खेळ घेण्यात आला.

**पुणे विभाग –** गणेशोत्सवात मुलींनी 'स्त्री भ्रूण हत्या' या विषयावर स्वरचित पथनाट्य आठ मंडळांपुढे सादर केले. सर्व गणपती मंडळांचा, प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. तसेच कसबा गणपतीसमोर अथर्वशीर्ष पठणासाठी मुली गेल्या होत्या. अनंत चतुर्दशीला तुळशीबाग गणपतीच्या मिरवणुकीत प्रथमोपचाराचे काम वर्गाच्या मुलींनी केले.

नवरात्रात दोन्ही वर्गांवर भोंडला झाला. वर्गातल्या मुलींबरोबर शिवणवर्ग, साक्षरता वर्ग, बालवाडीच्या शिक्षिका व विद्यार्थिनीही सहभागी झाल्या होत्या. फेरातल्या गाण्यानंतर दांडियाचा कार्यक्रम खूपच रंगला.

*रुग्ण सहाय्यक वर्गात माजी विद्यार्थिनी अनुभव कथन करण्यासाठी सतत येत असतात. १९९२ च्या वर्गातील पूजा गड्डम तिचा अनुभव सांगताना म्हणाली, ''मी हा वर्ग करण्यापूर्वी लहान सहान नोकऱ्या करत होते. वर्गाची माहिती समजल्यावर प्रवेश घेतला. अडचणी आल्या तरी जिद्दीने अभ्यास केला. वर्षभर वेगवेगळ्या व्याख्यानातून, शिबिरातून मिळालेल्या विचारांनी मी पूर्णपणे बदलले. आज सह्याद्री हॉस्पिटलमध्ये कार्यकारी प्रशिक्षक* ('Trainer Executive') *या पदावर काम करताना मला इथे शिकायला मिळालेल्या गोष्टी आठवतात आणि त्यामुळेच मी आज या मोठ्या पदावर आत्मविश्वासाने काम करत आहे. मला असे वाटते की जो मी विचार स्वप्नातही केला नव्हता तो वर्धिनीत आल्याने मी प्रत्यक्षात कृतीत उत्तम प्रकारे आणू शकले आणि याचा फायदा मला आर्थिक व कौटुंबिकदृष्ट्याही झाला आहे.''*

**साक्षरता वर्ग –** यावर्षी वर्गाचा २५ जणींनी लाभ घेतला. सगळ्यांना लिहिता वाचता यायला लागले आहे. वाचनाचा वेग वाढवा म्हणून सरावासाठी त्या येत असतात. या वर्गाचा झालेला फायदा सांगताना...

**सौ. अंजना दरेकर –** 'धुणी भांडी करून वर्गाला येताना खरंतर कंटाळा यायचा. पण शिकल्यामुळे मुलांच्या शाळेतला अभ्यास कळतो. त्यांचा अभ्यासही घेता येतो. वर्तमानपत्र वाचायला येते.'

**सौ. उषा सावंत –** 'सरावासाठी आल्याने पटपट वाचता येते. मोबाईलवरच्या इतर गोष्टीही वापरता येऊ लागल्या.'

**सौ. रस्तीजा इनामदार –** 'मी उर्दूतून शाळा शिकले. पण मला शिवणवर्ग करायचा होता म्हणून आधी मराठी शिकले आणि शिवणवर्ग पूर्ण केला.'

**सौ. ज्योती खडके –** 'घरची परिस्थिती कठीण होती म्हणून शाळेत गेले नाही. मुलं बालवाडीत घातल्यामुळे वर्गाची माहिती मिळाली. घरचा विरोध होता पण मुलांना न्यायला आले की अर्धा पाऊण तास बसून अभ्यासाला बसायचे. आता वाचायला येते. त्यामुळे शिकायचा उत्साह वाढला आहे.'

**सौ. मंगल घोरपडे –** 'लिहायला यायला व हिशोब करता येऊ लागल्याने घरातले आर्थिक व्यवहार स्वतः करू लागले. भाडी घेणे, लाईटबिल भरणे, खर्चाचा हिशोब ठेवणे ही कामे करू लागले. हे माझ्या मुलाला कळल्यावर त्यालाही खूप आनंद झाला.'

**शिवण वर्ग –** यावर्षी पायाभूत शिवणवर्गाचा २५ महिलांनी, तर फॅशन डिझायनिंग वर्गाचा २० महिलांनी लाभ घेतला. यातून तयार झालेल्या महिलांनी वर्धिनीच्या बालवाडीचे व रुग्ण सहाय्यक वर्गाचे गणवेश शिवले. त्यातून त्यांना आर्थिक लाभही झाला. काही जणी स्वतःचा घरगुती व्यवसाय करत आहेत. ५ डिसेंबर १८ रोजी फॅशन डिझायनिंगच्या वर्गातील महिलांनी वर्धिनीमध्ये प्रदर्शनी मांडली होती. यामुळे इतर महिलांना वर्गाची माहिती झाली आणि वर्गातील महिलांना नवीन काम मिळाले.

साक्षरता व शिवणवर्गातील महिलांची कार्ले-एकवीरा देवी व लोणावळा येथे सहल गेली होती. यातील काही महिला प्रथमच लोकलमध्ये बसल्या आणि सहलीला प्रथमच बाहेर पडल्या होत्या. सर्वांनी मोकळेपणाने सहलीचा

आनंद घेतला.

**बचतगट –** या वर्षात ८ गट नव्याने सुरू झाले. त्यामुळे 'स्व'–रूपवर्धिनीच्या गटांची संख्या ३० आहे. हे गट वर्धिनीच्या परिसराशिवाय बिबवेवाडी, गोखलेनगर, कर्वेनगर भागात चालतात. काही शाखांमधील पालक या गटात सामील झाले आहेत. गटांच्या द्वारे घरगुती अडचणी, व्यवसाय, दवाखाने, मुलांचे शिक्षण व अन्य अशा कारणासाठी सोळा लाख रुपयांचे कर्जवाटप झाले.

दि. ७ मार्चला वर्धिनीत सर्व विभागातील महिलांसाठी आरोग्य तपासणी उपक्रमासंबंधित व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. ह्या उपक्रमाद्वारे महिलांची मोफत कर्करोग पूर्वनिदान तपासणी 'समवेदना' ह्या संस्थेतर्फे करण्यात येणार आहे. यासाठी ह्या संस्थेतून सौ. शशी भाटे व सौ. रेणुका जालोगी आल्या होत्या. त्यांनी कॅन्सर कसा होतो, त्यासाठी स्त्रियांनी स्वतःची काळजी कशी घेतली पाहिजे व का घेतली पाहिजे, आहारात काय बदल करावे, व्यायामाचे व वेळेचे नियोजन कसे करावे याबद्दल माहिती दिली. महिलांना व्यायामाचे व सूर्यनमस्काराचे फायदे सांगितले व सूर्यनमस्कार कसा घालावा ह्याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. सगळ्यांनी मिळून नंतर नमस्कार घातले. पुढील तपासणीसाठी महिलांनी नोंदणी केली.

### *उत्साहाचा झरा – वंदनाताई सोवनी*

*जून महिना सुरू झाल्यावर एक दिवस फोन वाजतो, ''सर, आपण उद्या वर्धिनीत भेटू या का ? पुढील आठवड्यात शाळा सुरू होतायत. आपले वेळापत्रक ठरवू या !'' अतीव उत्साहाने प्रयोगशाळेच्या कार्यात झोकून देणाऱ्या वंदनाताईंचा तो आवाज आम्हालाही उत्साहित करणारा असायचा. प्रत्येक गोष्ट, पाठ असो की प्रयोग असो, नियोजनबद्ध असायलाच हवी असा त्यांचा आग्रह होता.*

*बिलकेअर कंपनीतलं काम सांभाळून राजगुरुनगर परिसरातील १० शाळांच्या विकासासाठी, मुलांच्या प्रगतीसाठी धडपडणाऱ्या, स्वतःच्या आजारपणाचीही पर्वा न करणाऱ्या वंदनाताई आपल्यात नाहीत हे खरंच वाटत नाही. शाळांमधील शिक्षक, विद्यार्थ्यांसाठी सिद्ध समाधी योगाचे वर्ग, प्रयोगशाळा, पहिली ते चौथीच्या मुलांना गाणी, गोष्टी असे अनेक उपक्रम त्या राबवीत असत. त्या म्हणजे उत्साहाचा झराच होता. त्यांच्यामुळे सर्व शाळेतच उत्साह संचारायचा. खऱ्या अर्थानं उत्साह हा संसर्गजन्य असतो याची प्रचिती यायची.*

*शिक्षकांची प्रशिक्षण शिबिरे, विविध स्पर्धा, शिक्षकांच्या अडचणी समजावून घेऊन त्यावर उपाययोजना करण्यात सारे आयुष्य त्यांनी वेचले. वर्धिनीबरोबर गेली ८–१० वर्षेकाम करताना कधी वर्धिनीमय झाल्या ते समजलेच नाही. प्रयोगशाळेत त्या रमल्याच परंतु पाकोळीतील मुलांच्याही त्या दोस्त होत्या. त्यांची अनुपस्थिती राजगुरुनगर परिसरातील विद्यार्थ्यांना जशी जाणवेल तशीच आम्हालाही, वर्धिनीलाही जाणवणार हे नक्की ! ''विज्ञानाची नदी वाहत आहे. विद्यार्थ्याला त्याचा योग्य वापर करायला शिकण्यासाठी वर्धिनीची प्रयोगशाळा हा घाट आहे.'' आणि ह्या अशा घाटाच्या पायरीवर बसून वंदनाताई मुलांना मार्गदर्शन करीत असल्याचं दृश्य आता बघायला मिळणार नाही याची खंत आहे.*

***– श्री. सुनील कुलकर्णी***



जगीं दृष्ट राष्ट्रीय काढावयाला । नको मोहऱ्या ! मीठ वा ते कशाला ?
पुरा स्वार्थ ओवाळुनी टाकुनीया । पुन्हां तेज वाढे, फुले दिव्य काया ।।

**विशेष अभ्यास दौरा –**

दि. २ आणि ३ फेब्रुवारी २०१७ ला स्पर्धा परीक्षा केंद्राचा अभ्यास दौरा जव्हार, जि. पालघर या ठिकाणी आदिवासी जीवनाचा अभ्यास करण्यासाठी तसेच त्यांची कला, संस्कृती, भाषा हे जाणून घेण्यासाठी झाला. सामाजिक कामाची आवड असणारे ५६ विद्यार्थी या दौऱ्यामध्ये सहभागी झाले होते. अधिकारी होऊन पुढे प्रशासनात काम करताना वंचित व दुर्बल घटकांचे प्रश्न समजावून घेऊन, त्यांच्यासाठी काम करताना आवश्यक गोष्टीची माहिती मिळविणे व सामाजिक बांधिलकी जपणे हे उद्देश डोळ्यासमोर ठेवून हा अभ्यास दौरा आखला गेला होता.

सकाळी जव्हारमधील डोयाचा पाडा या आदिवासी ठिकाणी आम्ही पोहचलो. सकाळी उपासना झाली. नंतर आम्ही कायद्याची अंमलबजावणी करून राखलेले जंगल पाहण्यासाठी, वेगवेगळ्या गटांमध्ये विभागणी करून, जंगल भटकंती व परिसर अभ्यास करण्यासाठी बाहेर पडलो. तेथील मोह, अलन, करवंद, पळस, भूतवेल, मेडवाल, मोखेल, पंटागरी, टेमरुण, अटाई अशा अनेक उपयुक्त वनस्पतींचे औषधी गुणधर्म जाणून घेतले. ओढ्यांवर बांधलेले बंधारे, तेथील शेतीत लागवड करत असलेली पिके यांची माहिती घेतली.

**'वयम' –** 'आपल्या विकासाची आपली चळवळ' हा विचार मनाशी बाळगून मा. श्री. मिलिंद थत्ते आदिवासींच्या प्रगतीसाठी व त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी निस्वार्थ वृत्तीने झटत आहेत. वारली, कातकरी अशा लोकांच्या जीवनामध्ये वनहक्क व पेसा कायदा याची अंमलबजावणी करून त्यांनी प्रकाश आणला. केंद्राच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांनी काम करत असताना आलेल्या अडचणी व अनुभव सांगितले. तेथील आदिवासी समाज शिक्षणापासून वंचित असण्याचे एकमेव कारण म्हणजे आर्थिक दुर्बलता होय. याची जाणीव होताच **प्रत्येक विद्यार्थ्यांने यथाशक्ती आपला वाटा उचलला. ३००० रुपये आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी जमा करून दिले.**

रात्री सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. त्यामध्ये कॅशलेस, वनहक्क, ग्रामपंचायत, हागणदारीमुक्ती, शिक्षण अशा विविध विषयांवर पथनाट्ये झाली व त्यामधून प्रबोधन व समाजाची बदलती वाटचाल यावर लक्ष वेधले गेले. वारली नृत्य हा आदिवासींचा अतिशय प्रसिद्ध नृत्यप्रकार त्यांनी सादर केला. त्यांना साद देत आम्ही पण या नृत्यामध्ये सहभागी झालो. **खरा भारत हा ग्रामीण भागात, वाड्यावस्त्यावरती आहे आणि तिथेच कला संस्कृती याचे जतन व संवर्धन केले जाते; याचा अनुभव याची देही याची डोळा आला.**

**प्रगती प्रतिष्ठान –** आम्ही या संस्थेअंतर्गत चालणाऱ्या विविध उपक्रमांची व लोकोपयोगी योजनांची माहिती घेतली. यामध्ये प्रगती विद्यार्थी वसतीगृह, सौरग्राम प्रकल्प, आश्रमशाळांकरिता असलेली सौरऊर्जा योजना, शेतीसाठी सौरपंप योजना, जलसंधारण, सिमेंट बंधारे, शेततळे, कृषि विकास, पाणी व स्वच्छता, अपंग पुनर्वसन केंद्र इत्यादींची माहिती घेतली. कर्णबधिर मुलांची शाळा चालविण्याचे अत्यंत जोखमीचे काम प्रगती प्रतिष्ठान करत आहे. त्या शाळेतील मुलांची शिकण्याची धडपड व शिक्षकाची तळमळ पाहून सर्वांचे डोळे पाणावले. नियतीने जरी डावलले असले तरी त्यावर मात करून ती मुले शिक्षण घेत आहेत. त्यांची शिक्षणाची पद्धत पाहून प्रत्येकाला त्यांच्याकडून प्रेरणा मिळत होती. येथे बालवर्ग ते चौथीपर्यंत ३९ मुले व २५ मुली असे एकूण ६४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. श्रवणयंत्राचा व मौखिक पद्धतीचा उपयोग करून विद्यार्थ्यांना बोलतं करण्याचा प्रयत्न केला जात असून

त्यामधून मुलांची प्रगती होत आहे. आदिवासींची वारली चित्रशैली जी संपूर्ण जगाला आकर्षित करते आहे, त्या कलादालनाला आम्ही भेट दिली. जव्हारमधील राजवाडा पाहिल्यावर तेथील ऐतिहासिक वैभवसंपन्नतेचे दर्शन झाले.

आदिवासींसाठी काम करणारे व ध्येयधोरण आखणारे जव्हारचे नगराध्यक्ष मा. संदीप वैद्य, प्रांताधिकारी मा. स्वप्निल कापडणीस, जव्हार पंचायत समितीचे (BDO) मा. श्री. सुनील पठारे ग्रामीण विकास या विषयामध्ये पी.एच.डी. मिळविणारे श्री. अनिल पाटील सर अशा विविध क्षेत्रामध्ये काम करत असणाऱ्या मान्यवरांनी आम्हा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली.

**खऱ्या अर्थाने भौतिक प्रगतीपासून वंचित असणारा, शहरीकरणापासून दूर असलेला आदिवासी हा मनाने खूप मोठा, निस्वार्थी वृत्तीचा, कला व संस्कृती यांची जपणूक करणारा, माणुसकी जपणारा, आपल्या जीवनामध्ये आनंदी असणारा असा आम्हाला जाणवला आणि वाटलं की खरा भारत हाच आहे.**

**शहीद दिन–** आपल्या देशासाठी भगतसिंग, राजगुरु व सुखदेव हे तीन भारतमातेचे सुपुत्र हसत हसत फासावर गेले. त्यांच्या या बलिदानाचे स्मरण रहावे, शहिदांच्या स्वप्नातील भारत देश हा खऱ्या अर्थाने प्रशासनातील अधिकाऱ्यांनी उत्तम काम करून घडवावा व त्यासाठी त्यांना प्रेरणा मिळावी हा उद्देश समोर ठेवून दि. २३ मार्च २०१७ या दिवशी 'स्व'–रूपवर्धिनी स्पर्धा परीक्षा केंद्राच्या वतीने यावेळी ह्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

मा. सतीश पाटील सर, गटविकास अधिकारी (BDO), यशदाचे माजी संचालक यांनी मुलांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, ''कोणत्याही क्षेत्रात यशस्वी व्हायचे असेल तर शारीरिक स्वास्थ्य उत्तम असणे गरजेचे आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने रोज किमान एक तास हा योगासने, प्राणायाम किंवा मैदानी खेळासाठी द्यावा त्यामुळे शारीरिक व मानसिक स्वास्थ चांगले राहील. परीक्षेमध्ये चांगले गुण मिळवायला मदत होईल. स्पर्धा परीक्षांकडे जीवन मरणाचा प्रश्न म्हणून पाहू नये. कोणत्याही क्षेत्रात काम करायचे असेल तरीही सुरुवातीला तीन चार वर्ष स्पर्धा परीक्षांची तयारी करावी व नंतर आपल्या आवडीच्या क्षेत्रात काम करावे. कारण स्पर्धा परीक्षांमुळे विविध विषयांमधील माहिती मिळते व एक चांगला दृष्टिकोन तयार होतो. स्पर्धा परीक्षांची तयारी करत असताना कोणतीही एक परीक्षा डोळ्यासमोर ठेवून तयारी करावी. त्यामुळे यश लवकर मिळते. परीक्षेमध्ये मिळालेल्या यश अपयशाचे परीक्षण स्वतः करावे, इतरांशी तुलना करू नये. आपल्या चुका ह्या स्वतः समजून घेऊन त्यात सुधारणा करावी.'' यावेळी मुलांनी प्रश्न विचारले व सरांनी त्यावर दिलेल्या उत्तरांमुळे परीक्षेला सामोरे जाताना मनामध्ये असणारी भीती व दडपण दूर झाले. सर्वांना परीक्षेमध्ये यश मिळावे अशा शुभेच्छा सरांनी दिल्या.

**सत्कार समारंभ –** कोणताही चांगला खेळाडू निर्माण होण्यासाठी उत्तम प्रशिक्षकाची व योग्य प्रेरणेची गरज असते. हीच प्रेरणा आपल्याच केंद्रातील यशस्वी विद्यार्थ्यांकडून घेताना सर्वांचा उत्साह अजून वाढतो.

२२ एप्रिल २०१७ रोजी राज्य सेवा परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार मा. श्री. शिवाजी जगताप सर (उपजिल्हाधिकारी, सोलापूर) व यशदाचे माजी संचालक मा. श्री. सतीश पाटील सर (BDO, ACE) यांच्या हस्ते झाला. यशस्वी विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून यशस्वीतेच्या वाटांचे दर्शन घडवले.

सौ. अश्विनीताई शेंडगे मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या, 'अभ्यास हा मनापासून व प्रामाणिकपणे केला पाहिजे. आपल्या अभ्यासातील चुका शोधून त्यात सुधारणा स्वतःच कराव्यात. आपल्याला दुसरी व्यक्ती जास्त दिवस प्रेरित

करू शकत नाही तर स्वतःची आत्मिक प्रेरणा जास्त उपयोगी पडते. ती सतत जागी ठेवली पाहिजे.'

श्रीमती किर्ती देशमुख म्हणाल्या, 'आपल्या आयुष्यात काही क्षण आपल्या आयुष्याला कलाटणी देऊन जातात. हेच क्षण ध्येय निश्चित करण्याचे बळ देतात.'

'जिद्द, सातत्य, कष्ट, सकारात्मक विचार या गोष्टींनी यश मिळते. पेपर सोडवताना योग्य विश्लेषण करा. अभ्यासाबरोबर छंदांची जोपासना व्हायला हवी' असे श्री. सारंग पोफळे म्हणाले.

श्री. स्वप्निल जाधव म्हणाले, 'आपल्या अभ्यासाच्या पायाभूत संकल्पना (Basic Concept) पक्क्या असल्या पाहिजेत. प्रशासनात गेल्यावर संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्ये कामातून बाणली गेली पाहिजेत. त्यासाठी स्वतःतही ही तत्त्वे बाणवा आणि त्याप्रमाणे वागा.'

'यशस्वी विद्यार्थ्यांचे सूत्र प्रत्येकाला लागू पडेल असे नाही. पण तुमचे सूत्र स्वतः तयार करा व यशस्वी व्हा. नुसते अधिकारी होण्यापेक्षा कार्यक्षम यशस्वी अधिकारी होण्याचे ध्येय ठेवा. त्यासाठी प्रयत्न करा' असे श्री. प्रणिल गिल्डा यांनी सांगितले. डॉ. उमेश भुसे म्हणाले, 'अभ्यासातील सातत्य महत्त्वाचे. विषयाचा आवाका लक्षात घेऊन त्याप्रमाणे अभ्यास झाला पाहिजे.'

मा. श्री. सतीश पाटील सरांनी यशस्वी विद्यार्थ्यांना भावी आयुष्यातील कामासाठी, जबाबदारीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच 'अभ्यासाचे नियोजन, अभ्यासाबरोबर खेळ, योगासने, व्यायाम हाही महत्त्वाचा भाग आहे' असे सांगितले.

मा. श्री. शिवाजी जगताप सरांनी यशवंतांना शुभेच्छा देऊन अधिकारी बनल्यावर नवनवीन आव्हानांना कसे सामोरे जावे या विषयीचे आपले अनुभव सांगितले.

हा कार्यक्रम सत्काराचा नसून प्रेरणासत्राचा आहे असे सर्व उपस्थितांना वाटत होते.

**वर्षासहल –**

१८ जुलै रोजी स्पर्धा परीक्षा केंद्रातील विद्यार्थ्यांची सहल वेल्हा येथील तोरणा वसतीगृह व मढेघाट येथे गेली. त्या आधी दोनच दिवस MPSC ची परीक्षा झाली होती. अभ्यासाचा शिणवटा घालवून परत तयारी करण्यास उत्साह यावा हा उद्देश यामागे होता.

सकाळी ७.३० वाजता वर्धिनीपासून निघालो. गाडीमध्ये पद्य, कविता, गाण्यांच्या भेंड्या, विनोद सांगत वेल्हा गावात कधी पोचलो ते समजले नाही. तेथील तोरणा वसतीगृहाला आम्ही भेट दिली. वसतीगृहाचे प्रमुख श्री. आंबेडकर सर यांनी डोंगरी भागातील मुलांच्या समस्या, त्यातून सुरू झालेले वसतीगृहाचे काम व मुलांची प्रगती याची माहिती सांगितली. ''वसतीगृह चालवताना अनेक अडचणी येतात पण मुलांची शिकण्याची जिद्द बघितली की त्या सोडवण्याची प्रेरणा आम्हाला मिळते,'' असे ते म्हणाले.

पुण्यापासून केवळ ८०-९० किमी अंतरावर असूनसुद्धा डोंगरी भागात शिक्षणाच्या सुविधा कमी पडतात हे जाणवले.या वसतीगृहाला सर्व मदत लोकसहभागातून होत असते. इथून खूपशी मुले पुढे शिकून आज वेगवेगळ्या ठिकाणी उच्च पदांवर काम करीत आहेत. त्यानंतर आम्ही मुलांशी गप्पा मारल्या. आपल्या केंद्राची प्राथमिक माहिती त्यांना सांगितली. कुणी डॉक्टर, अधिकारी, सैनिक, वैमानिक, शास्त्रज्ञ बनण्याची स्वप्नं घेऊन शिकत आहेत. सध्या वसतीगृहात ५ वी ते १० वी पर्यंतची ८० मुले निवासाला आहेत.

वेल्ह्यावरून नंतर आम्ही मढेघाट येथील धबधब्याचे सौंदर्य बघायला निघालो. जातानाचा रस्ता खूपच अरुंद,

वळणा वळणाचा, दोन्ही बाजूला झाडी असा होता. वाटेत श्री. निशिकांत वाईकर यांनी तानाजी मालुसऱ्यांच्या जीवनातील प्रसंग सांगितले. तानाजींचे गाव याच भागात आहे. धारातीर्थी पडल्यावर मावळ्यांनी या घाटातून तानाजी मालुसरेंचे शव गावी आणले. त्यामुळे हा घाट मढेघाट म्हणून ओळखला जातो.

पुढे धबधब्याशी पोचल्यावर ३०० मी. उंचीवरून पाणी दरीत कोसळत होते. खूपच मनोहारी दृष्य दिसत होते. गावकऱ्यांनी तेथील धोका आधीच सांगितल्याने सर्वांनी जपूनच निसर्ग सौंदर्याचा, पाण्यात भिजण्याचा आनंद घेतला. परतीच्या मार्गावर जेवण करून रात्री ९.३० वाजता पुण्यात पोहोचलो.

**कारगिल विजय दिन–**

‘स्व’–रूपवर्धिनी स्पर्धा परीक्षा केंद्र व जम्मू काश्मीर स्टडी सेंटर यांच्या संयुक्त विद्यमानाने शहीद जवानांना आदरांजली वाहण्यासाठी ‘२६ जुलै – कारगिल विजय दिना’चे आयोजन करण्यात आले.

‘संघटन गढे चलो सुपंथ पर बढे चलो । भला हो जिसमे देश का वो काम सब किये चलो ।।

या भावनेने काम करणारे मा. श्रीनिवास सोहनी (IAS), माजी प्रशासकीय अधिकारी यांचे मार्गदर्शन सर्वांना मिळाले. ते जम्मू काश्मीरमध्ये कार्यरत आहेत. तेथील परिस्थिती मांडताना ते म्हणाले, ‘‘जम्मू काश्मीरमध्ये होत असलेल्या घुसखोरीमुळे, दहशतवादामुळे तेथील स्थानिक नागरिकांवर वाईट परिणाम होत आहेत. कळत नकळत काही तरुण यात ओढले जातात व देशविरोधी कृत्यात सहभागी होतात. हे थांबवण्यासाठी काही संस्था व भारत सरकार कार्यक्रम व योजना राबवत आहेत. प्रशासकीय अधिकारी स्थानिक पातळीवर लाभ लोकांपर्यंत पोचवत आहेत. त्यामुळे अशा कृत्यांना आळा बसण्यास मदत होत आहे. जम्मू–काश्मीरबाहेरील अन्य प्रांतातील युवकांनी जम्मू काश्मीरचा इतिहास, भाषा, संस्कृती याचा अभ्यास करून संघटन करून या मन परिवर्तनाच्या चळवळीत सामील व्हायला हवे. यातून आपले राष्ट्रहित जोपासले जाईल.’’ केंद्रातील सर्व अभ्यासार्थींना त्यांच्या वाटचालीसाठी शुभेच्छा देत या राष्ट्रकार्यात सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले.

**गणेशोत्सव–**

**श्रमिकांचा बाप्पा –** श्रमिक वर्गाचा सन्मान करणे व कुठल्याही प्रकारचे प्रदूषण न करता सांस्कृतिक वारसा जपणे या हेतूने स्पर्धा परीक्षा केंद्र व अभ्यासिका यांच्या वतीने गणेशोत्सव साजरा झाला. विद्येची देवता गणपती पुस्तकांच्या सजावटीत विराजमान झाली होती. वर्धिनीत वेगवेगळ्या सेवा देणाऱ्या काका, मावशी यांच्या हस्ते रोज आरती झाली. आरतीनंतर मुलांनी त्यांच्याशी संवाद साधला. त्यांच्या बोलण्यातून वर्धिनीबद्दलचे प्रेम आपुलकी जाणवत होती. सर्वांना दैनंदिन जीवनात उपयोगी पडणाऱ्या वस्तू भेट दिल्या. शेवटच्या दिवशी अभ्यासिकेतील मुलींच्या हस्ते श्रींच्या मूर्तीचे हौदामध्ये विसर्जन झाले. कोणत्याही वाद्याशिवाय घोषणांच्या गजरात १०० विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत गणरायाला निरोप दिला.

**तिहेरी तलाकचा लढा –** दि. ३१ ऑगस्ट २०१७ रोजी ‘स्व’–रूपवर्धिनी स्पर्धा परीक्षा केंद्र, अभ्यासिका व लोकशाही जागर मंच यांच्या संयुक्त विद्यमानाने ‘श्रमिकांचा बाप्पा’ या उपक्रमांतर्गत विशेष कार्यक्रम म्हणून सध्या गाजत असलेल्या ‘तिहेरी तलाक’ या संवेदनशील विषयावर व्याख्यान आयोजित केले. याबाबत विविध मुद्दे व विविध दृष्टिकोन स्पष्ट व्हावेत म्हणून या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी मा. प्रा. शमसुद्दीन तांबोळीसर यांना बोलावण्यात आले होते. प्रा. तांबोळी सर हे ‘मुस्लीम सत्यशोधक मंडळ’ या समाजसेवी संस्थेचे कार्याध्यक्ष आहेत. ‘मुस्लीम सत्यशोधक मंडळा’ची स्थापना डॉ. हमीद दलवाई यांनी केली होती. या मंडळाने मुस्लीम समाजात



**जगी सूड घेता वरी मान येते । अरी ध्वंसिता दस्यु होतात जेते ।।**
**प्रभावी सुडाची जिथे भावना ना । तिथे दुःख दारिद्र्य पीडी जनांना ।।**

सुधारणा घडून आणण्यासाठी वेळोवेळी अनेक प्रकारचे मोर्चे आणि आंदोलने केली आहेत. 'तिहेरी तलाक' हा प्रकार मुस्लिम समाजात पूर्वीपासून चालत आला आहे. त्याचे विविध पैलू समजावून देण्यासाठी शमशुद्दीन तांबोळी सरांनी विविध मुद्द्यांचे स्पष्टीकरण केले. त्यांनी तलाकचे विविध प्रकार व त्यांचा कुराणमधील संदर्भ व कालानुसार त्या प्रकारांमध्ये होत गेलेले बदल स्पष्ट केले. त्यांनी तिहेरी तलाक व संविधान हा मुद्दा विद्यार्थ्यांना समजेल अशा भाषेत समजावून सांगितला. सरांनी या विषयाबाबत मंडळाची भूमिका स्पष्ट केली. तसेच सर्वोच्च न्यायालयाने जो निर्णय दिला त्या निर्णयाचे विविध दृष्टिकोनातून विविध मुद्दे स्पष्ट करून सांगितले.

वरील विषयावर बोलून झाल्यावर कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांच्या मनात जे प्रश्न निर्माण झाले त्या प्रश्नांना प्रा. तांबोळी सरांनी विस्तृत उत्तरे दिली.

**शारीरिक चाचणी तयारी मार्गदर्शन–**

'स्व'–रूपवर्धिनी परीक्षा केंद्र व अभ्यासिकेमध्ये विविध स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणारे विद्यार्थी सहभागी असतात. विशेषतः महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेतल्या जाणाऱ्या विविध परीक्षांसाठी उदा. राज्यसेवा, PSI, STI, ASST इत्यादी. या सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक ती सर्व मदत केंद्र त्यांना देते.

नुकताच पोलिस उपनिरीक्षक मुख्य परीक्षेचा निकाल लागला. त्यामध्ये आपल्या केंद्रातील १५ विद्यार्थी शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरले. तसेच १६ जुलै रोजी झालेल्या संयुक्त परीक्षेतही बऱ्याच विद्यार्थ्यांना उत्कृष्ट गुण मिळाले आहेत. या दोन्ही परीक्षांचा निकाल लक्षात घेऊन केंद्राने पोलिस उपनिरीक्षक पदाच्या शारीरिक परीक्षेची तयारी कशी करावी यासाठी 'स्व'–रूपवर्धिनीचे माजी वर्धक श्री. महेश साळवी सर (पोलिस निरीक्षक शिवाजीनगर पोलिस हेडक्वॉर्टर) यांच्या मार्गदर्शनाचे सत्र दि. २५–०९–२०१७ रोजी आयोजित केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस सौ. मनीषाताईंनी सरांचा परिचय करून दिला. मार्गदर्शन करताना सरांनी या गोष्टीचा आवर्जून उल्लेख केला की, मी वर्धिनीच्या सावलीत वाढलो आहे, खेळलो आहे व माझ्या यशात वर्धिनीचा खूप मोलाचा वाटा आहे. आपल्या आठवणींना उजाळा देत सरांनी पटवर्धन सर, पुरंदरे सर यांचा विशेष उल्लेख केला व विद्यार्थ्यांना या गोष्टीची जाण करून दिली की तुम्ही खूप भाग्यवान आहात की तुम्ही वर्धिनीच्या परिवारात आहात. सरांनी पोलिस उपनिरीक्षक पदाच्या चाचणीची संपूर्ण माहिती सांगितली, चाचणीसाठी किती गुण असतात, कोणत्या निकषाला किती गुण मिळतात इत्यादी. शारीरिक चाचणीच्या तयारीसाठी शरीराचे वेगवेगळे व्यायाम त्यांनी सांगितले. कोणत्या अवयवासाठी कोणता व्यायाम फायदेशीर आहे याबद्दलही खूप छान सांगितले. योग्य व्यायामाबरोबर संतुलित आहार घेणे आवश्यक आहे हे सुद्धा नमूद केले. ऐन परीक्षेवेळी होणाऱ्या चुका कशा टाळाव्यात याबद्दल त्यांनी सांगितले. शारीरिक चाचणीसाठी आवश्यक सर्व बारीक व अतिशय महत्त्वाच्या क्लुप्त्या सांगितल्या व विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले.

**शिष्यवृत्ती वर्ग उद्घाटन–**

स्पर्धा परीक्षा केंद्रामार्फत राज्य सेवा परीक्षेची तयारी करणारे गरजू व ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी गेली ६ वर्षे शिष्यवृत्ती वर्ग चालवला जातो. २०१७–१८ या वर्षातील शिष्यवृत्ती वर्गाचा उद्घाटन समारंभ दिनांक २ ऑक्टोबर या दिवशी प्रमुख पाहुणे – मा. श्री. गणेश शिंदे सर (ACP, पुणे शहर) यांच्या उपस्थितीत झाला.

'स्व'–रूपवर्धिनीच्या मुख्य शाखेतील अभ्यासिका सभागृहात सकाळी १० वाजता कार्यक्रमाची सुरुवात श्री. चंदन हायगुंडे सरांनी सादर केलेल्या 'हम युवा है हम करे, मुश्किलों से सामना' गीताने झाली.

प्रथम बापू शिंदे सर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंद करून स्वागत केले आणि सूत्रसंचालनास सुरुवात केली. 'स्व'-रूपवर्धिनी स्पर्धा परीक्षा केंद्राच्या प्रमुख समन्वयिका सौ. मनिषाताई यांनी प्रास्ताविकेद्वारे संस्थेच्या स्थापनेचा इतिहास, कार्य आणि इतर उपक्रम यांबद्दल थोडक्यात विद्यार्थ्यांना ओळख करून दिली. तद्नंतर प्रमुख पाहुणे मा. श्री. गणेश शिंदे सर यांनी विद्यार्थ्यांना पुढील मुद्द्यांवर मार्गदर्शन केले.

१) सरांनी स्वतःची ओळ करून देताना 'स्वतः वर्धिनीच्या स्पर्धा परीक्षा केंद्रात कसा घडलो' याची माहिती दिली.

२) स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करताना विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण होणारे अनेक प्रश्न, भय, न्यूनगंड यांच्या निराकरणासाठी मोलाचे मार्गदर्शन केले.

३) स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करताना 'अभ्यासातील सातत्य आणि विषयाचे सखोल ज्ञान तसेच मूलभूत संकल्पना याच बाबींवर यश अवलंबून आहे' असा मूलमंत्र दिला.

४) सरांनी 'प्रशासनात आलेले अनुभव, कठीण प्रसंगात घ्यावयाची निर्णय क्षमता आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचे केलेले प्रयत्न याबद्दल स्वानुभव कथन करून' विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देऊन मनोगत समाप्त केले. सदर कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

**गडचिरोली अभ्यास दौरा–** आधुनिक सेवा सुविधांपासून वंचित असणारा अतिशय दुर्गम भाग म्हणजे गडचिरोली जिल्हा. या ठिकाणी 'स्व'-रूपवर्धिनी स्पर्धा परीक्षा केंद्राच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीवीर बाबुराव शेडमाके अभ्यासिका, वाचनालय व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र भामरागड, जि. गडचिरोली येथे सुरू करण्यात आले. या केंद्राचे काम बघण्यासाठी ६ नोव्हेंबर ते १० नोव्हेंबरमध्ये 'स्व'-रूपवर्धिनी स्पर्धा परीक्षा केंद्रातील समन्वयक श्री. बापू शिंदे, अभ्यासिका प्रमुख श्री. स्वप्नील काटकर व श्री. समीर येनपुरे यांनी भेट दिली. गरजू व क्षमता असणाऱ्या विद्यार्थ्यांना दिशा दाखवणे व आधुनिक जीवनशैलीपासून वंचित असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशासनात येण्याची संधी मिळावी हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून हे केंद्र सुरू करण्यात आले.

क्रांतीवीर बाबुराव शेडमाके अभ्यासिका या केंद्राचे उद्घाटन कु. अश्विनी सोनवणे, गटशिक्षणाधिकारी, भामरागड यांच्या हस्ते झाले. केंद्राच्या विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास जागवताना त्या म्हणाल्या, 'तुमची स्वतःची क्षमता दाखवून देण्याची वेळ आली आहे. आता भामरागड येथील विद्यार्थी-विद्यार्थिनी पुण्यातील विद्यार्थ्यांप्रमाणे यश मिळवतील.' श्री. किशोर गर्जलवार (BDO) यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. मार्गदर्शनासाठी ते सदैव उपलब्ध असतील असे आश्वासनही त्यांनी याप्रसंगी दिले. स्पर्धा परीक्षा केंद्राला लागणारी पुस्तके देण्याची तयारी त्यांनी दर्शवली. या कार्यक्रमास डॉ. हेमराज लाड, प्रा. दत्ताजी शिर्के व स्थानिक सामाजिक कार्यकर्तेउपस्थित होते.

-----------

स्पर्धा परीक्षा केंद्राच्या कार्यकर्त्यांनी चंद्रपूर जिल्ह्यात अवितरपणे सेवा करणारे व लोकांचे दुःख समजावून घेऊन स्वतःचे आयुष्य कुष्ठरोग्यांसाठी देणाऱ्या कै. बाबा आमटे यांच्या आनंदवन प्रकल्पास भेट दिली. त्यांच्या समाधीस्थानापुढे नतमस्तक होताना त्यागाची, वैराग्याची जाणीव मनात निर्माण झाली. याबरोबरच भामरागडच्या हेमलकसा प्रकल्पालाही भेट दिली. थोर समाजसेवक डॉ. प्रकाश आमटे यांच्याशी संवाद साधताना भविष्यकाळात काम करण्याची प्रेरणा मिळाली.

भामरागड या अतिशय दुर्गम भागात कठोर विरोध असताना लोकांच्या सोयीसाठी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता मा. दत्ताजी शिर्के यांनी पोलिस प्रशासनाची मदत घेऊन 'जुवी नाला' येथे बांधलेला पूल पाहिला. स्थानिक

लोकांशी संवाद साधला. सर्व प्रकारचे आघात सहन करून जिद्दीने काम करणाऱ्या दत्ताजी शिर्के यांच्या कामाची त्यातून ओळख झाली. भामरागड येथील पोलिस स्टेशन परिसरात आम्ही निवास केला. त्याठिकाणी काम करताना दररोज वेगवेगळी आव्हाने उभी राहतात व तेथील पोलिस आपल्या परीने या आव्हानांना तोंड देत समाजाचा विश्वास मिळवतात. हे असताना प्रशासनाला होणारा विरोध त्यांना काम करताना सहन करावा लागतो. येथे काम करणे अतिशय जिकीरीचे व जिद्दीचे आहे हे श्री. शिवराज थडवे (PSI) यांच्याशी बोलताना जाणवले. हे सर्व ऐकताना पोलिस व प्रशासन करत असलेल्या कार्याने मन भारावून जात होते.

आमलापल्ली या वनविभागास स्थानिक कार्यकर्त्याच्या बरोबर भेट दिली. निसर्गरम्य परिसर लाभलेल्या या भागातील झाडे, पक्षी यांची माहिती व महत्त्व त्यांनी आम्हाला सांगितले. आशिया खंडातील सर्वात मोठा सागवृक्ष या वनविभागात आहे.

लोकांच्या सहभागातून मेंढालेखा हे गाव प्रगतीपथावर नेणाऱ्या मा. देवाजी तोफा यांची भेट झाली. या गावात राहून त्यांनी केलेल्या सुधारणा प्रत्यक्षात बघायला मिळाल्या.

'स्व'-रूपवर्धिनीच्या वातावरणात मोठे झालेले श्री. विवेक नाकाडे (अधीक्षक पंचायत समिती, शालेय पोषण आहार) श्री. प्रमोद नाटके (अधीक्षक) व श्री. मल्लिनाथ कांबळे (महिला बालविकास अधिकारी) यांचीही भेट झाली. वर्धिनीच्या संस्कारांचा प्रशासनात अधिकारी म्हणून काम करताना खूप उपयोग होत आहे हे या सर्वांनी आवर्जून सांगितले. नागपुरातील रेशीमबाग या संघ कार्यालयाची भेट आम्हा सर्वांना सामाजिक काम करण्याची ऊर्जा देणारी ठरली.

**संविधान दिन-**

स्व-रूपवर्धिनी स्पर्धा परीक्षा केंद्राने संविधान दिनानिमित्त २६ नोव्हेंबर २०१७ रोजी मा. श्री. प्रदीप रावत यांचे 'भारताचे प्रबोधनपर्व आणि संविधान' या विषयावर अभ्यासिकेतील विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान आयोजित केले होते. रावत सरांनी अतिशय चांगल्या प्रकारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

ते म्हणाले, ''भारतीय समाज घडविण्याचे महत्त्वाचे काम प्रशासनाचे होय. भारतीय समाजामध्ये कुठल्याही क्षेत्रात सर्व दरवाजे उघडलेले आहेत. ते सर्व या संविधानामुळेच हा त्याचा दृश्य परिणाम आहे. केवळ स्पर्धा परीक्षांना आवश्यक म्हणून संविधानाचा अभ्यास करणे नसून समाजातील प्रत्येकाने या घटनेचा अभ्यास केला पाहिजे. घटना कशी जन्माला आली या प्रक्रियेचा अभ्यास केला तरच आपण जी प्रतिज्ञा करतो, त्याबद्दलची मनापासूनची बांधिलकी निर्माण व्हायला पाहिजे ती या अभ्यासाद्वारे निर्माण होईल.

भारतीय संविधान हा असा ग्रंथ आहे की सर्व पिढ्यांना त्या-त्या वेळेच्या गरजा ओळखून मार्ग दाखवेल व त्यातील अपुरेपणा, दोष, संदिग्धता असेल तर त्यात बदल करता येईल. घटनेवरील पुस्तके ही मुख्यत्वे कलमे, कायद्याच्या दृष्टीने केलेली चिकित्सा याच्यावर पाहायला मिळतात. पण घटनेची राजकीय चिकित्सा हा त्याचा सर्वांत महत्त्वाचा गाभा आहे. तो फार क्वचित पाहावयास मिळतो. राजकीय अंगाने त्याचे विश्लेषण केले पाहिजे. तसा अभ्यास केला पाहिजे. मग त्याला आपण प्रबोधन पर्व म्हणू.

घटनासमितीतील मंडळींनी त्यांचे स्वत:चे दृष्टिकोनदेखील मांडले असून त्यात एकमत कसे केले याचा आढावा आवश्यक आहे. त्याचाही अभ्यास करणे गरजेचे आहे.

तसेच आपल्याकडे झालेल्या सर्व चळवळींचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. प्रशासनात जाऊन संविधानाचे

महत्त्व समाजाच्या सर्व घटकांपर्यंत पोहोचवून त्याची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करणे किती गरजेचे आहे हे या व्याख्यानाद्वारे समजले.

## अभिनंदन

**केंद्रीय लोकसेवा आयोग २०१६-१७**

श्री. सारंग पोफळे : (१) CRPF - १४ वा क्रमांक - २०१६ (२) Indian Information Services

**- राज्यसेवा २०१६-१७ यशस्वीतांची नावे -**

१) कु. अश्विनी शेंडगे - पोलिस उपअधिक्षक
२) श्री. स्वप्नील जाधव - पोलिस उपअधिक्षक
३) श्री. प्रणील गिल्डा - पोलिस उपअधिक्षक
४) श्री. संजयकुमार डव्हळे - उपजिल्हाधिकारी
५) श्री. सचिन खाडे - तहसीलदार
६) कु. अश्विनी मारणे - वित्त व लेखा अधिकारी
७) डॉ. निलेश देशमुख - पोलिस उपअधिक्षक
८) कु. कीर्ती देशमुख - अन्न व सुरक्षा अधिकारी
९) डॉ. उमेश भुसे - अन्न व सुरक्षा अधिकारी
१०) श्री. संजय परमार - सनदी लेखपाल
११) श्री. रामेश्वर देशमुख - माहिती जनसंपर्क पर्यवेक्षक (समाजकल्याण)
१२) श्री. वैभव महाडिक - सहाय्यक अभियंता (मराविमं)
१३) श्री. शुभम शेंडकर - नेव्हल एअरमन (नौदल)
१४) श्री. दिलीप भोगुलकर - वरिष्ठ लिपीक (आदिवासी विभाग, ठाणे)
१५) श्री. रोहित जाधव - आर.बी.आय. असिस्टंट (बँक ऑफ इंडिया)
१६) श्री. प्रतिक पठाडे - सिनीयर क्लार्क (युनियन बँक)
१७) श्री. प्रशांत बोरकर - पी.एस.आय.सेंट्रल
१८) श्री. भाग्योदय बत्तीसे - टेक्निकल ऑफिसर (डीआरडीओ)
१९) श्री. हिरेंद्र बडोले - अधिक्षक (आदिवासी विभाग, ठाणे)
२०) सौ. प्रियांका खाडे (पाचर्णे) - विक्रीकर निरीक्षक
२१) कुमारी शिल्पाराणी जाधव - विक्रीकर निरीक्षक
२२) श्री. गोपाळ कानडे - कॉन्स्टेबल (राज्य उत्पादन शुल्क)
२३) श्री. प्रमोद खरसडे - कॉन्स्टेबल (राज्य उत्पादन शुल्क)

## जोडोनिया धन...


जोडोनिया धन । उत्तम व्यवहारे ।
उदास विचारे । वेच करी ।।

हाच जगद्गुरु तुकोबारायांचा अभंग, प्रत्यक्ष जगणाऱ्या अनेक व्यक्तींच्या अनंत हातांनी आजपर्यंत वर्धिनीचा हा जगन्नाथाचा रथ ओढला आहे. वर्धिनीसारखे मूलभूत काम आसेतू हिमालय जागोजागी उभे रहायला हवे, अशी प्रामाणिक इच्छा आपल्या सर्वांच्याच मनात असते आणि आजची सामाजिक परिस्थिती व नुकत्याच घडलेल्या काही घटनांनी तर ही आवश्यकता अधोरेखित केली आहे. तद्नुसार यथाशक्ती कामाचा विस्तारही होत आहे.


येत्या नजिकच्या काही वर्षात कातवडी व चऱ्होली येथील संस्थेच्या जागेवरही विविध प्रकल्प उभे करण्याचे नियोजन चालू आहे. त्यासाठी मोठा आर्थिक निधी उभारण्याची गरज लागणार आहे. त्याचप्रमाणे घटते व्याजदर व महागाईचा वाढता निर्देशांक यामुळे नित्य कामासाठीही निधी संकलन वेगाने वाढण्याची आवश्यकता आहे. आजपर्यंत आपल्यासारख्या अनेकांच्या आधारावरच हा वर्धिनीच्या कामाचा गोवर्धन उचलून धरला आहे. यापुढील काळातही आपला व आपल्या स्नेहपरिवाराचा वाढता सक्रीय सहभाग या कामात राहील असा विश्वास आहे. या विश्वासामुळेच अशा प्रकल्पांसाठीची आर्थिक चिंता कार्यकर्त्यांच्या मनावरचे दडपण थोडे हलके नक्की करते. कारण हे काम केवळ देणग्यांवरच चालते. आपण कोणतेही शासकीय अनुदान घेत नाही हे आपण जाणता.

वर्धिनीच्या संस्कारांप्रमाणे या साऱ्या आर्थिक विषयाचा लेखा जोखा समाजाला देणे हे आद्य कर्तव्य आहे. गतवर्षीच्या एकूण खर्चाच्या ९४.५४% खर्च हा थेट उद्दिष्टांवर तर केवळ ५.४६ % खर्च हा व्यवस्थापन व इतर गोष्टींवर झाला आहे.

| अ.क्र. | विषय | एकूण खर्च | एकूण टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | मूळ उद्देश खर्च | १,१२,६५,३४२.७२ | ९४.५४% |
| २. | प्रशासकीय खर्च | ६,४९,४६१.०० | ५.४६% |
| | **एकूण खर्च** | **१,१९,१४,८०३.७२** | **१००%** |



वर्धिनीच्या वाटचालीतील स्मरणात राहतील अशा काही मार्गदर्शक, देणगीदार आणि कार्यकर्त्यांचे आप्तेष्ट यांचे गतवर्षात निधन झाले. वर्धिनी त्या सर्व मान्यवरांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे. या व्यक्तींचा अल्प परिचय देत आहोत.



*** डॉ. जगन्नाथ वाणी –** कॅनडा सरकारच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित डॉक्टर जगन्नाथ वाणी यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. विदेशात राहूनही ज्यांचे आपल्या देशाकडे, आपल्या माणसांकडे, देशातील सामाजिक प्रश्नांकडे आणि असे प्रश्न आपल्या परीने सोडवण्याचा धडपडाट करणाऱ्या व्यक्ती आणि संस्था संघटनांकडे अत्यंत आत्मियतापूर्वक लक्ष होते अशा एका देशाभिमानी व्यक्तीला आपण सारे मुकलो आहोत.

त्यांच्या याच स्वभाव विशेषत्वामुळे त्यांचा 'स्व'–रूपवर्धिनीशी सुमारे तीस वर्षांपूर्वी ऋणानुबंध जुळला. त्यानंतर जेव्हा जेव्हा आणि ज्या ज्या माध्यमातून वर्धिनीला मदत करणं शक्य आहे त्या पद्धतीने ते वर्धिनीला सहाय्य करीत होते. धर्माच्या भिंतीपलीकडे जाऊन आणि विशेषतः महिलांच्या सबलीकरणासाठी वर्धिनी करीत असलेल्या उपक्रमांचे त्यांना विशेष कौतुक होते. अशाच एका यशकथेचे त्यांनी चित्रण करून एक शॉर्ट फिल्म बनवली होती. त्याच्याच प्रेरणेने कॅनडा स्थित निलेश काविया आणि त्याची पत्नी सोनल काविया रजा घेऊन भारतात आले होते आणि त्या दोघांनी वर्धिनीच्या आजोळ प्रकल्पात सहा महिने काम केले होते.

व्यक्तिगत/कौटुंबिक जीवनात आलेल्या अडचणीने खचून न जाता उलट अशा प्रकारच्या अडचणी येणाऱ्या लोकांचा विचार करून त्यांनी स्किजोफ्रेनियासारख्या आजाराने ग्रस्त लोकांसाठी पुण्यात एक संस्था सुरू केली. या विषयासंबंधी जनप्रबोधन व्हावे म्हणून एका चित्रपटाची निर्मिती केली होती. मातृभाषा हाही त्यांचा एक अत्यंत आग्रहाचा आणि अभिमानाचा विषय होता आणि एका स्वतंत्र संस्थेच्या माध्यमातून ते मराठी भाषा विकासाचे काम करीत होते.

प्रत्येक क्षणी समाजाला उपयोगी कसा पडू शकेन असा विचार करणाऱ्या आणि तसेच जगलेल्या एका थोर व्यक्तीला आपण सारे मुकलो आहोत. या प्रसंगातून सावरण्याची ताकद श्री परमेश्वराने त्यांच्या कुटुबियांना द्यावी अशी त्याच्या चरणी प्रार्थना.

*** डॉ. द. ना. धनागरे –** आंतरराष्ट्रीय ख्यातीचे ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरु व विद्यार्थीप्रिय प्राध्यापक डॉ. द. ना. धनागरे यांचे ७ मार्चला निधन झाले. सरांचा वर्धिनीच्या उपक्रमांमध्ये अत्यंत आपुलकीने सहभाग असायचा.

*** श्री. मुकुंद कुलकर्णी –** विधान परिषदेच्या पुणे विभागीय शिक्षक मतदार संघाचे माजी आमदार मुकुंद कुलकर्णी यांचे (वय ९०) वृद्धापकाळाने निधन झाले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या केंद्रीय कार्यकारिणीचे ते प्रतिनिधी होते. त्यांनी शिक्षकांची चळवळ उभी करण्यात आयुष्य वेचले. देशातील शिक्षण व्यवस्था सुधारण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा होता.



तनमनधन सर्वस्व समर्पुन । ध्येयास्तव झिजविणार जीवन ।
विश्रांतीचे विचार सोडुन । क्रांतीने स्वातंत्र्य देविचे । घुमविणार प्राकार।।

*** गानसरस्वती किशोरीताई आमोणकर –** थोडे थोडके नव्हे तर साडेपाच तप शास्त्रीय गायकीने रसिकांच्या मनात अधिराज्य गाजवणाऱ्या किशोरीताईंचे वयाच्या ८४ व्या वर्षी अकस्मात निधन झाले.

*** डॉ. वसंत सीताराम तथा अण्णा ताम्हणकर –** ज्ञानप्रबोधिनीचे कार्याध्यक्ष श्री. अण्णा ताम्हणकर यांचे दीर्घ आजाराने ९ मे रोजी निधन झाले. अण्णांनी ग्रामीण भागातील तरुणांना प्रशिक्षण देऊन उद्योजक म्हणून उभे करण्यासाठी १९६९ ते १९८२ या काळात अथक परिश्रम घेतले. तसेच शिवगंगा, गुंजवणी परिसरात ग्रामविकासाची पायाभरणी केली. सोलापुरात त्यांनी प्रबोधिनीच्या रुपाने शिक्षण व संस्कार केंद्र उभे केले. उस्मानाबाद जिल्ह्यातील हराळी गावी गुरुकुलाची उभारणी केली. शिक्षणक्षेत्राशिवाय त्यांनी दारुबंदी, मराठवाड्यातील भूकंपग्रस्तांचे पुनर्वसन, शेतकऱ्यांसाठी निरनिराळे उपक्रम ह्याही विषयात काम केले. वर्धिनीच्या कार्यकर्त्यांना त्यांचे सतत मार्गदर्शन होत असे.

* सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार **श्री. मंगेश तेंडुलकरांचे** निधन झाले. 'स्व'–रूपवर्धिनीतील वर्धकांना शिबिरातून त्यांचे सतत मार्गदर्शन होत असे. तामिळनाडूत झालेल्या त्सुनामीच्या प्रलयानंतर वर्धिनीचे कार्यकर्ते तिकडे मदतकार्यासाठी जाणार होते. तेव्हा त्यांनी पटकन 'त्सुनामीच्या लाटांमधून नवीन वर्षाचे स्वागत करणारे हात' असे प्रेरणादायी चित्र इतर बोलक्या व्यंगचित्रांबरोबर वर्धिनीच्या कार्यकर्त्यांना काहीही मानधन न घेता स्वाधीन केले. वर्धिनी त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे.

* वैश्विक किरणांच्या संशोधनातील योगदानाबद्दल ओळखले जाणारे प्रसिद्ध शास्त्रज्ञ पद्मविभूषण पुरस्कारित **प्रा. यशपाल** यांचे वयाच्या ९० व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले.

* प्रसिद्ध शास्त्रज्ञ आणि भारतीय अवकाश संशोधन संस्थेचे (इस्रो) माजी अध्यक्ष **प्रा. यु. आर. राव** (वय ८५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. 'आर्यभट्ट' हा भारताचा पहिला उपग्रह विकसित करण्यात, 'चंद्रयान–१', 'मंगलयान' या तसेच 'आदित्य' या सौरमोहिमेमध्ये त्यांचा सहभाग होता. त्यांच्या जाण्याने देशाने कुशल आणि द्रष्टे वैज्ञानिक नेतृत्व गमावले आहे.

* देवदासी प्रथेविरोधात आयुष्य वाहिलेले आणि बेरड, रामोशी समाजाच्या उद्धाराचा ध्यास घेतलेल्या **डॉ. भीमराव गस्ती** यांचे (वय ६७) निधन झाले. 'स्व'–रूपवर्धिनीच्या कार्यक्रमांतून, भेटींमधून कार्यकर्त्यांना त्यांचे सतत अनमोल मार्गदर्शन होत असे.

* माजी हवाईदल प्रमुख आणि १९६५ च्या युद्धातील विजयाचे शिल्पकार **मार्शल ऑफ द एअरफोर्स अर्जन सिंग यांना विनम्र आदरांजली.**


* बिलकेअर कंपनीतील सीएसआर हेड म्हणून काम पाहणाऱ्या **श्रीमती वंदनाताई सोवनी** यांचे अलिकडेच अल्प आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या सहकार्यामुळे राजगुरुनगरच्या परिसरातील १० खेड्यांमध्ये 'स्व'–रूपवर्धिनीचा 'फिरती प्रयोगशाळा' हा प्रकल्प गेल्या आठ–दहा वर्षांपासून चालू होता.

* 'स्व'–रूपवर्धिनीच्या हितचिंतक **श्रीमती नीलाताई गोपाळ देव** यांना २८ सप्टेंबर २०१७ रोजी वृद्धापकाळाने देवाज्ञा झाली. नीलाताई भारत इंग्लिश स्कूलमध्ये (शेठ हिरालाल प्रशाला) ग्रंथपाल होत्या. त्यांनी केलेल्या मृत्युपत्रात बुधवार पेठेतील राहती वास्तू 'स्व'–रूपवर्धिनीच्या कार्यासाठी दिली आहे.

* वर्धिनीचे हितचिंतक **श्री. संजय मोघे** यांचे हृदयविकाराने निधन झाले. वर्धिनी त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात

सहभागी आहे.

* **श्री. रामचंद्र सदाशिव भोसले उर्फ रामभाऊ भोसले** यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. वर्धिनीच्या चऱ्होली येथील विस्तारकामात त्यांचा सहभाग होता.



* **डॉक्टर बळवंत जोशी** हे मूळचे कर्नाटकातील जमखिंडीचे. धारवाड येथून शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी मुंबईमधून पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. प्रो. वेंकटरमण यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी 'Anthraquinone Colouring Matters' या विषयावरील पी.एच.डी. पूर्ण केली. पुढे इंग्लंड येथे नोबेल पुरस्कार प्राप्त प्रो. अलेक्झांडर टोड यांच्या मार्गदर्शनाखाली रसायनशास्त्रातील दुसरी पी.एच.डी.पूर्ण केली. CIBA या मुंबईतील संस्थेबरोबर त्यांनी केलेले औषधी वनस्पती आणि विशेषतः आयुर्वेदिक औषधांवरील संशोधन खूप मोलाचे ठरले. आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांच्या संशोधनाची दखल घेतली गेली. १९८२ पासून अमेरिकेतील वास्तव्यात त्यांनी विविध प्रकारचे संशोधनात्मक काम आणि लेखन केले. असे किमान २०० संशोधनपर लेख त्यांनी प्रसिद्ध केले. १९९६ पासून त्यांचा 'स्व'-रूपवर्धिनीशी संबंध आला. पत्नी आणि त्यांच्या नावाने वर्धिनीमध्ये शिष्यवृत्ती योजना सुरू झाली आणि त्याचा लाभ आजपर्यंत शेकडो वर्धक वर्धिकांना झाला. वृद्धत्वामुळे नुकतेच त्यांचे दुःखद निधन झाले.

* **डॉ. शांताराम केतकर** यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. विशेष म्हणजे वैद्यकीय कामातील सेवानिवृत्तीनंतर त्यांनी संघमाध्यमातून देशभर चालणाऱ्या सेवाप्रकल्पांचा सखोल अभ्यास करून तो 'सेवा सरितांचा अमृतकुंभ' या पुस्तकरूपात प्रकाशित केला. या पुस्तकात वर्धिनीच्या कामाचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला आहे. या कामातून वर्धिनीच्या कार्यकर्त्यांना त्यांचे विशेष मार्गदर्शन मिळाले.

* संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते व वर्धिनीचे मार्गदर्शक **श्री. डी. एस. उर्फ अप्पासाहेब वज्रम** यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.

* **डॉ. कमलाकर भदे,** आगरकर हायस्कूलचे कार्यकारिणी सदस्य यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. वर्धिनीच्या आगरकर शाळेत चालणाऱ्या भगिनी निवेदिता शाखेच्या उपक्रमांत त्यांचा मार्गदर्शक म्हणून नेहमी सहभाग असे.

* वर्धिनीच्या देणगीदार **श्रीमती स्मितताई भोळे** यांचे निधन झाले.

❖ ❖ ❖

# दैनंदिन शाखा आणि प्रकल्पांचे पत्ते व संपर्काच्या वेळा

**शाखा विभागपालक–श्री. विनोद बिबवे ✆ : ९८५०८९०८२२**

**शाखा विभागप्रमुख–**श्री. निलेश धायरकर ✆ : ९०२९०७४५२१

## भाग १ (पूर्व शहर विभाग)

**भागप्रमुख : श्री. शुभम जगताप** ✆ : ९७६३४७१३७२

| शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|
| **समर्थ रामकृष्ण शाखा** | बाबुराव सणस कन्याशाळा, २२/१, मंगळवार पेठ, पुणे – ११. | **कु. तुषार मुढे** ✆ : ९८२२८२२८९० |
| **स्वामी योगानंद शाखा** | एम. ई. एस. भावे हायस्कूल, (पेरुगेट) सदाशिव पेठ, पुणे – ३० | **कु. अजय सोमवारे** ✆ : ७७४३८६८२२९ |
| **स्वामी श्रद्धानंद शाखा** | म. गांधी विद्यालय घोरपडे पेठ, पुणे – ४२ | **कु. योगेश नराल** ✆ : ७३५०१४११४० |
| **वीर अभिमन्यू बालशाखा** | ‘स्व’–रूपवर्धिनी वास्तू २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे – ११ | **कु. रोनक पवार** ✆ : ७४४८१०६६०४ |

## भाग २ (बिबवेवाडी विभाग)

**भागप्रमुख : श्री. दीपक भोरेकर** ✆ : ९९६०९७५२०९

| शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|
| **स्वामी अखंडानंद शाखा** | सिताराम आबाजी विद्यालय, बिबवेवाडी, पुणे – ३७ | **कु. शुभम शिंदे** ✆ : ८००६२९४२५० |
| **स्वामी दयानंद सरस्वती शाखा** | विश्वकर्मा विद्यालय, अप्पर इंदिरानगर, पुणे ३७ | **कु. किशोर बेंडगे** ✆ : ७०६६०७३३५० |
| **स्वामी शिवानंद शाखा** | अरण्येश्वर विद्यामंदिर, पद्मावती, पुणे–९. | **कु. अनस शेख** ✆ : ९८२२२३५२८७ |
| **धर्मवीर शंभू राजे शाखा** | प्रेरणा माध्यमिक विद्यालय, गणेश चौक, आंबेगाव पठार, पुणे ४६ | **श्री. अजय रायकर** ✆ : ९०९६८५९६२४ |

## भाग ३ (कर्वेनगर विभाग)

**भागप्रमुख : श्री. अशोक इंगवले ✆ : ९८८१५५८१८०, श्री. राहुल पायगुडे ✆ : ९६०४६६५३४२**

| शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|
| **स्वामी सुबोधानंद शाखा** | पंडित दिनदयाळ उपाध्याय विद्यालय, एरंडवणे गावठाण, पुणे - ५२ | **कु. गजानन केंडे** ✆ : ९७६३०५०५२६ |
| **स्वामी ब्रह्मानंद शाखा** | म.न.पा. शाळा क्र. १६८, हिंगणे खुर्द, पुणे - ५१ | **कु. केतन खेडकर** ✆ : ८३९०१४१५०३ |
| **राजर्षी शाहू शाखा** | सम्राट अशोक विद्यालय, कर्वेनगर, पुणे - ५२ | **श्री. सतीश बिराजदार** ✆ : ९१३९६०६०९८ |
| **नरवीर तानाजी मालुसरे शाखा** | बंडुजी खंडुजी विद्यालय, धायरी. पुणे ४१ | **कु. कौस्तुभ उनवणे** ✆ : ९७६७४८२०३१ |

## भाग ४ (गोखलेनगर विभाग)

**भागप्रमुख : श्री. हर्षल सोनार ✆ : ९६०४३००८६४**

| शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|
| **स्वामी विवेकानंद शाखा** | रामदासस्वामी माध्यमिक विद्यालय पांडवनगर, वडारवाडी, पुणे-१६ | **कु. अक्षय कदम** ✆ : ८४०८८२६९९५ |
| **स्वामी अभेदानंद शाखा** | वीर बाजीप्रभू विद्यालय गोखलेनगर, पुणे - १६ | **कु. राहुल इंगळे** ✆ : ७७९८४७७१२३ |

## भाग ५ (वर्धिका विभाग)

**भागप्रमुख : कु. अहिल्या धायगुडे ✆ : ८४१२८३८५८७**

| शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|
| **भगिनी निवेदिता शाखा** | आगरकर मुलींचे विद्यालय, रास्ता पेठ, पुणे - ११ | **कु. प्रियांका घारे** ✆ : ९७३०८३०१६९ |
| **क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले शाखा** | महर्षी शिंदे विद्यालय, घोरपडे पेठ, पुणे - ४२ | **कु. ऋतुजा नराल** ✆ : ९०११७१२५४१ |

**शाखा संपर्काच्या वेळा :** सोमवार ते शुक्रवार - सायं. ६ ते ८.३०, शनिवार- दु. ४.३० ते ७.३०, रविवार- स. ७.३० ते १०.३०

# शारदामणि महिला विभाग

महिला विभाग प्रमुख – **श्रीमती पुष्पाताई नडे** ✆ : ९८२२८२३७५७

महिला विभाग सहाय्यक – **सौ. सुनिता गंगावणे, सौ. मंजुषा कुलकर्णी**

'पाकोळी' बालवाडी प्रमुख – **सौ. संगीता शेडगे** बचतगट समन्वयक – **सौ. वनिता जगताप**

# उद्योगशिक्षण वर्ग

१) रुग्ण सहाय्यक (पुणे वर्ग) – **सौ. लता सत्तूर, कु. अतिशा भोसले**
   रुग्ण सहाय्यक (माले वर्ग) – **सौ. दुर्गा केणी, सौ. साधना सातपुते**

२) शिवण वर्ग (पुणे) – **सौ. संगीता पाटील, श्रीमती मनिषा कुलकर्णी**

३) साक्षरता प्रसार – **श्रीमती सुगंधाताई कबीर**

# प्रकल्पांचे पत्ते व संपर्काच्या वेळा

| **स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र** | **अभ्यासिका केंद्र** | **ग्रंथालय** |
|---|---|---|
| सौ. मनिषाताई नरडेकर | श्री. स्वप्निल काटकर | श्रीमती नीला कुडलिंगार |

**फिरती प्रयोगशाळा व ग्रामविकास प्रकल्प**

पालक – श्री सुनील कुलकर्णी ✆ : ९६०४०१६७१५

विभागप्रमुख – श्री. विश्वास कुलकर्णी ✆ : ८६००१०१३०७

# विस्तार विभाग

**शाखा उपक्रम – वर्धिनीची उपकेंद्रे**

१) लक्ष्मीकेशव प्रतिष्ठान, सातारा २) जनभारती प्रतिष्ठान, लातूर

३) सेतू चॅरिटेबल ट्रस्ट, कोल्हापूर ४) हिंद सेवा मंडळ, अहमदनगर

**रुग्ण सहाय्यक वर्ग**

१) योगेश्वरी हॉस्पिटल, दौंड २) भगिनी निवेदिता प्रतिष्ठान, सांगली

३) हरिजन सेवक संघाचे गांधी छात्रालय, बार्शी

**संपर्काच्या वेळा**

सोमवार ते शनिवार सकाळी ११.०० ते सायंकाळी ६.००

# असे उपक्रम... असे तास... असे दिवस

**संस्थेच्या इमारतीत चालणारे उपक्रम**

**सकाळी ६ ते दुपारी १२ वाजेपर्यंत**

१) बालवाडी : सकाळी ८ ते दुपारी १२
२) अभ्यासिका : सकाळी ६ ते दुपारी १२

**दुपारी १२ ते सायं. ६ पर्यंत चालणारे उपक्रम**

१) उद्योशिक्षण वर्ग, साक्षरता वर्ग : दुपारी १२ ते ४
२) अभ्यासिका : दुपारी १२ ते सायंकाळी ६

**सायं. ६ ते रात्री १२ पर्यंत चालणारे उपक्रम**

१) शाखाविभाग : सायं. ६ ते रात्री ९
२) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग : सायं. ६ ते रात्री ८
३) अभ्यासिका : सायंकाळी ६ ते रात्री १२

**आठवड्यातून एक दिवस चालणारे उपक्रम**

१) माता बालसंगोपन केंद्र (आरोग्य केंद्र) – प्रत्येक बुधवार
२) कुटुंब सल्ला केंद्र – प्रत्येक मंगळवार

**सोमवार ते रविवार चालणारे उपक्रम**

१) दैनंदिन शाखा प्रकल्प*
२) अभ्यासिका
३) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग

**सोमवार ते शनिवार उपक्रम**

१) बालवाडी
२) बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण
३) साक्षरता वर्ग
४) सहाय्यक परिचर्या वर्ग
५) शिवण वर्ग
६) बचतगट
७) कुटुंब सल्ला केंद्र
८) सेवावस्ती संस्कार वर्ग
९) फिरती प्रयोगशाळा / ग्रामविकास प्रकल्प**
१०) अभ्यासिका केंद्र

*हा प्रकल्प पुणे शहराच्या वेगवेगळ्या भागातील शाळांमध्ये संध्याकाळच्या वेळात चालतो.
** हा प्रकल्प पुणे व परिसरातील ४० शाळांमध्ये चालतो.
उर्वरित सर्व प्रकल्प संस्थेच्या इमारतीत त्यांच्या त्यांच्या वेळांमध्ये चालतात.

**कार्यालय विभाग**

श्री. निशिकांत भालेकर, कु. स्मिता कुलकर्णी, श्रीमती प्रगती तांबट,
श्रीमती नीला कुडलिंगार, श्री. अशोकराव चिपळूणकर
( २६१२१७०४, २६१३४३१० )

**कार्यालय**

२२/१, मंगळवार पेठ,
पारगे चौक, पुणे – ४११०११

**संपर्क**


सोमवार ते शनिवार,
दु. ११.३० ते सायं. ५.३०



## प्रार्थना



नमस्कार देवा तुला आमुचा हा
करी आमुची मायभूमी महा ।।



हिचे रूप चैतन्यशाली दिसावे
जगाला कळावी हिची थोरवी ।
स्मरूनी हिच्या त्या कथा अन् व्यथाही
हिला न्यायचे रे पुन्हा वैभवी ।
अशा सर्व स्वप्नांस सामर्थ्य द्यावे
म्हणूनीच देवा नमस्कार हा ।। १ ।।



जनांचा प्रवाहो इथे चाललेला
सदा संस्कृतीच्या मुळापासुनी ।
पिढ्या नांदती भोवती बांधवांच्या
आम्ही भिन्न ना त्यांचियापासुनी ।
तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला
तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा ।। २ ।।



स्फुरो कल्पनाशक्ति अभ्यास-यत्ने
बनो शुद्ध बुद्धीही तेजस्विनी ।
शरीरास आरोग्य, संकल्प चित्ती
नि आत्म्यास इच्छा शुभाकांक्षिणी।
पदी धैर्य, बाहूत शौर्य स्फुरावे,
घडावी विवेकी कृती-ध्यास हा ।। ३ ।।



प्रभो तू चिदानंदरूपी असोनी
अणूरेणु ब्रह्मांड तू व्यापिले ।
तुझे अंश आम्ही, तुझ्या पूजनाचे
पहा दिव्य हे, ध्येय स्वीकारले ।
पुन्हा जन्म घेऊ, स्वराष्ट्रास ध्याऊ
प्रतिज्ञेस या तूचि साक्षी रहा ।। ४ ।।

**पराक्रमाची हीच वेळ, हा पुरुषार्थाचा काल असे । व्यक्तींतील परमोच्च गुणांच्या उत्कर्षाचें पर्व असे ।।**
**श्रीरामाची शक्ति पाठिशी, श्रीकृष्णाची नीति असे । शिवरायांच्या वारसामध्ये विजयाचे सामर्थ्य असे ।।**

# जनकल्याण रक्तपेढी, पुणे

**विभागीय रक्तसंक्रमण केंद्र**

१००३, शुक्रवार पेठ, स्वारगेट बस स्थानकाजवळ, पुणे ४.
दूरभाष – २४४४९५२७/२४४४४५०२




**गरीब व गरजू बालकांसाठी रक्तपेढीची विशेष सवलत योजना**

समाजातील गरीब व गरजू बालकांस सवलतीच्या दरात रक्तपिशवी मिळावी यासाठी जनकल्याण रक्तपेढीने ‘बालसंजीवनी’ ही योजना कार्यान्वित केली आहे. अशा बालकांसाठी जनता बँकेच्या कुठल्याही शाखेत खाते क्र. २२०१/८४७८६ या खात्यात किमान रु. १००० चे योगदान आपण देऊ शकता. आपले हे योगदान कुणाला तरी पुनर्जीवन देऊ शकते.

**बालसंजीवनी योजनेमध्ये अवश्य सहभागी व्हा !**

**अधिक माहितीकरिता संपर्क : ९८६०२२५४१०, ७३५०००२४६०**



CHEM-TECH **With Best Compliments From**

***M/s. Chemtech Laboratories Pvt. Ltd.***

**Testing-Laboratory for Oils, Fuels, Rubber, Plastics & various other chemicals**

Off. No. 501 to 504, Rajdhani Complex,
Pune-Satara Road,
Near Shankar Maharaj Math, Pune - 411009.
Tel. : 020-24366994/24377515, Telefax : 24366996
Email : chemtechlabs@yahoo.com



# नील इंजिनियर्स

**सिव्हील इंजिनियरींग,** *Construction*
**वॉटर अ‍ॅण्ड एनर्जी मॅनेजमेंट सर्व्हिसेस**

**श्री पराग लकडे**

फोन नं. ९४२२००११७४, ९८२२११७९३१

751, Kasba Peth,
Sattoti Chowk,
Pune 411 011

स्व-रूपवर्धिनीच्या कार्यास हार्दिक शुभेच्छा!!

# संपदा सहकारी बँक लि. पुणे.

मुख्य कार्यालय : ७१७ बुधवार पेठ, डी.आय.सी. बिल्डिंग, कसबा गणपती मंदिराजवळ, पुणे ४११ ००२.
फोन नं. : (०२०) २४४५६०८३, २४४५९७०८, २४४५१८३० फॅक्स : २४४९३२६१
ई-मेल : sampadabank@rediffmail.com वेब साईट : www.sampadabank.com

**संपदाची साथ म्हणजे संपन्नतेकडे वाटचाल!!**

**आठवी शाखा आपल्या सेवेत लवकरच कोंढव्यात**
मानाचा **'बँको पुरस्कार'** प्राप्त बँक
ऑडिट **'अ'** वर्गातील, लाभांश देणारी बँक

* आयकर, सर्व्हिस टॅक्स व व्हॅट इ. कर ऑन-लाईन भरण्याची सुविधा
* RTGS / NEFT द्वारे त्वरित पैसे पाठविण्याची सोय
* CBS द्वारे कोणत्याही शाखेतून व्यवहार

| | | |
|---|---|---|
| **आनंद देशपांडे** | **अप्पाजी आपटे** | **सीए विवेक मठकरी** |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

*With Best Compliments From*

# M/S KBC Systems

- **Cold Storage and Refrigeration Engineers**
- **Manufactures of Surface Coating Systems**
- **Authorized Distributor for TTK Healthcare Ltd.**
- **Panipuri and other Fryums product for Maharashtra**

| | |
|---|---|
| **Vijay Bane** | **Satish Chapekar** |
| 9422301700 | 9422031071 |

*With Best Compliments From*

**THE POONA MOTOR GOODS TRANSPORT**

❖ ***Fleet-Owners & Transport Contractors***
❖ ***Full load and part load service for Pune to Bombay & Vice Versa***
❖ ***Full truck load service for Maharashtra & Gujrath State***

❖ ❖ ❖

**Head Office :** 780, Sadashiv Peth,
Pune 411 030.
Phone : 24473222, 24477621, 24476914

❖ **Branch** ❖

137, Transportnagar, Sector 23, Nigdi, Pune 44.
Phone : 27656925, 27656935

❖

13 B, Sadashiv Cross Lane, Kandewadi,
Girgaon, Mumbai 4,
Phone : 23822538, 23862210

❖

Ramraj Yadav Chal, Gala No. 2,
90 Ft. D.P. Road, Sakinaka,
Near Ganesh Temple, Andheri, Mumbai 400 072,
Phone : 28513018

हार्दिक शुभेच्छा !

**श्री संतोष सेल्स्**

***Dryfruits & Spices***

३४१, मार्केटयार्ड,
पुणे-३७

☎

२४२७२०७५, २४२६०५६८
मो. ९८२३०९४२४९

हार्दिक शुभेच्छा !

**मनकर्णिका**

**With Best Compliments From**

**PROTOTYPE ENGG. CO.**

***Govt. Approved Valuers for Plant Equipment/Machinery Consulting / Chartered Engineers***

**Tel. : 22662496, 22631214,**
**Cell : 9820302436**
**E-mail : vijayswar@hotmail.com**




## जनता बँकेच्या सहाय्याने
## बँकिंग व्यवहार एका क्लिकवर...
## केव्हाही, कोठूनही!

- अत्यंत सोपी, गतिमान आणि सुरक्षित सेवा
- कोणत्याही बँकेच्या बचत खाते, चालू खाते अशा खात्यावर रक्कम पाठविणे सहज शक्य
- आपल्या खात्यावरून इलेक्ट्रीसिटी, टेलिफोन, मोबाईल अशा सर्व घरगुती बिलांचे पेमेंट शक्य
- मुदत ठेव, आवर्त ठेव, चेकबुक विनंती अशा सर्व व्यवहारांची सुविधा
- इंटरनेट बँकिंगसाठी कोणतीही भौगोलिक मर्यादा नाही
- या व अशा अनेक अद्ययावत सुविधांसह...

*अटी लागू

**जनता बँक JANATA BANK**

जनता सहकारी बँक लि., पुणे (मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक)

I.S.O. 27001 आणि I.S.O. 9001 प्रमाणित
डेटा सेंटर असलेली सहकारी बँक

मुख्य कार्यालय : १४४४, शुक्रवार पेठ, थोरले बाजीराव मार्ग, पुणे ४११००२. फोन : ०२०-२४४५३२५८ / ५९
टोल फ्री क्रमांक : 1800 233 3258 (बँकेच्या सुट्टीचे दिवस सोडून) www.janatabankpune.com

# NOVEL
## SEWING MACHINES

Reg. TM No. 533716
Since 1955

Mark of a Quality Sewing Machine

**FOR HOME & INDUSTRIAL USE SEWING MACHINES**




Delux Model




Link Model



Designer Auto Zigzag Portable Models



TA-1 Umbrella Model



NL 1377
Chainstitch Buttonstitch with 2 type operation Machine



Designer Model (with chain & gear)






NL-737/747/757
Novel 3/4/5 Thread High Speed Machine Overlock



95 T - 10 Model

NL - 5550
Single Needle Lockstich High Speed Auto Lubrication Machine Complete Set.



NL-781
Button Hole Machine

# NOVEL SEWING MACHINES

777, Raviwar Peth, Pune - 411002. | Tel : 020 - 24458207. 24458318 Fax : 24472797 Email : novelsm@gmail.com
Tel. : - 020 - 24464946 / 47, Fax : 24461895. | Email : novel.bharat@gmail.com
Pimpri : 206, Mumbai Pune Road, Pimpri Chowk, Pimpri, Pune - 18. Tel : 27426853. 27424504. email : novel.pimpri@gmail.com
Kolhapur : 464, Shahu Rd., Shahupuri, Kolhapur - 01. Tel : 0231 : 2657115 / 2653528 / 2652365.
Website : www.novelsewingmachines.com

**Best Compliments From -**


# M/s. Baldota Samal & Asso.

"Krutanjali" Shangrila Restaurant Lane,
65/20, Erandavana, Law College Road,
PUNE - 411 004

**Contact**

**Tel. : 2543 3000 / 3200**

**Mobile : 99223 - 00044**


With Best Compliments From
M.B. GHARPURAY ENGINEERS
&
CONTRACTORS (REGD.)
838, Shivajinagar,
Pune - 411 004.
Tel. : (020) 25655483, 25652217
Fax : (020) 25654186

*WITH BEST COMPLIMENTS FROM : DEODHAR GROUP*

## PRODUCT COATING

*An ISO 9001 : 2008 Certified Company*

*Manufacturing & Supply of Resin coated sand, shell cores & core assemblies*

## DECENT DECORATORS

*For Quality Coatings*

*Industrial and Decorative painting contractors Civil Engineers & Contractors*

## DECENT INTERIORS & DECORATIVE PVT. LTD.

*Interior Decorators & Furniture Contractors*

## JANSEVA BHOJANALAYA

*Maharashtrian Dining Hall*

## MEHFIL CATERING SERVICES

## HARSHAL HALL

*Two Marriage Halls with Ample Parking Space*

## RAMRAI

*Farming, Horticulture, Nursery*

**Chinchwad Office :** Plot No. 81, D-III Block, MIDC, Chinchwad, Pune 411019.
Telephone : 27473730, Web : deodhargroup.com
Email : product_coating@yahoo.com,
decentdecoratorspune@gmail.com

**Pune Office :**

759/55, B, Deccan Gymkhana, Pune 411004

Telephone : 25678217, 25679488, Fax : 25679497


With Best Compliments From
CADMOSIL CHEMICALS PVT. LTD.
(Mfg. of Photo Resists & Allied Chemicals)
A-58, MIDC-Latur
Latur 473531.
www.imagetechindia.com

# With Best Compliments from

autohangar
Dealer for Mercedes-Benz Passenger Cars

metromotors
Auto Hangar Division

**PRABHADEVI:**
Ground Floor, Electric Mansion, Appasaheb Marathe Marg, Mumbai - 400 025.
Tel.: (022) 6743 4360-64, Fax: (022) 6743 4365.
**Email: info@autohangarindia.com • Website: www.autohangar.in**

**HUGHES ROAD (SOUTH MUMBAI):**
Metro Motors Auto Hangar Division, Motor House, Ground Floor,
66 Hughes Road, Mumbai - 400 007. Tel.: (022) 6612 3500, Fax: (022) 6612 3535.
**Email: info@metromotors-autohangar.com • Website: www.metromotors.in**

**ANDHERI (W):**
Aston Building, Ground Floor, Suburban Diagnostic Centre, Near Lokhandwala Circle,
Shastri Nagar, Mumbai - 400 053. Tel.: (022) 6710 6660-63, Fax: (022) 6710 6664.
**Email: info@autohangarindia.com • Website: www.autohangar.in**

**CORPORATE SALES:**
Mezzanine Floor, Rajan House, Appasaheb Marathe Marg, Prabhadevi, Mumbai - 400 025.
Tel.: (022) 6612 3870, Fax: (022) 6612 3899.
**Email: info@autohangarindia.com • Website: www.autohangar.in**

**NAGPUR:**
Plot No. C-40 B, Central MIDC Main Road, MIDC Hingna, Nagpur - 440 028.
Tel.: (07104) 238180-83.
**Email: customerconnect@autohangarindia.com • Website: www.autohangar.in**

**RAIPUR:**
P. C. No. 104, Village Dumartalab, Mohaba Bazaar, Next to Hotel Picadaly,
G. E. Road, Raipur - 492 099. Tel.: (0771) 6537801-08.
**Email: customerconnect@autohangarindia.com • Website: www.autohangar.in**

# ‘स्व’ - रूपवर्धिनी म्हणजेच

* सहवासातून शिक्षण व शिक्षणातून संस्कार घडवणारी संस्था
* व्रती शिक्षक आणि तळमळीचे कार्यकर्ते यांच्याद्वारा हेतुप्रधान शिक्षण देणारी एक संस्था
* आपुलकीने व जिव्हाळ्याने मुलांचे प्रश्न हाताळणारा, सर्वांना आपलासा वाटणारा परिवार
* विपरीत परिस्थितीवर मात करायला शिकविणारी कार्यशाळा
* राष्ट्रीय चारित्र्य, सार्वजनिक शिस्त आणि सामाजिक बांधिलकी जोपासणारा एक ‘राष्ट्रीय प्रकल्प’
* परिस्थितीचा शाप आणि वातावरणाचा ताप असला, तरीही सदैव प्रगतीचाच मार्ग दाखवणारी, आपुलकी निर्माण करणारी संस्था
* अर्थात, ही पूर्ण वेळाची शाळा नाही; शाळेला पर्यायही नाही. विविध उपक्रमांद्वारे एकही दिवस सुट्टी न घेता वर्षभर सायंकाळी राबविला जाणारा हा एक अनौपचारिक शैक्षणिक प्रकल्प आहे.

---

'SWA'-ROOPWARDHINEE MONTHLY MAHMAR / 2007 / 26609 24 / 12 / 2008
Concessional postage under Regd. No. PCW / 148 / 2017-2019
DT. of Publication - 25th every month
Dt. of Posting - at PSO Kasba Peth, Pune on 25th of every month

प्रति, ______________________

______________________

______________________

हे मासिक ‘स्व’रूपवर्धिनी संस्थेच्या मालकीचे असून संस्थेच्या वतीने मुद्रक व प्रकाशक श्री. शिरीष रामचंद्र पटवर्धन,
यांनी प्रबोध उद्योग, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे – ४११००२ येथे छापून २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे –११ येथे प्रसिद्ध केले.